संकेत कोश

श्री. शा. हणमंते

मूल्य रुपये पांच

प्रकाशनाचे कामीं मिळालेला पुरस्कार

रु. २५० पुणें विद्यापीठ, पुणें

रु. १०० सौ. गोपिकाबाई हणमंते, सोलापूर

रु. २५ सौ. कमलाबाई बेंद्रे, सोलापूर

रु. २५ सौ. निर्मलाबाई किणीकर, सोलापूर

श्रीकृष्ण जयन्ति
निजश्रावण कृ. ८, शके १८८०

दि. ६ सप्टेंबर १९५८

प्रकाशिका :
सौ. कमलाबाई बेंद्रे
गोगटे बंगला
मुरारजी पेठ, सोलापूर

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणें २

यक्षप्रश्न:—

—दैवानें दिलेला मित्र कोण ?

*युधिष्ठिराचें उत्तर:—*पत्नी

जिनें मला हा ग्रंथ लिहिण्याइतकें स्वास्थ्य दिलें]

सौ. गोपिकाबाई हणमंते

यांस—

प्रस्तावना

[लोकनायक **माधव श्रीहरि अणे**]

श्रीधरपंत हणमंते यांनीं 'संकेत–कोश '–(संख्यात्मक) या त्यांच्या नवीन ग्रंथास प्रस्तावनेदाखल मीं चार शब्द लिहावे अशी मे महिन्यांत माझें पुणें मुक्कामीं वास्तव्य असतांना इच्छा प्रदर्शित केली, व त्यांच्या त्या इच्छेस माझे सन्माननीय मित्र व महाराष्ट्रांतील एक वेदाभ्यासी थोर पंडित श्री. विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनीं मजकडे मुद्दाम भेटीस येऊन पुष्टी दिली, त्यामुळें मला श्री. श्रीधरपंतांस रुकार देण्याशिवाय गत्यंतरच राहिलें नाहीं. त्यांच्या पुस्तकाचें संपूर्ण मुद्रित मजकडे आल्यासहि बरेच दिवस झाले. प्रस्तावना लिहून पाठविण्यास विलंब झाला, याबद्दल मी ग्रंथकर्त्यांची क्षमा मागतों.

२. ग्रंथकार श्री. श्रीधरपंत हणमंते हे एक व्यासंगी लेखक आहेत. त्यांनीं आतांपर्यंत लिहिलेल्या ग्रंथांत ' हिंदुस्थानचें संक्षिप्त गॅझेटियर ' व ' व्यवहार आणि शिष्टाचार ' हे ग्रंथ लोकप्रिय झाले आहेत.

३. मराठी भाषा हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या राजमान्य चौदा मुख्य भाषांत कोशग्रंथदृष्ट्या अधिक समृद्ध आहे असें मला वाटतें. व्याकरण–विपुलता व कोशसंपन्नता हे भाषेच्या प्रतिष्ठेचे आधारस्तंभ व तिच्या भावी प्रगतीचे मार्गादिग्दर्शक दीपस्तंभच होत. व्याकरण व कोश हीं भाषा अधिकाधिक सुसंस्कृत व प्रौढ आणि व्यापक विचारवाहनक्षम करण्याचीं महत्त्वाचीं साधनें आहेत. वेदपुरुषाच्या षडंगांत व्याकरण व ' निघण्टु ' यांचा समावेश महत्त्वाचीं अंगें म्हणून करण्यांत आला आहे, हें विद्वज्जनांस विदित आहेच. यास्काचार्यांनीं आपला पूर्वोत्तर षट्करूप द्विखंडात्मक द्वादशाऽध्यायी निरुक्त ग्रंथ, ' निघण्टु 'या शब्द समान्मायावर भाष्य म्हणून रचला. यावरून शब्दकोशाचें महत्त्व प्राचीन वैदिक संस्कृति-प्रवर्तक ऋषींना केवढें वाटत होतें याची आपणांस कांहींशी कल्पना करतां येण्यासारखी आहे. पाणिनीय गणपाठ, धातुपाठ हे देखील विशिष्ट दृष्टीनें तयार झालेले शब्दकोशच आहेत. किंबहुना ' गण ' शब्दाचा

अर्थ शब्दसंग्रह किंवा वाक्यसंग्रह किंवा वैदिक तत्त्वसंग्रह असा असावा. या सर्व कोशांचें ज्ञान वेदार्थ उपबृंहित करण्यास उपयोगी असल्यामुळें त्याचा अभ्यासहि वेदवेत्त्यांस करावा लागत होता. ‘ गणानां त्वा गणपतिम् ’ या प्रसिद्ध मंगलाचरणाच्या वैदिक मंत्रांतील ‘गण ’ शब्द अशा कोशाचाच वाचक असावा. त्या मंत्रांत गणपति देवतेच्या अनुचर-समूहाचा वाचक तो नाहीं असें मला वाटतें; म्हणूनच गणपति अथवा ब्रह्मणस्पति या देवतेचें दुसऱ्या एका ऋचेंत ‘ बृहस्पतिं सर्वगणम् ’ असें वर्णन करून सर्व तऱ्हेचे कोश जाणणारी गणपति किंवा ब्रह्मणस्पति हीच एक देवता आहे अशी तिची विशेष स्तुति केलेली आहे. प्राचीन काळा-पासून भाषेच्या अध्ययनाची या देशांत जी परंपरा चालत आली आहे तींत कोशनिर्मिति हें त्याचें एक प्रधान अंग आहे. वैदिक कालानंतरच्या काळांत देखील संस्कृत भाषेंत निर्माण झालेली कोशसमृद्धि विपुल आहे, हें विद्वानांस सांगण्याची जरूर नाहीं.

४. कोशनिर्मितीचें किंवा व्याकरण-रचनेचें कार्य हें जितकें महत्त्वाचें तितकेंच बिकट व दीर्घोद्योग आणि दृढव्यासंगाचें आहे. कांहीं विशिष्ट हेतु मनांत धरून कोशरचनेस जो बसतो त्याला वाङ्मयमहोदधीचें मंथन करून आपलीं रत्नें मिळवून तीं एकत्र करावीं लागतात; म्हणून बृहत्-कोशरचनेसारखीं कार्यें एकट्या-दुकट्याच्या हातून होणें फार कठीण असतें.

५. मराठींत हें कार्य श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांच्या राजव्यवहारकोश-रचनेपासून सुरू झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्रजी भाषेचा अभ्यास जसजसा वाढला तसतसा त्यांच्या वाङ्मयांत असलेल्या भिन्न भिन्न कोशांचा परिचय आपल्याकडील विद्वानांस होऊं लागला; व तत्सदृश ग्रंथनिर्मिति करण्याची इच्छाहि त्यांच्यांत उत्पन्न झाली. संस्कृत भाषेच्या पंडितांनीं पूर्वकालीं केलेल्या कोशांत शब्दसंग्रह प्रायः विषयवर्गीकरणपद्धतीवर केलेला दृष्टीस पडतो. वर्णानुक्रमानें शब्दसंग्रह किंवा कल्पनासंग्रह करण्याचा प्रघात त्यांच्या काळांत असल्याचें मला तरी निदान माहीत नाहीं. याशिवाय तें कोशवाङ्मयदेखील कंठगत करण्यास सुलभ जावें म्हणून प्रायशः पद्यात्मक म्हणजे श्लोकबद्ध असेंच होतें. इंग्रजांच्या किंवा पाश्चात्यांच्या उत्तेजनानेंच प्रथमतः वर्णानुक्रमानें जुन्या मुंबई इलाख्यांत

शब्दकोश रचण्याचा उपक्रम झाला; व मोल्स्वर्थ, कँडी इत्यादिकांच्या नांवानें प्रसिद्ध असलेले मराठी भाषेचे कोश हे प्रथमतः मुख्यत्वें करून इंग्रजांना आमच्या भाषेचा अभ्यास करण्यासाठींच लिहिले गेले होते, म्हणून इंग्रजी-मराठी व मराठी-इंग्रजी अशा द्विभाषिक रूपांत ते प्रसिद्ध करण्यांत आले होते, असें मला वाटतें.

पण कोशरचना ही केवळ शालीय शिक्षण घेणाऱ्या व देणाऱ्याकरितां नसून ती भाषा बोलणाऱ्या यच्चयावत् जनतेच्या उपयोगासाठीं व तिच्या ज्ञानवृद्धीसाठीं करावयास पाहिजे, हा विचार विद्वानांत निर्माण होऊन मराठी भाषेचे कोश केवळ मराठींतून अर्थ देणारे असे रचण्यांत येऊं लागले. कोश हें ज्ञानाचें साधन आहे, हें ठरल्यावर कोणत्याहि विषयाचें ज्ञान त्या विषयावर कोश रचून देण्याचाहि पायंडा मराठींत पडायला लागला. इतकेंच नव्हे तर विश्व-ज्ञान-कोशद्वारें तें लोकांस देशी भाषेंतून देण्याचा मान, भारतांत मराठी भाषेचे जाडे पंडित—ज्यांना लोक मराठीचे डॉ. जॉन्सन असें विनोदानें पण एकपरी यथार्थतेनें म्हणत त्या माझे दिवंगत मित्र डॉ. श्रीधर वेंकटेश केतकर यांनीं मराठी ज्ञानकोश हा प्रचंड ग्रंथ प्रसिद्ध करून मराठी भाषेस मिळवून दिला. कोणी जर मराठी वाङ्मयासंबंधाचा विभूतियोग लिहायला लागला, तर त्याला कोशकर्त्यांत 'श्रीधरः कोशकारेषु' असें वाक्य घालून त्यांच्या महत्कृत्याबद्दलचा आपला आदर व्यक्त करणें भाग पडेल.

६. विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री यांनीं तयार केलेले प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन चरित्रकोश हे तीन ग्रंथ त्यांच्या प्रचंड व्यासंगाची आणि लोकोत्तर उद्योगाची साक्ष देतात. भारताचा वेदकालापासून तों १९४० पर्यंतचा इतिहास या चरित्रकोशांत चरित्ररूपानें मोठ्या मार्मिक रीतीनें सांगितला गेला आहे. मराठींतील म्हणींचे व वाक्प्रचारांचेहि कोश तयार करण्यांत आले आहेत.

७. ज्याला न्याय म्हणतात, त्यांचाहि कोशरूपानें संग्रह करण्यांत आला आहे. न्यायांप्रमाणेंच संकेतांचाहि उपयोग प्रौढ वाङ्मयामध्यें वारंवार करण्यांत येतो. त्या संकेतांच्या मागें असणाऱ्या विशेष अर्थाचें जर स्पष्टीकरण झालें नाहीं तर वाचकांस त्या वाक्याच्या खऱ्या अर्थाचा

बोध होणें कठीण जाईल. तेव्हां त्यांचाहि संग्रह कोशरूपानें सार्थ अथवा स्पष्टीकरणासुद्धां उपलब्ध असणें हें भाषाभ्यासाच्या दृष्टीनें अवश्य आहे.

या ग्रंथांत संख्यात्मक संकेतांचाच संग्रह केला आहे. शून्यापासून १०८ पर्यंत ज्या संख्यांचे संकेत प्रायः ग्रंथांतून वा संभाषणांतून उल्लेखिले जातात त्यांचा या ग्रंथांत ग्रंथकर्त्यानें शोधपूर्वक संग्रह केलेला आहे. याशिवाय संकीर्ण या सदराखालीं १०० संख्येच्यावर असलेल्या 'चौऱ्यायशीं लक्ष योनि', 'अठरा पद्में वानर' अशासारख्या कांहीं थोड्या संकेतांचा निर्देश करून त्यासंबंधानें आधारभूत श्लोक उद्धृत केले आहेत. याशिवाय चार परिशिष्टांतून कांहीं शब्दसंकेत, कविसंकेत 'विविध संकेत' आणि इतर वरील सदरांत न बसणारे कांहीं संकेत 'संकीर्ण' या शीर्षकाखालीं देऊन ग्रंथकर्त्यानें ग्रंथाची व्याप्ति व उपयुक्तता वाढविली आहे. हा संख्यात्मक संकेतांचा कोश असल्यामुळें याची रचना वर्णानुक्रमानुसार न करतां संख्यांकानुक्रमानें म्हणजे १,२,३ या क्रमानें केली आहे, हें वाचकांस आढळून येईल.

८. संख्यात्मक संकेत जर माहीत नसले तर संस्कृतमधून अभ्यास करणाऱ्यास छंदःशास्त्र व ज्योतिषशास्त्र यांत संख्यांकांबद्दल योजिलेल्या परिभाषेचा बोध होणार नाहीं. उदाहरणार्थ, 'गायत्र्या वसवः, जगत्या आदित्याः, विराजो दिशः, त्रिष्टुयो रुद्राः' इ. यांत पिंगल नागानें आपल्या ग्रंथांतील संख्यात्मक परिभाषेचा उपयोग 'अष्टौ वसवः' या एका सूत्रानें केला आहे. वसु आठ आहेत, हा संकेत–निर्देश तत्सदृश इतर संख्यात्मक संदेशाचा प्रतीक म्हणून त्यांनीं वरील सूत्रांत केला आहे, व त्याला अनुसरून गायत्री, जगती, विराट्, त्रिष्टुप् इत्यादि छंदांतील पादांतील अक्षरसंख्या अंकानें न सांगतां वसु, आदित्य, दिशा, रुद्र या सांकेतिक अंकांनीं सांगितले आहेत. या पद्धतीमुळें सूत्रांतील ऱ्हस्वता कायम ठेवून अंकांची माहिती वाचकांस यथार्थतेनें देतां आली. कारण आठ वसु, बारा आदित्य, दहा दिशा, अकरा रुद्र इत्यादि संकेत वाङ्मयाभ्यासकांच्या परिचयाचे होते. ज्योतिष ग्रंथांतून पुष्कळदां संख्या-निर्देश वरील सांकेतिक शब्दांचा उपयोग करूनच करतात. संस्कृत ग्रंथांतून ग्रंथाच्या निर्मिति व समाप्तीच्या कालाच्या शकाचा निर्देश कित्येक ग्रंथकारांनीं केलेला आहे, पण त्यांत अंक व

आंकडे यांचा उपयोग न करतां संकेत शब्दांनींच केलेला आढळून येतो. लोकमान्य टिळकांनीं गीतारहस्याचें समर्पण करतांना कालनिर्देश "शाके मुन्यग्निवसुभूसंमिते शालिवाहने" असा केला आहे. त्याचा अर्थ शके १८३७ हा आहे. तेव्हां अभ्यासूंस व संशोधकांस संख्यात्मक संकेत व इतर संकेत यांचें यथार्थ ज्ञान अवश्य आहे, हें विस्तारानें सांगण्याची जरूर नाहीं.

९. कोश हे संदर्भ ग्रंथांत मोडतात. त्यांचा करमणुकीकरितां उपयोग होत नसतो. म्हणूनच अशा ग्रंथाचा ग्राहकवर्ग फार मर्यादितच असतो. परंतु संकेत–कोश किंवा चरित्र–कोश हे ग्रंथ असे आहेत कीं, विद्यार्थ्यांनीं फुरसतीच्या वेळीं अशा ग्रंथांचीं पानें सहज चाळलीं तरी त्यांचें मनोरंजनहि होईल व त्यांचा बहुश्रुतपणाहि वाढेल. भारतीय संस्कृतीविषयींच्या त्यांच्या ज्ञानांत त्यामुळें भर पडल्याशिवाय राहणार नाहीं. उदाहरण म्हणून जर त्यांनीं १८ या आंकड्याखालीं दिलेले संकेत वाचले तर त्यांना अज्ञात पण उपयुक्त अशी कितीतरी माहिती मिळेल. विशेषतः पान २११ वरील अठरा संख्याविशेष (महाभारतान्तर्गत) या सदराखालीं दिलेल्या माहितीकडे फक्त अंगुलिनिर्देश करतों. ती माहिती वाचणाऱ्यास महाभारत ग्रंथाविषयीं व त्याच्या निर्मात्या व्यास ऋषीविषयीं कौतुकपूर्ण आदर वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

१०. असले कोश म्हणजे आमच्या संस्कृतींतील बहुमूल्य रत्नांनीं भरलेले हंडेच होत. म्हणून वाङ्मयरूपानें आमच्या सांस्कृतिक वैभवाची ओळख करून देणाऱ्या ग्रंथकाराचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतों; व त्याच्या परिश्रमाचे मराठीचे सहृदय व रसिक आणि स्वाभिमानी वाचक आणि मराठी मुलखावर राज्य करणारीं शासनें हे त्याच्या या परिश्रममय सेवेचें योग्य आश्रय देऊन चीज करतील अशी आशा प्रगट करून आणि ग्रंथकर्त्यानें हा ग्रंथ मजकडे पाठविल्याबद्दल त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानून हें प्रस्तावनारूप स्वल्प विवेचन संपवितों.

सिव्हिल लाईन्स, नागपूर
दि. २४-८-५८

निवेदन

तरी न्यून तें पुरतें। अधिक तें सरतें।
करूनि घेयावें हें तुमतें। विनवितु असें॥ ज्ञानेश्वरी १-८०

व्यवहार आणि शिष्टाचार या आमच्या पुस्तकाची द्वितीयावृत्ति (सन १९४९) प्रसिद्ध करतांना व्यवहारांत कांहीं गृहीत गोष्टी म्हणजे संकेत असतात हें ध्यानांत आलें. तसे कांहीं संकेत त्याच पुस्तकांत देण्याचा प्रथम विचार होता, परंतु जसजसा संकेतविषयक अभ्यास होऊं लागला तसतसें या विषयाचें क्षेत्र संख्यात्मक व संख्येविरहितहि फार मोठें आहे असें आढळून आलें, म्हणून स्वतंत्र रीतीनें संकलित करून एक कोशच तयार करावा ही कल्पना आली व सतत अभ्यासानें ती दृढ झाली. या कल्पनेचें पर्यवसान म्हणजेच प्रस्तुतचा ग्रंथ होय. तो आज वाचकांपुढें ठेवण्यास आम्हास समाधान वाटत आहे.

मराठी भाषेंत चालू कोशयुगांत अनेक प्रकारचे कोश झाले आहेत, व होत आहेत. त्यांत अशा प्रकारच्या संकेत-कोशाची पण आवश्यकता आहे. चालू व्यवहारांत, तसेंच समाज, धर्म, संप्रदाय, शास्त्र वगैरेंत अनेक संकेत रूढ असतात. त्यांची एकत्र माहिती असावी, तसेंच त्या संकेतांच्या मागें असणाऱ्या विशेष अर्थाचें स्पष्टीकरणहि एकत्र उपलब्ध व्हावें म्हणून हा संकलनाचा उद्योग आवश्यक व उपयुक्त वाटला. अभ्यासू वृत्तीच्या रसिकांनाहि हा प्रयत्न आवडेल अशी खात्री आहे.

आपलें म्हणणें भाषेंत कितीहि शब्द घालून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला तरी एखाद्या शब्दाचे पुष्कळ अर्थ गृहीत धरण्याची आपल्याला संवय असते. तो गृहीत धरलेला विशेष अर्थ ठरलेला असला तरी सर्वांना सहज कळत नाहीं. अशा शब्दानें गृहीत धरला जाणारा विशेष अर्थ म्हणजेच संकेत. या अनेकविध संकेतांची या ग्रंथांत विशेष क्रमानें मांडणी केली आहे. त्यांचें जरूर तितकें स्पष्टीकरण शक्य तेथें मुळांतील समानार्थक अवतरणें त्या त्या ग्रंथांतून उद्धृत करून केलें आहे; अशा रीतीनें बऱ्याच दिवसांच्या परिश्रमानें हा छोटासा संख्यात्मक संकेत-कोश तयार केला आहे.

अशा प्रकारच्या कोशाचें कार्य मोठें किचकट आणि श्रमाचें असतें. त्याकरितां अनेक ग्रंथ विशेष दृष्टीनें चाळावे लागतात. इतकें करूनहि एकानें स्वीकारलेली पद्धत दुसऱ्यास पसंत पडेलच असें नाहीं. बरें, खपाच्या दृष्टीनें

अशा ग्रंथांना मागणी कमी. अशा स्थितींतहि कांहीं ज्ञानलालसा, कांहीं उपयुक्तता आणि आपल्या लिहिण्याबोलण्याला रेखीवपणा आणण्याचें साधन म्हणून असे प्रयत्न करावेसे वाटतात.

ग्रंथकारानें ग्रंथ लिहिल्यावर तो प्रकाशित न करणें म्हणजे बरें नव्हे, पण महाराष्ट्रांतल्या आर्थिक परिस्थितीची झळ आम्हासहि थोडीबहुत लागली असल्यानें प्रसिद्धीचें काम रेंगाळलें होतें; परंतु याकामीं पुणें विद्यापीठाकडून आर्थिक सहाय्य मिळाल्यानें प्रसिद्धीस त्वरित गति मिळाली त्याबद्दल आम्ही पुणें विद्यापीठाचे ऋणी आहों.

तसेंच आमच्या या प्रयत्नास सुदैवानें लोकनायक माधव श्रीहरि उपाख्य बापूजी अणे यांच्यासारख्या व्यासंगी व अधिकारी गृहस्थांची प्रस्तावना लाभली हेंहि आम्ही आमचें भाग्य समजतों, त्याचप्रमाणें विद्यानिधि श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांचेंहि बहुमोल मार्गदर्शन झालें हें नमूद करणें आमचें कर्तव्य आहे.

ग्रंथ छापला जात असतां संदर्भ शोधण्याच्या कामीं भारत इतिहास संशोधक मंडळ, मुक्तद्वार ग्रंथालय व केसरी-मराठा ग्रंथालय यांचें अमोल साहाय्य झालें. याबद्दल त्या त्या संस्थांचे व तेथील चालकांचे आम्ही आभारी आहों.

आनंद प्रेसचे उत्साही चालक श्री. य. गो. जोशी यांनीं सुबक छपाई केली व मुद्रित-शोधन-मंडळाचे कार्यवाह व आर्यभूषण मुद्रणालयांतील मुद्रित-शोधक श्री. य. ए. धायगुडे यांनीं मुद्रितें तपासलीं, त्यांचे व ज्यांनीं ज्यांनीं या कामीं उत्तेजन दिलें व साहाय्य केलें त्या सर्वांचे आम्ही आभारी आहों.

शेवटीं ज्याच्या कृपाप्रसादानें हें दीर्घकाल मनांत घोळत असलेलें कार्य आज हातावेगळें होत आहे, त्या श्रीशालाच वंदन करून आम्ही आमचें हें अल्प निवेदन येथेंच संपवितों.

श्रीकृष्ण जयन्ति, शके १८८०
गोगटे बंगला,
सोलापूर

श्रीधर शामराव हणमंते

ग्रंथ-संक्षेप

अ. रा. – अध्यात्म रामायण
अमर – अमरकोश
अग्नि – अग्निपुराण
ए. भा. – एकनाथी भागवत
क. क. – कथाकल्पतरु
क. गी. – कपिलगीता
का. नी. –कामंदकीय नीतिसार
कूर्म – कूर्मपुराण
कौ. – कौटिलीय अर्थशास्त्र
कृ. मा. – कृष्णामाहात्म्य
ग. पु. – गणेशपुराण
गरुड – गरुडपुराण
गी. र. – गीतारहस्य
गौ. सूत्रें – गौतम धर्मसूत्रें
च. सू. – चरक सूत्रस्थान
तैत्ति. – तैत्तिरीय ब्राह्मण
तत्त्व निज विवेक – तत्त्व निजबोध विवेक
तत्त्व चिं. – तत्त्व चिंतामणी
दा. बो. – दासबोध
नि. र. – निघंट रत्नाकर
देवी – देवी भागवत
पद्म – पद्मपुराण
प्र. को. – प्रबंधकोश
बृ. ना. – बृहन्नारदीय
ब्रह्म –ब्रह्मपुराण
भ. गी. – भगवद्गीता
भ. ब्राह्म – भविष्यपुराण
भा. प्र. – भावप्रकाश
भाग – भागवत
भा. रा. – भावार्थ रामायण
म. भा. – महाभारत.
मार्कंडेय – मार्कंडेयपुराण
मुक्तेश्वर – मुक्तेश्वर महाभारत
लिंग – लिंगपुराण
वि. स्मृ. – विष्णुस्मृति
वा. – वाग्भट
वृ. चा. – वृद्ध चाणक्य
वा. रा. – वाल्मीकि रामायण
वी. प्र. – वीरशैव प्रदीपिका
यो. सू. – योगसूत्रें
रा. गी. – रामगीता
रत्न दी. – रत्नदीपिका
रा. वि. – रामविजय
रा. पां. – राघव पांडवीय
रा. नि. – राजनिघंटु
शा. नि. – शालिग्राम निघंटु
शं. सं. – शंकर संहिता
सि. कौ. – सिद्धांत कौमुदी
सि. शि. – सिद्धांत शिखामणि
स्कंद – स्कंदपुराण
सु. – सुभाषित
हितो. – हितोपदेश
ज्ञा. – ज्ञानेश्वरी

संकेत - कोश

(संख्यात्मक)

शून्य — आकाशवाचक शब्द, पूर्ण.

१

एक अग्नि, एक सूर्य आणि एकच उषा — एकच अग्नि अनेक ठिकाणीं प्रज्वलित होतो, एकच सूर्य जगभर प्रकाश पाडतो व एकच उषा सर्व विश्व प्रकाशित करते. एकापासूनच हा सर्व पसारा झाला आहे. (ऋग्वेद ८–५८–२)

एक आत्मा — जगदात्मा.

एक चक्र — सूर्याचा रथ (प्रामाणिक हिंदी कोश)

एकतत्त्ववाद — या जगांत फक्त एकच सत्य तत्त्व आहे, मग तें भौतिक असो अथवा आध्यात्मिक असो. या तत्त्वज्ञानाविषयक मतास एकतत्त्ववाद म्हणतात. (म. ज्ञा. को. विभाग ९)

एक तिथि — अखंड तिथि म्हणजे सूर्योदयापासून कर्मकालपर्यंत असलेली म्हणजे पूर्ण.

एकदंत — गणपति. एकदन्ताय विद्महे । वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दन्ती प्रचोदयात् । (गणपति अथर्वशीर्षम्). ‘ नमन तुज एकदंता । एकपणें तूंचि आतां ’ (ए. भा. १-२)

एकनाड — पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या जन्मनक्षत्रावरून आद्य, मध्य व अन्त्य अशा तीन नाडी ठरलेल्या असतात. जन्मनक्षत्रानुसार येणारी नाडी एकच असेल तर अशा स्त्री-पुरुषांचा विवाह होत नाहीं. त्यास 'एकनाड' आली असें म्हणतात.

एक परमेश्वर — परब्रह्म वा परमेश्वर (ईश्वर एकच आहे).

एकपाठी — एकदा वाचून लगेच ज्याचें पाठ होतें असा.

एकबाणी, एकवचनी आणि एकपत्नी -- मर्यादापुरुषोत्तम श्रीरामचंद्र.

तद् ब्रूहि वचनं देवि राज्ञो यदभिकांक्षितम् ।
करिष्ये प्रतिजाने च रामो द्विर्नाभिभाषते ॥
(वा. रा. अयोध्या १८-३०)

द्विःशरे नाभिसंधत्ते रामो द्विर्नाभिभाषते। (सु.)

एक मूळप्रकृति — आदिमाया.

एकाक्ष — एका डोळ्यानें आंधळा, शुक्राचार्य.

एकाक्षरी मंत्र — द द द म्हणजे दमन, दान आणि दया. प्रजापतीनें अनुक्रमें देव, मनुष्य व असुर या आपल्या तिन्ही अपत्यांस हा एकाक्षरी मंत्र दिला. (बृहदारण्यक अ. ५-२)

एक वेद, एक देव व एकच वर्ण — पूर्वीं एकच वेद, सर्व वाङ्मयात्मक प्रणव (ओंकार) एकच, नारायण हा एकच देव, एकच अग्नि, एकच वर्ण व एकच भाषा होती. 'एकवर्णाः समा भाषा एकरूपाश्च सर्वशः' (वा. रा. उत्तरकांड ३०-१९)

एक एव पुरा वेदः प्रणवः सर्ववाङ्मयः ।
देवो नारायणो नान्य एकोऽग्निर्वर्ण एव च ॥
(भागवत स्कंध ९ अ. १४-४८)

एक शत्रु — अज्ञान हा मनुष्य जातीचा एक महान् शत्रु आहे. 'एकः शत्रुर्न द्वितीयोस्ति शत्रुरज्ञानतुल्यः पुरुषस्य राजन् ।' (म. भा. शांति २९७-२८)

एकात्मवाद — आत्मा एक आहे व तो सर्वत्र व्याप्त आहे हा सांख्यशास्त्राचा एक मुख्य सिद्धान्त. (पुरुषार्थबोधिनी भ. गी. १७२)

एकाध्यायी गीता — गीतेचा अठरावा अध्याय. अठरावो अध्यावो नोहे । हे एकाध्यायी गीताचि आहे । जैं वांसरुंचि गाय दुहे । तैं वेळु कायसा ? । (ज्ञा. १८–८४)

२

दोन (अठराही पुराणांतर्गत सारवचनें) — १ परोपकार हें पुण्य व २ परपीडा हें पाप.

अष्टादशपुराणेषु व्यासस्य वचनं द्वयम् ।
परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ॥ (गी. र. ९१)

दोन अधिष्ठानें (रोगाचीं) — १ शरीर आणि २ मन.

दोन अयनें—१ दक्षिणायन आणि २ उत्तरायण. दाक्षिणायनांत सूर्याची गति दक्षिणेकडे असते. आरंभ कर्कसंक्रांतीपासून होतो. उत्तरायणांत सूर्याची गति उत्तरेस असते. आरंभ मकरसंक्रांतीपासून होतो. अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् । (भ. गी. ८–२४) धूमोरात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् । (भ. गी. ८–२५)

दोन अवस्था — (अ) १ सुख आणि २ दुःख; (आ) १ पूर्वावस्था (बाल्य आणि तारुण्य) आणि २ उत्तरावस्था (प्रौढता आणि वार्धक्य).

दोन आश्विनीकुमार — अश्विनी नांवाच्या अप्सरेचे दोन जुळे मुलगे. हे देवांचे वैद्य होते.

दोनअक्षरी मंत्र — " राम ", " शिव " हे प्रत्येकी दोन अक्षरांचे मंत्र काशीक्षेत्रांत तारक होतात.

दोन अंगें (धर्माचीं) — १ अभ्युदय आणि २ निःश्रेयस्.

दोन आदर्श भक्तश्रेष्ठ -- १ हनुमान आणि २ अर्जुन. यांनीं राष्ट्रकार्यार्थ आपलें जीवित अर्पण केलें.

दोन उपासना — १ सगुणोपासना आणि २ निर्गुणोपासना.

दोन कारणांस्तव परान्नभोजन विहित आहे — १ परस्पर प्रेम असलें तर व २ उपासमार होत असेल तर (म. भा. उद्योग ९१–२५)

दोन गोष्टी स्वर्गसुखापेक्षां अधिक होत — १ जननी आणि २ जन्मभूमि.

नेयं स्वर्णपुरी लङ्का रोचते मम लक्ष्मण ।
जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ॥ (सु.)

दोन गोष्टी स्थिर (चिरंतन राहणाऱ्या) — १ धर्म आणि २ कीर्ति.

अस्थिरं जीवितं लोके अस्थिरे धनयौवने ।
अस्थिराः पुत्रदाराश्च धर्मकीर्तिद्वयं स्थिरम् ॥ (सु.)

दोन गोष्टी परत जोडतां येत नाहींत — १ फुटलें मोतीं आणि २ तुटलें मन. 'सोनें अथवा हस्तचरण । मोडिल्या सांधिती विचक्षण । फुटलें मोतीं तुटलें मन । सांधूं न शके विधाता ।' (मुक्तेश्वर म. भा. अ. १८)

दोन गोष्टींत जन्माची सफलता — १ अनायासानें मरण व २ विना दैन्यानें जीवन. " अनायासेन मरणं विनादैन्येन जीवनम् " (सु.)

दोन गोष्टींमुळें तीन आपत्ति ओढवतात — १ अपूज्यांची पूजा आणि २ पूज्यांची अवहेलना या दोन गोष्टी जेथें होतात तेथें १ दुर्भिक्ष, २ मरण आणि ३ भय या तीन आपत्ति ओढवतात.

अपूज्या यत्र पूज्यन्ते पूज्यानां तु विमानना ।
त्रीणि तत्र प्रवर्तन्ते दुर्भिक्षं मरणं भयम् ॥ (सु.)

दोन गोष्टी क्षणभंगुर — १ तारुण्य आणि २ धन.

दोन ग्रहणें — १ चंद्रग्रहण आणि २ सूर्यग्रहण.

दोन चिकित्सा — १ मानसचिकित्सा आणि २ औषधी चिकित्सा.

दोन तत्त्वें अनादि — १ प्रकृति आणि २ पुरुष.

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि । (भ. गी. १३–१९)

दोन दोष (चित्ताचे) — १ रजोगुण व २ तमोगुण हे चित्ताचे दोन दोष. ' रजस्तमश्च मनसो द्वौ दोषौ समुदीरितौ ' (वाग्भट)

दोन द्रव्याचे अतिक्रम अथवा दुरुपयोग — १ कुपात्रीं दान करणें व २ सत्पात्रीं दान न करणें हे दोन संपादन केलेल्या द्रव्याचे अतिक्रम होत.

लब्धानामपि वित्तानां बोद्धव्यौ द्वावतिक्रमौ ।
अपात्रे प्रतिपत्तिश्च पात्रे चाप्रतिपादनम् ॥
(म. भा. शांति २७–३१

दोन द्वारपाल (श्रीविष्णूचे) — १ जय आणि २ विजय.

दोन धर्म — (अ) १ विश्वधर्म व २ व्यवहारधर्म; (आ) १ सामान्य धर्म आणि २ विशेष धर्म.

दोन धर्मधुरंधर — १ भीष्म आणि २ श्रीकृष्ण.

दोन धनें — १ दैवधन (उपासना आणि कर्म) आणि २ मनुष्यधन (भूमि, पशु आणि सुवर्ण).

दोन ध्रुव — १ उत्तर ध्रुव, २ दक्षिण ध्रुव.

दोन नृत्यें — १ ताण्डव (शिव–नृत्य) आणि २ लास्य (पार्वती–नृत्य) असे दोन प्रकार.

दोन पक्ष — १ शुक्ल पक्ष आणि २ कृष्ण पक्ष. पक्ष म्हणजे पंधरवडा. अमावास्येपासून पौर्णिमेपर्यंत शुक्ल पक्ष व पौर्णिमेपासून अमावास्येपर्यंतचा कृष्ण पक्ष.

दोन पुराणकालीन प्रतिज्ञा — १ कचप्रतिज्ञा आणि २ भीष्मप्रतिज्ञा.

दोन प्रकारचे अलंकार — १ शब्दालंकार आणि २ अर्थालंकार.

दोन प्रकारचे आचार — १ शास्त्रीय आचार आणि २ लौकिक आचार.

'आचारो द्विविधः प्रोक्तः शास्त्रीयो लौकिकस्तथा'

(देवी भाग. स्कंध ९ अ १–१६)

दोन प्रकार (धर्माचे) — १ प्रवृत्तिपर आणि २ निवृत्तिपर.

(म. भा. शांति २४०–६)

दोन प्रकार (ध्यानाचे) — १ सगुणध्यान व २ निर्गुणध्यान.

दोन प्रकार (नमस्काराचे) — (अ) १ भावनमस्कार व २ द्रव्यनमस्कार; (आ) १ व्यवहारनमस्कार व २ निश्चयनमस्कार (रत्न करंडक)

दोन प्रकारचा विनय — १ स्वाभाविक आणि २ कृत्रिम.

'द्वाविधो विनयः स्वाभाविकः कृत्रिमश्च.' (कौटिल्य)

दोन प्रकारचें शौच — १ बाह्य शौच आणि २ आभ्यंतर शौच. हें दोन प्रकारचें शौच अथवा पावित्र्य. 'शौचं तु द्विविधं प्रोक्तं बाह्यमाभ्यन्तरं तथा' (शिवतत्त्वरत्नाकर ६–९), (दक्षस्मृति)

दोन प्रकारचे संकेत — १ श्रद्धाप्रधान (शास्त्राधारावरून ठरविलेले) आणि २ कल्पनाप्रधान (कविप्रतिभाजनित).

दोन प्रकारचें ज्ञान — (अ) १ जन्मसिद्ध आणि २ अनुभवसिद्ध; (आ) १ शाब्दिक ज्ञान आणि २ अनुभवजन्य ज्ञान.

ज्ञानं तु द्विविधं प्रोक्तं शाब्दिकं प्रथमं स्मृतम् ।
अनुभवाख्यं द्वितीयं तु ज्ञानं तद्दुर्लभं नृप ॥
(देवी भाग. षष्ठ स्कंध १५–५२)

दोन प्रकारच्या माणसांना सुखाचा लाभ होतो — १ आगामी संकटाची आगाऊ तरतूद करणारा आणि २ प्रसंगीं ज्याला युक्ति सुचते तो.

अनागतविधाता च प्रत्युत्पन्नमतिश्च यः ।
द्वावेव सुखमेधेते दीर्घसूत्री विनश्यति ॥
(म. भा. शांति १३७–१)

दोन प्रकारचे पुरुष जगांत विरळा — १ ज्यानें जें मागितलें त्यास तेंच देऊन टाकणारा आणि २ आपण स्वतः कोणापासून कांहींहि न मागणारा (कल्याण–उपनिषत् अंक).

दोन प्रकारचें वैर — १ स्वाभाविक आणि २ कृत्रिम. साप आणि मुंगूस, पाणी व अग्नि, देव आणि दानव, कुत्रा व मांजर, सिंह आणि हत्ती, सज्जन व दुर्जन हीं स्वाभाविक वैराचीं उदाहरणें (पंचतंत्र)

दोन प्रकारचें वैराग्य — १ ज्ञानवैराग्य आणि २ निर्वेदवैराग्य (अनुभवामृत—अमृतवाहिनी टीका).

दोन प्रतिज्ञा (अर्जुनाच्या) — १ दैन्य न भाकणें व २ युद्धांत पाठ न दाखविणें. ‘ अर्जुनस्य प्रतिज्ञे द्वे न दैन्यं न पलायनम् ’ (सु.)

दोन प्रयत्न — १ आभ्यंतरप्रयत्न आणि २ बाह्यप्रयत्न (सि. कौ.)

दोन प्रलय — १ नित्यप्रलय आणि २ महाप्रलय.

दोन प्रवृत्ति — १ सत्प्रवृत्ति आणि २ असत्प्रवृत्ति.

दोन पौराणिक वार्ताहर — १ नारद आणि २ संजय.

दोन ब्रह्में — १ शब्दब्रह्म आणि २ परब्रह्म.

दोन भक्तिसाधनें — १ नामस्मरण आणि २ कीर्तन.

दोन मति — १ सुमति व २ कुमति.

दोन मनें — १ अंतर्मन आणि २ बहिर्मन.

'चित्तं हि द्विविधम्' (योगशास्त्र)

दोन महान् राष्ट्रीय ग्रंथ — १ रामायण आणि २ महाभारत.

दोन महान् आमिषें — १ कनक आणि २ कांता.

दोन मार्ग — (जगांत आयुःक्रमणाचे)—१ सांख्य (संन्यास मार्ग) आणि २ योग (कर्ममार्ग) (गी. र. ६२५)

दोन मार्ग धर्मसाधनेचे — १ प्रवृत्तिमार्ग आणि २ निवृत्तिमार्ग. 'प्रवृत्तिश्च निवृत्तिश्च द्विविधं धर्मसाधनम्' (मोक्ष गीता ३-४)

दोन मार्ग साधकाला मुक्ति देणारे — १ विहंगममार्ग आणि २ पिपीलिका मार्ग. यांचे प्रवर्तक अनुक्रमें शुक व वामदेव होत.

शुकश्च वामदेवश्च द्वे स्मृती देवनिर्मिते ।
शुको विहङ्गमः प्रोक्तो वामदेवः पिपीलिका ॥
(वराहोपनिषद्)

दोन मंगलदायक शब्द — १ ॐ आणि २ अथ. हे दोन्ही शब्द ब्रह्मदेवाच्या कंठांतून प्रथम बाहेर आले म्हणून मंगलदायक गणले आहेत.

ॐकारश्चाथशब्दश्च द्वावेतौ ब्रह्मणः पुरा ।
कंठं भित्त्वा विनिर्यातौ तस्मान्मांगालिकावुभौ ॥ (स्मृति)

दोन राष्ट्रीय महाकवि — १ व्यास आणि २ वाल्मीकि.

वादाचीं दोन प्रबल कारणें — १ कनक आणि २ कांता. हीं कोणताहि विग्रह उत्पन्न होण्याचीं दोन मूल कारणें. 'कामिनी कनकं कार्यं कारणं विग्रहस्य वै' (देवी भाग. चतुर्थ स्कंध १०–६).

दोन विद्या — (अ) १ पराविद्या (आत्मविद्या) व २ अपराविद्या (ब्रह्मविद्या); (आ) १ शस्त्रविद्या व २ शास्त्रविद्या.

'विद्या शस्त्रस्य शास्त्रस्य द्वे विद्ये प्रतिपत्तये' (हितो.)

(इ) १ बला आणि २ अतिबला. सर्व प्रकारच्या ज्ञानाचें उगमस्थान अशा या देवनिर्मित दोन विद्या—बला व अतिबला—विश्वामित्रानें रामास दिल्या.

'बलामतिबलां चैव सर्वज्ञानस्य मातरौ' (वा. रा. बाल. सर्ग २२–१७)

दोन वंश — १ जन्मवंश आणि २ विद्यावंश.

दोन संपत्ति — १ दैवी संपत्ति आणि २ आसुरी संपत्ति.

दोन साधनें दैवाला अनुकूल करून घेण्याचीं — १ प्रयत्न आणि २ प्रार्थना (विचार पोथी)

दोनच खरे परदेशी — १ जीवन आणि २ झाडाचें पान (राजस्थानी लोककथा)

दोनच खरे यात्रेकरू — १ सूर्य आणि २ चंद्र (भोज–लोककथा)

दोनच खरे राजे — १ इंद्र आणि २ यम (भोज–लोककथा)

दोघेजण अंगीकारलेलें काम पूर्णतेस नेण्यास बद्धपरिकर होत — १ राजा (राज्यशासनकर्ते) आणि २ बहुश्रुत ब्राह्मण.
'द्वौ लोके धृतव्रतौ राजा च ब्राह्मणश्च बहुश्रुतः' (गौतम धर्मसूत्रें ८–१)

दोघेजण दुर्मिळ — १ अप्रिय पण हितकर असें सांगणारा व २ तें ऐकून घेणारा. 'अप्रियस्य च पथ्यस्य श्रोता वक्ता च दुर्लभः' (वा. रा. अरण्य ३७–२)

दोघेजण जलसमाधि देण्यास योग्य — १ धनिक असून दान न देणारा आणि २ दरिद्री असून तपस्या (कष्ट) न करणारा.

द्वावम्भसि निवेष्टव्यौ गले बध्वा दृढां शिलाम् ।
धनवन्तमदातारं दरिद्रं चातपस्विनम् ॥ (म. भा. उद्योग ३३–६०)

दोघेजण विपरीत कर्मांमुळें फजित होतात — १ गृहस्थाश्रमी असून कर्तव्यपराङ्मुख आणि २ भिक्षुक असून खटपटी.

अनारम्भो गृहस्थश्च कार्यवांश्चैव भिक्षुकः ।
उभौ तौ न विराजेते विपरीतेन वर्त्मना ॥ (रामगीता ९–७)

दोघेजण जगांत पराजित होत — १ कर्ज घेणारा आणि २ मुलीचा बाप. (भोज–लोककथा)

द्वितत्त्ववाद — दोन परस्पर विरोधी तत्त्वांपासून जगांतील सर्व गोष्टींचा खुलासा करतां येतो असें प्रतिपादणारें मत.

द्विविधनिष्ठा — १ सांख्ययोग आणि २ कर्मयोग. या दोन निष्ठा म्हणजे अनुष्ठानतत्परतेचे मार्ग. (भ. गी. ३–३)

द्वैत—भेदवाद. — १ ब्रह्म आणि जग, २ जीव आणि ईश, ३ आत्मा व परमात्मा हीं निराळीं, भिन्न भिन्न आहेत असें मत.

द्वंद्व — जोडी–युग्म. दोन परस्पर विरुद्ध गोष्टी साहचर्यानें राहतात. अशीं अनेक द्वंद्वें या जगांत आहेत. उदा.—जड–चेतन, पुरुष–प्रकृति, देव–दैत्य, प्रपंच–परमार्थ, प्रकाश–अंधकार, राग–द्वेष, सुख–दुःख, शीत–उष्ण, धर्म–अधर्म, पुण्य–पाप, ज्ञान–अज्ञान, उत्पत्ति–लय, लाभ–हानि, जय–पराजय, निंदा–स्तुति, मान–अपमान, शत्रु–मित्र, सज्जन–दुर्जन, सत्–असत्, आशा–निराशा, शाप–आशीर्वाद, प्रवृत्ति–निवृत्ति, त्याग–भोग, हिंसा–अहिंसा, दिवस–रात्र, इ.

३

तीन अकारण वैरी — १ हरिण–पारधी, २ मासे–मासेमारू लोक आणि ३ साधु–दुष्टजन. या तिघांना हे तीन अकारण वैरी असतात. (बृहन्नारदीय पूर्वखंड ३७–३८)

तीन अग्नि — (अ) १ ज्ञानाग्नि (शुभ अशुभ कोणतें हें सांगतो तो), २ दर्शनाग्नि (रूपादिकांचें दर्शन करवितो तो) व ३ कोष्ठाग्नि (खाल्लें प्यालेलें जो पचवितो तो) असे तीन प्रकार.

(आ) १ पिता–गार्हपत्य अग्नि, २ माता–दाक्षिणाग्नि व ३ गुरु–आहवनीय अग्नि श्रेष्ठ होत.

> पिता वै ‘ गार्हपत्योऽग्निर्माताग्नि ’ र्दक्षिणः स्मृतः ।
> गुरुरावहनीयस्तु साग्नित्रेता गरीयसी ॥ (मनु २–२३१)

तीन अवस्था — (अ) १ जागृति, २ स्वप्न आणि ३ सुषुप्ति यांना अवस्थात्रय म्हणतात, (आ) १ उत्पत्ति, २ स्थिति व ३ लय.

तीन अवस्था (पुरुषजीवनाच्या) — १ पुत्र, २ पति आणि ३ पिता.

तीन अवस्था (स्त्रीजीवनाच्या) १ कन्या, २ कांता व ३ माता.

तीन अवस्था (आत्म्याच्या) — १ बहिरात्मा, २ अंतरात्मा व ३ परमात्मा. आत्म्याच्या अशा तीन अवस्था जैन धर्मांत मानिल्या आहेत. (कल्याण साधनांक)

तीन अवस्था (प्रेमाच्या) — १ पूर्वराग (गुण ऐकून अथवा चित्र वगैरे पाहून उत्पन्न होणारें प्रारंभिक प्रेम), २ मीलन आणि ३ वियोग. (कल्याण योगांक ६२)

तीन अवस्था (बाल्यदशेच्या) — १ कौमार (एक ते पांच वर्षें), २ पौगंड (सहा ते दहा वर्षें) आणि ३ कैशोर (दहा ते पंधरा वर्षें) अशा बाल्य दशेच्या तीन अवस्था असतात.

कौमारं पञ्चमाब्दान्तं पौगण्डं दशमावधि ।
कैशोरमापंचदशाद्यौवनं तु ततः परम् ॥
(भाग. स्कंध १० अ. १२ तळटीप)

तीन अवस्था मानवी जीवनांतील — १ संकल्प, २ साधना व ३ सिद्धि.

तीन अवस्था (सृष्टींतील पदार्थांच्या) — १ घनरूप, २ द्रवरूप आणि ३ वायुरूप. यच्चावत् सृष्टींतील सर्व पदार्थांच्या या तीन अवस्था असतात.

तीन अर्थ — १ वाच्यार्थ, २ लक्ष्यार्थ आणि ३ व्यंग्यार्थ असे तीन प्रकारचे अर्थ एकाच शब्दापासून बोधित होतात, असें अलंकारशास्त्रांत मानलें आहे.

तीन अमावास्या — १ आषाढ वद्य अमावास्या (दीपपूजा), २ श्रावण वद्य (पिठोरी) आणि ३ भाद्रपद वद्य (सर्वपित्री). या तीन अमावास्या विशेष प्रसिद्ध आहेत.

तीन अवतार (वायुदेवतेचे) — १ श्रीहनुमान, २ भीमसेन व ३ पूर्णप्रज्ञ (श्रीमध्वाचार्य.)

प्रथमो हनुमन्नाम द्वितीयो भीम एव च ।
पूर्णप्रज्ञस्तृतीयस्तु भगवत्कार्यसाधकः ॥
(वायुस्तुति–फलश्रुति)

तीन अश्रु — १ आनंदाश्रु, २ दुःखाश्रु आणि ३ नक्राश्रु.

तीन अक्षरी मंत्र — (१) श्रीराम, (२) ॐ. हा, अ, उ, म् हीं तीन अक्षरें मिळून झाला आहे.

तीन अंगें (धर्माचीं) — १ आचार, २ व्यवहार आणि ३ प्रायश्चित्त.

तीन आदर्श (स्त्रियांचे) — १ सती, २ सीता आणि ३ सावित्री.

तीन आदर्श पतिव्रता — १ अनसूया, २ द्रौपदी व ३ दमयंती.

अनुसूया द्रुपदात्मजा दमयन्ती दुख–लीन।
निजसतीत्वके तेजसे चमक उठी ये तीन। (कल्याण–हिंदुसंस्कृति अंक)

तीन आधार धर्माचे (वैदिक) — (अ) १ यज्ञ, २ अध्ययन व ३ दान.

त्रयो धर्मस्कंधा यज्ञोऽध्ययनं दानमिति (छां. उप. २–२३–१)
(आ) १ श्रुति, २ स्मृति व ३ पुराणें हे तीन आधार धर्मशास्त्रांत मानतात. म्हणून कोणत्याहि कर्माचे आरंभीं "श्रुतिस्मृतिपुराणोक्त" असा संकल्प म्हटला जातो.

तीन आधारस्तंभ शरिराचे — १ आहार, २ निद्रा व ३ ब्रह्मचर्य. या तिन्हींच्या उचित उपयोगावर शरिरांत बल, वर्ण व आयुष्य यांची वृद्धि होते. (चरक. सूत्रस्थान अ. ११).

तीन उपदेशपद्धति (**वाङ्मयांत**) — (अ) १ वेद–प्रभुसंमित उपदेश–जा. २ पुराणें–सुरतसंमित उपदेश– जायला पाहिजे. ३ दासबोध–कांतासंमित उपदेश–जायचे ना ? (आ) १ प्रभुवाक्य–(स्वतःप्रमाण) २ मित्रवाक्य (परतःप्रमाण) व ३ कांतावाक्य (प्रमाण अप्रमाणाचा प्रश्न नाहीं).

तीन उपमाता — १ दाई, २ पालन करणारी मातेशिवाय दुसरी बाई आणि ३ सावत्र आई.

तीन ऋतु — १ उन्हाळा, २ पावसाळा व ३ हिंवाळा.

तीन ऋणें — १ देवऋण, २ ऋषिऋण आणि ३ पितृऋण. मनुष्य जन्मास येतो तो हीं तीन ऋणें घेऊन येतो. तीं यज्ञ, स्वाध्याय व पुत्रोत्पादन इत्यादींनीं फेडावयाचीं असतात. 'ब्रह्मचर्येण ऋषिभ्यो यज्ञेन देवेभ्यः प्रजया पितृभ्यः' (वै. संहिता).

तीन ऋषि — १ ब्रह्मर्षि, २ देवर्षि आणि ३ राजर्षि असे ऋषींचे तीन प्रकार.

तीन एषणा (इच्छा) — १ पुत्रैषणा, २ वित्तैषणा आणि ३ लोकैषणा.

तीन 'क' कार — १ कनक, २ कांता आणि ३ कादंबरी हे तीन 'क' कार प्रभावी आहेत.

तीन कला (कामशास्त्र) — १ गायन, २ वादन आणि ३ नर्तन.

तीन काळ — (अ) १ सकाळ, २ दुपार आणि ३ संध्याकाळ. (कालविभाग); (आ) १ भूतकाळ, २ वर्तमानकाळ आणि ३ भविष्यकाळ.

तीन कायिक (शारीरिक) पापें — (अ) १ दिल्याविना एखादी वस्तु घेणें, २ निषिद्ध हिंसा आणि ३ परस्त्रीसंगम हीं तीन शारीरिक पापें होत. (आ) १ हत्या, २ चौर्य व ३ परदारागमन.

अदत्तानामुपादानं हिंसा चैवाविधानतः ।
परदारोपसेवा च कायिकं त्रिविधं स्मृतम् ॥

(मनु. १२–७)

तीन क्रिया (प्राणायामाच्या) — १ पूरक–श्वास आंत घेणें, २ कुंभक–श्वास स्थिर करणें व ३ रेचक–श्वास बाहेर सोडणें या तीन क्रियांनीं प्राणायाम पूर्ण होतो.

तीन काळचीं तीन नांवें (गायत्रीचीं) — १ गायत्री, २ सावित्री आणि ३ सरस्वती.

गायत्रीनाम पूर्वाह्ने सावित्री माध्यमे दिने ।
सरस्वती च सायाह्ने एवं सन्ध्या त्रिधा स्मृता ॥

(वेदव्यास श्रुति)

तीन 'ग' कार — १ गणक, २ गणिका आणि ३ गणिती.

तीन गण — १ देवगण, २ मनुष्यगण आणि ३ राक्षसगण अशा मनुष्याच्या तीन कोटी, प्रकार अथवा गण आहेत. (कुंडली)

तीन गति (द्रव्याच्या) — १ दान, २ भोग आणि ३ नाश. या तीन प्रकारांनीं द्रव्याचा विनियोग होतो.

दानं भोगोनाशस्तिस्रो गतयो भवन्ति वित्तस्य । (भर्तृ. नीति. ४३)

तीन गया — १ मातृगया (सिद्धपूर–गुजराथ), २ पितृगया (गया–बिहार) व ३ शिवगया (काशी).

तीन गुण — १ सत्त्वगुण, २ रजोगुण आणि ३ तमोगुण.

' सत्त्वं रजस्तमश्चेति प्रसिद्धं हि गुणत्रयम् ' (रा. गी. ११–२).

तीन गुण (वाङ्मयांतले) — १ माधुर्य, २ ओज व ३ प्रसाद.

तीन गुण (शास्त्र जाणणारास आवश्यक) — १ ग्रंथाचें संपूर्ण ज्ञान, २ तात्पर्याचें निरूपण करतां येणें व ३ ग्रंथाच्या भागासंबंधीं विवेचन करतां येणें.

ग्रंथार्थस्य परिज्ञानं तात्पर्यार्थनिरूपणम् ।
आद्यन्तमध्यव्याख्यानशक्तिः शास्त्रविदो गुणाः ॥
(सं. समयसार ८–२७)

तीन गुरु — (अ) १ जन्मदाता, २ विद्यागुरु व ३ मोक्षगुरु. (आ) १ पिता, २ माता व ३ आचार्य.

पुरुषस्येह जातस्य भवन्ति गुरवः सदा ।
आचार्यश्चैव काकुत्स्थ पिता माता च राघव ॥
(वा. रा. अयोध्या १११–२)

तीन गोष्टी (अतींद्रिय ज्ञान्यासहि कळणें कठीण) — १ आयुष्य, २ वय आणि ३ गर्भिणीचें लक्षण.

आयुर्ज्ञानं वयोज्ञानं गर्भिणीनां च लक्षणम् ।
ऋषयश्चापि मुह्यन्ति किं पुनर्मांसचक्षुषः ॥
(गौ. धर्मसूत्रें. अ. ९)

तीन गोष्टी (आयुष्यांत उपकारक पण तितक्याच कठीण) — १ दारिद्र्यांत औदार्य, २ एकान्तांत इंद्रियनिग्रह व ३ संकटसमयीं सत्य.

तीन गोष्टी (एकेकदां होतात) — (अ) १ राजे एकदांच बोलतात, २ विद्वान् एकदांच बोलतात आणि ३ कन्यादान. (आ) १ वडिलार्जित मालमत्तेची वांटणी, २ कन्यादान आणि ३ वचन.

सकृज्जल्पन्ति राजानः सकृज्जल्पन्ति पण्डिताः ।
सकृत्प्रदीयते कन्या त्रीण्येतानि सकृत् सकृत् ॥
(स्कंद. वटसावित्री–कथा)

तीन गोष्टी (कालाधीन) — १ विवाह, २ जन्म आणि ३ मरण या तीन गोष्टी कालाधीन म्हणजे जेथें व ज्याच्याशीं होणें असतील त्या ठिकाणीं अवश्य होतील.

त्रयः कालकृताः पाशा शक्यन्ते न निवार्तितुम् ।
विवाहो जन्म मरणं यथा यत्र च येन च ॥

(पद्म.–भूमि ८१–३४)

तीन गोष्टी (केवळ नामधारी होत) — १ धान्य नसलेला गांव, २ पाणी नसलेली विहीर आणि ३ अध्ययन न केलेला ब्राह्मण.

धान्यशून्यो यथा ग्रामो यथा कूपश्च निर्जलः ।
ब्राह्मणश्चानधीयानस्त्रयस्ते नामधारकाः ॥ (सु.)

तीन गोष्टी (क्लेशदायक) — १ बालपणीं मातृवियोग, २ तरुणपणीं भार्यावियोग आणि ३ म्हातारपणीं पुत्रशोक.

तीन गोष्टी (दाबून ठेवतां येत नाहींत) — १ प्रेम, २ खोकला आणि ३ स्फूर्ति.

तीन गोष्टी (दुरूनच चांगल्या) — १ डोंगर, २ वेश्येचें मुखकमल आणि ३ युद्धवार्ता.

दूरस्था पर्वता रम्या वेश्या च मुखमंडने ।
युद्धस्य वार्ता रम्या च त्रीणि रम्याणि दूरतः ॥ (सु.)

तीन गोष्टी (दुर्लभ) — (अ) १ विषयत्याग, २ तत्त्वदर्शन व ३ अपरोक्ष साक्षात्कार. (आ) १ मनुष्यत्व, २ मुमुक्षत्व आणि ३ सत्पुरुष सहवास.

दुर्लभं त्रयमेवैतद्देवानुग्रहहेतुकम् ।
मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रयः ॥ (विवेकचूडामणि)

तीन गोष्टी (देतां येत नाहींत) — १ पुरुषानें आपली अब्रू, २ स्त्रीनें आपलें पातिव्रत्य आणि ३ राष्ट्रानें आपलें स्वातंत्र्य. या तीन गोष्टी कोणीं कितीहि उपकार केला म्हणून कृतज्ञतेचें मोल म्हणून देतां यावयाच्या नाहींत.

(डॅनिअल ओकोनेल)

तीन गोष्टी (देवाधीन) — १ अन्न, २ मान, ३ धन.

अन्न मान धन । हे तों प्रारब्ध आधीन ॥ (तुकाराम)

तीन गोष्टी (निरर्थक होत) — १ क्रिमयेनें द्रव्यप्राप्ति, २ शाक्त मार्गानें मोक्ष व ३ जांवयाचे ठिकाणीं पुत्रत्वबुद्धि—

धातुदाहेन वित्ताशा मोक्षाशा कौलिके मते ।
जामातरि च पुत्राशा त्रयमेतन्निरर्थकम् ॥ (सु.)

तीन गोष्टी (परत येत नाहींत) — १ सुटलेला बाण, २ बोललेला शब्द आणि ३ गेलेली अब्रू वा सत्कर्म करण्याची संधि.

तीन गोष्टी (पुरुषाचें विडंबन करणाऱ्या) — (अ) १ अर्धवट ज्ञान, २ द्रव्यसंपादित मैथुन आणि ३ पराधीन भोजन. (आ) १ वृद्धपणीं भार्यावियोग, २ बंधुवर्गाचे हातीं संपत्ति जाणें व ३ परस्वाधीन भोजन.

खण्डे खण्डे च पाण्डित्यं क्रयक्रीतं च मैथुनम् ।
भोजनं च पराधीनं तिस्रःपुंसोर्विडम्बनम् ॥

तीन गोष्टींचा प्रभाव (अतर्क्य असतो) — १ रत्नें, २ मंत्र व ३ औषधी.

" अचिंत्यो हि मणिमंत्रौषधीनां प्रभावः " (बाणकवि)

तीन गोष्टींमुळें मनुष्य गुरफटला जातो—१ लोभ, २ बेसावधपणा आणि ३ विश्वास.

लोभात्प्रमादाद्विश्रम्भात् पुरुषो बध्यते त्रिभिः ।
तस्माल्लोभो न कर्तव्यो न प्रमादो न विश्वसेत् ॥
(स्कंद-नागर. ५१–२५)

तीन गोष्टी वर्ज्य (स्नेह टिकविण्यास) — १ वाद, २ देवघेव आणि ३ पतीचे अपरोक्ष त्याच्या स्त्रीशीं संभाषण.

वाग्वादमर्थसंबंधं तत्पत्नीपरिभाषणम् ।
यदीच्छेत् विपुलां मैत्री त्रीणि तत्र न कारयेत् ॥
—(गरुड ११४–५)

तीन गोष्टी वेदानेंच जाणावयाच्या — १ परमेश्वर, २ परलोक व ३ पुनर्जन्म. या तीन गोष्टी केवळ वेदानेंच जाणल्या जातात.

तीन गोष्टी श्राद्धकालीं पवित्र आणि तीन गोष्टी वर्ज्य — १ कन्यापुत्र, २ दर्भ आणि ३ तीळ. हे तीन पवित्र आणि १ कोप, २ प्रयाण व ३ त्वरा (घाई) या तीन गोष्टी श्राद्धसमयीं वर्ज्य सांगितल्या आहेत.

त्रीणि श्राद्धे पवित्राणि दौहित्रं कुतपास्तिलाः ।
वर्ज्यानि चाहुर्विप्रेन्द्रैः कोपोऽध्वगमनं त्वरा ॥ (मार्कंडेय ३१–६४)

तीन गोष्टींमुळें रोगाचा उद्भव होत नाहीं — १ भोजनानंतर ताक पिणें, २ रात्रीं दूध घेणें व ३ उषःपान.

भोजनान्ते पिबेत्तक्रं वासरान्ते पिबेत्पयः ।
निशान्ते च पिबेद्वारि त्रिभि रोगो न जायते ॥ (सु.)

तीन गोष्टींत संतोष असावा — १ स्वपत्नी, २ भोजन आणि ३ धन. " संतोषस्त्रिषु कर्तव्यः स्वदारे भोजने धने " (वृ. चा. ७–४)

तीन गोष्टींत संतोष असूं नये — १ ज्ञानसाधना, २ उपासना व ३ दान. " त्रिषु चैव न कर्तव्योऽध्ययने तपदानयोः " (वृ. चा. ७–४)

तीन गोष्टींना स्वतंत्र अस्तित्व नसतें — १ व्यापारावांचून वैभव नाहीं, २ वादाशिवाय विद्वत्ता नाहीं आणि ३ सत्तेशिवाय राज्य नाहीं. (शेखसादी)

तीन गोष्टी तिघांत स्वभावसिद्ध असतात — १ कमलाचा लाल वर्ण, २ सत्पुरुषाचें परोपकारित्व आणि ३ दुष्टाचें निर्दयत्व.

रक्तत्वं कमलानां सत्पुरुषाणां परोपकारित्वम् ।
असतां निर्दयत्वं स्वभावसिद्धस्त्रिषु त्रितयम् ॥ (भर्तृ. नीति १२५)

तीन गोष्टी क्षणभंगुर — १ यौवन, २ धन आणि ३ जीवित.

" यौवनं धनमायुष्यं पद्मिनीजलबिन्दुवत् " (स्कंद-काशी ८२-४३)

तीन ग्राम (गायनशास्त्र) — १ षड्ज्, २ मध्यम आणि ३ गांधार. सप्तस्वरांच्या समुदायास ग्राम म्हणतात. यांचीं उत्पत्तिस्थानें अनुक्रमें भूलोक, भुवर्लोक आणि स्वर्ग अथवा मेघलोक हीं आहेत.

(कल्याण-नारद-विष्णुपुराणांक)

तीन चांडाळ — १ मद्यपि, २ जुगारी आणि ३ वेश्यागामी. हे तीन सामाजिक जीवनांतले चांडाळ होत.

तीन ठिकाणीं गंगास्नान दुर्लभ — १ गंगाद्वार, २ प्रयाग आणि ३ गंगासागर.

सर्वत्र सुलभा गङ्गा त्रिषु स्थानेषु दुर्लभा ।
गङ्गाद्वारे प्रयागे च गङ्गासागरसंगमे ॥ (पद्म. क्रिया ३-१४)

तीन ढोंगीपणाचीं लक्षणें — १ खोटें बोलणें, २ दिलेलें वचन न पाळणें व ३ विश्वास ठेवणारांशीं बेइमान होणें. (इस्लाम आणि नीतिशास्त्र)

तीन तंट्याचीं कारणें — १ कनक, २ कांता आणि ३ कृषि. हीं तीन प्रायः तंट्याचीं मूळ कारणें असतात.

तीन दानें -- १ विद्यादान, २ धनदान आणि ३ कन्यादान. हीं तीन प्रकारचीं दानें.

तीन दुःखें (जीवनांतील) — १ जरा (म्हातारपण), २ व्याधि (आजार) आणि ३ मरण.

तीन देवता — (अ) १ ब्रह्मा, २ विष्णु आणि ३ महेश; (आ) १ अग्नि, २ वायु आणि ३ सूर्य; (इ) १ महाकाली, २ महालक्ष्मी आणि ३ महासरस्वती; (ई) १ सत्ता, २ संपत्ति आणि ३ सरस्वती; (उ) १ मातृभूमि, २ मातृभाषा आणि ३ मातृसंस्कृति. (ऋग्वेद ७–२–८)

तीन दोष (विनाशाप्रत नेणारे) — १ परद्रव्यहरण, २ परदाराभिलाष व ३ सुहृदांचा अविश्वास.

परस्वानां च हरणं परदाराभिमर्षणम् ।
सुहृदामतिशङ्का च त्रयो दोषाः क्षयावहाः ॥
(वा. रा. युद्ध. ८७–२३)

परद्रव्याचे ज्यासी हरण । परदाराभिलाषण । सुहृदांचा द्वेषपूर्ण । तेथें मरण सहजाचि. (भा. रा. युद्ध. ३८–५९)

तीन दंड — (अ) १ राजदंड, २ नैसर्गिक दंड आणि ३ दैवी दंड; (आ) १ समाजदंड, २ राजदंड आणि ३ यमदंड; (इ) १ वाग्दंड, (मौन), २ मनोदंड (आशाहीन मन) व ३ देहदंड (स्वधर्माचरण).

योग हा मनोदंड । मौन होय वाग्दंड । निरिच्छता देहदंड । हें अखंड असावें ॥ (द. माहात्म्य अ. ३५)

" वाग्दंडः कर्मदंडश्च मनोदंडश्च ते त्रयः " (सु.)

तीन धर्मलक्षणें — १ वेदविहित धर्म, २ धर्मशास्त्रांतर्गत स्मार्त धर्म व ३ शिष्टांचा आचार.

वेदोक्तः परमो धर्मो धर्मशास्त्रेषु चापरः ।
शिष्टाचारश्च शिष्टानां त्रिविधं धर्मलक्षणम् ॥

(म. भा. वन. २०७–८४)

तीन धूर्त लक्षणें — १ मुख–कमलाप्रमाणें, २ वाणी–चंदनाप्रमाणें शीतल आणि ३ पोटांत राग, हीं धूर्तांचीं तीन लक्षणें होत.

मुखं पद्मदलाकारं वाणी चंदनशीतला ।
हृदयं क्रोधसंयुक्तं त्रिविधं धूर्तलक्षणम् ॥ (सु.)

तीन नाड्या — (अ) १ इडा, २ पिंगला व ३ सुषुम्ना (योगशास्त्र); (आ) १ वात, २ पित्त आणि ३ कफ (वैद्यक); (इ) १ आद्य, २ मध्य व ३ अन्त्य (ज्योतिष).

तीन नाश हेतु (दानाचे) — १ दिल्यानंतर वाईट वाटणें, २ अपात्रीं दान देणें आणि ३ देतांना श्रद्धा नसणें, हे तीन दानाचे नाश-हेतु म्हणून सांगितले आहेत.

यद्दत्वा तप्यते पश्चादपात्रेभ्यस्तथा च यत् ।
अश्रद्धया च यद्दानं दाननाशास्त्रयस्त्वमी ॥ (स्कंद कुमा. २–६९)

तीन नीतिशास्त्रप्रवर्तक — १ शुक्र, २ विदुर आणि ३ चाणक्य. हे तीन जगांतले आद्यनीतिशास्त्रप्रवक्ते होत.

नीतितत्त्वप्रवक्तारस्त्रयः सन्ति धरातले ।
शुक्रश्च विदुरश्चायं चाणक्यस्तु तृतीयकः ॥ (नीतिमयूख)

तीन पीठें —(अ) १ व्यासपीठ, २ पूजापीठ आणि ३ दीपपीठ; (आ) १ वाक्पीठ, २ व्यासपीठ आणि ३ मुद्रापीठ. (Press) हीं तीन पीठें आधुनिक प्रचारतंत्रांत प्रभावी आहेत.

तीन पुरुष जगांत दुर्लभ — १ जननिंदेला पात्र न झालेला श्रीमान्, २ स्वतःची प्रौढी न सांगणारा शूर आणि ३ सर्वत्र समदृष्टि असणारा राजा अथवा शासनाधिकारी.

श्रीमानजनानिंद्यश्च शूरश्चाप्यविकत्थनः ।
समदृष्टिः प्रभुश्चैव दुर्लभाः पुरुषास्त्रयः ॥ (यो. वा. १–१३–११)

तीन पुराणकालीन महाक्रोधी — १ दुर्वास, १ जमदग्नि आणि ३ विश्वामित्र. हे प्राचीन कालचे महाक्रोधी म्हणून प्रसिद्ध आहेत.

तीन पुराणकालीन मामा — १ कंसमामा, २ जांगीलमामा (घटोत्कचाचा कारभारी) व ३ शकुनिमामा. हे तीन कपटनीतिनिपुण मामा होत.

तीन प्रकार (संगीताचे) — १ गीत, २ वाद्य आणि ३ नृत्य असे संगीताचे तीन प्रकार.

" गीतं वाद्यं तथा नृत्यं त्रयं संगीतमुच्यते ॥ "

(सं. रत्नाकर अ. १)

तीन प्रकारच्या उपासना — १ ब्रह्मोपासना, २ मंत्रोपासना आणि ३ प्रतिमोपासना.

तीन प्रकारचे कवि — १ धीट, २ धीटपाठ आणि ३ प्रासादिक. (दासबोध १४–३–८)

तीन प्रकारचे ऋषि — १ ब्रह्मर्षि, २ देवर्षि आणि ३ राजर्षि.

तीन प्रकारचें कर्म — १ संचित, २ क्रियमाण आणि ३ प्रारब्ध.

तीन प्रकारचे गुरु — (अ) १ उपदेशगुरु, २ कुलगुरु आणि ३ जगद्‌गुरु; (आ) १ लौकिक ज्ञान देणारे, २ वैदिक ज्ञान देणारे आणि ३ आध्यात्मिक ज्ञान देणारे.

तीन प्रकारच्या दीक्षा (वीरशैव संप्रदाय) — १ वेधादीक्षा, २ क्रियादीक्षा आणि ३ मंत्रदीक्षा.

सा दीक्षा त्रिविधा प्रोक्ता शिवागमविशारदैः ।
वेधारूपा क्रियारूपा मंत्ररूपा च तापस ॥ (सि. शि.)

तीन प्रकारचे दूत — १ स्वतंत्रपणें कार्य साधणारा, २ सांगितलें तेवढेंच करणारा आणि ३ नुसता निरोप पोहोचविणारा. (का. नीति.)

तीन प्रकारचे दोष भोजनांत टाळावेत — १ जातिदोष (पदार्थाचा स्वाभाविक दर्प वगैरे), २ आश्रयदोष (पदार्थ शुद्ध असला तरी अपवित्र स्थानीं ठेविल्यामुळें) आणि ३ निमित्तदोष (कुत्रें वगैरेंच्या स्पर्शामुळें). (कल्याण साधनांक)

तीन प्रकारचे नास्तिक — १ क्रियादुष्ट (कर्म न करणारे), २ मनोदुष्ट (मनानेंच बिघडलेले) आणि ३ वाग्दुष्ट (वाणीनें दोष देणारे).

नास्तिकास्त्रिविधाः प्रोक्ता धर्मज्ञैस्तत्त्वदर्शिभिः ।
क्रियादुष्टो मनोदुष्टो वाग्दुष्टस्तथैव च ॥ (सु.)

तीन प्रकारचीं पापें — १ कायिक, २ वाचिक आणि ३ मानसिक.

तीन प्रकारच्या पीडा — १ इतर वेळीं याचकांपासून पीडा, २ भोजनसमयीं मुलांचा त्रास व ३ निद्राकाळीं स्त्रीहट्ट. या तीन प्रकारच्या पीडा नित्याच्या असतात व त्या तशा मोठ्या माणसांना असाव्या असा आशीर्वाद दिल्याची कथा आहे.

आसने विप्रपीडा च सुतपीडा च भोजने ।
शयने स्त्रीपीडा च त्रिभिः पीडा दिने दिने ॥ (सु.)

तीन प्रकारचे मृत्यु — १ अध्यात्मिक (कालमृत्यु), २ आधिभौतिक (कुपथ्यामुळें होणारे) आणि ३ आधिदैविक (गंडांतर वगैरे स्वरूपाचे).

अध्यात्मिक आधिभौतिक । तिसरा तो आधिदैविक ।
त्या तिघां माजी बलिष्ठ देख । अध्यात्मिक मृत्यु असे ॥ (ग. वि. ३-८५)

तीन प्रकारची यात्रा — १ गुरुयात्रा, २ देवयात्रा व ३ तीर्थयात्रा.

"गुरुयात्रा देवयात्रा तीर्थयात्रेति च त्रिधा" (वी. प्र. १०-३७)

तीन प्रकारचे वाद — १ वाद (गुरुशिष्य संवाद), २ जल्प (युक्तिप्रमाण कुशल पंडितांचा वाद) व ३ वितंड (मूर्खांचा प्रमाणरहित वाद). (मो. प्रदीप)

तीन प्रकारचें वैराग्य — १ पुराण वैराग्य, २ प्रसूतिवैराग्य आणि ३ स्मशानवैराग्य.

तीन प्रकारांनीं शहाणपण प्राप्त होतें — १ शास्त्राचा अभ्यास केल्यानें, २ संप्रदायांत वावरल्यानें व ३ निरीक्षणानें.

तीन प्रकार सद्गुरूस शरण जाण्याचे — १ प्रणिपात, २ प्रश्न आणि ३ सेवा.

तीन प्रकारचें स्वयंवर — १ इच्छास्वयंवर, २ पण लावून आणि ३ पराक्रम करून. अशा तीन प्रकारांनीं प्राचीन काळीं स्वयंवरें होत असत.

इच्छास्वयंवरश्चैको द्वितीयश्च पणाभिधः ।
तृतीयः शौर्यशुल्कश्च शूराणां परिकीर्तितः ॥

(देवी. भाग. तृतीयस्कंध १८–४२–४३)

तीन प्रतीति (अनुभव) — १ गुरुप्रतीति, २ शास्त्रप्रतीति व ३ आत्मप्रतीति. (दा. बो. ५–९)

तीन प्रपंच — १ स्थूल प्रपंच (कुटुंबपोषण), २ सूक्ष्म प्रपंच (कुटुंब-पोषणाविषयींचें मनोराज्य) आणि ३ कारण प्रपंच (परोपकार बुद्धि).

तीन प्रमाणें — (अ) १ प्रत्यक्ष, २ अनुमान आणि ३ शास्त्र (मनु. १२–१०५); (आ) १ श्रुति, २ धर्मशास्त्र आणि ३ लोकसंग्रह.

" धर्मजिज्ञासमानानां प्रमाणं प्रथमं श्रुतिः ।
द्वितीयं धर्मशास्त्रं तु तृतीयं लोकसंग्रहः ॥ " (सु.)

तीन प्रमुख गुण (धनुर्विद्येचे) — १ अति लहान वस्तूचा वेध करणें, २ अति दूरग्राही वेध करणें आणि ३ अति कठीण पदार्थ फोडणें. धनुर्धर अर्जुन हा असा तिन्ही गुणांत प्रवीण होता.

लक्ष्मणो लघुसन्धानः दूरपाती च राघवः ।
कर्णो दृढप्रहारी च पार्थस्यैते त्रयो गुणाः ॥ (सु.)

तीन प्राचीन संस्कृत व्याकरण-ग्रंथकार — १ पाणिनी-सूत्रकार, २ कात्यायन–वार्त्तिककार, आणि ३ पतंजलि–भाष्यकार.

तीन प्राचीन भारतीय ज्योतिर्वेत्ते — १ आर्यभट्ट, २ वराह-मिहिर आणि ३ भास्कराचार्य.

तीन प्राचीन महायुद्धें — १ देव–दानव युद्ध, २ राम–रावण युद्ध आणि ३ कौरव–पांडव युद्ध. यांतील प्रमुख नायकांस युद्धावर पाठविण्या-पूर्वीं ब्रह्मोपदेश करण्यांत आला. ब्रह्मदेवानें इंद्रास, वसिष्ठानें रामास व श्रीकृष्णानें अर्जुनास गीता सांगितली.

तीन फलज्योतिष शास्त्राचे आद्य प्रणेते — १ पराशर, २ जैमिनी व ३ वराहमिहिर.

तीन बलें — १ मंत्र (युक्ति), २ कोश आणि ३ सैन्य हीं राजसत्तेचीं तीन बलें.

तीन बंध — १ मूलबंध, २ उड्डियान बंध आणि ३ जालंधर बंध. हीं तीन योगशास्त्रांत श्रेष्ठ मानिलीं आहेत. (गोरक्षपद्धति)

तीन भरत — १ रामसखा भरत, २ दुष्यंतपुत्र भरत आणि ३ जीवन्मुक्त जडभरत. हे तीन प्राचीन काळीं आदर्शभूत होऊन गेले.

तीन मद — १ धनमद, २ विद्यामद आणि ३ उच्च कुलाचा मद.

विद्यामदो धनमदस्तृतीयोऽभिजनो मदः । (म. भा. उ. ३४–४४)

तीन महत्त्वाचे प्रसंग (माणसाचे आयुष्यांत) – १ जन्म, २ विवाह आणि ३ मृत्यु.

तीन महा आनंद —१ स्वतःचा विवाह, २ सत्पुत्रलाभ आणि ३ पुत्राला पुत्रप्राप्ति होणें. हे संसारांतले तीन महा आनंद होत.

जैं होतसे अपुलें स्वयंवर । आणिक सत्पुत्र होय संसारीं ।
आणिक पुत्रासी पुत्र होय तरी । विशेष चतुर्गुण ॥

(काशीखंड ७६–१६०)

तीन मार्ग मोक्षप्राप्तीचे — १ कर्मयोग, २ ज्ञानयोग आणि ३ भक्तियोग.

" मार्गास्त्रयो मे विख्याता मोक्षप्राप्तौ नगाधिप ॥ "

(देवी. भाग. ७–३७–२)

तीन मानसिक पापें — १ परधनापहार करण्याचा विचार करणें, २ मनानें दुसऱ्याचें अहित चिंतिणें आणि ३ खोटा दुराग्रह.

परद्रव्येष्वभिध्यानं मनसानिष्टचिंतनम् ।
वितथाभिनिवेशश्च मानसं त्रिविधं स्मृतम् ॥

(स्कंद–काशी खंड २७–१५४)

तीन मूर्ख — (अ) १ विरक्त पण लोभी, २ योगी पण इंद्रियासक्त आणि ३ व्युत्पन्न पण क्रोधी; (आ) १ ज्ञानी पण वैराग्यरहित, २ श्रद्धाहीन भक्त व ३ कुटुंबसंग्रही पण निर्धन.

तीन युगांतले तीन दाते — १ सत्ययुग–बलि, २ त्रेतायुग–श्रीरामचंद्र व ३ द्वापरयुग–राजा युधिष्ठिर आणि कलियुग (?)

तीन योग — (अ) १ कर्मयोग, २ भक्तियोग आणि ३ ज्ञानयोग; (आ) १ कालयोग, २ दैवयोग आणि ३ प्रारब्धयोग.

तीन रत्नें — १ जल, २ अन्न आणि ३ सुभाषित.

"पृथिव्यां त्रीणि रत्नानि जलमन्नं सुभाषितम् ।" (सु.)

तीन रूपें (भगवंताचीं) — १ प्रकृति, २ पुरुष आणि ३ काल. अशीं सृष्ट्युत्पत्तिसमयीं भगवंताचीं तीन रूपें प्रकट होतात.

(कल्याण नारद–विष्णुपुराणांक)

तीन लयी (संगीतशास्त्र) — १ द्रुत, २ मध्यम आणि ३ विलंबित.

तीन लक्षणें (साधूचीं) — १ सन्मानाचा हर्ष नाहीं, २ अपमानाचा राग नाहीं व ३ क्रोध आला तरी कठोर वाणी नाहीं. हीं साधूचीं तीन लक्षणें होत.

न प्रहृष्यति सम्मानैर्नावमानैः प्रकुप्यति
न क्रुद्धः परुषं ब्रूयादेतत्साधोस्तु लक्षणम् (गरुड ११३-४२)

तीन लाभ (आसनापासून) (व्यवहारदृष्ट्या) — १ नाडीची शुद्धि, २ आरोग्य आणि ३ अंगचापल्य.

आसनस्य फलान्वक्ष्ये प्रथमं नाडिशोधनम् ।
द्वितीयं शरीरारोग्यं तृतीयं चांगलाघवम् ॥ (सु.)

तीन लोक — (अ) १ स्वर्ग, २ मृत्यु व ३ पाताळ; (आ) १ भूमि, २ अंतरिक्ष आणि ३ द्यौ; (इ) १ मनुष्यलोक, २ पितृलोक व ३ देवलोक (शतपथ)

तीन वाद (वेदान्तशास्त्र) — १ आरंभवाद–जसें मृत्तिकेपासून घटाची उत्पत्ति, २ परिणामवाद–दुधापासून दहीं होणें आणि ३ विवर्तवाद–दोरीवर सर्पाचा भास होणें.

तीन वस्तु (दुसऱ्याचे स्वाधीन करूं नयेत) — १ ग्रंथ, २ स्त्री व ३ पैसा.

" पुस्तकं वनिता वित्तं परहस्तगतं गतम् ।
यदिचेत्पुनरायाति नष्टं भ्रष्टं च खंडितम् ॥ " (सु.)

तीन वासना — १ लोकवासना (लोकांनीं चांगलें म्हणावें म्हणून), २ शास्त्रवासना (शास्त्राध्ययनाची आवड) आणि ३ देहवासना (वेशभूषा वगैरेंनीं चांगलें दिसावें म्हणून खटपट). यांमुळें जीवांना खरें ज्ञान होत नाहीं. यांनाच वासनात्रय म्हणतात.

तीन वारकरी वैशिष्ट्यें — १ टाळ, २ माळ आणि ३ पताका. हीं तीन वारकरी सांप्रदायिकांस धारण करावीं लागतात.

तीन विद्याप्राप्तीचीं साधनें — १ गुरुशुश्रूषा, २ पुष्कळ धन आणि ३ विद्या देऊन विद्या घेणें.

" गुरुशुश्रूषया विद्या पुष्कलेन धनेन वा ।
अथवा विद्यया विद्या चतुर्थं नोपपद्यते ॥ " (सु.)

तीन विद्येचे शत्रु — १ गुरुशुश्रूषेचा अभाव, २ त्वरा आणि ३ आत्मश्लाघा.

" अशुश्रूषा त्वरा श्लाघा विद्यायाः शत्रवस्त्रयः ॥ "

(म. भा. उद्योग ४०–४)

तीन हेतु तीर्थप्राशनाचे — १ देहशुद्धि, २ धर्मसाधन आणि ३ मोक्षप्राप्ति असे तीन हेतु तीर्थ घेण्याचे क्रमानें सांगितले आहेत.

प्रथमं कायशुद्ध्यर्थं द्वितीयं धर्मसाधनम् ।
तृतीयं मोक्षमाप्नोति एवं तीर्थं त्रिधा पिबेत् ॥ (ऋग्वेदी ब्रह्मकर्म)

तीन वेळां विश्वरूपदर्शन -- पहिलें–धृतराष्ट्राच्या राजसभेंत शिष्टाईस गेल्या वेळीं, दुसरें–अर्जुनास गीता उपदेशितांना आणि तिसरें–युधिष्ठिरास राज्याभिषेक झाल्यानंतर द्वारकेस परत जात असतां उत्तंक नांवाच्या तपोधन ऋषीस त्याचे विनंतीवरून श्रीकृष्णानें विश्वरूपदर्शन दिलें.

(भगवान् श्रीकृष्ण)

तीन वैभवलक्षणें — १ दुसऱ्याचे गोष्टींत ढवळाढवळ न करणें, २ आपल्या कामामध्यें मग्न असणें आणि ३ मिळालेल्या संपत्तीचें रक्षण करणें. हीं तीन वैभव प्राप्त होण्याचीं लक्षणें होत.

अव्यापारः परार्थेषु नित्योद्योगः स्वकर्मसु ।
रक्षणं समुपात्तानामेतद्वैभवलक्षणम् ॥ (म. भा. सभा. ५४–७)

तीन व्यसनें (कामापासून उत्पन्न होणारीं) — १ मिथ्या भाषण, २ परस्त्रीगमन व ३ वैरावांचून क्रूर कर्म. हीं तीन व्यसनें कामापासून उत्पन्न होणारीं. (वा. रा. अरण्य. ९–३)

तीन शरिरें — १ स्थूल शरीर (पंचमहाभूतांच्या पंचीकरणानें बनलेलें), २ सूक्ष्म शरीर (मन, बुद्धि, पंचकर्मेंद्रियें व प्राण यांचें) आणि ३ कारणशरीर (अनादि). अशीं तीन शरिरें आत्म्याला असतात.

तीन शक्ति — १ ज्ञानशक्ति, २ क्रियाशक्ति आणि ३ अर्थशक्ति. (देवी. भाग. तृतीयस्कंध ७–२५)

तीन शास्ते (जगाचे नियंत्रण करणारे) — १ मनोनिग्रही माणसाचा शास्ता गुरु, २ दुष्टांचा शास्ता राजा (शासनाधिकारी) आणि ३ गुप्तपणें पाप करणारांचा प्रयक्ष यमच. हे तीन शास्ते होत.

गुरुरात्मवतां शास्ता शास्ता राजा दुरात्मनाम् ।
अथ प्रच्छन्नपापानां शास्ता वैवस्वतो यमः ॥

(म. भा. उ. ३५–७१)

तीन संग्रहणीय वस्तु — १ ग्रंथ, २ स्नेही व ३ औषधी. यांचा संग्रह करावा.

तीन साधनें (तिघांना आपलेसे करून घेण्याची) — १ वृद्ध–इष्ट वस्तूचें दान, २ बालक–प्रेमळ अंतःकरण आणि ३ विद्वान्–मधुरवाणी.

तीन सौंदर्यें — १ विचारसौंदर्य, २ गुणसौंदर्य व ३ मनोसौंदर्य.

तीन स्थानें (पवित्र) — १ अवतारांची जन्मभूमि, २ संतांची मृत्युभूमि आणि ३ वीरांची कर्मभूमि. (विचार पोथी)

तीन हट्ट — १ बालहट्ट, २ स्त्रीहट्ट आणि ३ राजहट्ट.

तीन हेतु (दांपत्य जीवनाचे) — १ धर्मसाधन, २ प्रजोत्पत्ति व ३ रतिसुख. " धर्म प्रजा रत्यर्थोहि विवाहः । "

तीन हास्यें — १ सुप्तहास्य, २ स्मितहास्य आणि ३ व्यक्तहास्य. असे हास्याचे तीन प्रकार.

तिघांना तीन प्रकारचें भय असतें — १ कनिष्ठ वर्गांना बेकारीचें भय, २ मध्यम वर्गीयांना मरणाचें भय आणि ३ उच्च वर्गीयांना अपमानाचें भय.

अवृत्तिर्भयमन्त्यानां मध्यानां मरणाद्भयम् ।
उत्तमानां तु मर्त्यानामवमानात्परं भयम् (म. भा. उ. ३४--५२)

तिघेंहि सुखी असावेत — १ अन्नदाता, २ भोजन करणारा व ३ स्वयंपाक करणारा.

"अन्नदाता तथा भोक्ता पाककर्ता सुखी भवेत् ।" (सु.)

तिघेजण दुर्दैवी — १ जुगारानें धनप्राप्ति, २ सेवा करून मान आणि ३ भिक्षेनें भोग मिळण्याची इच्छा करणारा. हे तिघे दुर्दैवी होत.

द्यूतेन धनमिच्छन्ति मानमिच्छन्ति सेवया ।
भिक्षया भोगमिच्छन्ति ते दैवेन विडम्बितः ॥ (सु.)

तिघेजण नामधारी होत — १ नांव विद्याधर पण मूर्ख, २ नांव दिवाकर पण जन्मांध व ३ नांव लक्ष्मीधर पण दरिद्री. कृति व आकृति यांत विसंगति असली म्हणजे हा संकेत उपयोजिला जातो.

विद्याधरो यथा मूर्खो जन्मांधश्च दिवाकरः ।
लक्ष्मीधरो दरिद्रश्च–त्रयस्ते नामधारकाः ॥ (सु.)

तिघेजण पृथ्वीचा उपभोग घेणारे — १ शूर, २ विद्यासंपन्न आणि ३ सेवा कशी करावी हें जाणणारा. (म. भा. उद्योग ३५-७४)

तिघेजण पित्यासमान — १ जन्मदाता, २ प्राणदाता आणि ३ अन्नदाता. (म. भा. आदि. ७२-१५)

तिघेजण यज्ञ न करितां स्वर्ग प्राप्त करून घेतात — १ अन्नदान करणारा, २ पाणपोई घालणारा आणि ३ रोगी बरा करणारा. या तिघांना यज्ञ न करितां स्वर्ग (उत्तम गति) प्राप्त होते.

अन्नदो जलदश्चैव ह्यातुरश्च चिकित्सकः ।
त्रयस्ते स्वर्गमायान्ति विनायज्ञेन भारत ॥ (योग रत्नाकर)

तिघेजण वक्रोक्तिमार्गनिपुण — १ सुबंधु, २ बाणभट्ट आणि ३ जगन्नाथ पंडित. हे तीन संस्कृत वाङ्मयांत वक्रोक्तिमार्गनिपुण असे कवि होऊन गेले.

सुबंधुर्बाणभट्टश्च कविराज इति त्रयः ।
वक्रोक्तिमार्गनिपुणाश्चतुर्थो विद्यते न वा ॥ (रा. पा. १-४१)

तिघेजण सृष्टिकर्त्याशीं स्पर्धा करणारे — १ ग्रंथकार, २ चित्रकार आणि ३ शिल्पकार. (प्राचीन हिंदी शिल्पशास्त्रसार)

तिघेजण स्थानांतरामुळें शोभा पावतात — १ सिंह, २ सत्पुरुष व ३ हत्ती. हे तिघे संचारामुळें शोभून दिसतात.

' स्थानभ्रष्टाः सुशोभन्ते सिंहाः सत्पुरुषा गजाः ' (सु.)

तीर्थयात्रेचीं तीन प्रयोजनें — १ देहदंडन, २ षड्विकारांचा त्याग आणि ३ आपपर अभेदत्व. अशीं तीर्थयात्रेचीं तीन प्रयोजनें होत.

यापरी यात्रा तीन्ही । घडल्या असती ज्यालागुनी । तो ज्ञानियाचा मुकुटमणी । प्रतिईश्वर होईल ॥ (भक्तिसारामृत ११-१०६)

त्रयी — तिन्हींचा समुदाय. (अ) १ सत्, २ चित्, आणि ३ आनंद; (आ) १ ऋक्, २ यजुस् आणि ३ सामन्; (इ) १ शंसन, २ हवन आणि ३ स्तवन; (ई) १ अध्यात्म, २ भक्ति आणि ३ नीति. अशा अनेक त्रयी आहेत. यांच्या एकत्रीकरणांतच वैदिक धर्माची सिद्धि आहे. (उ) १ बाप, २ आजा आणि ३ पणजा; (ऊ) १ आई, २ आजी आणि ३ पणजी असे अनुक्रमानें येणारे तीन पूर्वज.

त्रयी विद्या — १ ऋग्वेद, २ यजुर्वेद आणि ३ सामवेद. या तीन वेदांस मिळून त्रयी विद्या अशी संज्ञा आहे. अशाच पुढीलप्रमाणें त्रयी आहेत.

आयुर्वेद त्रयी — १ चरक, २ सुश्रुत आणि ३ अष्टांग संग्रह.

पुराण प्रस्थानत्रयी — १ रामायण, २ महाभारत आणि ३ भागवत.

वारकरी प्रस्थानत्रयी — १ श्रीज्ञानेश्वरी, २ तुकाराम गाथा आणि ३ एकनाथी भागवत.

वेदान्त प्रस्थानत्रयी — १ दशोपनिषदें, २ ब्रह्मसूत्रें आणि ३ भगवद्गीता.

रत्नत्रयी — (बुद्ध धर्मांची) १ बुद्ध, २ धर्म आणि ३ संघ.

त्रिकर्मे — १ नित्य, २ नैमित्तिक आणि ३ काम्य.

'नित्यं नैमित्तिकं काम्यमिति कर्मत्रिधा मतम्' (व्यास. स्मृति ३-१)

त्रिकटु — १ सुंठ, २ मिरें आणि ३ पिंपळी या तीन औषधांचा समुदाय.

त्रिकांड — १ कर्मकांड (मंत्रभाग), २ उपासनाकांड (ब्राह्मण-भाग) आणि ३ ज्ञानकांड (उपनिषद्भाग). या तीन कांडांनीं युक्त असा वेद.

ज्ञान भक्ति कर्म कांडा। वेद त्रिकांड नेमस्त॥ (ए. भा. २०-७१)

त्रिगुण — १ सत्त्व, २ रज आणि ३ तम. हे तीन प्राकृतिक गुण.

तै प्राणिये तंव स्वभावें । अनादि मायाप्रभावें ।
त्रिगुणाचेचि आघवे । वळिले आहाती ॥ (ज्ञा. १७-५६)

त्रिगुणाचीं तीन प्रतीकें — १ रजोगुण–रावण, २ तमोगुण–कुंभकर्ण आणि ३ सत्त्वगुण–बिभीषण. (विचार पोथी)

त्रिजात — १ दालचिनी, २ तमालपत्र आणि ३ वेलदोडे या तीन मसाल्याच्या पदार्थांस समुच्चयानें.

त्रिताप — १ आधि, २ व्याधि आणि ३ दैन्य.

त्रिदंडी — १ काया, २ वाचा आणि ३ मन. या तिहींवर ज्यानें ताबा मिळविला आहे असा पुरुष.

वाग्दंडः कर्मदण्डश्च मनोदंडश्च ये त्रयः ।
यस्यै ते नियतादण्डः स त्रिदण्डी महायतिः ॥ (सु.)

त्रिदंडी संन्यास — ज्यांत १ शिखा, २ यज्ञोपवीत व ३ कच्छ यांचा त्याग करावा लागत नाहीं असा संन्यासाचा एक प्रकार. अशास पुन्हा गृहस्थाश्रमांत येतां येतें अशी समजूत आहे.

त्रिपदागायत्री — तीन पदांचा गायत्री छंद. उदा० —

ॐतत्सवितुर्वरेण्यम् । भर्गोदेवस्य धीमहि । धियो योनः प्रचोदयात्(गा.मंत्र)

त्रिपदा जपे पवित्रपूर्ण । यालागीं वेदांचें निवासस्थान ॥ (ए. भा. ११-१३८०).

त्रिपथगा (भागीरथी)—ही १ स्वर्ग, २ मृत्यु आणि ३ पाताळ या तिन्ही लोकांत वाहणारी म्हणून त्रिपथगा.

क्षितौ तारयते मर्त्यान् नागांस्तारयतेप्यधः ।
दिवि तारयते देवान् तेन त्रिपथगा स्मृता ॥

त्रिपुटी — एक नसेल तर दुसऱ्या दोहोंची सिद्धि होणार नाहीं. अशा रीतीनें एकमेकांशीं संबद्ध अशा तीन गोष्टींचा समुच्चय; याला त्रिपुटी म्हणतात. अशा त्रिपुटी अनेक आहेत.

उदा० — परमेश्वर, आत्मा व जगत्; तत्, त्वं, व असि; सत्, चित् व आनंद; ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान; कर्ता, कारण व क्रिया; प्रकृति, पुरुष व परमपुरुष; दृश्य, द्रष्टा व दर्शन; ब्रह्म, माया व जीव; साध्य, साधक व साधन; पूजा, पूजक व पूजन; ध्येय, ध्याता व ध्यान; पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा (ख्रिस्ती धर्म) इत्यादि.

त्रिपुंड्र — १ अ - कार, २ उ - कार आणि ३ म - कार या भस्माच्या तीन रेषा कपाळावर लावावयाच्या. यास त्रिपुंड्र म्हणतात.

(गुरुचरित्र)

त्रिफळा — १ हिरडा, २ बेहडा आणि ३ आवळकठी या तीन औषधांचा समुच्चय.

त्रिमधु — १ तूप, २ गूळ किंवा साखर आणि ३ मधु. हे तीन मधुर पदार्थ मानले आहेत.

' घृतं गुडं माक्षिकं च विज्ञेयं मधुरत्रयम् । ' (शा. नि.)

त्रिमूर्ति — (अ) १ ब्रह्मा (सृजन), २ विष्णु (पालन) आणि ३ शिव (संहार) या तीन देवता; (आ) ब्रह्मा, विष्णु आणि शिव या तिन्ही देवतांच्या अंशापासूनचा दत्तात्रेयावतार.

त्रिराम — १ दाशरथि राम, २ परशुराम आणि ३ बलराम.

त्रिरूपा लक्ष्मी — १ श्रीदेवी, २ भूदेवी व ३ दुर्गा. लक्ष्मीदेवतेचीं हीं सत्त्व, रज व तम या त्रिगुणात्मक प्रकृतीचीं तीन रूपें आहेत.

' लक्ष्मी त्रिरूपा संभूता श्री भू दुर्गेति संज्ञिता ' (गरुड. ब्रह्म. ४-१)

त्रिवाचा — तीन वेळां उच्चारिलेलें वचन. ठाम अभिवचन.

जानकी आणीन हें प्रमाण । सत्य सत्य त्रिवाचा ॥

(रा. वि. १७–११८)

त्रिवारशांति — १ व्यक्तीमध्यें शांति, २ राष्ट्रांत शांति आणि ३ जगांत शांति. याचा अर्थ सर्वत्र शांति नांदावी असा आहे. म्हणून कोणत्याहि शुभकार्याचे अंतीं ' ॐ शांतिः शांतिः शांतिः ' असा शांतिपाठ त्रिवार उच्चारण्याचा परिपाठ आहे.

त्रिविध ताप — १ आधिदैविक (विद्युत्पतन, अतिवृष्टि इ.), २ आध्यात्मिक (ज्वर, शूळ इ.) आणि ३ आधिभौतिक (पाण्यांत बुडणें, चौर्य, भय इ.)

देवापासूनि आधिदैविक । मानसताप आध्यात्मिक ।
भूतापासाव तो भौतिक । या नांव देख त्रिविध ताप ॥

(ए. भा. २२–३०९)

त्रिविध देह — १ स्थूल देह, २ सूक्ष्म देह आणि ३ कारण देह.

त्रिदोष (आयुर्वेद) — १ वात, २ पित्त आणि ३ कफ. हे शरिरांत असणारे तीन दोष. चांगल्या स्थितींत असले म्हणजे शरिराचें रक्षण करतात व बिघडले म्हणजे नाश करतात.

वात पित्त कफा एते त्रयो दोषा इति स्मृताः । (भावप्रकाश पूर्वखंड)

त्रिविध बुद्धि — १ देहबुद्धि, २ जीवबुद्धि आणि ३ आत्मबुद्धि.

त्रिविध वीरचूडामणी — १ रणवीर, २ विद्यावीर आणि ३ दानवीर. अशा तीन गुणांनीं युक्त असा प्राचीन कालीं राजा भोज होऊन गेला. त्याला त्रिविध वीरचूडामणी म्हणत.

त्रिविध श्रद्धा — १ सात्त्विक, २ राजस आणि ३ तामस.

'त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा।' (भ. गी. १७–१)

त्रिवेणी संगम — १ गंगा, २ यमुना आणि ३ सरस्वती (गुप्त). या तीन नद्यांचा संगम हा प्रयागास आहे. त्रिवेणी संगमावरील स्नान फार पुण्यकारक मानलें आहे.

त्रिसूत्री (भगवंताच्या अवतार कार्याची)— १ सज्जनांचें रक्षण, २ दुष्टांचें निर्दालन व ३ धर्माची संस्थापना.

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ (भ. गी. ४-८)

त्रिस्थळी यात्रा — १ काशी, २ प्रयाग आणि ३ गया. या तीन तीर्थांची यात्रा.

त्रिस्रोता — १ स्वर्ग, २ मृत्यु आणि ३ पाताळ. या तिन्ही लोकांत वाहणारी–गंगा. पृथ्वीवरील प्रवाहास भागीरथी, स्वर्गांतील प्रवाहास मंदाकिनी व पाताळ लोकांतील प्रवाहास भोगावती अशी संज्ञा आहे.

त्रैविद्या — १ भगवद्गीता, २ उपनिषदें आणि ३ ब्रह्मसूत्रें. या तीन ग्रंथांस मिळून त्रैविद्या अशी संज्ञा आहे.

३॥

साडेतीन पीठें — १ तुळजापूरची भवानी, २ मातापुरची रेणुका, ३ जोगाईच्या आंब्याची योगेश्वरी आणि ॥ कोल्हापूरची लक्ष्मी. हीं देवीचीं साडेतीन पीठें मानिलीं आहेत.

साडेतीन मुहूर्त — १ वर्षप्रतिपदा, २ अक्षय्य तृतीया, ३ विजयादशमी हे तीन पूर्ण व बलिप्रतिपदा हा अर्धा.

साडेतीन वाद्यें — १ वीणा, २ पखवाज, ३ बांसरी आणि ·॥· मंजिरी मिळून साडेतीन वाद्यें.

साडेतीन शहाणे (पेशवाईतील) — १ सखारामबापू बोकील, २ देवाजीपंत चोरघडे, ३ विठ्ठलसुंदर आणि नाना फडणवीस अर्धा शहाणा. हे साडेतीन शहाणे मराठ्यांच्या इतिहासांत प्रसिद्ध आहेत.

४

चतुर्थ — १ चार वस्तूंच्या समुच्चयापैकीं चवथ्या वस्तूला संकेतानें म्हणतात. कात, मोक्ष, दंड इ.

(अ) १ पान, २ सुपारी, ३ चुना आणि ४ **कात**; (आ) १ धर्म २ अर्थ, ३ काम आणि ४ **मोक्ष**; (इ) १ साम, २ दाम, ३ भेद, आणि ४ **दंड**.

चतुराश्रम — १ ब्रह्मचर्य, २ गृहस्थ, ३ वानप्रस्थ आणि ४ संन्यास.

'चतुराश्रमवशें । पुरुषु चतुर्धा दीसे ॥' (ज्ञा. १८–६२९)

चतुरायुध — १ शंख, २ चक्र, ३ गदा आणि ४ पद्म. हीं श्रीविष्णूचीं चार आयुधें.

चतुरायुधक्षेत्रें — १ शंखक्षेत्र–जगन्नाथपुरी, २ चक्रक्षेत्र-भुवनेश्वरी, ३ गदाक्षेत्र–जयपूर (कलकत्ता) आणि ४ पद्मक्षेत्र–मैत्रावन (कलकत्ता).

चतुर्विध अन्न — १ भक्ष्य–चर्वण करून खाण्याचे पदार्थ–भाकरी, पोळी वगैरे; २ भोज्य–भोजन करण्याचे, भात वगैरे; ३ लेह्य–चोष्य–चोखण्याचे, जसें पंचामृत, रायतें वगैरे आणि ४ पेय–पिण्याचें–दूध, ताक वगैरे. (आ) १ शुष्क, २ पक्व, ३ स्निग्ध आणि ४ विदग्ध. (शिव–ली.)

चतुर्विध पुरुषार्थ — १ धर्म, २ अर्थ, ३ काम व ४ मोक्ष. हे चार पुरुषार्थ होत.

चतुर्विध दानें — १ आहारदान, २ ज्ञानदान, ३ औषधीदान आणि ४ अभयदान (जैनधर्म).

चतुर्विध प्रलय — १ नित्य प्रलय, २ प्राकृत प्रलय, ३ नैमित्तिक प्रलय आणि ४ आत्यंतिक प्रलय.

चतुर्विधभक्त — १ आर्त–द्रौपदी, २ जिज्ञासू–उद्धव, ३ अर्थार्थी-ध्रुव आणि ४ ज्ञानी–शुकदेव.

'आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ।' (भ. गी. ७–१६)

चतुर्विध मित्र — १ औरस, २ नात्यागोत्यांचे, ३ वंशपरंपरा ऋणानुबंधी आणि ४ आपत्कालीं रक्षण करणारे.

औरसं कृतसंबंधं तथा वंशक्रमागतम् ।
रक्षकं व्यसनेभ्यश्च मित्रं ज्ञेयं चतुर्विधम् ॥ (का. नी. ४–७४)

चतुर्विध मुक्ति — १ सलोकता, २ समीपता, ३ सरूपता व ४ सायुज्यता.

चतुर्विध योग — १ कर्मयोग, २ भक्तियोग, ३ राजयोग आणि ४ ज्ञानयोग.

चतुर्व्यूह — (अ) १ वासुदेव, २ संकर्षण, ३ प्रद्युम्न आणि ४अनिरुद्ध. पृथ्वीस आधारभूत असे चार व्यूह आहेत; (आ) १ रोग, २ आरोग्य, ३ निदान आणि ४ भैषज्य (वैद्यशास्त्र).

चतुःश्लोकी भागवत — श्रीमद्भागवताच्या दुसऱ्या स्कंधांतील नवव्या अध्यायांतील ३२ ते ३५ हे चार श्लोक. यांत ब्रह्मदेवाला भगवंतानें सांगितलेलें गुह्य ज्ञान अथवा सर्व भागवत ग्रंथाचें सार आहे, म्हणून त्यास चतुःश्लोकी भागवत म्हणतात.

चतुःश्लोकी शाकुंतल — शाकुंतल नाटकांतल्या चवथ्या अंकांतील चार श्लोक. या कालिदासाच्या अमर कृतीला ही संज्ञा आहे.

काव्येषु नाटकं रम्यं तत्रापि च शकुंतला ।
तन्मध्ये तु चतुर्थोऽङ्कः तत्र श्लोकचतुष्टयम् ॥ (सु.)

चतुःसूत्री (कर्मयोगाची) — १ कर्मण्येवाधिकारस्ते, २ मा फलेषु कदाचन, ३ मा कर्मफलहेतुर्भूः, ४ मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि. (भ.गी. २-४७)

चतुःसूत्री (महानुभाव) — १ अहिंसा, २ निःसंग, ३ निवृत्ति आणि ४ भक्तियोग.

चतुःसूत्री (लोकमान्यप्रणीत) — १ स्वदेशी, २ बहिष्कार, ३ राष्ट्रीय शिक्षण आणि ४ स्वराज्य.

चतुःसूत्री (समर्थांची) — १ हरिकथानिरूपण–भक्ति, २ राजकारण–शक्ति, ३ सर्वविषयीं सावधपणा–युक्ति आणि ४ साक्षेप–मुक्ति. (दा. बो. ११-५-४)

चत्वार गुण — १ तमोगुण, २ रजोगुण, ३ सत्त्वगुण आणि ४ शुद्धसत्त्वगुण.

ऐसे हे चत्वार गुण । चौदेहांचे ।। (दा. बो. १७-९-५)

चत्वार शक्ति — १ क्रियाशक्ति, २ द्रव्यशक्ति, ३ इच्छाशक्ति आणि ४ ज्ञानशक्ति. (दा. बो. १७-९-६)

चतुष्पाद धर्म — (अ) १ तप, २ यज्ञ, ३ ज्ञान व ४ वैराग्य; (आ) १ अहिंसा, २ सत्य, ३ अस्तेय आणि ४ आनृण्य. हे चार धर्मांचे पाद (पाय) होत.

चतुष्पाद संपत्ति व तिच्या सोळा कला (आयुर्वेदांतील) —

संपत्ति	कला
१ वैद्य —	१ दक्ष, २ गुरूपासून वैद्यक शिकलेला, ३ स्वच्छतेची आवड असलेला व ४ अनुभविक.
२ औषध—	१ अनेक प्रकारें देतां येण्यासारखें, २ अनेक विकार बरें करणारें, ३ संपन्न–ताजें व ४ ज्या रोगावर द्यावयाचें त्याच रोगावर योजिलेलें.
३ परिचारक —	१ प्रेमळ, २ स्वच्छतेनें राहणारा, ३ रोग्याबद्दल आस्था असलेला व ४ चतुर.
४ रोगी —	१ औषधास खर्च करणारा, २ वैद्यावर विश्वास ठेवणारा, ३ रोगाचीं खरीं कारणें सांगणारा आणि ४ धैर्यवान्.

या प्रकारच्या षोडशकलात्मक चतुष्पाद संपत्तीनें युक्त असा रोगी बरा झाल्यावांचून राहात नाहीं असें वैद्यक शास्त्रांत सांगितलें आहे. (वा. अ. १)

चातुर्मास्य — १ आषाढ शु. ११ ते कार्तिक शु. ११ पर्यंतचा चार महिन्यांचा काळ.

चार अवस्था — (अ) १ जागृति (सृष्टीच्या विविधतेचा अनुभव), २ स्वप्न, ३ सुषुप्ति (अद्वैताचा अनुभव) आणि ४ तुर्या (शुद्धावस्था); (आ) १ बाल्य, २ पौगंड, ३ तारुण्य आणि ४ वार्धक्य. यांना अवस्था-चतुष्टय म्हणतात.

चार अवस्थांतील चार गोष्टींचा कधींच मेळ बसत नाहीं — १ बाळपणच्या कल्पना, २ तारुण्यांतील मनोराज्यें, ३ प्रौढपणींचे विचार आणि ४ वार्धक्यांतील भावना.

चार अरण्यें — १ दंडकारण्य, २ स्वकारण्य, ३ नैमिषारण्य आणि ४ धर्मारण्य. हीं पूर्वकालीं भारतवर्षांतर्गत जंबुद्वीपांतील चार अरण्यें होतीं. (मूळ. कथा.)

चार अलंकार — १ उपमा, २ दीपक, ३ रूपक आणि ४ यमक. (भ. ना. १६-४०)

चार अंगें (आत्मज्ञानाचीं) — १ इच्छाशक्ति, २ प्रज्ञा, ३ नीतिज्ञान व ४ श्रद्धा. (कल्याण ईश्वरांक)

चार अंगें (सहिष्णुतेचीं)—१ द्वंद्वसहिष्णुता, २ वेगसहिष्णुता, ३ परोत्कर्षसहिष्णुता आणि ४ परमतसहिष्णुता.

चार आश्रम — १ ब्रह्मचर्याश्रम, २ गृहस्थाश्रम, ३ वानप्रस्थाश्रम आणि ४ संन्यासाश्रम. 'एते गृहस्थप्रभवाश्चत्वारः पृथगाश्रमाः'। (मनु ६-८७)

चार आर्य सत्यें (बौद्ध धर्म) — १ जग दुःखमय आहे, २ दुःखाचें कारण (तृष्णा), ३ कारण नाहींसें झालें तर दुःखाचाहि (निरोध) होतो आणि ४ दुःखनिरोध शक्य तर तो प्राप्त करून घेण्याचा (मार्ग).

चार आचार्य (वैष्णव सांप्रदायाचे) — १ विष्णुस्वामी, २ निंबार्क, ३ मध्वाचार्य आणि ४ रामानुजाचार्य. हे चारहि वैष्णव सांप्रदायप्रवर्तक दाक्षिण भारतांत होऊन गेले.

विष्णुस्वामी प्रथमतो निंबादित्यो द्वितीयकः ।
मध्वाचार्यस्तृतीयस्तु चतुर्थो रामानुजस्तथा ॥

चार आत्मे — १ जीवात्मा–शरिरांत राहणारा, २ शिवात्मा—जग भरून राहणारा, ३ परमात्मा–दिक्कालातीत आणि ४ निर्मलात्मा (केवळ शुद्ध चैतन्य स्वरूप).

चार आत्मज्ञानाचीं मुख्य साधनें — १ विवेक, २ वैराग्य, ३ शमादि षट्क व ४ मुमुक्षता.

चार आपत्तींचीं द्वारें — १ अयोग्यकर्मांचा आरंभ, २ स्वजनांशीं वैर, ३ बलवंताशीं स्पर्धा आणि ४ दुष्ट स्त्रीचा विश्वास.

(प्रमाणसाहस्री)

चार आरोग्याचे शत्रु — १ रसनेची विकृत रुचि, २ देहांतील मृत तंतु, ३ अनवश्यक अन्न आणि ४ न पचतां जठरांत सांचणारें अन्न.

चार उपाय — १ साम, २ दाम, ३ भेद आणि ४ दंड.

चार उपवेद — १ आयुर्वेद (ऋग्वेद), २ धनुर्वेद (यजुर्वेद), ३ गांधर्ववेद (सामवेद) आणि ४ स्थापत्यवेद–अर्थशास्त्र (अथर्ववेद)

(भ. ब्रा. २–८)

चार ऋणें — १ देवऋण, २ ऋषिऋण, ३ पितृऋण व ४ मनुष्य-ऋण किंवा समाजऋण.

चार ऋत्विज — १ अध्वर्यु, २ ब्रह्मा, ३ होता आणि ४ उद्गाता. असे यज्ञांत मुख्य चार ऋत्विज असतात.

चार कर्मे (इस्लाम धर्म) — १ नमाज, २ रोजा, ३ जकात व ४ हज. (कल्याण साधनांक)

चार कर्मे (यतींचीं) — १ ध्यान, २ अंतर्बाह्य शुचिता, ३ भिक्षा आणि ४ नित्य एकान्तसेवन.

ध्यानं शौचं तथा भिक्षा नित्यमेकान्तशीलता ।
यतेश्चत्वारि कर्माणि पञ्चमं नोपपद्यते ॥ (स्कंद. काशी. ४१–२०)

चार कलि (कलह) वास्तव्य स्थानें — १ द्यूत, २ मद्यपान, ३ स्त्रियांसंबंधीं क्षुद्र व्यवहार व ४ हिंसा. कलीनें आपल्यास राहावयास स्थान नेमून देण्याविषयीं विनंती केल्यावरून राजा परीक्षितानें हीं चार प्रकारचीं दुष्कृत्यें जेथें चालतात, अशीं चार स्थानें नेमून दिलीं.

अभ्यर्थितस्तदा तस्मै स्थानानि कलये ददौ ।
द्यूतं पानं स्त्रियः सूना यत्राधर्मश्चतुर्विधः ॥

(भाग. स्कंध १–१७–३८)

चार 'ग' कार — १ गंगा, २ गीता, ३ गायत्री आणि ४ गोविंद. या चार 'ग' कारांचें स्मरण करणारांस पुनर्जन्मापासून मुक्त होतां येतें. (पां. गी.)

चार गुण (पुढारीपणाचे) — १ धैर्य, २ इच्छाशक्ति, ३ बुद्धिमत्ता व ४ उपजत बुद्धि. (नेपोलिअन)

चार गुण कोंबड्यापासून घ्यावेत — १ पहाटे उठणें, २ युद्ध करणें, ३ स्वकष्टार्जित भाग बंधुवर्गास देणें व ४ स्त्रीचें आपत्तीपासून रक्षण करणें.

युद्धं च प्रातरुत्थानं भोजनं सहबंधुभिः ।
स्त्रियमापद्गता रक्षेच्चतुः शिक्षेत् कुक्कुटात् ॥ (वृ. चा. ६-१८)

चार गुण दुर्लभ — १ संपत्तींत पावित्र्य, २ दानांत विनय, ३ पराक्रमांत दया आणि ४ अधिकारांत निरभिमानता.

चार गुण स्वभावसिद्ध असतात — १ औदार्य, २ मधुर भाषण, ३ धैर्य व ४ युक्तायुक्त विचार.

दातृत्वं प्रियवक्तृत्वं धीरत्वमुचितज्ञता ।
अभ्यासेन न लभ्यन्ते चत्वारः सहजागुणाः ॥ (सु.)

चार गोष्टी एकदा गेल्या म्हणजे पुन्हा न मिळणाऱ्या — १ गेलेली अब्रू, २ बोललेला शब्द, ३ दवडलेली संधि आणि ४ गेलेलें आयुष्य.

चार गोष्टी कल्याणकर — १ वाणीचा संयम, २ अल्पनिद्रा, ३ अल्प आहार आणि ४ एकाग्र चित्तानें परमेश्वर-स्मरण.

चार गोष्टींपासून ग्रंथ सांभाळावेत — १ तेल, २ पाणी, ३ अस्ताव्यस्तपणें ठेवणें आणि ४ मूर्खांचे हातीं देणें.

तैलाद्रक्षेत् जलाद्रक्षेत् रक्षेत् शिथिलबंधनात् ।
मूर्खहस्ते न दातव्यमिदं वदति पुस्तकम् ॥ (सु.)

चार गोष्टी दुर्लभ — १ संतोषवृत्तीनें दान, २ गर्वरहित ज्ञान, ३ शौर्य असून क्षमा आणि ४ संपत्तिमान् असून त्याग.

चार गोष्टी नसतील तेथें वास्तव्य करूं नये — (अ) १ मान अथवा प्रतिष्ठा, २ प्रीति, ३ गोत्रज व ४ ज्ञानसंपादन; (आ) १ धनिक, २ वैद्य, ३ श्रोत्रिय ब्राह्मण आणि ४ जलपूर्णा नदी.

तत्र मित्र न वस्तव्यं यत्र नास्ति चतुष्टयम् ।
ऋणदाता च वैद्यश्च श्रोत्रियः सजला नदी ॥ (सु.)

चार गोष्टी पडद्याआड ठेवाव्यात — १ भोजन, २ भजन, ३ संपत्ति आणि ४ स्त्री.

भोजन भजन खजाना और नारी
ये चारों चीजें कर परदेकी आरी

चार गोष्टी पवित्र — १ झऱ्याचें पाणी, २ पतिव्रता स्त्री, ३ कल्याण करणारा राजा अथवा थोर पुरुष व ४ संतुष्ट ब्राह्मण.

चार गोष्टींचा परिणाम दृष्टोत्पत्तीस येत नाहीं — १ अजायुद्ध, २ ऋषिश्राद्ध (तर्पण), ३ सकाळचे ढग आणि ४ दांपत्यकलह.

अजायुद्धमृषिश्राद्धं प्रभाते मेघडम्बरम् ।
दंपत्योः कलहश्चैव परिणामे न किंचन ॥ (सु.)

चार गोष्टी बुद्धीची वाढ करणाऱ्या — १ तीर्थावलोकन, २ सर्वत्र परिचय, ३ द्रव्यार्जन आणि ४ नाना प्रकारचें निरीक्षण.

चार गोष्टी मनुष्यास बिघडविणाऱ्या — १ यौवन, २ धन, ३ अधिकार आणि ४ अविवेक.

चार गोष्टी मिळतांना सुख व सोडतांना दुःख देणाऱ्या — १ अधिकार, २ गर्भ, ३ ऋण आणि ४ श्वानमैथुन.

अधिकारं च गर्भं च वित्तं च श्वानमैथुनम् ।
आगमे सुखमाप्नोति निर्गमे प्राणसंकटम् ॥ (सु.)

चार गोष्टी मोक्षाचे दारावरील द्वारपाल — १ शम, २ विचार, ३ संतोष आणि ४ साधुसमागम.

मोक्षद्वारे द्वारपालाश्चत्वारः परिकीर्तिताः ।
शमोविचारः संतोषश्चतुर्थः साधुसंगमः ॥ (यो. वा. २-११-५९)

चार गोष्टींची लहान म्हणून उपेक्षा करूं नये — १ रोग, २ सर्प, ३ अग्नि आणि ४ शत्रु.

चार गोष्टींत लज्जा अथवा भिडस्तपणा असूं नये — १ धान्य-संग्रह, २ विद्यासंपादन, ३ भोजन व ४ व्यवहार.

धनधान्यप्रयोगेषु विद्यासंग्रहणेषु च ।
आहारव्यवहारे च त्यक्तलज्जः सुखी भवेत् ॥ (चाणक्य-नीतिसार)

चार गोष्टी वर्ज्य — १ आत्मनिंदा, २ आत्मस्तुति, ३ परनिंदा व ४ परस्तुति. या चारहि भल्या मनुष्यास वर्ज्य मानिल्या आहेत.
(म. भा. कर्ण ३६-४५)

चार गोष्टी सद्यःफलदायक — १ देवतांचा संकल्प, २ बुद्धि-वानांचा प्रभाव, ३ विद्वानांचा विनय आणि ४ पापी पुरुषांचा नाश. हे चारी सद्यःफलदायी होतात असें बृहस्पतीनें इंद्रास सांगितलें अशी कथा आहे.

देवतानां च सङ्कल्पमनुभावं च धीमताम् ।
विनयं कृतविद्यानां विनाशं पापकर्मणाम् ॥ (म. भा. उ. ३३-७२)

चार गोष्टी स्वार्थ-परमार्थ हे दोन्ही साधणाऱ्या — १ सूर्योदया-पूर्वी स्नान, २ गोसेवा, ३ पुष्पोद्यानांत निवास आणि ४ मातापित्यांची सेवा.

प्रातःस्नानं गवां सेवा आरामः पुष्पवाटिका ।
मातापित्रोश्च शुश्रूषा शास्त्राय च सुखाय च ॥ (सु.)

चार गोष्टी राष्ट्रोदयास आवश्यक — १ लोकांत एकी, २ धर्म-श्रद्धा, ३ विद्वानांचा मान आणि ४ शक्तिसंपन्नता. (भक्ति सा. २८-४२)

चार गोष्टी वडिलांच्या सेवेनें वृद्धिंगत होणाऱ्या — १ आयुष्य, २ विद्या, ३ बल व ४ यश.

अभिवादनशीलस्य नित्यं वृद्धोपसेविनः ।
चत्वारि तस्य वर्धन्ते आयुर्विद्या यशो बलम् ॥ (मनु. २-१२१)

चार गृहसौख्यें — १ स्वतःचें व कुटुंबियांचें आरोग्य, २ सुशील व सुदृढ पत्नी, ३ खेळकर व दणकट संतति आणि ४ आवश्यक तितकें धन.

चार चरण (धर्माचे) — १ आत्मज्ञान, २ अध्यात्मचिंतन, ३ मनोविजय (मनःस्थिरत्व) आणि ४ इंद्रियनिग्रह.

‘ चतुष्पादा हि धर्मस्य ज्ञानं ध्यानं शमोदमः ॥ ’
(भ. प्रतिसर्ग २६-३५)

चार देह — १ स्थूल देह, २ लिंग देह, ३ सूक्ष्म देह आणि ४ कारण देह.

चार दुर्गुण विनाशाप्रत नेणारे — १ आळस, २ निद्रा, ३ विसराळूपणा व ४ दिरंगाई. (कुरल)

चार धनदायाद — १ धर्म, २ अग्नि, ३ चोर आणि ४ राजा अथवा शासनाधिकारी.

‘ चत्वारो धनदायादा धर्माग्निनृपतस्कराः ॥ ’ (सु.)

चार धर्मलक्षणें — १ वेद, २ स्मृति, ३ सदाचार (शिष्टाचार) आणि ४ (शास्त्रानें विकल्प सांगितला असेल तेथें) जो पक्ष आपणांस प्रिय असेल तो.

वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ।
एतच्चतुर्विधं प्राहुः साक्षाद्धर्मस्य लक्षणम् ॥ (मनु २-१२)

चार धर्मांतील चार सर्वश्रेष्ठ देवस्थानें — १ हिंदु (वैदिक)– काशी–श्रीविश्वेश्वर, २ बौद्ध — बुद्धगया–बोधिवृक्षाचें स्थान, ३ मुसलमान — मक्का–काबा. ४ ख्रिस्ती — जेरुसलेम–ख्रिस्ताची जन्मभूमि.

चार धामें (पवित्रस्थानें) — (अ) १ बदरी-केदार, २ रामेश्वर, ३ द्वारका व ४ जगन्नाथपुरी हीं भारतवर्षांत चार दिशेला असलेलीं; (आ) हिमालयांतील १ गंगोत्री, २ जम्नोत्री, ३ बदरी आणि ४ केदार.

चार नरकद्वारें — १ काम, २ लोभ, ३ क्रोध आणि ४ दंभ.

'कामोलोभस्तथाक्रोधोदंभश्चत्वार इत्यमी ॥' (ग. गी. १०-२३)

चार पण — १ अज्ञानी बालपण, २ धुंद तरुणपण, ३ पराधीन म्हातारपण व ४ बाळंतपण. पहिले तीन पुरुषांना व त्याखेरीज चवथा स्त्रियांना असे चार पण आयुष्यांत जिंकावयाचे असतात. (भा. मर्दन)

चार परब्रह्माचीं प्रतीकें — १ आकाश, २ सागर, ३ सूर्य आणि ४ नगाधिराज हिमालय.

चार पैगंबर — १ दाऊद, २ महम्मद, ३ ईसा व ४ मूसा असे चार पैगंबर मुसलमानांत मानिले आहेत. (तत्त्व-निज-विवेक)

चार पुण्यश्लोक — १ नल, २ युधिष्ठिर, ३ जनक आणि ४ जनार्दन (परमेश्वर). हे चार पवित्र कीर्तीचे पुरुष म्हणून सांगितले आहेत.

पुण्यश्लोको नलोराजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः ॥
पुण्यश्लोको विदेहश्च पुण्यश्लोको जनार्दनः ॥ (पद्म. सृष्टि)

चार पार्वतीच्या सख्या — १ जया, २ विजया, ३ जयंती आणि ४ मंगलारुणा. (स्कंद. चातु. २१-२३)

चार प्रकार (अभिनयाचें) — १ सात्त्विक, २ आंगिक, ३ वाचिक आणि ४ आहार्य. (भ. ना. ६-२४)

चार प्रकार (कुस्तीचे) — १ भींमसेनी (शक्तीचे डाव), २ हनुमन्ती (युक्तीचे डाव), ३ जांबुवन्ती (बांधाचे डाव) आणि ४ जरासन्धी (नेस्त्या–हातपाय मोडण्याचे). (व्या. को.)

चार प्रकारचे नायक (नाट्यशास्त्र) — १ धीरोदात्त, २ धीरोद्धत, ३ धीरललित आणि ४ धीरप्रशांत.

चार प्रकार नांवाचे — १ नाक्षत्रनाम, २ मासनाम, ३ देवनाम आणि ४ व्यावहारिक नाम.

चार प्रकारच्या नायिका (नाट्यशास्त्र) — १ धीरा, २ ललिता, ३ उदात्ता आणि ४ निभृता; (आ) १ अनुकूला, २ दाक्षिणा, ३ शठा व ४ दुष्टा. (अनंगरंग)

चार प्रकारचे पाकयज्ञ — १ वैश्वदेव होम, २ बलिकर्म, ३ नित्य-श्राद्ध आणि ४ अतिथिभोजन.

चार प्रकारची पुष्टिभक्ति – पुष्टि म्हणजे ईश्वरी अनुग्रह — १ प्रवाह पुष्टिभक्ति, २ मर्यादा पुष्टिभाक्ति, ३ पुष्टि-पुष्टिभाक्ति आणि ४ शुद्ध पुष्टिभक्ति. (व. सं.)

चार प्रकार (प्राणायामाचे) — १ पूरक (श्वास वर ओढून घेणें), २ कुंभक (श्वास स्थिर करणें), ३ रेचक (श्वास हळूहळू खालीं सोडणें) आणि ४ शून्यक अथवा केवल कुंभक (आंतून श्वास बाहेर न सोडणें व बाहेरूनहि न घेणें.)

रेचकः पूरकश्चैव कुंभकः शून्यकस्तथा ।
एवं चतुर्विधः प्रोक्तः प्राणायामोमनीषिभीः ॥
(बृ. ना. पूर्व. ३३-१२०)

चार प्रकारच्या ताना (संगीतशास्त्र) — १ सरलतान, २ मिश्र-तान, ३ अलंकारिक तान आणि ४ कूटतान.

चार प्रकार दानाचे — १ नित्य, २ नैमित्तिक, ३ काम्य व ४ विमल (निष्काम)

नित्यं नैमित्तिकं काम्यं विमलं च चतुर्विधम् ॥ (सौ. पु. १०-१)

चार प्रकार जपाचे — १ रसनाजप, २ ओष्ठजप, ३ श्वासजप व ४ मानसजप. (Pathway to God)

चार प्रकारची देहशुद्धि (वैद्यशास्त्र) — १ वमन, २ विरेचन' ३ निरूह आणि ४ नस्य. या चार प्रकारांनीं देहशुद्धि करतां येते.

चार प्रकारची परीक्षा — (अ) (सुवर्णाची) — १ कसोटीवर घासणें, २ तोडणें, ३ तापविणें व ४ बडविणें; (आ) (मनुष्याची) १ बहुश्रुतता, २ भारदस्तपणा, ३ कुल व ४ कृति. अशा चार प्रकारांनीं परीक्षा करतां येते. (चंद्रकांत भाग १ ला)

चार प्रकारचे महापुरुष (गीतोक्त) — १ स्थितप्रज्ञ, २ त्रिगुणातीत, ३ भक्तिमान् आणि ४ निष्काम कर्मयोगी.

चार प्रकारचीं पापें — १ कायिक, २ वाचिक, ३ मानसिक आणि ४ सांसर्गिक. (काशी खंड)

चार प्रकारचे प्राणी — १ अण्डज (पक्षी, मासे वगैरे), २ जारज (मनुष्य, पशु वगैरे), ३ स्वेदज (उवा, ढेकूण वगैरे) आणि ४ उद्भिज्ज (झाडें, वेली वगैरे). या चार प्रकारच्या जीवकोटि आहेत. यांना योनिचतुष्टय म्हणतात.

चार खाणी चारी वाणी । चौऱ्यायशी लक्ष जीवयोनि ॥
निर्माण झाले लोक तिन्ही । पिंड ब्रह्मांड ॥ (दा. बो. १३-३-१५)

चार प्रकारचे लोक — (अ) १ कर्मी, २ भक्त, ३ ज्ञानी व ४ योगी. 'कर्मिणः सन्ति भक्ताश्च ज्ञानिनो योगिनस्तथा ॥' (रा.गी. ११-३)

(आ) १ दुर्जन, २ मतलबी, ३ सज्जन आणि ४ संत.

दुर्जन रत संसारीं । मतलबी कामापुरता धरी ।
सज्जन त्याचा विचार करी । संत त्यागी सर्वथा ॥
(भ. सा. १७-६४)

(इ) १ स्वार्थ सोडून लोकांचें कल्याण करणारे, २ स्वार्थ न सोडतां लोकांसाठीं झटणारे, ३ स्वार्थासाठीं लोकांचें नुकसान करणारे व ४ स्वार्थहि नसतां दुसऱ्याची निरर्थक हानि करणारे. असे चार प्रकारचे लोक जगांत असतात.

एते सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थं परित्यज्य ये ।
सामान्यास्तु परार्थमुद्यमभृतः स्वार्थाविरोधेन ये ॥

तेऽमी मानुषराक्षसाः परहितं स्वार्थाय निघ्नन्ति ये।
ये निघ्नन्ति निरर्थकं परहितं ते के न जानीमहे ॥ (भ. नी. ७४)

चार प्रकारचें वर्ष (कालगणना) — १ चांद्रवर्ष, २ सौरवर्ष, ३ नाक्षत्रवर्ष आणि ३ सायन अथवा संपातवर्ष.

चार प्रकारचे वाद — १ आरम्भवाद — हा काणादांचा पक्ष— नैय्यायिक मीमांसक वगैरे, २ संघातवाद — हा बौद्धांचा पक्ष, ३ परिणामवाद — सांख्य पातंजल वगैरेंचा पक्ष आणि ४ विवर्तवाद किंवा मायावाद — अद्वैत वेदान्त्यांचा पक्ष.

चार प्रकारचीं वाद्यें — १ तंत – तारेचीं वाद्यें, २ वितंत – टाळ, चिपळ्या वगैरे, ३ घन – नगारा, डफ वगैरे व ४ सुस्वर – सनई वगैरे.

चार प्रकारची वैद्याची वृत्ति असावी — १ रोग्याविषयीं ममता, २ दया, ३ साधा रोग बरे करण्याचा उत्साह व ४ रोग असाध्य असेल तर (अगोदरच) सोडणें, अशी वैद्याची वृत्ति असावी.

मैत्री कारुण्यमार्तेषु शक्ये प्रीतिरुपेक्षणम् ।
प्रकृतिस्थेषु भूतेषु वैद्यवृत्तिश्चतुर्विधा ॥ (च. सू. ९–२४)

चार प्रकारची शुचिता — १ द्रव्यशौच, २ मनःशौच, ३ वाक्‌शौच व ४ कामशौच.

चार प्रकारची संन्यासदीक्षा — १ कुटीचक (आश्रमविहित कर्म करणारा), २ बहूदक (अवश्य कर्में करून ज्ञानाभ्यास करणारा), ३ हंस (फक्त ज्ञानाभ्यास करणारा) व ४ परमहंस (ब्रह्मज्ञानी झालेला).

' दीक्षा असेही चतुर्विध ' (गुरु-ली. १३–२४)

चार प्रकारचीं स्त्रियांचीं भूषणें — १ केशभूषा, २ वेषभूषा, ३ वस्त्रप्रावरण आणि ४ विलेपन (अंगाला उटी लावणें).

कचधार्यं देहधार्यं परिधेयं विलेपनम् ।
चतुर्धा भूषणं प्राहुः स्त्रीणामत्यर्थदेशिकम् ॥ (रसाकर)

चार प्रकारचें ज्ञान — १ शब्दज्ञान, २ अपरोक्षज्ञान, ३ सामान्य ज्ञान व ४ विशेष ज्ञान.

चार बहुमोल रत्नें — १ सवत्स कामधेनु, २ सुंदरसा पलंग, ३ रत्न-जडित दीप व ४ नागवेलीचीं पानें. हीं चार रत्नें पाताळ लोकच्या राजा वासुकीनें भूलोकींच्या राजा उदयनाला आपल्या कन्येच्या विवाह प्रसंगीं हुंडा म्हणून दिलीं अशी कथा आहे. (प्र. को.)

चार बुद्ध तीर्थक्षेत्रें — १ लुम्बिनी—बुद्ध जन्मस्थान, २ बुद्धगया —ज्ञानप्राप्तिस्थान, ३ ऋषिपतन-–बुद्धानें पहिलें प्रवचन केलें तें ठिकाण व ४ कुसिनारा — बुद्ध निर्वाणस्थल.

चार ब्रह्मवेत्ते — १ श्रीदत्तात्रेय, २ शुकाचार्य, ३ कपिलमुनि व ४ याज्ञवल्क्य. हे चार महान् ब्रह्मवेत्ते होऊन गेले.

चार ब्रह्मदेवाचे मानसपुत्र — १ सनक, २ सनन्दन, ३ सनातन आणि ४ सनत्कुमार. हे चार ब्रह्मदेवाचे मानसपुत्र ज्ञानी असून ते नैष्ठिक ब्रह्मचारी होते. (भाग. स्कंध ३ अ. १२।४)

चार 'म'कार स्वभावसिद्धच असावे लागतात — १ मन, २ मनगट, ३ मेंदु आणि ४ माणुसकी. हीं रक्तांत म्हणजे स्वभावांतच असावीं लागतात.

चार मठ (शंकराचार्यांचे) — १ शृंगेरी, २ द्वारका, ३ जगन्नाथपुरी व ४ बदरिकाश्रम (ज्योतिर्मठ) असे आद्य शंकराचार्यस्थापित भारतांतील चार दिशेस असलेले चार मठ.

चार मतें (गायनाचीं) — १ शिवमत, २ ब्रह्ममत, ३ पिंगलनागमत व ४ हनुमंतमत.

चार महावाक्यें (भक्तिमार्गाचीं) — १ कृष्णस्तु भगवान् स्वयम्, २ मतःपरतरं नान्यत्, ३ ब्रह्मणे प्रतिष्ठाहम् व ४ मामेकं शरण व्रज. (भागवत)

चार महावाक्यें (वेदान्ताचीं) — १ प्रज्ञानं ब्रह्म (ऋग्वेद), २ अहं ब्रह्मास्मि (यजुर्वेद), ३ तत्त्वमसि (सामवेद) व ४ अयमात्मा ब्रह्म (अथर्ववेद).

चार मुक्तिस्थानें — १ ब्रह्मज्ञान, २ गयाश्राद्ध, ३ गाईच्या गोठ्यांत मरण आणि ४ कुरुक्षेत्रनिवास.

ब्रह्मज्ञानं गयाश्राद्धं गोगृहे मरणं तथा ।

वासः पुंसां कुरुक्षेत्रे मुक्तिरेषा चतुर्विधा ॥ (ना. उत्तर ४४-२०)

चार मुद्रा — (अ) १ खेचरी, २ भूचरी, ३ चांचरी आणि ४ अगोचरी; (आ) १ ध्यान, २ राधायंत्र, ३ षण्मुखी आणि ४ शांभवी.

चार युगें — १ कृतयुग—आरंभ काल—कार्तिक शु० ९
२ त्रेतायुग ,, वैशाख शु० ३
३ द्वापरयुग ,, माघ व० ३०
४ कलियुग ,, भाद्रपद व० १२ (शिवनिबंध)

आद्यं कृतयुगं प्रोक्तं ततस्त्रेतायुगं बुधैः ।

तृतीयं द्वापरे पार्थ चतुर्थं कलिरुच्यते ॥ (कूर्म २९–९)

चार युगांतील चार अवतार (महानुभाव) — १ दत्त (कृत), २ हंस (त्रेता), ३ कृष्ण (द्वापर) आणि ४ प्रशांत (कलियुग—व्हावयाचा आहे.)

चार युगाचे चार स्मृतिकार — १ कृतयुग – मनु, २ त्रेतायुग—गौतम, ३ द्वापर—शंखलिखित आणि ४ कलियुग—पराशर. (प्रा. च. को.).

चार प्रकार योगाचे — १ मंत्रयोग, २ हठयोग, ३ लययोग व ४ राजयोग. असे योगाचे मुख्य चार प्रकार. (शि. सं. ५–१५)

चार श्रेष्ठदानें — १ कन्यादान, २ गोदान, ३ भूमिदान आणि ४ विद्यादान.

दानानां च समस्तानां चत्वार्येतानि भूतले ।

श्रेष्ठानि कन्यागोभूमिविद्यादानानि सर्वदा ॥ (शं. सं.)

चार लक्षणें (खऱ्या ज्ञान्याचीं) — १ वाणी गोड असून उदार, २ ज्ञान असून गर्व नाहीं, ३ शूर असून अंगीं क्षमा आणि ४ अमूप धन तसेंच अपार औदार्य.

या चौलक्षणीं मंडित । तोचि ज्ञानी तोचि पंडित॥ (वेदान्त सूर्य)

चार लक्षणें (शिष्टाचाराचीं) — १ गुरुशुश्रूषा, २ सत्य, ३ अक्रोध आणि ४ दान. हीं चार शिष्टाचाराचीं नियत लक्षणें होत.

गुरुशुश्रूषणं सत्यमक्रोधो दानमेव च ।
एतच्चतुष्टयं ब्रह्मन् शिष्टाचारेषु नित्यदा ॥
(म. भा. वन. २०७–६५).

चार ललितकला — १ नृत्य, २ नाट्य, ३ गायन व ४ वादन.

चार लोक — १ स्वर्ग, २ मृत्यु, ३ पाताळ आणि ४ कैलास.

चार वर्ण — १ ब्राह्मण, २ क्षत्रिय, ३ वैश्य आणि ४ शूद्र. मूळ एका वर्णाचेच हे चार वर्ण म्हणजे चातुर्वर्ण्य महाभारतकाळीं करण्यांत आले.

' चत्वारो वैवार्णाः ब्राह्मणो राजन्यो वैश्यः शूद्रः । ' (शतपथ)

चार वर्ण (मुसलमानांत) — १ सय्यद, २ शेख, ३ मोंगल व ४ पठाण. असे चार वर्ण मुसलमानांत मानतात.

चार वंश — १ सोमवंश, २ सूर्यवंश, ३ ब्रह्मवंश आणि ४ शेषवंश. असे चार वंश पुराणग्रंथांत सांगितले आहेत. (चंड माहात्म्य)

चार वाणी — १ परा, २ पश्यन्ती, ३ मध्यमा व ४ वैखरी. या चार वाणी आहेत. यांना वाचाचतुष्टय म्हणतात.

आतां ज्ञानदेवो म्हणे । श्रीगुरूप्रणामें येणें ।
फेडिली वाचा ऋणें । चौही वाकांची ॥ (अमृतानुभव)

चार वर्णांचीं चार दैवतें — १ ब्राह्मण – महादेव, २ क्षत्रिय – विष्णु, ३ वैश्य – ब्रह्मदेव व ४ शूद्र – गणेश.

विप्राणां दैवतं शम्भुः क्षत्रियाणां च माधवः ।
वैश्यानां तु भवेद् ब्रह्मा शूद्रानां गणनायकः ॥ (सु.)

चार वर्णांचे चार यज्ञ — १ ब्राह्मण – तप, २ क्षत्रिय – उद्योग, ३ वैश्य – हवि व ४ शूद्र – सेवा. असे चार प्रकारचे यज्ञ चार वर्णांस विहित आहेत. (म. भा. शांति २३९–१००).

चार वर्णांचे चार सण — १ ब्राह्मण – श्रावणी, २ क्षत्रिय – विजयादशमी (दसरा), ३ वैश्य – दिवाळी व ४ शूद्र – होळी.

चार वस्तूंवर कोणाचेंहि एकाचें स्वामित्व नाहीं — १ अरण्य, २ नद्या, ३ पर्वत व ४ तीर्थें. यांवर कोणाचेंहि एकाचें स्वामित्व नसतें. (म. भा. अनु. ६९–३४)

चार वाचिक पापें — १ कठोर भाषण, २ खोटें बोलणें, ३ चहाडी आणि ४ अद्वातद्वा बोलणें. हीं वाणीचीं चार पापें होत. (स्कंद – काशी. २७–१५३)

चार विद्या — १ तर्कशास्त्र, २ वेदविद्या, ३ कृषिकर्मादि अर्थशास्त्र आणि ४ सामदामदंडादि राजनीति. (कौ. १–२)

चार वेद — १ ऋग्वेद, २ यजुर्वेद, ३ सामवेद आणि ४ अथर्ववेद.

चार वेद (महाराष्ट्राचे) — १ श्रीज्ञानेश्वरी, २ एकनाथी भागवत, ३ दासबोध व ४ तुकाराम गाथा.

चार वेदांचीं उपांगें — १ पुराणें, २ न्याय, ३ मीमांसा व ४ धर्मशास्त्र.

चार वैष्णव सांप्रदाय — १ प्रकाश संप्रदाय (श्रीज्ञानेश्वर), २ आनंद संप्रदाय (एकनाथ), ३ स्वरूप संप्रदाय (रामदास) व ४ चैतन्य संप्रदाय (तुकाराम). असे परमार्थमार्गांत चार प्रकारचे वैष्णव संप्रदाय मानले आहेत. त्यांस वारकरीचतुष्टय म्हणतात. (अमृता –अमृतवाहिनी टीका)

चार व्यसनें सत्ताधाऱ्यांना असणारीं — १ मृगया, २ मद्यपान, ३ द्यूत व ४ कामासक्ति अतिरिक्त. (म. भा. सभा. ६८–२०)

चार व्यास — १ वृद्धव्यास, २ बृहद्व्यास, ३ वेदव्यास व ४ मानव व्यास.

चार शक्ति — १ क्रियाशक्ति, २ द्रव्यशक्ति, ३ इच्छाशक्ति व ४ ज्ञानशक्ति. (दा. बो. १७–९–६)

चार शैव संप्रदाय — १ शैव, २ पाशुपत, ३ कारुणिक–सिद्धान्ती आणि ४ कापालिक.

चार स्वर्गीय मणि — १ चिंतामणि (चिंता दूर करणारा), २ कौस्तुभमणि, ३ रुद्रमणि व ४ स्यमन्तक मणि. (रत्नदी.)

चार संगीत मतें — १ नारदमत–संगीत, २ भरतमत–संगीत, ३ हेनुमन्तमत–संगीत व ४ श्रीकृष्णमत–संगीत असे चार प्रकार आहेत.

चार स्वातंत्र्यें — १ व्यक्तिस्वातंत्र्य, २ धर्मस्वातंत्र्य, ३ भाषण-स्वातंत्र्य व ४ मुद्रणस्वातंत्र्य. हीं आधुनिक काळचीं चार स्वातंत्र्यें लोकशाहीचीं मूलभूत तत्त्वें म्हणून मानिलीं आहेत.

चार श्रेष्ठ आसनें — १ सिद्धासन, २ पद्मासन, ३ सिंहासन व ४ भद्रासन (गोरक्षासन). योगशास्त्रांतील चौऱ्यायशीं आसनांत हीं चार श्रेष्ठ आसनें होत.

चार श्रेष्ठ शक्ति (लोकशाहींतील) — १ राष्ट्रपति, २ राज्यसभा, ३ संसद् (लोकसभा) व ४ वृत्तपत्रें.

चार सिद्ध आदेश — १ पुराणें, २ मानवधर्म, ३ सांगवेद आणि ४ वैद्यक. या चार गोष्टी सिद्ध म्हणजे अबाधित आज्ञा होत. त्या टाळून चालावयाचें नाहीं.

पुराणं मानवोधर्मः साङ्गो वेदश्चिकित्सितम् ।
आज्ञा सिद्धानि चत्वारि न हातव्यानि हेतुभिः ॥ (वि. स्मृ.)

चार स्थानीं कृष्णास्नान दुर्लभ — १ शूर्पालय, २ मलप्रभा व कृष्णा संगम, ३ छाया (भगवती) या नांवाचें एक तीर्थ (कृष्णेचा प्रवाह भागावर आहे) आणि ४ श्रीशैल्य.

शूर्पाले संगमे चैव छायायां श्रीगुरौ तथा ।
सर्वत्र सुलभा कृष्णा चतुःस्थानेषु दुर्लभा ॥ (कृ. मा. ५४–८)

चार स्थानीं कुंभमेळा—१ हरद्वार, २ प्रयाग, ३ उज्जयिनी व ४ नाशिक. समुद्रमंथनांतून निघालेला अमृतकुंभ या चार ठिकाणीं १ चंद्र, २ बृहस्पति, ३ शनि व ४ सूर्य या चौघांच्या संरक्षणाखालीं बारा दिवसपर्यंत दडवून ठेवला होता. तन्निमित्त पुराणकालापासून भारतांत प्रचलित असलेली मोठी यात्रा. (केसरी जानेवारी १९५६)

चौघेजण कोणत्याहि कार्याच्या चांगल्यावाईटाचे समभागी होत — १ प्रत्यक्ष करणारा, २ तें करविणारा, ३ जवळ असून पाहणारा आणि ४ अनुमोदन देणारा.

कर्ता कारयिता चैव प्रेषको ह्यनुमोदकः ।
सुकृतं दुष्कृतं चैव चत्वारः समभागिनः ॥ (सु.)

चौघांची खरी ओळख चार अवस्थेंत होते — १ विपत्काळांत मित्रांची, २ दारिद्र्यसमयीं स्त्रीची, ३ युद्धांत वीरांची आणि ४ अपकीर्तींत बांधवांची.

चौघांशीं मसलत करूं नये — १ मंदमति, २ चेंगट, ३ हर्षानें हुरळून जाणारा आणि ४ स्तुतिपाठक. (म. भा. उद्योग ३३–६९)

चौघेजण आश्रयास पात्र — १ वृद्ध नातेवाईक, २ खालावलेला कुलीन मनुष्य, ३ दरिद्री मित्र आणि ४ निपुत्रिक भगिनी.
(म. भा. उद्योग ३३-७०)

अनुबंध चतुष्टय — १ प्रयोजन, २ विषय, ३ अधिकार आणि ४ संबंध. या चार गोष्टी ग्रंथांत असाव्या लागतात.

अनंत चतुष्टय — १ अनंतज्ञान, २ अनंतदर्शन, ३ अनंतवीर्य व ४ अनंतसुख.

उपसर्ग चतुष्टय — १ आधि, २ व्याधि, ३ उपाधि व ४ समाधि.

घात चतुष्टय — १ घातचंद्र, २ घाततिथि, ३ घातनक्षत्र व ४ घातवार.

बला चतुष्टय — १ बला, २ महाबला, ३ अतिबला व ४ नागबला. या चार प्रकारच्या वनस्पति आहेत.

चित्त चतुष्टय — १ मन, २ बुद्धि, ३ चित्त आणि ४ अहंकार.

प्रस्थान चतुष्टय — १ दशोपनिषदें, २ ब्रह्मसूत्रें, ३ भगवद्गीता आणि ४ श्रीमद्भागवत. या चार ग्रंथांना मिळून प्रस्थान चतुष्टय म्हणतात. वेदांचे विभाग व ब्रह्मसूत्रांची रचना करूनहि व्यासांना शांति मिळाली नाहीं. ती त्यांना श्रीमद्भागवताची रचना केल्यानंतर लाभली अशी कथा आहे.

भक्त चतुष्टय — १ नारद, २ ध्रुव, ३ प्रल्हाद व ४ विदुर. हे चार आदर्श भक्त होत.

वीर चतुष्टय (पुराणकालीन) — १ भरत, २ अभिमन्यु, ३ ककुत्स्थ आणि ४ भीष्म.

साधन चतुष्टय — १ नित्यानित्यविवेक, २ वैराग्य, ३ शमादि षट् संपत्ति आणि ४ मुमुक्षत्व. हीं चार ब्रह्मप्राप्तीचीं साधनें म्हणून मानिलीं आहेत.

पौराणिक चांडाळ चौकडी — १ दुर्योधन, २ दुःशासन, ३ कर्ण आणि ४ शकुनि.

५

पंच अवस्था — १ जाग्रति, २ स्वप्न, ३ सुषुप्ति, ४ तुर्या आणि ५ उन्मनी. (क. गी. २–७)

पंच अंगें (अनुमानाचीं) — १ प्रतिज्ञा, २ हेतु, ३ दृष्टान्त, ४ उपनय व ५ निगमन.

पंच अंगें (अभिनयाचीं) — १ डोळे, २ भिंवया, ३ हात, ४ पाय आणि ५ मन (सर्वांग). या अवयवांनीं भावदर्शन करणें.

> चित्ताक्षिभ्रूहस्तपादैरंगश्चेष्टादि साम्यतः ।
> पात्राद्यवस्थाकरणं पञ्चाङ्गोऽभिनयो मतः ॥ (सु.)

पंच अंगें औषधीचीं (वैद्यकांत) — १ साल, २ पान, ३ फूल, ४ मूळ आणि ५ फळ एकाच झाडाचें ! हीं पांच अंगें. यास वृक्षपंचांग म्हणतात.

> त्वक्पत्रं कुसुमं मूलं फलमेकस्य शाखिनः ।
> एकत्रामिलितं चेतत् पञ्चाङ्गमिति संज्ञितम् ॥ (सु.)

पंच अंगें (कालाचीं) — १ तिथि, २ वार, ३ नक्षत्र, ४ योग आणि ५ करण. हीं पांच अंगें ज्यांत मुख्यत्वें सांगितलेलीं असतात त्यास पंचांग म्हणतात.

> ‘ तिथिर्वारश्च नक्षत्रं योगः करणमेव च ।
> तत्पञ्चाङ्गमिति प्रोक्तम् ॥ ’ (सु.)

पंच अंगें (धर्मकार्यांत) — १ जप, २ होम, ३ तर्पण, ४ अभिषेक आणि ५ ब्राह्मणभोजन अशीं उपासनेचीं पांच अंगें.

पंच अंगें (मीमांसा पद्धतीचीं) — १ विषय, २ संशय, ३ पूर्वपक्ष, ४ उत्तरपक्ष आणि ५ सिद्धान्त.

पंच अंगें (यज्ञाचीं) — (अ) १ देवता, २ हविर्द्रव्य, ३ मंत्र, ४ ऋत्विज व ५ दक्षिणा; (आ) १ शास्त्रोक्त विधि, २ अन्नसंतर्पण, ३ वेदमंत्र, ४ दक्षिणा व ५ श्रद्धा हीं पांच अंगें मानतात.

देवानां द्रव्यहविषामृक्सामयजुषां तथा ।
ऋत्विजां दक्षिणानां च संयोगो यज्ञ उच्यते ॥ (वा. पु.)

पंच आचार (वीरशैव संप्रदाय) — १ लिंगाचार, २ सदाचार, ३ शिवाचार, ४ गणाचार आणि ५ भृत्याचार. (सि. शि. भाग १ ला)

पंच आदर्श पतिव्रता — १ सीता, २ सावित्री, ३ अनसूया, ४ द्रौपदी आणि ५ दमयंती.

पंच आनंद — १ विषयानंद, २ योगानंद, ३ अद्वैतानंद, ४ विदेहानंद आणि ५ ब्रह्मानंद.

विषययोगानंदौ द्वावद्वैतानंद एव च ।
विदेहानन्दो विख्यातो ब्रह्मानन्दश्च पञ्चमः ॥ (क. गी. २–३४)

पंचाचार्य (वीरशैव संप्रदाय) — १ रेवणाराध्य–रंभापुरी–बाळीहळ्ळी, २ मरुळाराध्य–उज्जयिनी, ३ एकोरामाराध्य–हिमवत्केदार, ४ पंडिताराध्य–श्रीशैल्य आणि ५ विश्वाराध्य–कोलिपाकी–काशी (वी.प्र.)

पंच 'उ' कार — १ उद्योग, २ उत्साह, ३ उत्तेजन, ४ उपकारबुद्धि आणि ५ उदारत्व. हे पंच 'उ'कार उच्च प्रतीचे सद्गुण होत.

पंच उपप्राण — १ नाग–ढेकर येणारा, २ कूर्म–निमिषोन्मेष करणारा, ३ कृकल–शिंक येणारा, ४ देवदत्त–जांभई येणारा व ५ धनंजय–मरणानंतर किंचित्काल ब्रह्मरंध्रांत राहणारा. असे पंच वायु. (रा. गी. ४–३७)

पंच उपविषें — १ रुईचा चीक, २ त्रिधारी निवडुंगाचा चीक, ... आणि ५ कण्हेर.

अर्कक्षीरं स्नुहीक्षीरं तथैव कलिहारिका ।
धत्तूरः करवीरश्च पंचोपविषाः स्मृताः ॥ (सु.)

पंच उपविघ्नें (योगाभ्यासाचे आड येणारीं) — १ दुःख, २ दौर्मनस्य (मन क्षुब्ध होणें), ३ अंगमेजयत्व (कंप सुटणें), ४ श्वास आणि ५ प्रश्वास (शरिरांतील वायु बाहेर सोडणें.) (यो. सू. १-३१).

पंच 'क'कार — १ केस, २ कडें, ३ कंगवा, ४ कच्छ (आखूड विजार) आणि ५ कृपाण. हे 'पांच 'क'कार गुरु गोविंदसिंगानें सुरू केले, व ते प्रत्येकाजवळ असले पाहिजेत, असा शीखपंथांत निर्बंध आहे.

पंचकन्या (प्रातःस्मरणीय) — १ अहल्या, २ द्रौपदी, ३ सीता, ४ तारा आणि ५ मंदोदरी.

अहल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा ।
पञ्चकं ना स्मरेन्नित्यं महापातक नाशनम् ।

पंचकर्मे (संध्यासमयीं वर्ज्य) — १ आहार (भोजन), २ मैथुन, ३ झोप, ४ अध्ययन व ५ मार्गक्रमण. (भा. प्र. पूर्वखंड).

पंचकर्मेंद्रियें — १ हात, २ पाय, ३ वाणी, ४ शिश्न व ५ गुद.

पंचकल्याणी (घोडा) — गुडघ्यापर्यंत चारी पाय पांढरे व तोंडावर पांढरा पट्टा असतो असा घोडा. हा शुभलक्षणी मानतात. (अश्वपरीक्षा).

पंचकल्याणिक (जैनधर्म) — १ गर्भकल्याणिक, २ जन्मकल्याणिक, ३ तपकल्याणिक, ४ केवलकल्याणिक आणि ५ मोक्षकल्याणिक. असे तीर्थंकर भगवानाच्या १ गर्भ, २ जन्म, ३ तप, ४ केवल आणि ५ मोक्ष अशा पांच प्रसंगाच्या उत्सवप्रकारास पंच महाकल्याणिक म्हणतात.

पंचकालि (कलह-वास्तव्यस्थानें) — १ मिथ्या भाषण, २ उन्माद, ३ काम, ४ हिंसादि दोष व ५ वैर. परीक्षितीनें कलीला प्रथम चार स्थानें नेमून दिलीं (चारच्चे अंकांत पाहा). त्यानंतर कलीनें पुनः प्रार्थना केल्यावरून परीक्षितीनें आणखी पांच स्थानें कलीला दिलीं.

(भा. ग. १·१७·३९)

पंच अंगें (धर्मकार्यांत) — १ जप, २ होम, ३ तर्पण, ४ अभिषेक आणि ५ ब्राह्मणभोजन अशीं उपासनेचीं पांच अंगें.

पंच अंगें (मीमांसा पद्धतीचीं) — १ विषय, २ संशय, ३ पूर्वपक्ष, ४ उत्तरपक्ष आणि ५ सिद्धान्त.

पंच अंगें (यज्ञाचीं) — (अ) १ देवता, २ हविर्द्रव्य, ३ मंत्र, ४ ऋत्विज व ५ दक्षिणा; (आ) १ शास्त्रोक्त विधि, २ अन्नसंतर्पण, ३ वेदमंत्र, ४ दक्षिणा व ५ श्रद्धा हीं पांच अंगें मानतात.

देवानां द्रव्यहविषामृक्सामयजुषां तथा ।
ऋत्विजां दक्षिणानां च संयोगो यज्ञ उच्यते ॥ (वा. पु.)

पंच आचार (वीरशैव संप्रदाय) — १ लिंगाचार, २ सदाचार, ३ शिवाचार, ४ गणाचार आणि ५ भृत्याचार. (सि. शि. भाग १ ला)

पंच आदर्श पतिव्रता — १ सीता, २ सावित्री, ३ अनसूया, ४ द्रौपदी आणि ५ दमयंती.

पंच आनंद — १ विषयानंद, २ योगानंद, ३ अद्वैतानंद, ४ विदेहानंद आणि ५ ब्रह्मानंद.

विषययोगानंदौ द्वावद्वैतानंद एव च ।
विदेहानन्दो विख्यातो ब्रह्मानन्दश्च पञ्चमः ॥ (क. गी. २–३४)

पंचाचार्य (वीरशैव संप्रदाय) — १ रेवणाराध्य–रंभापुरी–बाळीहळ्ळी, २ मरुळाराध्य–उज्जयिनी, ३ एकोरामाराध्य–हिमवत्केदार, ४ पंडिताराध्य–श्रीशैल्य आणि ५ विश्वाराध्य–कोलिपाकी–काशी (वी.प्र.)

पंच 'उ' कार — १ उद्योग, २ उत्साह, ३ उत्तेजन, ४ उपकारबुद्धि आणि ५ उदारत्व. हे पंच 'उ'कार उच्च प्रतीचे सद्गुण होत.

पंच उपप्राण — १ नाग–ढेकर येणारा, २ कूर्म–निमिषोन्मेष करणारा, ३ कृकल–शिंक येणारा, ४ देवदत्त–जांभई येणारा व ५ धनंजय–मरणानंतर किंचित्काल ब्रह्मरंध्रांत राहणारा. असे पंच वायु. (रा. गी. ४–३७)

पंच उपविषें — १ रुईचा चीक, २ त्रिधारी निवडुंगाचा चीक, ३ कळलावी, ४ धोत्रा आणि ५ कण्हेर.

अर्कक्षीरं स्नुहीक्षीरं तथैव कलिहारिका ।

धत्तूरः करवीरश्च पंचोपविषाः स्मृताः ॥ (सु.)

पंच उपविघ्नें (योगाभ्यासाचे आड येणारीं) — १ दुःख, २ दौर्मनस्य (मन क्षुब्ध होणें), ३ अंगमेजयत्व (कंप सुटणें), ४ श्वास आणि ५ प्रश्वास (शरिरांतील वायु बाहेर सोडणें.) (यो. सू. १-३१).

पंच 'क'कार — १ केस, २ कडें, ३ कंगवा, ४ कच्छ (आखूड विजार) आणि ५ कृपाण. हे 'पांच 'क'कार गुरु गोविंदसिंगानें सुरू केले, व ते प्रत्येकाजवळ असले पाहिजेत, असा शीखपंथांत निर्बंध आहे.

पंचकन्या (प्रातःस्मरणीय) — १ अहल्या, २ द्रौपदी, ३ सीता, ४ तारा आणि ५ मंदोदरी.

अहल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा ।

पञ्चकं ना स्मरेन्नित्यं महापातक नाशनम् ।

पंचकर्में (संध्यासमयीं वर्ज्य) — १ आहार (भोजन), २ मैथुन, ३ झोप, ४ अध्ययन व ५ मार्गक्रमण. (भा. प्र. पूर्वखंड).

पंचकर्मेंद्रियें — १ हात, २ पाय, ३ वाणी, ४ शिश्न व ५ गुद.

पंचकल्याणी (घोडा) — गुडघ्यापर्यंत चारी पाय पांढरे व तोंडावर पांढरा पट्टा असतो असा घोडा. हा शुभलक्षणी मानतात. (अश्वपरीक्षा).

पंचकल्याणिक (जैनधर्म) — १ गर्भकल्याणिक, २ जन्मकल्याणिक, ३ तपकल्याणिक, ४ केवलकल्याणिक आणि ५ मोक्षकल्याणिक. असे तीर्थंकर भगवानाच्या १ गर्भ, २ जन्म, ३ तप, ४ केवल आणि ५ मोक्ष अशा पांच प्रसंगाच्या उत्सवप्रकारास पंच महाकल्याणिक म्हणतात.

पंचकालि (कलह-वास्तव्यस्थानें) — १ मिथ्या भाषण, २ उन्माद, ३ काम, ४ हिंसादि दोष व ५ वैर. परीक्षितीनें कलीला प्रथम चार स्थानें नेमून दिलीं (चारचे अंकांत पाहा). त्यानंतर कलीनें पुनः प्रार्थना केल्यावरून परीक्षितीनें आणखी पांच स्थानें कलीला दिलीं.

(भा. ग. १·१७·३९)

पंचकषाय — (अ) १ हिरडा, २ आमलक, ३ मंजिष्ट, ४ लोध्र व ५ टेंभुरणी; (आ) १ शमी, २ उंबर, ३ अश्वत्थ, ४ वड आणि ५ पळस.

शम्युदुम्बरमश्वत्थं न्यग्रोधं च पलाशकम् ।
यज्ञं यज्ञे विमन्त्रेण दद्यात्पञ्चकषायिकम् ॥ (भ. पु. १३५–३०)

(इ) १ जांभुळ, २ सांवरी, ३ चिकणा, ४ बकुल आणि ५ बोर. हे पंचकषाय देवीला प्रिय आहेत.

जंबूशाल्मलिबांट्यालं बकुलं बदरं तथा ।
कषायाः पञ्चविज्ञेया देव्याः प्रीतिकराः शुभाः ॥ (दुर्गोत्सवपद्धति)

पंचकाशी — १ वाराणसी, २ गुप्तकाशी, ३ उत्तरकाशी, ४ दक्षिण काशी (तेन्काशी) व ५ शिवकाशी.

पंचकुळी — १ भोसले, २ गुजर, ३ शिर्के, ४ मोहिते व ५ महाडीक. हीं महाराष्ट्रांतील पांच प्रसिद्ध क्षत्रिय कुळें.

पंचकेणें — १ मिरीं, २ मोहरी, २ जिरे, ४ हिंग आणि ५ धोंडफुल. या मसाल्याच्या पांच जिनसांना म्हणतात.

पंच केदार — १ बदरीकेदार, २ मध्यमहेश्वर, ३ तुंगनाथ, ४ रुद्रनाथ व ५ गोपेश्वर.

पंच क्लेश — १ अविद्या, २ अस्मिता (आहेपणा, मीपणाची गांठ), ३ राग, ४ द्वेष आणि ५ अभिमान. या पांचांपासून उद्भवणाऱ्या स्थूल वृत्ति, यांस क्लेशादि पंचक म्हणतात. (पातंजलयोग साधनपाद ३)

पंच कोश (योगशास्त्र) — १ अन्नमय, २ प्राणमय, ३ मनोमय, ४ विज्ञानमय आणि ५ आनंदमय. असे पंचकोश म्हणजे देहाचीं पांच आवरणें.

पंचकृष्ण (महानुभाव सांप्रदाय) — १ श्रीकृष्ण, २ दत्तात्रय, ३ चांगदेव राऊळ, ४ गुंडम राऊळ आणि ५ श्रीचक्रधर.

पंचाकाश — (अ) १ आकाश, २ महाकाश, ३ पराकाश, ४ तत्त्वाकाश आणि ५ सूर्याकाश (कल्याण योगांक ६२); (आ)

१ घटाकाश, २ मठाकाश, ३ महदाकाश, ४ चिदाकाश आणि ५ निराकाश. (क. गी. २–२४)

पंचीकरण — १ पृथ्वी, २ आप, ३ तेज, ४ वायु आणि ५ आकाश. या पंचमहाभूतांपैकीं प्रत्येकाचा कमी जास्त भाग घेऊन त्या सर्वांच्या मिश्रणानें तयार होणारा पदार्थ. याला पंचीकरण अथवा पांच तत्त्वांचें विवरण म्हणतात. (गी. र. १८१)

पंचखंडें — १ आशिया, २ युरोप, ३ अमेरिका, ४ आफ्रिका आणि ५ आस्ट्रेलेशिया असे या पृथ्वीचे पांच मोठे भूमाग.

पंचखाद्यें अथवा पंचमेवा — (अ) १ खारीक, २ खोबरें, ३ खसखस, ४ बेदाणा व ५ खडीसाखर; (आ) १ खारीक, २ खोबरें, ३ डाळें, ४ लाह्या व ५ पोहे.

पंचख्याति — १ असत् ख्याति – शून्यवाद, २ आत्मख्याति – क्षणिक विज्ञानवाद, ३ अन्यथाख्याति – नैय्यायिक, ४ अख्याति ख्याति – सांख्य प्रभाकरमत, आणि ५ अनिर्वचनीय ख्याति – वेदान्त. या पांच ख्याति म्हणजे प्रचीति अथवा कथनरूप व्यवहार होत.

अनिर्वचनीय जे ख्याति । तो वादू निश्चिती मी उद्धवा ॥
(ए. भा. १६–२०६).

पंचगंगा —१ नंदिनी, २ नलिनी, ३ सीता, ४ मालती आणि ५ विष्णुपदा (ज्वालामुखी पर्वतांत). (गदाधर भाष्य).

पंच 'ग 'कार (गवयाचे) — (अ) १ गत, २ गर्व, ३ गांजा, ४ गप्पा आणि ५ गणिका; (आ) १ गायत्री, २ गोविंद, ३ गाय, ४ गीता आणि ५ गंगास्नान. हे पंच 'ग ' कार वैदिक धर्माचे पंचप्राण होत.

गायत्री गोविन्द गौ गीता गङ्गास्नान ।
इन पाँचोंकी कृपासे शीघ्र मिले भगवान ॥ (तत्त्वार्चि. भाग २)

पंच 'ग ' कार दुर्लभ — १ गोमती नदी, २ गोमयस्नान, ३ गोदान, ४ गोपीचंदन आणि ५ गोपीनाथदर्शन.

गोमती गोमयस्नानं गोदानं गोपीचंदनम् ।
दर्शनं गोपिनाथस्य गकाराः पंचदुर्लभः ॥ (स्कंद. नागरखंड.)

पंच गंध — १ कस्तुरी, २ चंदन, ३ कापूर, ४ अगरू आणि ५ मलयागरचंदन. हीं पांच प्रसिद्ध सुगंधी द्रव्यें. हीं सर्व कार्यांत शुभदायक होत.

कस्तुरीचंदनं चंद्रमगरु द्वितीयं तथा ।
पंचगंधसमाख्यातं सर्वकार्येषु शोभनम् ॥ (पद्म. पाताळखंड)

पंचगव्य — १ गोमूत्र, २ गोमय, ३ दूध, ४ दहीं व ५ तूप. हे पांचहि गाईपासून मिळणारे पदार्थ सर्व पवित्र. धार्मिक कार्यांत शुद्धि-कार्यांकडे यांचा उपयोग करतात.

गोमूत्रं गोमयं क्षीरं दधिसर्पिस्तथैव च ।
गवां पञ्चपवित्राणि पुनन्ति सकलं जगत् ॥ (स्कंद. रेवाखंड)

पंचगीता — १ भगवद्गीता, २ गणेशगीता, ३ भगवतीगीता, ४ सूर्यगीता आणि ५ शिवगीता.

पंचगौड — १ सारस्वत, २ कान्यकुब्ज, ३ गौड, ४ उत्कल आणि ५ मैथिल. या पांच उत्तर भारतांतील ब्राह्मणांस पंचगौड म्हणतात.

' गौडाः पञ्चेति विख्याता विंध्यस्योत्तरवासिनः । ' (वाराह पुराण)

पंच तन्मात्रा — १ शब्द, २ स्पर्श, ३ रस, ४ रूप आणि ५ गंध. या पंचतन्मात्रा—पंचमहाभूतांचीं मूलतत्त्वें.

प्रकृति पुरुष महत्तत्त्व । पंच तन्मात्रा सूक्ष्मस्वभाव ॥
(ए. भा. १९-१६८)

पंच ताल — १ डोलीताल, २ सप्तरुद्रताल, ३ वासुकीताल, ४ लोकपालताल व ५ संतोषताल असे पांच तलाव हिमालयांत.

पंच तिक्त — १ निम्ब, २ गुळवेल, ३ अडुळसा, ४ परवर (कडू पडवळ) व ५ भटकट्या (रिंगणा). या पांच कडू वनस्पतींस म्हणतात.

पंचतीर्थें — १ गंगाद्वार, २ कुशावर्त, ३ बिल्वक, ४ नीलपर्वत आणि ५ कनखल. हीं पाच तीर्थें हरिद्वार येथें व त्र्यंबकेश्वरास गोदावरीचे

परिसरांत आहेत; (आ) १ वन्हितीर्थ, २ प्रल्हादकुंड, ३ नारदकुंड, ४ कूर्मधारा व ५ लक्ष्मीधारा बदरीनाथ येथें.

पंचतंत्र — विष्णुशर्मा नामक ब्राह्मणानें रचिलेला प्राचीन संस्कृत ग्रंथ. यांत पांच कथानकें आहेत. या ग्रंथाचे द्वारें पं. विष्णुशर्म्यानें मूर्ख राजपुत्रांस चतुर केलें.

पंच देवपादप — पादप म्हणजे झाड. झाडें पायांनीं (मुळांनीं) पाणी शोषितात म्हणून पादप. १ मंदार, २ पारिजातक, ३ संतान, ४ हरिचंदन व ५ कल्पवृक्ष, हे पांच स्वर्गलोकींचे प्रमुख वृक्ष.

पंच देवता (नित्य उपासनेच्या) — १ सूर्य, २ देवी, ३ विष्णु, ४ गणेश आणि ५ शिव.

आदित्यं अंबिकां विष्णुं गणनाथं महेश्वरम् ।
गृहस्थः पूजयेत्पञ्च भुक्तिमुक्त्यर्थ सिद्धये ॥ (सु.)

पंच देवी — १ दुर्गा, २ पार्वती, ३ सावित्री, ४ सरस्वती व ५ राधिका.

पंच देह — १ स्थूलदेह, २ सूक्ष्मदेह, ३ कारणदेह, ४ महाकारण देह आणि ५ कैवल्य–ज्ञानदेह. (क. गी. २-८)

पंच दुर्ग — १ जलदुर्ग, २ पर्वतदुर्ग, ३ वृक्षदुर्ग, ४ ईरिणदुर्ग (जेथें कोणत्याहि प्रकारची शेती होत नाहीं असा प्रदेश) व ५ धन्वदुर्ग (वालुकामय प्रदेश), अशीं पांच संरक्षण-साधनें प्राचीन कालीं होतीं.

पंच दोष — १ काम, २ क्रोध, ३ भय, ४ निद्रा आणि ५ श्वास. हे पांच दोष जेवढे म्हणून देहधारी प्राणी आहेत त्यांच्या ठिकाणीं असतात. (म. भा. शांति)

पंच द्रविड — १ तेलंग, २ द्राविड, ३ महाराष्ट्रीय, ४ कर्नाटकी व ५ गुर्जर. या पांच दक्षिण भारतांतील ब्राह्मणांस पंचद्रविड म्हणतात.

द्राविडाः पंचाविख्याता विंध्यदक्षिणवासिनः ॥ (वाराह पुराण)

पंच धातु — १ सोनें, २ रुपें, ३ लोखंड, ४ तांबें आणि ५ जस्त या पंचधातु. पंचधातूंच्या मिश्रणानें तयार होणारी वस्तु टिकाऊ असते.

पंच धान्यें — १ गहूं, २ जव, ३ तांदूळ, ४ तीळ व ५ मूग. हवन करण्यास उक्त अशीं पांच धान्यें.

पंचनाथ — १ उत्तर–श्रीबदरीनाथ, २ दक्षिण–श्रीरंगनाथ (श्रीरंगम्), ३ पूर्व–जगन्नाथ, ४ पश्चिम–श्रीद्वारकानाथ व ५ मध्य–श्रीगोवर्धननाथ (नाथद्वारा राजस्थान).

पंचमी तिथी — वैदिक धर्मांत पंचमी तिथीस विशेष महत्त्व आहे. अनेक सण व पर्वें या तिथीस आढळतात. आषाढ शु. ५ स वीज पंचमी म्हणतात. निदान वीज जरी चमकली तर पावसाळा चांगला जाईल, अशी समजूत आहे. श्रावण शु. ५—नागपंचमी; भाद्रपद शु. ५—ऋषिपंचमी; आश्विन शु. ५–ललितापंचमी; कार्तिक शु. ५—लाभपंचमी; माघ शु. ५—वसंत पंचमी; फाल्गुन व. ५—रंगपंचमी. इ.

पंचजन (वेदकालीन) — (अ) १ पुरु, २ अनु, ३ द्रह्यु, ४ यदु व ५ तुर्वश. या पांच जमातींना ऋग्वेदकालीं पंचजन म्हणत; (आ) १ ब्राह्मण, २ क्षत्रिय, ३ वैश्य, ४ शूद्र व ५ निषाद.

पंच 'ज' कार (दुर्लभ) — १ जननी, २ जन्मभूमि, ३ जाह्नवी, ४ जनार्दन आणि ५ जनक.

> जननी जन्मभूमिश्च जान्हवी च जनार्दनः ।
> जनकः पञ्चमश्चैव जकाराः पञ्चदुर्लभाः ॥ (सु.)

पंच 'ज' कार तृप्ति न पावणारे — १ जांवई, २ जठर, ३ जाया, ४ जातवेद आणि ५ जलाशय.

> जामाता जठरं जाया जातवेदा जलाशयः ।
> पूरिता नैव पूर्यन्ते जकाराः पञ्चदुर्भराः ॥ (सु.)

पंचाग्नि — (अ) १ वडवाग्नि, २ मंदाग्नि, ३ जठराग्नि, ४ शोकाग्नि आणि ५ कामाग्नि. (क. गी. २-३३); (आ) १ दक्षिणाग्नि, २ गार्हपत्य, ३ आहवनीय, ४ सभ्य व ५ आवसथ्य. हे पांच श्रौताग्नि होत; (इ) १ स्वर्ग, २ मेघ, ३ पृथ्वी, ४ पुरुष आणि ५ स्त्री. या पांच अग्निद्वारां मानवाचा पुनर्जन्म होतो. (छां. अ. ५)

पंचाग्निसाधन — चारी दिशांना चार अग्निकुंडें प्रज्वालित करून ठेवावयाचीं व सूर्याकडे टक लावून तपश्चर्या करावयाची. याला पंचाग्नि साधन म्हणतात. हा विधि ग्रीष्मऋतूंत भरउन्हांत करावयाचा असतो. अशा प्रकारची तपस्या प्राचीन कालीं करीत असत.

पंचनद — १ वितस्ता, २ इरावती (असिक्नी), ३ चंद्रभागा (परुष्णी), ४ शतद्रु (सतलज) व ५ विपाशा हीं वेदकालीन नांवें. या पांच नद्या असलेला हस्तिनापुरालगतचा प्रदेश.

विवस्तेरावती चंद्रभागा मद्रेसरिद्वरा ।
शतद्रुश्च विपाशा च तेन पंचनदः स्मृतः ॥ (वि. पु. तळटीप)

आधुनिक नांवें—१ झेलम, २ चिनाब, ३ रावी, ४ सतलज व ५ बियास.

पंच नमस्कार — १ अर्हतांना नमस्कार, २ सिद्धांना नमस्कार, ३ आचार्यांना नमस्कार, ४ उपाध्यायांना नमस्कार आणि ५ सर्व संतांना नमस्कार. हे पंच नमस्कार सर्व पापांचा नाश करणारे व मंगलामध्यें मंगल असे जैन धर्मात मानले आहेत.

पंचपदी — देवापुढें नित्य पांच अभंग व पांच पदें म्हणण्याची जी प्रथा तीस पंचपदी म्हणतात.

पंचोन्मत्त — १ बलोन्मत्त, २ मदोन्मत्त, ३ राजोन्मत्त, ४ विजयोन्मत्त आणि ५ महामत्त. असा रावणाचा भाऊ कुंभकर्ण पंचोन्मत्त होता.

मदोन्मत्त बलोन्मत्त । राज्योन्मत्त गर्वोन्मत्त ।
विजयोन्मत्त महामत्त । पंचोन्मत्त कुंभकर्ण ॥ (भा.रा.यु. २७-५५)

पंच पतिव्रता — १ सती, २ पार्वती, ३ अरुंधती, ४ अनसूया आणि ५ शांडिली.

पंच पक्वान्नें — १ लाडू, २ पुरणपोळी, ३ साखरभात, ४ बासुंदी व ५ श्रीखंडपुरी. हीं पांच उंची पक्वान्नें. हीं सर्व भोजनाच्या वेळीं एकत्र वाढणें ही ऐश्वर्याची परमावधि समजली गेली आहे; (आ) १ घीवर, २ लाडू, ३ खाजी, ४ जिलेबी आणि ५ गुळोरी. (क. क.)

पंच पंच उषःकाल — सूर्योदयापूर्वीं पांच घटिकांचा काळ. पांच घटिका मिळून दोन तास होतात. हा समय नित्य उठून कार्यप्रवृत्त होण्याला फार प्रशस्त व शुभ मानला आहे.

पंच पल्लव — (अ) १ वड, २ पिंपळ, ३ पायरी, ४ जांभूळ व ५ आंबा (ब्रह्मांड पुराण); (आ) १ आंबा, २ उंबर, ३ जांभूळ, ४ रुई व ५ पिंपळ; (इ) १ आंबा, २ जांभूळ, ३ कवठ, ४ महाळुंग आणि ५ बेल.

पंच पर्वकाल — (अ) १ व्यतिपात, २ वैधृति, ३ संक्रांत, ४ पौर्णिमा व ५ अमावास्या; (आ) १ चतुर्दशी, २ अष्टमी, ३ अमावास्या, ४ पौर्णिमा व ५ रविसंक्रांति हे पर्वकाल होत.

पंचपर्वा विद्या — १ वैराग्य, २ विचार, ३ योग, ४ तप व ५ ईशभाक्ति. अशी पांच पर्वांनीं युक्त अशी विद्या आहे. ही साध्य झाली म्हणजे जीव मुक्तावस्थेस जातो असें वल्लभ संप्रदायांत मानलें आहे.

पंच परमेष्ठी (जैनधर्म) — १ अर्हतपरमेष्ठी, २ सिद्धपरमेष्ठी, ३ आचार्य, ४ उपाध्याय आणि ५ साधुपरमेष्ठी.

पंच परिवर्तनें (जैनधर्म) — १ द्रव्यपरिवर्तन, २ क्षेत्रपरिवर्तन, ३ कालपरिवर्तन, ४ भावपरिवर्तन आणि ५ भवपरिवर्तन.

पंच पुष्प — १ चंपक, २ आम्र, ३ शमी, ४ कमल आणि ५ कण्हेर. हीं देवतांना प्रिय आहेत.

पंच प्रमाणें — १ शब्दप्रमाण, २ आप्तवाक्य प्रमाण, ३ अनुमान प्रमाण, ४ उपमान प्रमाण आणि ५ प्रत्यक्ष प्रमाण.

पंच प्रलय — १ नित्यप्रलय, २ मरणप्रलय, ३ दैनंदिनप्रलय, ४ ब्रह्मप्रलय व ५ आत्यंतिक प्रलय. (भा. रा. किष्किंधा १२-२४)

पंच प्रयाग — १ विष्णुप्रयाग — लेटी व अलकनंदा संगम, २ कर्णप्रयाग — पिंडार व अलकनंदा, ३ रुद्रप्रयाग — मंदाकिनी व अलकनंदा, ४ देवप्रयाग — भागीरथी व अलकनंदा व ५ भूतप्रयाग — यमुना व गंगासंगम. अलाहाबादेस जो त्रिवेणी संगम आहे हा भूतप्रयाग व बाकीचे चार हिमालयांत बदरीनारायणाचे वाटेवर आहेत.

पंच पांडव — १ धर्म, २ भीम, ३ अर्जुन, ४ नकुल आणि ५ सहदेव.

पंच प्राण — १ प्राण — अन्नप्राशन, २ अपान — गुदस्थानीं मलमूत्र धारण करणारा, ३ व्यान — पाचन, ४ उदान — भाषण व ५ समान–डोळे मिटणें व उघडणें. हे पंचप्राण शरिरांतील पांच प्राणवायु होत.

पंच प्राण (लौकिकांत) — १ बायको, २ तिची बहीण, ३ सासू, ४ सासरा व ५ मेहुणा. हे कलिनिर्मित पंचप्राण होत.

गृहिणी भगिनीतस्याः श्वशुरौ श्याल इत्यपि ।
प्राणिनां कलिना सृष्टाः पंचप्राणा इमे परे ॥

(रामदास मासिक आषाढ १८७४)

पंचप्राण (काव्याचे) — (अ) १ प्रचीति, २ प्रक्षोभ, ३ प्रसाद, ४ प्रतीक्षा व ५ प्रयत्न (मधुपर्क); (आ) नाट्याचे — १ संघर्ष, २ संवाद, ३ प्रसंग, ४ समस्या व ५ स्वभावलेखन.

पंच प्रासाद — मध्यभागीं गर्भागारावर एक मुख्य कळस व चार बाजूंस चार लहान कळस अशा प्रकारच्या शिल्परचनेस पंच प्रासाद म्हणतात.

पंच बलें — (अ) १ बाहुबल, २ अमात्यबल (सल्लागार–सामान्य लोकांचे बाबतींत), ३ धनबल, ४ कुलबल व ५ बुद्धिबल. हीं पांच प्रकारचीं बलें होत; (आ) १ इंद्रियबल, २ मनोबल, ३ बुद्धिबल, ४ नैतिक बल आणि ५ शरीरबल.

पंच बदरी — १ विशाल बदरी (बदरीनाथ), २ योगबदरी (पंडु-केसर), ३ भविष्यबदरी (तपोवन–जोशी मठापासून ८ मैल), ४ वृद्धबदरी, (आत्रिमठ) व ५ ध्यानबदरी (सीलांग). हीं पांची स्थानें बदरीनाथाचे परिसरांत आहेत.

पंचबाण — १ अरविंद (लालकमल), २ अशोक, ३ आम्रमंजिरी, ४ जाईचें फूल किंवा मोगरा व ५ नीलकमल. हे पंचबाण होत. मदनाला पंचबाण अथवा पंचशर म्हणतात. त्याच्या धनुष्याचे पांच बाण म्हणजे पांच फुलें असें मानलें आहे.

अरविंदमशोकं च चूतं च नवमल्लिका ।
नीलोत्पलं च पञ्चैते पंचबाणस्य सायकाः ॥ (सु.)

पंचब्रह्म (सनातन) — १ तारक, २ दंडक, ३ कुंडल, ४ अर्धचंद्रक आणि ५ बिंदुसंकाश असे सनातन पंच ब्रह्म आहे. (क. गी. २–१)

पंच भक्तिमती — १ अनसूया, २ शबरी, ३ गोपीजन, ४ विदुर-पत्नी व ५ राणी मीरा. या पांच प्रसिद्ध भक्तिमती होत.

पंचभद्र — १ गुळवेल, २ पित्तपापडा, ३ वाळा, ४ काडे चिराईत ५ सुंठ. या पांच वनस्पतींस आर्यवैद्यकांत पंचभद्र म्हणतात.

पंचभ्रम — १ भेदभ्रम, २ कर्तृत्वभ्रम, ३ संगभ्रम, ४ विकार-भ्रम आणि ५ सत्यत्व. (मो. प्र.)

पंचभाव — १ शांत, २ दास्य, ३ सख्य, ४ वात्सल्य आणि ५ मधुर.

पंचभिक्षु — १ कौण्डिण्य, २ वप्र, ३ भद्रायु, ४ महानाम व ५ अश्वजित्. हे गौतमबुद्धानें प्रथम उपदेशिलेले पांच भिक्षु होत.

पंच भिक्षुव्रतें — १ चोरी न करणें, २ ब्रह्मचर्य, ३ त्याग, ४ लोभाचा अभाव व ५ अहिंसा.

अस्तेयं ब्रह्मचर्यं च त्यागो लोभास्तथैव च ।
व्रतानि पञ्च भिक्षूणामहिंसा परमाणि वै ॥ (मार्कण्डेय पु.)

पंच भेद (संन्यास दीक्षेचे) — १ आश्रम, २ तीर्थ, ३ सरस्वती, ४ भारती व ५ परमहंस असे पांच प्रकार.

पंच 'म' कार — १ मांस, २ मदिरा, ३ मत्स्य, ४ मैथुन व ५ मद्य. या पांच वस्तूंचें सेवन हा शाक्तपंथांतील वाममार्गीयांत आचार-धर्म समजला जातो.

मकारपञ्चकं देवि । देवानामपि दुर्लभम् ॥ (गुप्तसाधनतंत्र)

पंच महाकाव्यें (संस्कृत) — १ रघुवंश, २ कुमारसंभव, ३ किरातार्जुनीय, ४ शिशुपालवध व ५ नैषधचरित.

पंच महातत्त्वांचीं देवस्थानें — १ पृथ्वी–कांजीवरम्, २ आप–जंबुकेश्वरम्, ३ तेज–अरुणाचालम्, ४ वायु–कालहस्ति व ५ आकाश–चिदंबरम्. हीं पांची देवस्थानें दक्षिण भारतांत मद्रास राज्यांत आहेत.

पंच महातत्त्वांचे पांच विषय — १ पृथ्वी–गंध, २ आप–रस, ३ तेज–रूप, ४ वायु–स्पर्श आणि ५ आकाश–शब्द. (तत्त्व-निजबोध-विवेक)

पंच महातत्त्वांचीं दहा इंद्रियें — १ पृथ्वी–नाक व गुद, २ जल–जीभ व लिंग, ३ तेज–नेत्र व पाय, ४ वायु–त्वचा व हात आणि ५ आकाश–कान व मुख. (तत्त्व-निजबोध–विवेक)

पंच महापातकें — (अ) १ ब्रह्महत्त्या, २ भ्रूणहत्या, ३ बाल-हत्त्या, ४ गोहत्या आणि ५ स्त्रीहत्या; (आ) १ ब्रह्महत्या, २ सुरापान, ३ चोरी, ४ गुरुदारागमन आणि ५ अशांशीं संसर्ग ठेवणें हीं पंचमहापातकें; व हीं ज्यांचेकडून घडतात ते पंचमहापातकी होत. (स्कंद–कुमा. ३६–२)

पंच महाभूतें — १ पृथ्वी, २ आप, ३ तेज, ४ वायु आणि ५ आकाश. हीं पंच महाभूतें परमात्म्यानें विश्वोत्पत्तीकरितां निर्माण केलीं. (क. गी. २–१३)

पंच महायज्ञ — १ ब्रह्मयज्ञ–अध्यापन, २ पितृयज्ञ–तर्पण, ३ देवयज्ञ–वैश्वदेव होम, ४ भूतयज्ञ–बलिहरण व ५ मनुष्ययज्ञ–अतिथि-सत्कार.

अध्यापनं ब्रह्मयज्ञः पितृयज्ञश्च तर्पणम् ।
होमोदैवो बलिर्भूतौ नृयज्ञोऽतिथिपूजनम् ॥ (मनु. ४–३६)

(आ) १ मातृपितृभक्ति, २ पातिव्रत्य, ३ समता, ४ मित्रांचा द्वेष न करणें व ५ विष्णुभक्ति.

पित्रोरर्चाथ पत्युश्च साम्यं सर्वजनेषु च ।
मित्राद्रोहो विष्णुभक्तिरेते पञ्चमहामखाः ॥ (पद्म सृष्टि. ७–१३)

पंच महाविषें — १ सोमल, २ हरताळ, ३ मनशीळ, ४ वत्सनाभ आणि ५ सर्प विष. (शा. नि.)

पंच महाव्रतें (जैनधर्म) — १ अहिंसा, २ असत्य त्याग, ३ अस्तेय ४ ब्रह्मचर्य व ५ अपरिग्रह. अशीं पांच व्रतें पाळण्याची भिक्षु-भिक्षुणींस शपथ घ्यावी लागते; (आ) १ सत्य, २ अस्तेय, ३ अहिंसा, ४ ब्रह्मचर्य व ५ शास्त्र आज्ञापालन. हीं सर्वसामान्य पंचमहाव्रतें.

पंच महाव्याधि — १ मूळव्याध, २ यक्ष्मा (क्षय), ३ कोड, ४ प्रमेह आणि ५ उन्माद.

पंच महाभूतांचीं पंचवीस तत्त्वें — (१) पृथ्वी–१ अस्थि, २ मांस, ३ नाडी, ४ त्वचा व ५ रोम; (२) आप–१ शुक्र (वीर्य), २ शोणित (रक्त), ३ लाळ, ४ मूत्र व ५ स्वेद; (३) तेज–१ क्षुधा, २ तृषा, ३ आलस्य, ४ निद्रा व ५ कांति; (४) वायु–१ चलन, २ वलन, ३ पलायन, ४ प्रसरण व ५ आकुंचन; (५) आकाश–१ काम, २ क्रोध, ३ शोक, ४ मोह व ५ भय. (विचारचंद्रोदय दर्शन)

पंच महाशब्द — (अ) १ झांज, २ नगारा, ३ कर्णा, ४ चौघडा व ५ पिपाणी; (आ) १ शिंग, २ ताशा, ३ नगारा, ४ शंख व ५ जय-घंटा. हीं पांच मोठ्या आवाजाचीं वाद्यें होत व तीं प्राचीन काळीं राजाची स्वारी निघाली असतां वाजवीत असत.

पंच महासरोवरें — १ बिंदु सरोवर–सिद्धपूर–मातृगया, २ नारायण सरोवर–कच्छप्रांत, ३ मानस सरोवर–हिमालयांत, ४ पुष्कर–अजमीर-जवळ व ५ पंपा सरोवर-होसपेठजवळ.

पंच महासागर — १ उत्तर महासागर, २ दक्षिण महासागर, ३ हिंदी महासागर, ४ पॅसिफिक (प्रशांत) महासागर आणि ५ अटलांटिक महासागर. हे पृथ्वीवरील पंच महासागर होत. यांत प्रशांत महासागर अधिक खोल व मोठा आहे.

पंच माता — १ राजपत्नी, २ गुरुपत्नी, ३ मित्रपत्नी अथवा भ्रातृपत्नी, ४ पत्नीमाता (सासू) आणि ५ आपली माता. या पांच माता–मातेसमान होत. (वृ. चा. ४–२०)

पंचमुखें (शिवदेवतेचीं) — १ सद्योजात, २ वामदेव, ३ अघोर, ४ तत्पुरुष आणि ५ ईशान. अशीं शिवाचीं पांच मुखें व स्वरूपें होत.

यांनाच पंचब्रह्में असेंहि म्हणतात; व त्यांपासून अनुक्रमें १ रेणुकाचार्य, २ दारुक (मरुल), ३ घंटाकर्ण (एकोराम), ४ धेनुकर्ण (पंडिताराध्य) व ५ विश्वकर्ण (विश्वाराध्य) असे पंचाचार्य अवतरले.
(सुप्रबोधागम)

पंचमुद्रा — (अ) (जप विधि) १ कमल, २ कलश, ३ धेनु, ४ ज्ञान आणि ५ अंजलि. अशा पांच प्रकारच्या मुद्रा करून जप करावा असें सांगितलें आहे.

कमलं कलशं धेनुं ज्ञानमञ्जलिमेव च ।
पञ्चमुद्राः प्रदर्श्याथ श्रीसूक्तं जपेद्बुधः ॥ (श्रीसूक्त फलश्रुति)

(आ) (मुद्रा धारण) १ चक्र, २ शंख, ३ गदा, ४ पद्म आणि ५ नारायण. अशा पांच मुद्रा मध्वसंप्रदायी शरिरावर धारण करतात.

(इ) (दीक्षाविधि) १ भिक्षापात्र, २ दंडकाष्ठ, ३ भगवी कंथा, ४ कमंडलु व ५ विभूति. या पांच वस्तु वीरशैव संप्रदायांत दीक्षाविधीस लागतात, त्यांसहि पंचमुद्रा म्हणतात.

(ई) (योगशास्त्र) १ खेचरी, भूचरी, ३ अगोचरी, ४ चाचरी आणि ५ अलक्ष. (क. क. स्तबक ८)

पंचमुळें — १ डाय (दाय), २ डोला, ३ रिंगणी, ४ रानवांगी आणि ५ गोक्षुर. यांस आर्यवैद्यकांत पंचमुळें म्हणतात.

पंच मूर्खलक्षणें — १ गर्विष्ठ, २ दुरुत्तरें करणें, ३ हट्टी, ४ अप्रिय भाषण करणें व ५ दुसऱ्याचें भलेंबुरें न जाणणें.

मूर्खस्य पंचचिह्नानि गर्वी दुर्वचनी तथा ।
हठी चाप्रियवादी च परोक्तं नैव मन्यते ॥ (सु.)

पंचमूत्रें — १ गाय, २ शेळी, ३ म्हैस, ४ मेंढी व ५ गाढव. या पांच प्राण्यांचीं मूत्रें चेतनावर्धक औषधी आहेत.

गोजानिका महिषीणां मूत्रं गर्दभकस्य च ।
पंचमूत्रं कटूष्णस्य शोधनं वृष्यमीरितम् ॥ (शा. नि.)

पंचमृत्तिका — १ विटकर, २ गेरू, ३ क्षार मृत्तिका, ४ भस्म आणि ५ वारुळाची माती. या पांचांना पंचमृत्तिका म्हणतात.

इष्टिका गैरुका लोणं भस्मवल्मीकमृत्तिका ।
रसप्रयोगकुशलैः कीर्तिताः पंचमृत्तिकाः॥ (र. र. समुच्चय १०. ८३)

पंच मोक्षसाधनें — १ मुद्राधारण, २ त्रिपुंड्र, ३ विष्णुनामें ठेवणें, ४ विष्णुप्रिय माला धारण करणें व ५ 'ॐनमो नारायणाय' हा मंत्रोपदेश. हीं पांच मोक्षसाधनें रामानुज संप्रदायांत मानलीं आहेत.

पंच यज्ञ — १ स्नान, २ दान, ३ तप, ४ होम व ५ पितृयज्ञ (तर्पण). हे पांच यज्ञ नित्याचे होत.

पंच योग — (अ) १ क्रियायोग, २ मंत्रयोग, ३ हठयोग, ४ नादयोग आणि ५ राजयोग; (आ) १ मंत्रयोग, २ स्पर्शयोग, ३ भावयोग, ४ अभावयोग आणि ५ महायोग. (लिंग. अ. ५५)

पंच रत्नें — (अ) १ माणिक, २ नील, ३ पाच, ४ पुष्पराज व ५ हिरा; (आ) १ सोनें, २ रुपें, ३ मोतीं, ४ माणिक आणि ५ पोवळें. हीं सर्व देवांना प्रिय अशीं पांच रत्नें (विष्णुधर्मोत्तर); (इ) १ इंद्रनीलमणी, २ हिरा, ३ माणिक, ४ मोतीं व ५ प्रवाळ.

नीलकं वज्रकं चेति पद्मरागश्च मौक्तिकम् ।
प्रवालं चेति विज्ञेयं पंचरत्नं मनीषिभीः ॥ (सु.)

पंच रत्नें (सौराष्ट्राचीं) — १ नदी, २ नारी, ३ घोडे, ४ श्रीसोमनाथ आणि ५ द्वारका.

सौराष्ट्रे पंचरत्नानि नदीनारीतुरंगमः ।
चतुर्थं सोमनाथं च पञ्चमं हरिदर्शनम् ॥ (केसरी ११-६-१९५१)

पंचरत्न गीता — १ श्रीभगवद्गीता, २ विष्णुसहस्रनाम, ३ भीष्मस्तवराज, ४ अनुस्मृति व ५ गजेंद्रमोक्ष. या पांच अध्यात्म ग्रंथांस समुच्चयानें.

पंचरसा — आवळ्याला संस्कृतमध्यें पंचरस हें नांव आहे. हें अत्यंत आरोग्यदायक असून यांत पंचरसांचें मिश्रण असतें. यापासूनच आयुर्वेदांतील दीर्घायुदायक च्यवनप्राश हें औषध तयार करतात.

पंचरसी — १ सुवर्ण, २ रुपें, ३ लोह, ४ तांबें व ५ जस्त. या पांच धातूंच्या मिश्रणानें बनाविलेली वस्तु.

पंच राजचिह्नें — १ छत्र, २ चामर, ३ सिंहासन, ४ मुकुट आणि ५ राजदंड.

पंच लवणें — १ सामुद्र, २ सैंधव, ३ संचळ, ४ बिडलोण व ५ बांगडखार.

पंच लक्षणें (धश्चोटाचीं) — १ सामान्य मनुष्याच्या दुपटीनें आहार, २ वेळीं अवेळीं झोपणें, ३ अति विषयलंपट, ४ मान आणि ५ अपमान या दोहोंबद्दल सारखाच बेफिकीर.

आहारं द्विगुणं प्रोक्तं शय्या च कुचमर्दनम् ।
नास्ति मानापमानं च धश्चोटं पंचलक्षणम् ॥ (सु.)

पंच लक्षणें (पुराणांचीं) — १ सर्ग–उत्पत्ति, २ प्रतिसर्ग–संहार, ३ पुनरुत्पत्ति, ४ मन्वन्तर (वेगवेगळ्या मनूच्या कालांतील कथा) आणि ५ वंशानुचरित. (सूर्यचंद्रवंशीय राजांच्या कथा.)

सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशोमन्वन्तराणि च ।
वंशानुचरितं चैव पुराणं पंचलक्षणम् ॥ (सु.)

पंच लक्षणें (पुरुषाचीं) — १ सत्पात्रीं त्याग, २ गुणाचा प्रेमी, ३ बंधुवर्गास समान भाग देणारा, ४ शास्त्र जाणणारा आणि ५ पराक्रमी.

पात्रे त्यागी गुणे रागी संविभागी च बंधुषु ।
शास्त्रे बोद्धा रणे योद्धा पुरुषः पंचलक्षणः ॥ (सु.)

पंच लक्षणें (श्रेष्ठत्वाचीं) — १ पैसा, २ कुल, ३ वय, ४ कर्तृत्व व ५ विद्या.

पंच 'ल' कार संपन्न स्त्री भाग्यानेंच मिळते — १ अनुकूल, २ निर्मल, ३ कुलीन, ४ कुशल आणि ५ सुशील.

अनुकूलां विमलांगीं कुलजां कुशलां सुशीलसंपन्नां ।
पंच 'ल'कारां भार्यां पुरुषः पुण्योदयाल्लभते ॥ (सु.)

पंच लावण्यें (स्त्रीजीवनांतील) — १ निद्रासौंदर्य, २ स्नानसौंदर्य, ३ मानसौंदर्य, ४ रागसौंदर्य आणि ५ अनुरागसौंदर्य. हीं स्त्रीजीवनांतील पांच प्रकारचीं लावण्यें होत.

पंच लोह — १ कांसें, २ पितळ, ३ तांबें, ४ शिसें व ५ कथील. हे पांच धातु एकत्र केल्यानें तयार होणारा धातु. (आयुर्वेद)

पंच 'व' कार — १ विद्या, २ वपु, ३ वाचा, ४ वस्त्र आणि ५ विभव. हे पांच 'व' कार मनुष्याला वैभव प्राप्त करून देणारे आहेत.

पंचवटी — १. अश्वत्थ, २ बिल्व, ३ वड, ४ धात्री (आवळी) व ५ अशोक. असे पांच प्रकारचे वृक्ष असलेला प्रदेश. असें ठिकाण नाशिकजवळ आहे. येथेंच वनवासांत असतांना श्रीरामचंद्राचें वास्तव्य होतें.

पंच वल्कलें — (अ) १ अश्वत्थ, २ अंजीर (न्यग्रोध), ३ उंबर, ४ पिंपरी आणि ५ वेतस यांच्या साली. यांना पंच वल्कलें म्हणतात; (आ) १ वड, २ उंबर, ३ पिंपळ, ४ पासेरस आणि ५ नांदुर्खी किंवा वेतस.

पंच वर्ज्य नामें — १ आत्मनाम, २ गुरुनाम, ३ कृपणनाम, ४ ज्येष्ठापत्यनाम व ५ पत्नीनाम. ज्याला पुष्कळ जगण्याची इच्छा असेल त्यानें या पांचांस नांवानें संबोधूं नये. सौभाग्यवतीनें पतीचें नांव घेऊं नये हें अनुमेय समजावें.

पंच वज्रनिवारक — १ सुमन्तु, २ वैशंपायन, ३ पुलस्त्य, ४ पुलह आणि ५ जैमिनी. (प्रा. च. को.)

पंच वाचा — १ वैखरी, २ मध्यमा, ३ पश्यन्ती, ४ परा आणि ५ अनिर्वाचा. (सि. बो. ३४-३७)

पंच वाद्यें — १ तंतिवीणा, २ वितंत, ३ मृदंग, ४ घनकांस्य व ५ अनाहत वेणुनाद. अशीं पांच वाद्यें आणि त्यांचे नाद आहेत.

पंच वानरशार्दूल — १ ऋषभ, २ शरभ, ३ नीळ, ४ गवाक्ष व ५ गवय. हे पांच रामरावणयुद्धांतील प्रमुख वानरवीर.

पांचही वीर संग्रामशीळ । ऋषभ शरभ आणि नीळ ।
गवाक्ष गवय अतिप्रबळ । वीरशार्दूल संग्रामीं ॥

(भा. रा. युद्ध. २६-३१)

पंचविध दानें — १ धर्ममूलक—निर्मत्सर बुद्धीनें देणें, २ अर्थ-मूलक—याचकाच्या तोंडून धन्योद्गार, ३ भयमूलक—पीडा देईल म्हणून, ४ काममूलक—परस्पर प्रेम जाणून, ५ करुणामूलक—दया म्हणून.

पंचविध दृष्टान्त — १ शुक्तिरजत न्याय–शिंपीच्या ठिकाणीं रौप्याचा आभास, २ रज्जुसर्प न्याय–रज्जूवर सर्पाचा आभास, ३ स्थाणुचोर न्याय–स्थाणु (खोड) त्याचे ठिकाणीं चोराचा भास, ४ ख-पुष्पन्याय–आकाशामध्यें पुष्पाचा किंवा नीलतेचा भास आणि ५ मृगजलन्याय–मध्याह्न समयीं मरुभूमीवर प्रतिबिंबित होणारा पाण्याचा आभास. असे जगन्मिथ्यत्वाविषयीं पंचाविध दृष्टान्त आहेत.

पंच विनायक — १ मोद, २ प्रमोद, ३ दुर्मुख, ४ सुमुख आणि ५ गणनायक.

पूजा करा भावेंसी। मोदारि पंचाविनायका॥ (गुरु. च ४१–१८४)

पंच विषय — १ रूप, २ रस, ३ गंध, ४ स्पर्श आणि ५ शब्द. हे पंच ज्ञानेंद्रियानें जाणले जाणारे पांच विषय होत.

पंच वीरांगना — १ कैकेयी, २ संयोगिता, ३ दुर्गावती, ४ कर्मदेवी आणि ५ झांशीची राणी लक्ष्मीबाई. (कल्याण नारी अंक)

पंचवृत्ति (भूमिका) — १ क्षिप्त, २ मूढ, ३ विक्षिप्त, ४ एकाग्र आणि ५ निरुद्ध. (मानसशास्त्र)

पंचव्रीहि — १ तीळ, २ उडीद, ३ मूग, ४ सांवे व ५ साळी. हीं पांच व्रीहि (धान्यें) होत. हा सर्व अरिष्टांचा नाश करणारा धान्यगण म्हणून सांगितला आहे.

तिलाश्च माषामुद्गाश्च श्यामकः शालयः स्मृताः ।
पञ्च धान्यगणः प्रोक्तः सर्वारिष्टनिषूदनः (भ. म. ६–२८)

पंच व्यास — १ बृहद्व्यास, २ देवव्यास, ३ मानव व्यास ४ द्वैपायनव्यास आणि ५ वेदव्यास.

पंचशिला — १ नारद शिला, २ नृसिंह शिला, ३ वराह शिला, ४ गरुड शिला आणि ५ मार्कंडेय शिला हीं पांच तीर्थें. त्या त्या तीर्थांचे ठिकाणीं अति अजस्र शिला बद्रीनाथास अलकनंदेच्या प्रवाहांत आहेत. त्या ठिकाणीं ज्यांनीं तपश्चर्या केली त्यांचीं नांवें दिलीं आहेत.

पंच शिल्पकार — १ सुतार, २ कोष्टी, ३ न्हावी, ४ धोबी व ५ चांभार.

तक्षश्च तंत्रवायश्च नापितो रजकस्तथा ।
पंचमश्चर्मकारश्च कारवः शिल्पिनो मताः ॥ (सु.)

पंचशील (भगवान बुद्धाचे) — १ स्वतः हिंसा करूं नये व दुसऱ्याला अनुमति देऊं नये, २ स्वतः चोरी करूं नये व दुसऱ्याकडून चोरी घडूं देऊं नये, ३ स्वतः व्यभिचार करूं नये व दुसऱ्याकडून तो घडूं देऊं नये, ४ खोटें कधीं बोलूं नये व खोट्याला संमति देऊं नये व ५ स्वतः मद्यपान करूं नये व दुसऱ्याकडून घडूं देऊं नये.

पंचशील — (आंतरधार्मिक) — १ सर्व धर्मासंबंधीं समान आदर, २ ज्ञानानें धर्मपरिवर्तन मान्य, पण छलबलानें निषिद्ध, ३ पूजास्थानाविषयीं समान आदर, ४ गतकालीन समाजानें केलेल्या पूजास्थानाच्या विध्वंसनासंबंधीं आजच्या समाजाला उत्तरदायी धरूं नये. तसेंच तशा विध्वंसनाचें समर्थनहि करूं नये आणि ५ धार्मिक संघर्षप्रसंगीं परस्पर सहिष्णुतेच्या तत्त्वावर एकत्र विचारानें मार्ग काढणें. (केसरी १२।१०।१९५४)

पंचशील (आंतरराष्ट्रीय) — १ परस्परांच्या प्रादेशिक अभंगत्वाबद्दल व सार्वभौमत्वाबद्दल आदर, २ अनाक्रमण, ३ एकमेकांच्या अंतर्गत कारभारांत हस्तक्षेप न करणें, ४ परस्पर समानता व ५ शांततापूर्ण सहजीवन. हे आंतरराष्ट्रीय पंचशील होत. (केसरी जून १९५५)

पंचशौच — १ मनःशौच, २ कर्मशौच, ३ कुलशौच, ४ शरीरशौच आणि ५ वाक्शौच.

पंच 'स'कार — (अ) १ सहिष्णुता, २ सेवा, ३ सन्मानदान, ४ स्वार्थत्याग व ५ समता; (आ) १ सत्संग, २ सदाचार, ३ संतोष, ४ सरलता व ५ सत्य.

पंचसार — १ तूप, २ मध, ३ तापविलेलें दूध, ४ पिंपळी व ५ खडीसाखर. हे पांच पदार्थ एकत्र घुसळून तयार केलेलें सार. हें हृद्रोग, श्वास व कास यांचा नाश करितें.

पंचसम्राट् — १ यौवनाश्व (मांधाता)–अजिंक्य लोकांना जिंकल्यामुळें, २ भगीरथ–प्रजापालनामुळें, ३ कार्तवीर्य–तपःप्रभावानें, ४ भरत–सामर्थ्यसंपन्नतेमुळें आणि ५ मरुत्–प्रजेची भरभराट करून या पांचांनीं सम्राट् ही पदवी मिळविली. (म. भा. सभा. १५–१६)

पंच सिद्धऔषधी — १ बचानग, २ पांढरा भुइकोहळा, ३ कोडकन्द, ४ रुद्रवंती (रानहरभरे) आणि ५ सर्पाक्षी (थोर मुंगुसवेल).

तैलकन्दः सुधाकन्दः कोडकन्दोरुदंतिका ।
सर्पनेत्रयुताः पञ्च सिद्धौषधिक संज्ञकाः ॥ (रा. नि.)

पंचसिद्धि — १ जन्मसिद्धि, २ औषधीसिद्धि, ३ मंत्रसिद्धि, ४ तपःसिद्धि आणि ५ समाधिसिद्धि. (पातंजल योगसूत्रें)

पंचसिद्धान्तिका — वराहमिहिरकृत एक ज्योतिषग्रंथ. यांत १ रोमक सिद्धान्त, २ पैतामह, ३ वासिष्ठ, ४ पौलिश आणि ५ सौर सिद्धान्त अशा ज्योतिष्यांतील पांच पुरातन ज्योतिष सिद्धान्तांचें विवरण असल्यामुळें त्यास पंचसिद्धान्तिका म्हणतात.

पंच सुगंध — १ कापूर, २ कंकोळ, ३ लवंग, ४ सुपारी व ५ जायफळ. हे पांच पदार्थ समभाग विड्यांत घातले असतां उत्तम सुगंध तयार होतो, त्यास पंच सुगंध म्हणतात.

पंच सूक्तें — १ पुरुषसूक्त, २ देवीसूक्त, ३ सूर्यसूक्त, ४ पर्जन्यसूक्त व ५ श्रीसूक्त.

पंचसूत्री (संसारोपयोगी) — १ विचार करून बाजारासाठीं बाहेर पडा, २ भेटीस गेल्यावेळीं दोन शब्द कमी बोला, ३ सौंदर्य मावळत जातें पण गुणविकास होतो, ४ डोळे उघडे ठेवा, कानाचा नीट उपयोग करा, जीभ जपून वापरा व ५ आधीं गरजा व मग सोई आणि नंतर चैनी. (कण आणि क्षण)

पंचसूत्री (स्वास्थ्यसंरक्षणाची) — १ आहार, व्यायाम व मैथुन नियमित, २ निर्व्यसनता, ३ नित्य सुखानें ७–८ तास झोप, ४ मच्छरदाणी वापरणें व ५ सुशील सुग्रण व हसतमुख पत्नी असणें. (ज. नानासाहेब शिंदे)

पंच सूत्रें (ग्रंथालय शास्त्र) — १ ग्रंथ अध्ययनाकरितां आहेत, २ ते सर्वांकरितां आहेत, ३ प्रत्येक ग्रंथाला वाचक असतोच, ४ अभ्यासकांचा वेळ वांचवा आणि ५ ग्रंथालय सारखें वाढतें असावें.

पंचसूना दोष — १ झाडसारवण, २ कांडणें, ३ चूल पेटविणें, ४ दळणें, वाटणें व ५ पाणी भरणें. एतन्मूलक हत्त्या सूक्ष्म जीवांची हिंसा मनुष्याच्या हातून नकळत नित्य घडत असते. (मनु ३-६८)

पंच स्थानें वायूचीं व त्यांचीं नांवें — १ अपानवायु–मलस्थान, २ समानवायु–नाभी, ३ प्राणवायु–हृदय, ४ उदानवायु–कंठीं व ५ व्यान वायु–सर्व शरिरांत.

पंच क्षार — १ टांकणखार, २ सज्जीखार, ३ जवखार, ४ बांगड-खार आणि ५ सोराखार. (चि. प्र.)

पंच क्षुद्रसिद्धि — १ त्रिकाण्ड ज्ञान, २ शीतोष्णादि द्वंद्वावर सत्ता, ३ दुसऱ्याचें मन जाणणें, ४ अग्नि—सूर्य–उष्ण–जल–विष इत्यादींचें स्तंभन (परिणाम थांबविणें) आणि ५ अजिंक्यता. (भाग स्कंध ११ अ. १५)

पंच ज्ञानी — १ श्रीकृष्ण, २ शुकाचार्य, ३ जनक, ४ श्रीरामचंद्र आणि ५ वसिष्ठ.

कृष्णोयोगी शुकस्त्यागी राजानौ जनकराघवौ ।
वसिष्ठः कर्मकर्ता च पञ्चैते ज्ञानिनः स्मृताः ॥ (जीवन्मुक्तिविवेक)

पंच ज्ञानें (जैनधर्म) — १ मतिज्ञान, २ श्रुतिज्ञान, ३ अबाधि-ज्ञान, ४ मनःपर्यय ज्ञान, व ५ केवळज्ञान.

पंच ज्ञानेंद्रियें — १ कान, २ त्वचा, ३ डोळे, ४ जीभ आणि ५ नाक.

" श्रोत्रं च चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च " (भ. गी. १५-९)

पंचम स्वर—१ नाभि, २ छाती, ३ हृदय, ४ कंठ व ५ मूर्धा. या शरिराच्या पांच स्थानांमधून निघालेल्या वायूनें काढलेला गाण्याचा सूर.

पंचांगुलें — १ अंगुष्ठ, २ तर्जनी, ३ मध्यमा, ४ अनामिका व ५ कनिष्ठिका.

पंचामरा — १ दूर्वा, २ भांग, ३ बेल, ४ निर्गुंडी व ५ तुळस. ह्या पांच पवित्र वनस्पति. (वज्रकोश)

पंचामृत — (अ) १ गाईचें दूध, २ दहीं, ३ तूप, ४ मध व ५ साखर. या पांच अमृततुल्य पदार्थांना पंचामृत म्हणतात. यानें देवमूर्तीला अभिषेक करतात; (आ) १ सुंठ, २ मुसळी, ३ गुळवेल, ४ शतावरी आणि ५ गोखरू. हें औषधी पंचामृत अथवा वनस्पति पंचामृत (शा. नि); (इ) १ चिंच, २ गूळ, ३ मीठ, ४ मिरची व ५ तीळ. या पांच पदार्थांच्या मिश्रणानें केलेला पदार्थ (भोजनांतील); (ई) १ नारळ, २ आंबा, ३ फणस

व ४ केळीं या चारींपैकीं कोणतींहि तीन व ४ साखर व ५ मध. या पांचांचें एक पंचामृत प्राचीनकालीं करीत असत.

नालिकेराम्रपनसकदलीनां फलत्रयम् ।
शर्करा मधुसंयुक्तं पञ्चामृतमितीरितम् ॥ (बौ. गृह्यसूत्र)

पंचामृतयूष — १ कुळीथ, २ मूग, ३ तूर, ४ उडीद आणि ५ राजशिबी या पांच धान्यांचें कढण.

पंचायतन — १ शिव, २ विष्णु, ३ सूर्य, ४ गणपति व ५ देवी या पांच देवतांचा समुदाय. या पांचांपैकीं प्रत्येक देवतेस प्राधान्य देऊन शिव, विष्णु इ. चीं पांच पंचायतनें मानण्याची प्रथा आहे.

आदित्यं गणनाथं च देवीं रुद्रं च केशवम् ।
पंचदैवतमित्युक्तं सर्वकार्येषु पूजयेत् ॥ (सु.)

या पंचायतनकल्पनेचा उगम श्रीशंकराचार्यांचे कालापासून झाला व ती त्यांस पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या सृष्टींतल्या पंचतत्त्वांवरून सुचली म्हणतात.

पंचारति — १ दीप, २ कमल, ३ वस्त्र, ४ आम्रफल व ५ सुपारी हीं एकत्रपणें ओवाळणें.

पंचावयव — १ प्रतिज्ञा–या पर्वतावर अग्नि आहे. २ हेतु–कारण तेथें धूर आहे, ३ उदाहरण–धूर असतो तेथें अग्नि असतो, ४ उपनय–या पर्वतावर अग्नीस कधींहि सोडून न राहणारा धूर आहे आणि ५ निगमन –म्हणून या पर्वतावर अग्नि आहे. हे वाक्याचे पांच अवयव अथवा सिद्धान्ताचे भाग न्यायशास्त्रांत सांगितले आहेत. (प्र. भा. सभा ५-५)

पंचाक्षरी मंत्र — (अ) नमः शिवाय. १ नकार–पृथ्वीतत्त्व, २ मकार–उदकतत्त्व, ३ शिकार–अग्नितत्त्व, ४ वकार–वायुतत्त्व आणि ५ यकार–आकाशतत्त्व. हीं पांच बीजाक्षरें पांच तत्त्वें आहेत. (वी. प्र. अ. ८); (आ) ॐ नमः सिद्धं हा वाक्प्रचार जैन मताचा आहे. याचा अर्थ सिद्धांस नमस्कार. याचेंच मराठी अपभ्रष्ट रूप म्हणजे ओ–ना–मा–सी–धं असें आहे.

पंचाक्षरी यमक — आर्येच्या प्रत्येक चरणांत पांच अक्षरांचें यमक (समान अक्षरांची पुनरावृत्ति) साधलें आहे असें. उदा०—

गांधार म्हणे तसाच कां ? त्यां आहेत काय बा ! सिंगें ?
कीर्तिवर म्हणुनि विधिनें बांधियली त्यांसि काय बासिंगें ?

(मो. आ. उद्योग ५–५०)

पंचोपचार —(अ) १ गंध, २ पुष्प, ३ धूप, ४ दीप, ५ नैवेद्य हे पंचोपचार होत. या पंचोपचारांनीं केलेल्या देवपूजेस पंचोपचार पूजा म्हणतात; (आ) १ ध्यान, २ आवाहन, ३ नैवेद्य, ४ नीरांजन व ५ नमस्कार. (जाबालि)

पांच अवस्था (मनुष्यजीवनाच्या) — १ कौमार, २ पौगंड, ३ कैशोर, ४ यौवन आणि ५ वार्धक्य.

पांच अवस्था (स्त्रीजीवनाच्या) — १ कन्या, २ भगिनी, ३ पत्नी, ४ माता आणि ५ पितामही.

पांच अंगें (आन्तरपूजनाचीं) — १ जप, २ होम, ३ तर्पण, ४ मार्जन आणि ५ अन्नसंतर्पण.

पांच अंगें (बाह्य पूजनाचीं) — १ पटल, २ पद्धति, ३ वर्म, ४ स्तोत्र आणि ५ नमस्कार (कल्याण शक्ति अंक)

पांच अंगें (राजनीतीचीं) — १ कार्यारंभ, २ माणसें आणि द्रव्य यांचा पुरवठा, ३ देशकालाची अनुकूलता, ४ संकटांचा प्रतिकार व ५ कार्यसिद्धि. (स. को.)

पांच अंगें (विवाहाचीं) — १ वाग्दान, २ प्रदान–वधूला वस्त्रालंकार देणें, ३ वरण–लग्नास सर्वांनीं संमति देणें; ४ पाणिपीडन–वरानें वधूचें पाणिग्रहण करणें आणि ५ सप्तपदी. (जैनधर्म)

पांच आयुष्यवर्धनास उपाय — १ भूमीवर शय्या, २ दोन वेळां जेवण, ३ सहा वेळां लघुशंका, ४ तीन वेळां शौचास जाणें आणि ५ स्त्रीसंग अल्प प्रमाणांत.

पांच आज्ञा (श्रीकृष्णाच्या) —

१. उद्धरेदात्मनात्मानम्–आपण होऊन आपला उद्धार करावा;
२. आत्मैव ह्यात्मनोबंधुः — आपणच आपला बंधु किंवा आपणच आपला शत्रु;

३. कर्मण्येवाधिकारस्ते–कर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे;
४. स्वधर्मे निधनं श्रेयः–स्वधर्माप्रमाणें मरण आलें तरी त्यांत कल्याण आहे;
५. श्रद्धामयोऽयं पुरुषः–मनुष्य हा श्रद्धामय आहे. (भ. गी.)

पांच आज्ञा (बुद्धाच्या) —१ अहिंसा, २ सत्य, ३ अस्तेय, ४ अव्यभिचार आणि ५ अपेयपान.

पांच आज्ञा (महंमदाच्या) — १ शुचित्व, २ निराहार, ३ दान, ४ उपासना व ५ तीर्थयात्रा.

पांच कन्नड महाकवि — १ पंपा, २ रन्न, २ पोन्न, ४ नागवर्म, आणि ५ चासुंडराय.

पांच कन्नड महाकाव्यें — १ पंपभारत, २ आदि पुराण, ३ शांति पुराण, ४ गदायुद्ध आणि ५ कर्नाटक कादंबरी.

पांच कर्तव्यें राजाचीं (राजशासकांचीं) — १ दुष्टांना दंड, २ सज्जनांचा परामर्श, ३ न्यायानें कोश संमृद्धि, ४ धनिकांविषयीं निःपक्षपात आणि ५ राष्ट्राचें संरक्षण.

दुष्टस्य दंडः सुजनस्य पूजा । न्यायेन कोशस्य च संप्रवृद्धिः ।
अपक्षपातोऽर्थिषु राष्ट्ररक्षा । पञ्चैव यज्ञाः कथिता नृणाम् ॥
(अत्रिसंहिता)

पांच कारणें (सर्वकर्मांच्या सिद्धीस आवश्यक) — १ अधिष्ठान (क्षेत्र), २ कर्ता, ३ साधन, ४ क्रिया आणि ५ दैव. (भ. गी. १८. १४)

पांच कायिक दोष — १ एखाद्याला पीडा–मारपीट करणें, २ व्यभिचार, ३ एखाद्याची वस्तु चोरून घेणें, ४ उगीचच ताठ्यानें चालणें आणि अपवित्र राहणें व ५ व्यर्थ कुचेष्टा करणें.

पांच गीतेचे प्रधान भाष्यकार — १ श्रीशंकराचार्य, २ श्रीरामानुजाचार्य, ३ श्रीमध्वाचार्य, ४ श्रीवल्लभाचार्य आणि ५ श्रीज्ञानेश्वरमहाराज.

पांच गुण दानासंबंधीं — १ सहानुभूति उत्पन्न होणें, २ सद्गदित होणें, ३ आदर, ४ प्रिय भाषण व ५ दिल्यानंतर समाधान वाटणें.

आनंदाश्रूणि रोमाणि बहुमानं प्रियं वचः ।
किञ्चानुमोदनं दानं दानभूषणपंचकम् ॥ (दानशासनम्)

पाच गुण लिपीस आवश्यक — १ निश्चिति (उच्चारासंबंधीं), २ उपयोगिता, ३ सरलता, ४ सौंदर्य व ५ लेखनसुलभता.

पांच गुण कावळ्यापासून शिकावेत — १ गुप्त रीतीनें संभोग, २ धैर्य, ३ समयाच्या ठायीं संग्रह करणें, ४ सावधानपणा व ५ कोणाचाहि विश्वास न धरणें. (वृ. चा. ६–१९).

पांच गुण (ब्राह्मण्याचे) — १ सत्य, २ दया, ३ इंद्रियदमन, ४ परोपकार व ५ तपाचरण.

पाच गुरु (अभ्युदयेच्छु पुरुषाचे) — १ पिता, २ माता, ३ अग्नि, ४ आत्मा आणि ५ गुरु. (म. भा. वन. २१४.२८)

पांच गुरु (स्त्रियांचे) — १ माता, २ पिता, ३ सासू, ४ सासरा व ५ पति.

पांच गोष्टी अकीर्तिकर — १ परान्न, २ दुसऱ्याचें वस्त्र, ३ परशय्या, ४ परस्त्री आणि ५ परगृहवास.

परान्नं परवस्त्रं च परशय्या परस्त्रियः ।
परवेश्मनि वासश्च शक्रस्यापि श्रियं हरेत् ॥ (सु.)

पांच गोष्टी अग्निविना जाळणाऱ्या — १ भार्यावियोग, २ स्वजनापवाद, ३ ऋणशेष, ४ कृपणाची सेवा व ५ दारिद्य आल्यावेळीं स्वकीयांचें दर्शन.

पांच गोष्टी अक्षय्य निधीच होत — १ शील, २ शौर्य, ३ आळसराहित्य, ४ विद्वत्ता व ५ मित्रसंग्रह यांना चोरीचें भय नाहीं.

शीलं शौर्यमनालस्यं पाण्डित्यं मित्रसंग्रहम् ।
अचोरहरणीयानि पञ्चैतान्यक्षयोनिधिः ॥ (सु.)

पांच गोष्टी आयुष्यनाशक — १ सायंकाळचें उन्ह, २ प्रेताचा धूर, ३ वृद्धा स्त्रीसंग, ४ सांचलेलें पाणी व ५ नित्य रात्रीं दहीं खाणें.

वृद्धार्कः प्रेतधूमश्च वृद्धास्त्री थिल्लरोदकम् ।
आयुष्यनाशकं नित्यं रात्रौ दध्यन्नभोजनम् ॥ (सु.)

पांच गोष्टी आयुष्यवर्धक — १ प्रातःकालचें उन्ह, २ यज्ञधूम, ३ तरुण स्त्री, ४ झऱ्याचें पाणी व ५ रात्रीं दूध पिणें.

बालार्को यज्ञधूमश्च बालास्त्री निर्झरोदकम् ।
आयुष्यवर्धकं नित्यं रात्रौ क्षीरान्नभोजनम् ॥ (सु.)

पांच गोष्टी आदर्श समाजास आवश्यक — १ स्वच्छता, २ टापटीप, ३ व्यवस्था, ४ दक्षता आणि ५ सौंदर्यदृष्टि.

पांच गोष्टी ग्रंथनिर्मितीस आवश्यक — १ अवलोकन, २ मनन, ३ अभ्यास, ४ ऊर्मि, ५ अलिप्तता (संयम).

पांच गोष्टी परमेश्वरी सत्तेच्या — (खियामत दिन) १ शेवटचा न्यायाचा दिवस, २ परमेश्वरच पाऊस पाडतो, ३ गर्भाशयांत काय असतें हें परमेश्वरालाच माहीत असतें, ४ उद्यांची प्राप्ति किती हें परमेश्वरालाच माहीत असतें आणि ५ कोणाचा अंत कोठें होणार हें त्यालाच माहीत असतें. (कुराण २१-३२)

पांच गोष्टी पूर्वपुण्याईनें प्राप्त होणाऱ्या — १ यश, २ पुण्य, ३ कलत्र, ४ पुत्र आणि ५ धन.

पांच गोष्टी नसतील तेथें वसति करूं नये — १ व्यवहारधंदा, २ अभय, ३ लज्जा, ४ दाक्षिण्य आणि ५ दानशीलता.

लोकयात्रा भयं लज्जा दाक्षिण्यं दानशीलता ।
पञ्च यत्र न विद्यन्ते न तत्र दिवसं वसेत् ॥ (गरुड ११०-२७)

पांच गोष्टी प्रकट करूं नयेत — १ संपत्तिनाश, २ मनस्ताप, ३ गृहछिद्रें, ४ स्वतःची फसगत आणि ५ अपमान. या पांच गोष्टींची वाच्यता करूं नये.

अर्थनाशं मनस्तापं गृहे दुश्चरितानि च ।
वञ्चनं चापमानं च मतिमान् न प्रकाशयेत् ॥ (कौटिल्य)

पांच गोष्टी प्राणी गर्भांत असतांनाच ठरलेल्या असतात — १ आयुष्य, २ कर्म, ३ धन, ४ विद्या आणि ५ मरण.

पांच गोष्टींमुळें राष्ट्राची अभिवृद्धि होते — १ न्यायालय, २ संग्राम, ३ धर्मसंरक्षण, ४ योग्य वेळीं योग्य विचार करणें आणि ५ सुखी जीवन.

रक्षाधिकरणं युद्धं तथा धर्मानुशासनम् ।
मंत्रचिन्ता सुखं काले पंचभिर्वर्धते मही ॥ (म.भा.शांति ९३-२६)

पांच गोष्टी संध्याकाळीं निषिद्ध — १ भोजन, २ मैथुन, ३ निद्रा, ४ वेदपठण आणि ५ मार्गक्रमण (प्रवास).

एतानि पञ्चकर्माणि सन्ध्यायां वर्जयेद्बुधः ।
आहारं मैथुनं निद्रा संपाठं गतिमध्वनि ॥ (नि. र.)

पांच गोष्टी सार्वजनिक उपयोगाच्या — १ विहीर, २ तळें, ३ सरोवर, ४ देवालय आणि ५ झाड.

वापीकूपतडागानां देवालयकुजन्मनाम् ।
उत्सर्गात्परतः स्वाम्यपिकर्तुं न शक्यते ॥ (पंचतंत्र)

पांच गोष्टी हळूहळू कराव्या — १ विद्या, २ द्रव्यप्राप्ति, ३ गिर्यारोहण, ४ विषयसेवन आणि ५ धर्म.

शनैर्विद्या शनैरर्थाः शनैः पर्वतमारुहेत् ।
शनैः कामं च धर्मं च पञ्चैतानि शनैः शनैः ॥ (ग. पु १०९-४६)

पांच घटक (राष्ट्राचे) — १ देश, २ वेष, ३ धर्म, ४ संस्कृति आणि ५ भाषा.

पांच तत्त्वज्ञानें (भारतकालीन) — १ सांख्य, २ योग, ३ पाशुपत, ४ वेदान्त आणि ५ पांचरात्र. हीं भिन्नभिन्न पांच तत्त्वज्ञानें भारतकालीं प्रचलित होतीं. (म. भा. शान्ति.)

पांच तामिळ महाकाव्यें — १ जीवक चिंतामणी (तिरुतक्कदेवर), २ सिलप्पादिकारम्, २ मणिमेखले, ४ वलयापदि आणि ५ कुंडलकेसी.

पांच तामिळ लघुकाव्यें — १ यशोधरकाव्य, २ चूडामणी, ३ उदयनकथै, ४ नागकुमारकाव्य आणि ५ नीलकेशी.

पांच देवलोकींच्या गाई — १ नंदा, २ भद्रा, ३ सुरभि, ४ सुशीला आणि ५ सुमना.

नन्दा भद्रा च सुरभिस्सुशीला सुमनस्तथा ।
पञ्चगावो विभोर्जाता सद्योजातादि वक्रतः ॥ (सि. शि.)

पांच दांभिक लक्षणें — १ लंगोटी घालणें, २ भस्मलेपन, ३ दर्भासन, ४ रुद्राक्षमाला धारण करणें आणि ५ मौन. हीं बाह्य चिन्हें (ह्याप्रमाणें आचरण नसेल तर) म्हणजे दांभिक लक्षणें होत.

पांच देहांतर्गत दोष — १ काम, २ क्रोध, ३ भय, ४ निद्रा आणि ५ श्वास. हे पांच दोष शरिरांत स्वभावसिद्ध असतात.

> कामक्रोधौ भयं निद्रा पञ्चमः श्वास उच्यते ।
> एते दोषाः शरीरेषु दृश्यन्ते सर्वदेहिनाम् ॥ (सु.)

पांच दैवी प्रकोप — १ आग लागणें, २ अतिवृष्टि, ३ रोगराई, ४ दुष्काळ व ५ पटकीचा उपद्रव.

पांच दोष दानासंबंधीं — १ अनादर, २ विलंब, ३ तोंड चुकविणें, ४ अप्रिय भाषण व ५ दिल्यानंतर पश्चात्ताप होणें.

> अनादरो विलंबश्च वैमुख्यं चाप्रियं वचः ।
> पश्चाद् भवति संतापो दानदूषणपंचकम् ॥ (दानशासनम्)

पांच द्रविड देशीय पवित्र नद्या — १ ताम्रपर्णी, २ कृतमाला, ३ पयस्विनी, ४ कावेरी व ५ प्रतीची.

> ताम्रपर्णी नदी यत्र कृतमाला पयस्विनी ।
> कावेरी च महापुण्या प्रतीची च महानदी ॥ (भाग. स्कंध ११)

पांच नरकाचीं द्वारें — १ जीवहिंसा, २ सुरापान, ३ अगम्यागमन, ४ चोरी व ५ विश्वासघात.

> जीवहिंसा सुरापानमगम्यागमनं तथा ।
> चौर्यं विश्वासघातं च पञ्चैतानि मुनीश्वराः ॥ (लक्ष्मीपूजनमंत्र)

पांच नांवें (श्रीगीतेचीं) — १ श्रीमद्भगवद्गीता, २ उपनिषद्, ३ ब्रह्मविद्या, ४ योगशास्त्र आणि ५ श्रीकृष्णार्जुनसंवाद.

पांच नियम (आत्मसंयमनासाठीं करावयाचीं कृत्यें) — १ शौच, २ संतोष, ३ तप, ४ स्वाध्याय आणि ५ ईश्वरप्रणिधान. (योगसूत्रें २.३२)

पांच नियम (भिक्षूचे) — १ अक्रोध, २ गुरुशुश्रूषा, ३ शौच, ४ मिताहार आणि ५ नित्यस्वाध्याय.

अक्रोधो गुरुशुश्रूषा शौचमाहारलाघवम् ।
नित्यस्वाध्याय इत्येते नियमाः पञ्चकीर्तिताः ॥ (सु.)

पांच परमेश्वरी कृत्यें — १ सृष्टि, २ पालन, ३ संहार, ४ अनुग्रह आणि ५ निग्रह.

पांच पवित्र नद्या — १ किरणा, २ धूतपापा, ३ सरस्वती, ४ गंगा व ५ यमुना.

किरणा धूतपापा च पुण्यतोया सरस्वती ।
गंगा च यमुना चैव पञ्चनद्याः प्रकीर्तिताः ॥

(बृहन्नारदीय उत्तर खंड ५१.१५)

पांच पुरुषार्थ — १ धर्म, २ अर्थ, ३ काम, ४ मोक्ष आणि ५ भक्ति. पांच पुरुषार्थांत भक्ति हा पांचवा श्रेष्ठ.

" चहूं पुरुषार्थांशिरीं भक्ति " । (ज्ञा. १८.८६७)

पांच पंचायतनें — १ विष्णुपंचायतन, २ शिवपंचायतन, ३ सूर्यपंचायतन ४ देवीपंचायतन आणि ५ गणेशपंचायतन. ज्या देवतेची उपासना करावयाची ती मध्यभागीं स्थापून इतर चार देवता चार बाजूंस स्थापावयाच्या. (धर्मसिंधु)

पांच प्रकारचे अग्नि — १ मंदाग्नि, २ तीक्ष्णाग्नि, ३ विषमाग्नि, ४ समाग्नि व ५ भस्माग्नि. (वैद्यक)

पांच प्रकारचे आनंद — १ आत्मानंद, २ ब्रह्मानंद, ३ सुरतानंद, ४ विद्यानंद आणि ५ शौचानंद.

पांच प्रकारचीं कर्मे — १ नित्य, २ नैमित्तिक, ३ काम्य, ४ प्रायश्चित्त व ५ निषिद्ध. (विचारचंद्रोदय दर्शन)

पांच प्रकार कल्पतरूचे — १ मंदार, २ पारिजात, ३ संतान, ४ कल्पवृक्ष व ५ हरिचंदन. असे पांच कल्पतरु (इच्छिलेली वस्तु प्राप्त करून देणारे वृक्ष) होत.

पांच प्रकारचे गुप्तहेर — १ कापटिक–कपटी शिष्य अथवा विद्यार्थी, २ उदास्थित–भ्रष्ट संन्यासी, ३ गृहपतिक–कफल्लक शेतकरी, ४ वैदेहिक–व्यापारांत दिवाळें निघालेला आणि ५ तापस–व्यवसाय करूं इच्छिणारा जटाधारी. (कौटिल्य १.१)

पांच प्रकारें द्रव्याचा विनियोग करावा — १ धर्म, २ यश, ३ अर्थ, ४ काम आणि ५ स्वजन. या पांच गोष्टींप्रीत्यर्थ द्रव्याचा विनियोग करणाऱ्या पुरुषास इहपर आनंद मिळतो. (भागवत ८।१९।३७)

पांच प्रकार पूजेचे — १ अभिगमन (सफाई, निर्माल्यविसर्जन वगैरे), २ उपादान (पूजासामग्री-संग्रह), ३ योग (इष्ट देवतेचें ध्यान), ४ स्वाध्याय आणि ५ प्रत्यक्ष पूजा. (कल्याण साधनांक)

पांच प्रकारचें भस्म — १ विभूति, २ भसित, ३ भस्म, ४ क्षार व ५ रक्षा.

पांच प्रकार मनाचे — १ नास्तिक, २ रोगी–पापी, ३ अचेत–पोटभरू, ४ उलटें मन–व्याजावर निर्वाह करणारांचें आणि ५ शुद्ध मन–साधुसंतांचें.

पांच प्रकारचीं माणसें — १ दगड–बेदर्दी, २ झाड–कुटुंबप्रिय, ३ पशु–जातिप्रिय, ४ मनुष्य–देशप्रिय व ५ संत–विश्वकल्याण. अशीं पांच प्रकारचीं माणसें जगांत असतात. (गुरुदेव मासिक)

पांच प्रकारचे यज्ञ — (अ) १ द्रव्ययज्ञ, २ तपोयज्ञ, ३ योगयज्ञ, ४ वाग्यज्ञ आणि ५ ज्ञानयज्ञ (भ. गी. ४।२८); (आ) १ अग्निहोत्र, २ दर्शपूर्णमास, ३ चातुर्मास्य, ४ पशुयाग व ५ सोमयाग.

पांच प्रकारचीं युद्धें — १ तंत्रयुद्ध, २ दंडयुद्ध, ३ पाषाणयुद्ध, ४ पाशयुद्ध आणि ५ क्षेपण युद्ध (फेकून मारण्याचें). (वसिष्ठ धनुर्वेद)

पांच प्रकारचे योग — (अ) १ मंत्रयोग, २ स्पर्शयोग, ३ भावयोग, ४ अभावयोग व ५ महायोग (लिंग. अ. ५५); (आ) १ क्रियायोग, २ भक्तियोग, ३ हटयोग, ४ ज्ञानयोग व ५ राजयोग.

पांच प्रकारचें रासनृत्य — १ महारास, २ वसंतरास, ३ कुंजरास, ४ उत्कलरास व ५ राखालरास.

पांच प्रकारांनीं रोगनिदान होतें — १ निदान, २ पूर्वरूप, ३ रूप, ४ उपशय आणि ५ संप्राप्ति. (माधवनिदान १–४)

पांच प्रकारचें वर्ष — १ चांद्र, २ सौर, ३ सावन, ४ नाक्षत्र व ५ बार्हस्पत्य. असें पांच प्रकारचें वर्ष कालगणनेंत मानलें आहे. (धर्मसिंधु)

पांच प्रकारचें वैर — १ सापत्नभाव, २ घर वगैरेंच्या योगें, ३ स्त्री-योगें, ४ शिवीगाळ व ५ अपराध केल्यानें. असें पांच प्रकारें वैर उत्पन्न होतें. तें इष्ट त्या मार्गानें शमवावें.

सापत्न्यं वास्तुजं स्त्रीजं वाग्जातमपराधजम् ।
वैरं पञ्चविधं प्रोक्तं साधनैः प्रशमं नयेत् ॥ (अग्नि. २४०.१९)

पांच प्रकारचें वैराग्य — १ त्रासवैराग्य, २ स्मशानवैराग्य, ३ प्रसूतिवैराग्य, ४ मैथुनवैराग्य आणि ५ शुद्ध वैराग्य. (सि. बो. ४०)

पांच प्रकारचे वैद्य अपूज्य — १ निंद्य वस्त्र अंगावर घेणारा, २ कठोर, ३ स्तब्ध असणारा, ४ गांवकामगार आणि ५ रोग्याकडे आपण होऊनच आलेला. अशा पांच वैद्यांकडून ते धन्वंतरीसारखे असले तरी औषध घेऊं नये.

कुचैलः कर्कशः स्तब्धो ग्रामणी स्वयमागतः ।
पञ्च वैद्या न पूज्यन्ते धन्वंतरिसमा अपि ॥ (रा. नि.)

पांच प्रकारची शुद्धि — १ सत्य, २ मनःशौच, ३ इंद्रियनिग्रह, ४ सर्वभूतदया आणि ५ पाण्यानें शुद्धि.

सत्यशौचं मनःशौचं शौचमिंद्रियनिग्रहः ।
सर्वभूते दयाशौचं जलशौचं च पंचमम् ॥ (ग. पु.).

पांच प्रकारच्या सख्या — १ सखी, २ नित्यसखी, ३ प्राणसखी, ४ प्रियसखी आणि ५ परमेष्ठ सखी. (कल्याण नारी अंक)

पांच प्रकारचे साक्षीदार — १ लेख, २ प्रत्यक्ष पाहिलेलें आठवणीनें सांगणारा, ३ सहजगत्या येऊन सांगणारा, ४ गुप्तपणें सांगणारा व ५ उलट बाजूचा पण अनुकूल सांगणारा.

लिखितः स्मारितश्चैव यदृच्छाभिज्ञ एव च ।
गूढश्चोत्तरसाक्षी च साक्षी पंचविधः स्मृतः ॥ (ना. स्मृ.)

पांच प्रकारची सृष्टि — १ खनिज सृष्टि, २ वनस्पति सृष्टि, ३ प्राणिसृष्टि, ४ मनुष्य सृष्टि, ५ देव सृष्टि. अशी क्रमानें सृष्टीची उत्पत्ति झाली.

पांच प्रकारच्या सिद्धि — १ जन्म, २ औषधी, ३ मंत्र, ४ तप व ५ समाधि. (पां. योग.)

पांच प्रमुख आसनें (योगाचीं) — १ पद्मासन, २ स्वस्तिकासन, ३ भद्रासन, ४ वज्रासन आणि ५ वीरासन. योगशास्त्रांतील चौऱ्यायशी आसनांतील हीं पांच आसनें मुख्य आहेत. (कल्याण योगांक)

पांच प्रमुख तत्त्वें (बौद्ध धर्माचीं) — १ प्रज्ञा, २ शील, ३ दया, ४ करुणा आणि ५ मैत्री.

पांच प्रमुख तत्त्वें (समर्थसंप्रदायाचीं) — १ शुद्ध उपासना, २ विमलज्ञान, ३ वीतराग (वैराग्य), ४ ब्राह्मण्यरक्षण आणि ५ शुद्ध कर्माचरण.

पांच प्रसंगीं खोटें बोलणें पाप नाहीं — १ थट्टेंत, २ पत्नीजवळ, ३ विवाहकालीं, ४ प्राणसंकटाचे वेळीं आणि ५ सर्वस्व लुबाडलें जात असतांना. (वसिष्ठस्मृति अ. १६)

पांच प्रपंचांतील प्रमुख सुखें — १ निरोगी काया, २ द्रव्याची अनुकूलता, ३ पतिव्रता व मधुरभाषिणी स्त्री, ४ आज्ञांकित पुत्र व ५ धन देणारी विद्या.

पांच प्रतीकें (भारतीय संस्कृतीचीं) — १ दीप – ज्ञानाचें प्रतीक, २ कमळ – जन्मस्थान नव्हे पण कर्तृत्वाचें प्रतीक, ३ वटवृक्ष – औदार्याचें प्रतीक, ४ स्वस्तिक – कल्याण व ५ ॐ – ध्वनींचें उगमस्थान. हीं भारतीय संस्कृतीचीं पांच मुख्य प्रतीकें होत.

पांच बलें — १ आत्मबल, २ तपोबल, ३ बाहुबल, ४ पैशाचें बल व ५ परमेश्वरावर श्रद्धा.

पांच भक्तीचीं लक्षणें — १ निरपेक्षता, २ मनन, ३ शांति, ४ समता व ५ निर्वैरता.

निरपेक्षता आणि माझें मनन। शांति आणि समदर्शन ॥
पांचवें तें निर्वैर जाण। पांच लक्षणें हें मुख्यत्वें ॥ (ए.भा.अ.१४)

पांच भाग (वेदांचे) — १ मंत्रसंहिता, २ ब्राह्मण, ३ आरण्यक, ४ सूत्र व ५ अनुक्रमणि. या पांच भागांना मिळून श्रुति अशी संज्ञा आहे. (कल्याण–बालकांक)

पांच मराठेशाहींतील प्रसिद्ध शाहीर — १ परशराम, २ होनाजी बाळा, ३ अनंत फंदी, ४ रामजोशी व ५ प्रभाकर.

पांच मराठी संतकवि — १ श्रीज्ञानेश्वर, २ नामदेव, ३ एकनाथ, ४ तुकाराम आणि ५ रामदास.

पांच महान् तत्त्वें (इस्लाम धर्माचीं) — १ कलमा (धर्मश्रद्धा), २ नमाज (प्रार्थना), ३ उपवास, ४ दानधर्म व ५ मक्केची यात्रा. (इस्लाम आणि संस्कृति)

पांच मानव जातीचे शत्रु — १ दारिद्र्य, २ अस्वच्छता, ३ रोगराई, ४ अज्ञान आणि ५ आळस.

पांच मानसिक तपें — १ मनाची प्रसन्नता, २ सौम्यता, ३ ईश्वराचें ध्यान, ४ मनोनिग्रह व ५ अन्तःकरणाची शुद्धि.

मनःप्रसादसौम्यत्वं मौनमात्मनिग्रहः।
भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥ (कल्याण नारी अंक)

पांच मानसिक दोष — १ विषाद मानणें, २ निर्दय विचार करणें, ३ व्यर्थ चिंतन करणें, ४ मन स्वाधीन न ठेवतां भटकूं देणें आणि ५ अपवित्र विचार बाळगणें. (कल्याण साधनांक)

पांच मुखें परमेश्वराचीं — १ सद्योजात – पृथ्वी, २ वामदेव – जल, ३ अघोर – अग्नि, ४ तत्पुरुष – वायु आणि ५ ईशान – आकाश. हीं परमेश्वराचीं पांच मुखें पंचतत्त्वात्मक आहेत. (पाशुपततंत्र)

पांच मूर्खलक्षणें — १ रस्त्यानें खात जाणें, २ हसत हसत बोलणें, ३ गेल्या गोष्टीचा शोक करणें, ४ आत्मप्रशंसा करणें व ५ दोघे बोलत असतील तेथें जाणें.

पांच यम (संयमन करावयाच्या गोष्टी) — १ अहिंसा, २ स्तेय, ३ अस्तेय, ४ ब्रह्मचर्य आणि ५ अपरिग्रह. (यो. सू. २-३०)

पांच रत्नें (महाभारतान्तर्गत) — १ भगवद्गीता, २ विष्णुसहस्रनाम, ३ भीष्मस्तवराज, ४ अनुस्मृति आणि ५ गजेंद्रमोक्ष.

गीतासहस्रनामैव स्तवराजो ह्यनुस्मृतिः ।
गजेंद्रमोक्षणं चैव पंचरत्नानि भारते ॥ (सु.)

पांच लक्षणें सद्गुरूचीं — १ श्रोत्रिय (शास्त्रज्ञ), २ ब्रह्मनिष्ठा (अनुभवी), ३ शिष्यप्रबोधिनी (समर्थ), ४ कृपालुत्व आणि ५ पूर्ण शांति (पु. दी.)

पांच लेखनगुण — १ अर्थानुक्रम, २ वाक्यसंगति, ३ परिपूर्णता, ४ माधुर्य आणि ५ गौरव आणि निःसंदेहपणा. (कौ. आधि. २ अ. १)

पांच लेखनदोष — १ कळाहीनपणा, २ विरोध, ३ पुनरुक्ति, ४ चुकीचा शब्दप्रयोग आणि ५ अक्षरांचा घोटाळा (कौ. अ. २ अ. ३१)

पांच लोक — १ सत्यलोक, २ वैकुंठलोक, ३ कैलास, ४ आश्रय आणि ५ निराश्रय. (क. गी. २.२६)

पांच वस्तु अति पवित्र होत — १ उच्छिष्ट–वासराचें उष्टें दूध, २ शिवनिर्माल्य–शंकराच्या मस्तकापासून निघालेली गंगा, ३ वमन–मधमाश्यांपासून उत्पन्न झालेला मध, ४ शवकर्पट–प्रेतचीवर म्हणजे किडे नष्ट होऊन उत्पन्न झालेलें रेशीम व ५ काकविष्ठेपासून झालेला पिंपळ.

उच्छिष्टं शिवनिर्माल्यं वमनं शवकर्पटः ।
काकविष्ठासमुत्पन्नाः पञ्चैतेऽतिपवित्रकाः ॥ (सु.)

पांच वस्तु निद्रेसमयीं जवळ असाव्या — १ पादत्राण, २ काठी, ३ पाण्याचें तांब्याचें भांडें, ४ दिवा व ५ आगपेटी.

पांच वाणीचीं तपें — १ उद्वेग न करणारे, २ प्रिय, ३ हितकर, ४ यथार्थ भाषण आणि ५ स्वाध्याय.

पांच वाचिक दोष — १ असत्य भाषण, २ निंदा करणें, ३ मर्मीं लागेल असें बोलणें, ४ आत्मश्लाघा व ५ परदोषकथन.

पांच विद्यासंपादनाचे मार्ग — १ आस्था, २ जिज्ञासा, ३ शिस्त, ४ एकाग्रता आणि ५ तज्ज्ञसहवास.

पांच वैदिक संप्रदायाचे प्रमुख आचार्य — १ श्रीशंकराचार्य, २ श्रीरामानुजाचार्य, ३ श्रीवल्लभाचार्य, ४ श्रीनिंबार्काचार्य व ५ श्रीमध्वाचार्य. वैदिक धर्माला आलेलें मालिन्य नाहींसें करून धर्माची घडी नीट बसवून देणारे हे प्रमुख पांच आचार्य होत.

पांच वैश्याचे स्वाभाविक गुणधर्म — १ श्रद्धा, २ दान, ३ विचाराप्रमाणें आचार, ४ वेदब्राह्मणांची सेवा आणि ५ धनसंग्रहासंबंधानें असमाधान. (भा. स्कंध ११.३७.१८)

पांच शारीरिक तपें — १ देव, गुरुजन आदि ज्ञानी पुरुषांचें पूजन, २ पवित्रता, ३ सरलता, ४ ब्रह्मचर्य आणि ५ अहिंसा.

पांच साधनें सिद्धीचीं — १ जन्म, २ औषध, ३ मंत्र, ४ तप व ५ समाधि. (योगदर्शन)

पांच श्रेष्ठ वेदान्ती — १ याज्ञवलक्य, २ आरुणी, ३ शांडिल्य, ४ दध्यच आणि ५ सनत्कुमार.

पांच हेतु ज्योतिर्गणिताचा विचार करतांना जाणावेत — १ चक्षु, २ शास्त्र, ३ जल, ४ लिखाण व ५ प्रत्यक्ष गणित.

चक्षुः शास्त्रं जलं लेख्यं गणितं बुद्धिसत्तमाः ।
पञ्चैते हेतवो ज्ञेया ज्योतिर्गणितविचिन्तने ॥ (वायु.पू.५४-१२३)

पांच हेतु (विवाहाचे) — १ संयम, २ कुलरक्षण, ३ सुप्रजोत्पादन, ४ प्रेम आणि ऐक्य व ५ भगवद्भाव.

पांच क्षुद्र सिद्धि — १ त्रिकालज्ञान, २ अद्वंद्वता–शीत, उष्ण, सुखदुःख या द्वंद्वाच्या आधीन न होणें, २ परचित्त ज्ञान, ४ भूत प्रतिकार (अग्नि, वायु, विष वगैरेंची बाधा न होणें) आणि ५ अपराजय.

पांचजणांना कन्या देऊं नये — १ मूढ, २ विरक्त, ३ स्वतःला फार मोठे समजणारा, ४ रोगी आणि ५ उद्धट.

मूढाय च विरक्ताय आत्मसंभाविताय च ।
आतुराय प्रमत्ताय कन्यादानं न कारयेत् ॥ (स्कंद. माहेश्वर खंड)

पांचजण अवश्यमेव पोष्य — १ अतिथि, २ बालक, ३ पत्नी, ४ जननी आणि ५ जनक.

अतिथिर्बालकः पत्नी जननी जनकस्तथा ।
पञ्चैते गृहिणः पोष्या इतरे च स्वशक्तितः ॥ (सु.)

पांचजण यथानुशक्ति पोष्य — १ मोठीं मुलें, २ बाप, ३ नातू, ४ भाऊ आणि ५ भाचा.

बालाः पिता च दौहित्रो भ्राता च भगिनीसुतः ।
एतेवश्यं पालनीयाः प्रयत्नेन स्वशक्तितः ॥ (सु.)

पांचजण कार्य उरकलें म्हणजे तृणवत् होतात — १ उपाध्याय, २ वैद्य, ३ ऋतुकालीन स्त्री, ४ सुईण आणि ५ दूती. हे पांचजण तें तें कार्य उरकलें म्हणजे तृणवत् होतात.

पांचजण कर्मचांडाल होत — १ नास्तिक, २ पिशुन, ३ कृतघ्न, ४ दीर्घद्वेषी आणि ५ अधर्मजन्य संतति.

नास्तिकः पिशुनश्चैव कृतघ्नो दीर्घदोषकः ।
चत्वारः कर्मचांडाला जन्मतश्चापि पंचमः ॥ (व. स्मृति)

पांचजणांना तीर्थाचें फल मिळत नाहीं — १ श्रद्धाहीन, २ स्वभावच पापमय आहे असा पापात्मा, ३ नास्तिक, ४ संदेहशील व ५ हेतुवादी.

अश्रद्दधानः पापात्मा नास्तिको छिन्नसंशयः ।
हेतुनिष्ठश्च पञ्चैते न तीर्थफलभागिनः ॥ (कृष्णा. म. अ. २९)

पांचजण दुसऱ्यावर जगतात — १ वैद्य–रोग्यावर, २ दुकानदार –गिऱ्हाइकावर, ३ शहाणा–अजागळावर, ४ चोर–गाफिलावर आणि ५ भिक्षुक–गृहस्थावर (पंचतंत्र).

पांचजणांना निद्रा येत नाहीं — १ बलवानानें दांत धरलेला, २ दुर्बल आणि साधनहीन, ३ सर्वस्व गमावून बसलेला, ४ विषयलंपट व ५ चोर. (म. भा. उद्योग ३३-१३)

पांचजण पचनशक्ति श्रेष्ठ असलेले — १ अगस्ति, २ कुंभकर्ण, ३ शनि, ४ वडवानल आणि ५ वृकोदर.

अगस्तिं कुंभकर्णं च शनिं च वडवानलम् ।
आहारपरिपाकार्थं स्मरामि च वृकोदरम् ॥ (यो. र. भाग १)

पांचजण पित्यासमान — १ जन्मदाता, २ उपनयनकर्ता, ३ विद्या देणारा, ४ अन्नदाता आणि ५ भयत्राता.

जनिता चोपनीता च यस्तु विद्या प्रयच्छति ।
अन्नदाता भयत्राता पञ्चैते पितरः स्मृताः ॥ (वृ. चा. ४·९)

पांचजणांना विद्या प्राप्त होत नाहीं. — १ रागीट, २ दुराग्रही, ३ आळशी, ४ रोगी आणि ५ चंचल चित्त असलेला.

पञ्च विद्या न गृह्णन्ति चंडास्तब्धा च ये नराः ।
अलसश्च सरोगश्च येषां च विस्मृतं मनः ॥ (नारदीय-पूर्वखंड)

पांचजणांवर विश्वासूं नये — १ जामात, २ कृष्णसर्प, ३ अग्नि, ४ दुर्जन व ५ भाचा.

जामातो कृष्णसर्पश्च पावको दुर्जनस्तथा ।
विश्वासो नैव कर्तव्यः पञ्चमो भागिनीसुतः ॥ (सु.)

पांचजण विद्वान् असले तरी अपूज्य — १ चंचल, २ कठोर, ३ दुराग्रही, ४ निंद्य वस्त्र धारण करणारा आणि ५ आगंतुक.

अधीरः कर्कशः स्तब्धः कुचलः स्वयमागतः ।
पंचविप्रा न पूज्यन्ते बृहस्पतिसमा अपि ॥ (गरुड. आचारकांड)

पांचजण व्याधींचा परिहार करणारे — १ धन्वंतरी, २ वृकोदास, ३ काशीराज, ४ नकुल आणि ५ सहदेव. हे पांच व्याधींचा परिहार करणारे म्हणून सांगितले आहेत. (नेपाळी पंचांग)

पांचजण संगतीला वर्ज्य — १ गर्विष्ठ, २ मूर्ख, ३ रागीट, ४ अविचारी आणि ५ धर्माला सोडून वागणारा.

पांच संस्कृत महाकवि — (अ) १ कालिदास, २ भवभूति, ३ भारवि, ४ माघ व ५ हर्ष; (आ) १ कालिदास, २ भवभूति, ३ दंडी, ४ बाण आणि ५ सुबंधु.

पांचजण सुखानें निद्रा करणारे — १ अगस्ति – अन्न चांगलें पचल्यामुळें, २ माधव – पुण्याचरणामुळें, ३ मुचकुंद – फार मेहनत

झाल्यामुळें, ४ कपिल – ध्यानधारणेमुळें आणि ५ आस्तिक – दुष्टावर-सुद्धां उपकार करणारा. निद्रासमयीं या पांचांचें स्मरण केल्यानें सुखानें निद्रा येते.

अगस्तिर्माधवश्चैव मुचकुंदो महामुनिः ।
कपिलो मुनिरास्तिकः पञ्चैते सुखशायिनः ॥ (गोभिल)

पांचांच्या स्मरणानें वेदपठणास प्रवृत्त व्हावें — १ गणेश, २ सरस्वती, ३ रवि, ४ शुक्र आणि ५ बृहस्पति.

गणनाथसरस्वतीरविशुक्रबृहस्पतीन् ।
पंचैतानि स्मरेन्नित्यं वेदवाणीप्रवृत्तये ॥ (प्रातःस्मरण)

पांचजण जिवंत असून मृतवत् होत — १ दरिद्री, २ नित्यरोगी, ३ मूर्ख, ४ सदां प्रवास करणारा, ५ आजन्म नोकरीवर निर्वाह करणारा.

जीवन्तोऽपि मृताः पञ्च श्रूयन्ते किल भारते ।
दरिद्रो व्याधितो मूर्खः प्रवासी नित्यसेवकः ॥ (पंचतंत्र)

पांचजणांना नांवानें संबोधूं नये — १ आत्मनाम, २ गुरु, ३ अतिकृपण मनुष्य, ४ ज्येष्ठपुत्र व ५ पत्नी. कल्याणेच्छु पुरुषानें या पांचांना नांवानें संबोधूं नये.

आत्मनाम गुरोर्नाम नामातिकृपणस्य च ।
श्रेयः कामो न गृह्णीयात् ज्येष्ठापत्यकलत्रयोः ॥ (सु.)

पांचजणांची पांच प्रकारची आसक्ति — १ हरिण–शब्द–ध्वनिलुब्ध झाल्यामुळें, २ हत्ती–स्पर्श–हत्तिणीवर आसक्त झाल्यामुळें, ३ पतंग–रूप–दिव्यावर मोहित झाल्यानें, ४ भ्रमर–रस–मधुररसावर आसक्त झाल्यामुळें आणि ५ मत्स्य–गंध–अमिषाला भुलून जाळ्यांत अडकणें. असे हे पांचजण पांच विषयांच्या आसक्तीनें नष्ट होतात.

" कुरंग–मातंग–पतंग–भृंग–मीनाहता–पंचाभिरेव पंच."

अंतःकरणपंचक — १ अंतःकरण, २ मन, ३ बुद्धि, ४ चित्त, व ५ अहंकार.

गाथापंचक — १ श्रीज्ञानदेव गाथा, २ श्रीनामदेव गाथा, ३ श्रीएकनाथ गाथा, ४ श्रीतुकाराम गाथा व ५ श्रीसंत गाथा.

गीतपंचक — १ वेणुगीत, २ गोपीगीत, ३ युगलगीत, ४ भ्रमरगीत व ५ महिषीगीत. या भागवतांतील भक्तिरसानें भरलेल्या पांच गीतांस गीतपंचक अशी संज्ञा आहे.

दुष्टपंचक — १ वाणी दुष्ट असणें, २ क्रिया क्रूर असणें, ३ स्वाभाविक दुष्टता, ४ संसर्गदुष्टता आणि ५ शिळेंपाकें. यांना दुष्टपंचक म्हणतात. हीं वर्ज्य करावींत.

भावदुष्टं क्रियादुष्टं जातिदुष्टमिति त्रिधा ।
संसर्गं कालदुष्टं च वर्जयेत् दुष्टपंचकम् ॥ (द्वैतसिद्धान्तकेसरी)

देवतापंचक — १ अग्नि, २ वायु, ३ सूर्य, ४ चंद्र व ५ नक्षत्रें. (तैत्तिरीय उपनिषद्)

नारीपंचक — १ गायत्री, २ भूति, ३ श्री, ४ धी आणि ५ जयन्ती. राष्ट्राराष्ट्रांतील युद्धामुळें स्त्रीपुरुषांना अपत्यांचा कंटाळा आल्यामुळें प्रजा झपाट्यानें नाहींशी होत चालली, अखेर पांच स्त्रिया राहिल्या त्या. (आपटेकृत अजरामर)

पुरुषपंचक — १ गौतम, २ कौशिक, ३ अगस्ति, ४ धाता आणि ५ शुक्र. राष्ट्राराष्ट्रांतील युद्धांमुळें स्त्रीपुरुषांना अपत्यांचा कंटाळा आला. अखेर पांच पुरुष राहिले ते. (आपटेकृत अजरामर)

पुष्पपंचक — १ चाफा, २ आंबा, ३ शमी, ४ कमळ व ५ कण्हेर.
'चम्पकाम्रशमी पद्मकरवीरं च पञ्चकम् । ' (भविष्य मध्यम पर्व)

प्राणपंचक — १ प्राण, २ अपान, ३ व्यान, ४ उदान व ५ समान.

भारतपंचक — १ सुमन्तु, २ जैमिनी, ३ पैल, ४ शुक आणि ५ वैशंपायन. भारताचें संवर्धन करणारे पांच व्यासशिष्य.

मघापंचक — १ मघा, २ पूर्वा, ३ उत्तरा, ४ हस्त व ५ चित्रा.

मृगपंचक — १ मृग, २ आर्द्रा, ३ पुनर्वसु, ४ पुष्य व ५ आश्लेषा.

विषयपंचक — १ शब्द, २ स्पर्श, ३ रूप, ४ रस आणि ५ गंध.

प्रवाळपंचामृत — १ प्रवाळ, २ मोतीं, ३ शंख, ४ कवडी व ५ मोत्यांचा शिंपला. या पांचांना मिळून प्रवाळपंचामृत असें म्हणतात.

रासपंचाध्यायी — श्रीमत् भागवत दशमस्कंध अध्याय २९ ते ३३ या पांच अध्यायांत भागवतांतील सर्व भक्तिसर्वस्व व काव्यकौशल्य भरलेलें आहे. यास रासपंचाध्यायी असें म्हणतात.

एकनाथपंचायतन — १ एकाजनार्दन, २ रामाजनार्दन, ३ जनीजनार्दन, ४ विठारेणुकानंदन आणि ५ दासोपंत.

कृष्णपंचायतन — १ बलराम, २ श्रीकृष्ण, ३ गरुड, ४ अर्जुन आणि ५ उद्धव.

गणेशपंचायतन — १ विष्णु, २ शिव, ३ गणेश, ४ सूर्य आणि ५ देवी.

" मध्ये गणपतिर्विष्णु शिवसूर्यांबिका ईशानादिक्रमेण. " (धर्मसिंधु)

देवी पंचायतन — १ विष्णु, २ शिव, ३ देवी, ४ गणेश आणि ५ सूर्य.

रामपंचायतन — (अ) १ श्रीराम, २ लक्ष्मण, ३ भरत, ४ शत्रुघ्न व ५ मारुती हे पांच मिळून रामपंचायतन होतें; (आ) १ श्रीराम, २ जानकी, ३ लक्ष्मण, ४ मारुती आणि ५ वंदनकर्ता भक्त. (रामरक्षा)

वारकरी पंचायतन — १ नामदेव, २ ज्ञानदेव, ३ तुकाराम, ४ एकनाथ व ५ निळोबा.

विष्णुपंचायतन — १ शिव, २ गणेश, ३ विष्णु, ४ सूर्य व ५ देवी.

शिवपंचायतन — १ विष्णु, २ सूर्य, ३ शिव, ४ गणेश व ५ देवी.

समर्थपंचायतन — १ श्रीसमर्थ, २ जयरामस्वामी वडगांवकर, ३ रंगनाथस्वामी निगडीकर, ४ केशवस्वामी भागानगरकर आणि ५ आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर.

सूर्यपंचायतन — १ शिव, २ गणेश, ३ सूर्य, ४ विष्णु व ५ देवी.

श्रीज्ञानेश्वर पंचायतन — १ निवृत्ति, २ ज्ञानदेव, ३ सोपान, ४ मुक्ताबाई आणि ५ चांगदेव तथा चांगावटेश्वर.

श्रीशिवपंचस्थली (शिवाजीमहाराजांची) — १ जन्मभूमि–शिवनेरी, २ कार्यारंभ–तोरणा, ३ बलिदान–घोडखिंड, ४ प्राणार्पण–सिंहगड आणि ५ समाधि–रायगड.

श्रीसमर्थपंचस्थली — १ जन्मभूमि–जांब, २ तपोभूमि–टाकळी, ३ कार्यभूमि–कृष्णातीर, ४ इष्ट स्थापना स्थळ–चाफळ आणि ५ समाधि –सज्जनगड.

श्रीकृष्णचरित्रांतील लीलायुगुलपंचक — १ दोन पिता–वसुदेव, नंद; २ दोन माता–देवकी, यशोदा; ३ दोन भगिनी–सुभद्रा, द्रौपदी; ४ दोन गुरु–श्रीदुर्वास, सांदीपनि आणि ५ दोन शिष्य–अर्जुन, उद्धव; याखेरीज श्रीकृष्णांनीं निर्माण केलेले ग्रंथहि दोनच आहेत. गीता आणि भागवत.

६

षट्कर्में (उपजीविकेचीं) — १ असि, २ मसि, ३ कृषि, ४ वाणिज्य, ५ शिष्य आणि ६ पशुपालन. (जैनधर्मादर्श)

षट्कर्में (गृहिणीचीं) — १ देवपूजन, २ अतिथिपूजन (आल्यागेल्याचा समाचार), ३ तुलसीपूजन, ४ गोग्रास देणें, ५ अर्घ्यदान देणें आणि ६ दीपदान.

देव–अतिथी–तुलसी पूजा गौओंके हितग्रासप्रधान
अर्घ्यदान और दीपदान ये गृहिणीके षट्कर्म प्रधान ।

षट्कर्म (नित्याचीं) — १ स्नान, २ संध्योपासना तथा जप, ३ दान, ४ देवपूजा, ५ अतिथिसत्कार आणि ६ वैश्वदेव.

संध्यास्नानं जपो होमः देवतानां च पूजनम् ।
आतिथ्यं वैश्वदेवं च षट्कर्माणि दिनेदिने ॥ (प. स्मृति १–३९)

षट्कर्में (ब्राह्मणाचीं) — १ अध्ययन, २ अध्यापन, ३ यजन, ४ याजन, ५ दान आणि ६ परिग्रह. (मनु. १०-७५)

षट्कर्में (वैश्याचीं) — १ पशूंचें रक्षण, २ दान, ३ यज्ञ, ४ अध्ययन, ५ व्यापार आणि ६ व्याजबट्टा व शेती. (मनु १-९०)

षट्कर्में (जैन धर्म) — १ देवपूजा, २ गुरुउपासना, ३ स्वाध्याय, ४ संयम, ५ तप आणि ६ दान.

षट्कर्मे (संन्यास मार्गाचीं) — १ भिक्षाटन, २ जप, ३ शौच, ४ स्नान, ५ ध्यान आणि ६ देवतार्चन.

षट्कर्मे (हठयोग) — १ धौति, २ बस्ति, ३ नेति, ४ नौलि, ५ कपालभाति आणि ६ त्राटक. (ह. प्र.)

षट्कोष — १ त्वचा, २ रुधिर, ३ मांस, ४ मज्जा, ५ अस्थि, ६ मेद.

षट्गया — १ गयागज, २ गयादित्य, ३ गायत्री, ४ गदाधर, ५ गया व ६ गयाशिर. हीं सहा तीर्थस्थानें मुक्तिदायक. (बृहन्नारदीय उत्तरखंड ४७-४०)

षट्चक्रें (शरिरांतील) —

१ मूलाधारचक्र अथवा पृथ्वीचक्र — गुदस्थान.
२ स्वाधिष्ठानचक्र अथवा आपचक्र — लिंगस्थान.
३ मणिपूरकचक्र अथवा अग्निचक्र — नाभिस्थान.
४ अनाहतचक्र अथवा वायुचक्र — हृदयस्थान.
५ विशुद्धिचक्र अथवा आकाशचक्र — कंठस्थान.
६ आज्ञाचक्र अथवा मनश्चक्र — भ्रूस्थान.

मानवदेहास आधारभूत अशीं हीं सहा चक्रें सुषुम्नानामक नाडीवर असतात. (शिवसंहिता)

षट्प्रज्ञ — १ धर्म, २ अर्थ, ३ काम, ४ मोक्ष, ५ व्यवहार व ६ तत्त्वज्ञान हीं सहा जाणणारा.

षट्शक्ति — १ पराशक्ति, २ ज्ञानशक्ति, ३ इच्छाशक्ति, ४ क्रियाशक्ति, ५ कुंडलिनीशक्ति आणि ६ मातृकाशक्ति. या सहा शक्ति मानव शरिरांत आहेत. (कल्याण शक्ति अंक)

षट्शास्त्रें — (अ) १ छंद, २ निरुक्त, ३ व्याकरण, ४ ज्योतिष, ५ शिक्षा आणि ६ कल्पसूत्र; (आ) १ धर्मशास्त्र, २ सांख्यशास्त्र, ३ वेदान्तशास्त्र, ४ न्यायशास्त्र, ५ कामशास्त्र आणि ६ योगशास्त्र (दर्शनप्रकाश); (इ) १ कापालिक, २ लौकायतिक, ३ दिगंबर, ४ शून्यवादी, ५ निरीश्वरवादी आणि ६ चार्वाक. (वाचस्पतिमिश्र)

षट्संपत्ति — १ शम–मनोनिग्रह, २ दम–इंद्रियनिग्रह, ३ तितिक्षा–शीतोष्णादिक द्वंद्वें सहन करणें, ४ उपरति–स्वधर्मानुष्ठान, ५ श्रद्धा आणि ६ समाधान. अध्यात्मविषयांतील संपत्ति होत. (कल्याण योगांक)

षट्स्थल — १ भक्त, २ महेश, ३ प्रसादि, ४ प्राणलिंगी, ५ शरण व ६ ऐक्य. सहा षट्स्थल किंवा मोक्षाच्या सहा पायऱ्या. (वीरशैव प्र.)

षडंगें (दानाचीं) — १ दाता, २ प्रतिग्रहीता (घेणारा), ३ पवित्रता, ४ वस्तु, ५ देश (स्थान) आणि ६ काल.

दाता प्रतिग्रहीता च शुद्धिर्देयं च धर्मयुक् ।
देशकालौ च दानामङ्गान्येतानि षड् विदुः ॥ (स्कंदमाहेश्वर ३-५०)

षडंगें (योगाचीं) — १ आसन, २ प्राणायाम, ३ प्रत्याहार, ४ धारणा, ५ ध्यान व ६ समाधि.

आसनं प्राणसंरोधः प्रत्याहारश्च धारणा ।
ध्यानं समाधिरेतानि योगाङ्गानि षट् ॥ (स्कंद काशी ४१–५९)

षडंगें (वेदाचीं) — १ व्याकरण – शब्दशास्त्र, २ छंद – वृत्त, ३ ज्योतिष, ४ निरुक्त–कोश, ५ कल्पसूत्र–मंत्रशास्त्र आणि ६ शिक्षा–उच्चारशास्त्र.

शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छंदसामिति ।
ज्योतिषामयनं चैव षडंगो वेद उच्यते ॥ (सु.)

षडंगें (सैन्याचीं) — १ रथ, २ हत्ती, ३ घोडे, ४ पायदळ, ५ गाडे आणि ६ उंट. अशीं महाभारतकाळीं सेनेचीं सहा अंगें होतीं.

षड्ऊर्मि — १ शोक, २ मोह, ३ जरा, ४ मृत्यु, ५ क्षुधा व ६ पिपासा. या सहा ऊर्मि म्हणजे संसाररूपी समुद्राच्या लहरी होत.

षडूषण — १ पिंपळी, २ पिंपळमूळ, ३ चवक, ४ चित्रक, ५ सुंठ व ६ मिरी. (नूतनामृतसागर)

षड्ऋतु — १ वसंत–चैत्र, वैशाख; २ ग्रीष्म–ज्येष्ठ, आषाढ; ३ वर्षा–श्रावण, भाद्रपद; ४ शरद्–आश्विन, कार्तिक; ५ हेमंत–मार्गशीर्ष, पौष व ६ शिशिर–माघ, फाल्गुन.

" षड्वा ऋतवः संवत्सरस्य । " (शतपथ)

षड्गुण—(अ) १ ऐश्वर्य, २ धर्म, ३ यश, ४ श्री, ५ ज्ञान व ६ वैराग्य. हे सहा ईश्वरी गुण मानले आहेत.

ऐश्वर्यस्य समग्रस्य वीर्यस्य यशसः श्रियः।
ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीरणा ॥ (बृहन्नारदीय पूर्वखंड)

(आ) १ कर्तृत्व, २ नियंतृत्व, ३ भोक्तृत्व, ४ विभुत्व, ५ साक्षित्व आणि ६ सर्वज्ञत्व (वज्रकोश); (इ) १ सर्वज्ञता, २ तृप्ति, ३ अनादिज्ञान, ४ स्वातंत्र्य, ५ शक्तिप्रकाशन आणि ६ अनंतशक्तित्व. असे सहा गुण श्रीकृष्णाचे ठिकाणीं होते. (हरिवंश–विष्णुपर्व अ. ६५)

षड्गुण गायनांतील — १ सुस्वर, २ सुरस, ३ सुराग, ४ मधुराक्षर, ५ सालंकार आणि ६ प्रमाण.

सुस्वरं सुरसं चैव सुरागं मधुराक्षरम् ।
सालंकारं सप्रमाणं षड्विधं गीतलक्षणम् ॥ (रागविलास)

षड्गुण (राजनीतिशास्त्र) — १ संधि–प्रसंगीं एकमेकांस मदत करणें, २ विग्रह–युद्ध, ३ यान–शत्रूवर चाल करून जाणें, ४ आसन–शत्रूची उपेक्षा करणें, ५ द्वैधीभाव–केव्हां संधि केव्हां विग्रह करणें (दुटप्पी धोरण) आणि ६ संश्रय – दुसऱ्याचा आश्रय घेणें–बलिष्ठ सत्तेशीं स्पर्धा न करणें. (मनु. ७.१६०)

षड्दर्शनें — (अ) १ न्याय, २ वैशेषिक, ३ वेदान्त, ४ बौद्धमत, ५ सांख्य आणि ६ पूर्वमीमांसा.

'बौद्धमतसंकेतु वार्तिकांचा' (ज्ञानेश्वरी १-१२)

(आ) १ सौर, २ शाक्त, ३ गाणपत्य, ४ शैव, ५ वैष्णव व ६ स्कंद.

षड्दर्शनें व षड्दर्शनप्रणेते — १ सांख्य–कपिलमुनि, २ योग–पतंजलि, ६ न्याय–गौतम, ४ वैशेषिक–कणाद, ५ पूर्वमीमांसा–जैमिनि आणि ६ वेदान्त–बादरायण (व्यास)

सांख्यस्य कर्ता कपिलो न्यायसूत्रस्य गौतमः ।
पतंजलिस्तु योगस्य कर्ता योगीश्वरो महान् – ॥
वैशेषिकास्य काणादो मीमांसायाश्च जैमिनी ।
वेदान्तशास्त्रस्य कर्ता व्यासो नारायणः स्वयम् ॥ (सु.)

षड्द्रव्यें (जैनधर्म) — १ जीवद्रव्य, २ पुद्गलद्रव्य, २ धर्मद्रव्य, ४ अधर्मद्रव्य, ५ कालद्रव्य आणि ६ आकाशद्रव्य.

षड्योग कपिलाषष्ठी — १ भाद्रपद मास, २ कृष्णपक्ष, ३ मंगळवार, ४ षष्ठी, ५ रोहिणी नक्षत्र व ६ व्यतीपात. असे सहा योग एकत्र आल्यास त्यास कपिलाषष्ठी म्हणतात. हा योग प्रायः साठ वर्षांनीं येतो. (धर्मसिंधु)

षडक्षरी मंत्र — (अ) ॐ नमः शिवाय.

" सर्वमंत्राधिकश्चाय ओंकाराद्यः षडक्षरः " (शिवपुराण)

(आ) राम-कृष्ण-हरि. (इ) ॐ विष्णवे नमः

षड्मुद्रा — १ भूचरी, २ चाचरी, ३ अगोचरी, ४ खेचरी, ५ उन्मनी व ६ अलक्ष्य (ह. प्र.)

षड्रस — १ गोड, २ आंबट, ३ तिखट, ४ कडू, ५ खारट, आणि ६ तुरट.

" मधुराम्लकटुतिक्तक्षारकषायाः षड्रसाः ॥ " (च. सं.)

षड्रिपु — १ काम, २ क्रोध, ३ मोह, ४ लोभ, ५ मद आणि ६ मत्सर.

षड्राग (गायनशास्त्रांतील) — १ श्री, २ वसंत, ३ भैरव, ४ पंचम, ५ मेघ किंवा मेघमल्हार व ६ बृहन्नाट किंवा नटनारायण हे सहा पुरुष राग होत.

श्रीरागोऽथ वसंतश्च भैरवः पंचमस्तथा ।
मेघरागो बृहन्नाटो षडैते पुरुषाः स्मृताः ॥ (संगीतरत्नाकर)

षडंगोदक — १ नागरमोथा, २ पित्तपापडा, ३ वाळा, ४ काळा वाळा, ५ रक्तचंदन आणि ६ सुंठ. या सहा जिनसा घालून उकळलेलें ऊन पाणी.

षडंग न्यास — १ हातांचीं बोटें, २ तळहाताच्या मागचा भाग, ३ हृदय, ४ मस्तक, ५ शिखा आणि ६ नेत्र. गायत्री मंत्रानें शरीरशुद्धीसाठीं या सहा अवयवांस स्पर्श करावयाचा असतो.

षडंगभक्ति — १ समरस भक्ति, २ आनंद भक्ति, ३ अनुभव भक्ति, ४ अवधान भक्ति, ५ निष्ठा भक्ति आणि ६ सद्भाव भक्ति. असे सहा भक्तीचे प्रकार वीरशैव संप्रदायांत मानले आहेत.

षड्लवण — १ मीठ, २ सैंधव, ३ संचळ, ४ बीडलोण, ५ रोमक आणि ६ पांसन. (निघंटु)

षड्विकार — १ अस्ति–गर्भांत संभवणें, २ जायते–जन्मास येणें, ३ वर्धते–वाढणें, ४ विपरिणमते–तारुण्यांत येणें, ५ अपक्षीयते–जरा येणें आणि ६ विनश्यति–मरण. हे सहा विकार देहाला असतात.

षड्विधि (गणितशास्त्र) — १ बेरीज, २ वजाबाकी, ३ गुणाकार, ४ भागाकार, ५ वर्गमूळ आणि ६ घनमूळ. अशा गणिताच्या सहा प्रक्रिया अथवा प्रकार आहेत.

षड्सूत्रें — १ जैमिनीय सूत्र, २ आश्वलायन सूत्र, ३ आपस्तंब-सूत्र, ४ बौधायन सूत्र, ५ कात्यायन सूत्र आणि ६ वैशेषिक सूत्र. हीं सहा गृह्यसूत्रें होत.

षड्विध अन्न — १ भक्ष्य–चर्वण करून खाण्याचे–भाकरी, पोळी वगैरे, २ भोज्य–भात वगैरे, ३ पेय–प्यावयाचें, ४ लेह्य–चाटून खाण्याचें पंचामृत वगैरे, ५ चोष्य-चोखून खाण्याचें व ६ पिच्छिल-चटण्या-कोशिंबिरी.

भक्ष्यं भोज्यं च पेयं च लेह्यं चोष्यं च पिच्छिलम् ।
इतिभेदाः षडन्नस्य मधुराद्याश्च षड्रसाः ॥ (सु.)

षड्विध भाव — १ दास्यरति, २ सख्यरति, ३ वात्सल्यरति, ४ शान्तरति, ५ कान्तरति आणि ६ अद्‌भुतरति. असे भक्तिरसाला पोषक सहा भाव अथवा रस मानले आहेत.

सहा अणुव्रतें — १ हिंसा, २ लबाडी, ३ चोरी, ४ मैथुन, ५ परिग्रह व ६ रात्रीं भोजन न करणें. हीं सहा अणुव्रतें जैनधर्मांत मानलीं आहेत.

सहा अवस्था (वस्तुमात्राच्या) — १ उत्पत्ति, २ अस्तित्व, ३ वृद्धि, ४ बदल – परिणत होणें, ५ क्षय–क्षीण होणें आणि ६ नाश पावणें. या सहा अवस्था प्रत्येक वस्तुमात्राला आहेत.

सहा अवस्था (स्थूल शारिराचे काल) — १ शिशु–एक वर्ष, २ कौमार–दोन ते पांच वर्षें, ३ पौगंड–सहा ते दहा वर्षें, ४ किशोर–अकरा ते पंधरा, ५ यौवन–सोळा ते चाळीस वर्षेंपर्यंतचा काल व ६ जरा–चाळीस वर्षांनंतरचा काल. (मो. प्र.)

सहा अधिष्ठानें (दानाचीं) — १ धर्म, २ अर्थ, ३ काम, ४ व्रीडा (लज्जा), ५ हर्ष व ६ भय. हीं दानाचीं सहा अधिष्ठानें होत.

सहा अनर्थ सदैव टाळावेत — १ अति निद्रा, २ आळस, ३ भय, ४ क्रोध, ५ मृदुता आणि ६ चेंगटपणा.

'निद्राऽलस्यं भयं क्रोधोमार्दवं दीर्घसूत्रता ॥' (म. भा. सभा ५-१२८)

सहा उपाय (पैसा मिळविण्याचे)—१ भीक मागणें, २ सरकारी चाकरी, ३ कला (हुन्नर), ४ शेती, ५ सावकारी आणि ६ व्यापार-उदीम करणें. (पंचतंत्र)

सहा उपरत्नें — १ वैक्रांत, २ सूर्यकांत, ३ चंद्रकांत, ४ राजावर्त, ५ लाल आणि ६ पेरोज.

सहा कर्ण — १ दातृत्वांत–महारथी कर्ण, २ कौरवांत-विकर्ण, ३ क्षेत्रांत–गोकर्ण, ४ राक्षसांत–कुंभकर्ण, ५ घोड्यांत–श्यामकर्ण आणि ६ देहांत–अंतःकरण. हे सहा कर्ण म्हणून वाङ्मयांत प्रसिद्ध आहेत.

सहा कलिकौतुकें — १ संत – दुःखी, २ असंतांचा उदोउदो, ३ मुलें अल्पायुषी, ४ मातापितरें दीर्घायु, ५ परक्यार्शी मैत्री आणि ६ स्वकीयाशीं वैर. हीं सहा कलिकौतुकें प्रत्यक्षांत अनुभवास येतात.

सीदन्ति सन्तो विलसत्यसन्तः पुत्रा म्रियन्ते जनकश्चिरायुः ।
परेषु मैत्री स्वजनेषु वैरं पश्यन्तु लोकाः कलिकौतुकानि ॥ (सु.)

सहा कालविभाग — १ वर्ष, २ अयन, ३ ऋतु, ४ मास, ५ पक्ष आणि ६ दिवस. असे सहा कालविभाग मानले आहेत. (धर्मसिंधु)

सहा कारणांनीं रोगोत्पत्ति होते — १ अति पाणी पिणें, २ अति कठीण पदार्थ घेणें, ३ धातुक्षय, ४ मलमूत्रावरोध, ५ दिवसा झोप आणि ६ रात्रीं जागरण.

अत्यम्बुपानं कठिनाशनश्च धातुक्षयो वेगविधारणं च ।
दिवाशयो जागरणं च रात्रौ षड्भिर्नराणां प्रभवन्ति रोगाः ॥ (सु.)

सहा कुलपरीक्षेचीं लक्षणें — १ सामानसुमान, २ जन्मभूमि, ३ घर, ४ आचार, ५ अन्न आणि ६ आच्छादन. या सहा गोष्टींवरून कुलाची परीक्षा केली जाते.

सहा गायनमहर्षि — १ अग्नि, २ ब्रह्मा, ३ चंद्र, ४ विष्णु, ५ नारद आणि ६ तुंबरु.

वह्निर्वेधाः शशांकश्च लक्ष्मीनाथस्तथैव च ।
नारदस्तुंबरुश्चैव षड्जादीनां ऋषीश्वराः ॥ (गायनाचार्यमाला)

सहा गुण (आत्म्याचे) — १ सर्वज्ञत्व, २ नित्यत्व, ३ नित्य-तृप्तत्व, ४ बोधरूपत्व, ५ स्वतंत्रत्व आणि ६ नित्यस्फूर्ति. (अ. रा. उत्तर सर्ग ५)

सहा गुण ऐश्वर्याप्रत नेणारे —१ उद्योग, २ साहस, ३ धैर्य, ४ बल, ५ बुद्धि आणि ६ पराक्रम.

उद्यमः साहसं धैर्यं बलं बुद्धिः पराक्रमः ।
षडिमे यत्र तिष्ठन्ति ससर्वं प्राप्नुयात् पुमान् ॥ (सु.)

सहा गुण कुत्र्यापासून घ्यावेत — १ पुष्कळ खाणें, २ अल्प-संतुष्टता, ३ झोप सावध, ४ एकदम तुटून पडणें, ५ इमानी आणि ६ शूर. (वृ. चा. ६–२०)

सहा गुण (पाठकाचे) — १ गोडी, २ स्पष्टोच्चार, ३ पदें पाडून म्हणणें, ४ गोड आवाज, ५ धीटपणा आणि ६ तन्मयता.

माधुर्यं अक्षरव्यक्तिः पदच्छेदस्तु सुस्वरः ।
धैर्यं लयसमर्थं च षडेते पाठका गुणाः ॥ (पाणिनिशिक्षा)

सहा गुण मनुष्यानें टाकूं नयेत — १ सत्य, २ परोपकार, ३ अनालस्य, ४ अनसूया, ५ क्षमा आणि ६ धैर्य. (प्रमाणसाहस्री)

सहा गुण (मित्रत्वाचे) — १ कायम टिकणारा, २ अनुकूल, ३ सहज किंवा अल्प प्रयासानें सज्ज होणारा, ४ वाडवडिलांपासून चालत आलेला, ५ वैभवशाली आणि ६ प्रतारणा न करणारा. असे मित्राचे सहा गुण म्हणून सांगितले आहेत.

नित्यं वश्यं लघुत्थानं पितृपितामहं महत् ।
अद्वैध्यं चेति संपन्नं मित्रं षड्गुणमुच्यते ॥ (कौटिल्य अ. १०७)

सहा गुण मिताहारी पुरुषाचा आश्रय करतात — १ आरोग्य, २ आयुष्य, ३ बल, ४ सुख, ५ शुद्ध संतति आणि ६ आधाशी म्हणून निंदिला न जाणें. या सहा गोष्टी मिताहारी पुरुषाला लाभतात. (म. भा. उद्योग ३७-३४).

सहा गुण राज्यशासकांस आवश्यक — १ वक्तृत्व, २ शत्रूचें दमन करण्याची सिद्धता, ३ तर्ककुशलता, ४ स्मरणशक्ति, ५ नीतिशास्त्रज्ञता आणि ६ विद्वत्ता. (म. भा. सभा ५-२२).

सहा गुण लेखकाचे अंगीं असावेत — १ बुद्धिमान्, २ समयस्फूर्त बोलणारा, ३ धीर-गंभीर, ४ जलद लिहिणारा, ५ संयमी आणि ६ दुसऱ्याचें इंगित संपूर्णपणें जाणणारा.

मेधावी वाक्पटु धीरो लघुहस्तो जितेंद्रियः ।
परशास्त्रपरिज्ञाता एष लेखक उच्यते ॥ (सु.)

सहा गुण सत्पुरुषाचे (स्वाभाविक) — १ विपत्कालीं धैर्य, २ भाग्यकालीं सहिष्णुता, ३ सभेंत पांडित्य, ४ रणांत शौर्य, ५ यशाविषयीं आवड आणि ६ ज्ञानसंपादन करण्याचें व्यसन. (भर्तृ. नीति.)

सहा गोष्टी अग्नीविना शरीर जाळणाऱ्या — १ कुग्रामांत वसति, २ दुर्जनाची सेवा, ३ जेवण चांगलें नसणें, ४ क्रोधमुखी भार्या, ५ मूर्ख मुलगा आणि ६ विधवा कन्या.

कुग्रामवासः कुलहीनसेवा कुभोजनं क्रोधमुखी च भार्या ।
पुत्रश्च मूर्खो विधवा च कन्या विनाग्निना षट् प्रदहन्ति कायम् ॥
(वृ. चा. ४–८)

सहा गोष्टी अशाश्वत होत — १ तारुण्य, २ रूप, ३ जीवित, ४ धनसंचय, ५ आरोग्य आणि ६ प्रियजनांचा सहवास. या सहा गोष्टींची शहाण्यानें आसक्ति ठेवूं नये.

अनित्यं यौवनं रूपं जीवितं द्रव्यसंचयः ।
आरोग्यं प्रियसंवासो मुह्येत् तत्र न पण्डितः ॥ (सु.)

सहा गोष्टी अभ्युदयाच्या आड येणाऱ्या — १ आळस, २ स्त्री-मोह, ३ व्याधि, ४ जन्मभूमिवात्सल्य, ५ अल्पसंतुष्टता आणि ६ भीरुता.

आलस्यं स्त्रीसेवा सरोगता जन्मभूमिवात्सल्यम् ।
संतोषो भीरुत्वं षड्व्याघाता महत्त्वस्य ॥ (हितो.)

सहा गोष्टींमुळें आयुष्याला हानि होते — १ अमर्याद अभिमान, २ अमर्याद भाषण, ३ अमर्याद पाप, ४ क्रोध, ५ आप्पलपोटेपणा व ६ मित्रद्रोह. (म. भा. उद्योग. ३७-१०)

सहा गोष्टी तत्काल क्षीण करणाऱ्या — १ शिळें मांस, २ वृद्ध स्त्री, ३ सकाळचें उन्ह, ४ पूर्ण न विरजलेलें दहीं, ५ सकाळचें मैथुन आणि ६ निद्रा.

शुष्कोमांसं स्त्रियोवृद्धा बालार्कस्तरुणं दधि ।
प्रभाते मैथुनं निद्रा सद्यः प्राणहराणि षट् ॥ (शा. नि.)

सहा गोष्टी पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें होत — १ आभाळाची सावली, २ गवतापासून उत्पन्न झालेला अग्नि, ३ दुष्ट पुरुषाच्या ठिकाणची प्रीति, ४ उंचवट्यावरील पाणी, ५ वेश्येचें प्रेम आणि ६ कुमित्र.

सहा गोष्टी बल वाढविणाऱ्या — १ ताजें मांस, २ ताजें अन्न, ३ तरुण स्त्री, ४ दुधाचे पदार्थ, ५ तूप आणि ६ ऊन पाणी.

सद्योमांसं नवान्नं च बालास्त्री क्षीरभोजनम् ।
घृतमुष्णोदकं चैव सद्यः प्राणकराणि षट् ॥ (शा. नि.)

सहा गोष्टी ब्रह्मचर्यास वर्ज्य — १ सुखशय्या, २ वेषभूषा, ३ तांबूल, ४ अभ्यंगस्नान, ५ दन्तकाष्ठ वापरणें आणि ६ सुगंधी पदार्थ सेवन.

सुखशय्यासनं वस्त्रं तांबूलं स्नानमज्जनम् ।
दन्तकाष्ठं सुगंधं च ब्रह्मचर्यस्य दूषणम् ॥ (शिवपुराण)

सहा गोष्टींत मौन आवश्यक — १ शौच, २ लघ्वी, ३ विषय-सेवन, ४ दांत घासणें, ५ श्राद्धकाल व ६ भोजन.

उच्चारे मैथुने चैव प्रस्रावे दन्तधावने ।
श्राद्धे भोजने चैव षट्सु मौनं समाचरेत् ॥ (हारीत)

सहा गोष्टी योगाला साधक — १ उत्साह, २ साहस, ३ धैर्य, ४ भावना, ५ अभ्यास चालू ठेवण्याचा निश्चय व ६ विषयीजनसंग त्याग.

सहा गोष्टी योगाभ्यासाला बाधक —१ अति आहार, २ अधिक श्रम, ३ फार बोलणें, ४ उपोषण (एकादशी वगैरे आवश्यक उपोषणांखेरीज), ५ योगाभ्यासी नव्हेत अशांची संगति व ६ जिह्वालौल्य.

अत्याहारः प्रवासश्च प्रजल्पो नियमग्रहः ।
जनसंगश्च लौल्यं च षड्भिर्योगो विनश्यति ॥ (ह. प्र.).

सहा गोष्टी लघुता म्हणजे कमीपणा आणणाऱ्या — १ लहान मुलांबरोबर सख्यत्व, २ अकारण हास्य, ३ स्त्रियांशीं वाद, ४ असज्जनांची सेवा, ५ गर्दभ-वाहनाचा योग आणि ६ ग्राम्यभाषा. (सु.)

सहा गोष्टी विडंबन करणाऱ्या — १ ब्राह्मण–पण मूर्ख, २ स्थविर (वृद्ध)–पण कामी, ३ कामी–पण दरिद्री, ४ धनवान–पण तपस्वी, ५ वेश्या–पण कुरूपी आणि ६ थोर–पण कृपण.

सहा गोष्टी क्षणिक असतात — १ ढगाची छाया, २ दुर्जनाची प्रीति, ३ शिजलेलें अन्न, ४ स्त्री, ५ तारुण्य आणि ६ धन.

अभ्रच्छाया खलप्रीतिः सिद्धमन्नं च योषितः ।
किंचित्कालोपभोग्यानि यौवनानि धनानि च ॥ (पंचतंत्र)

सहा गोष्टी संसारांत सुखप्रद —(अ) १ धनलाभ, २ निरोगी प्रकृति, ३ प्रिय, ४ मधुरभाषिणी स्त्री व ५ आज्ञाधारक पुत्र आणि ६ द्रव्य मिळवून देणारी विद्या; (आ) १ आरोग्य, २ ऋण नसणें, ३ सारखा प्रवास नसणें, ४ सज्जनसमागम, ५ अनुकूल उपजीविका आणि ६ भयरहित वसतिस्थान. हीं सहा जीवलोकींचीं सुखें होत. (म. भा. उद्योग ३३.८९)

सहा गव्य पदार्थांच्या उपयोगानें दुःस्वप्नांचें निवारण होतें– १ गोमूत्र, २ गोमय, ३ दूध ४ दहिं, ५ तूप व ६ गोरोचन.

गोमूत्रं गोमयं क्षीरं दधिसर्पिश्च रोचना ।
षडङ्गं परमं पाने दुःस्वप्नाद्यानिवारणम् ॥ (सु.)

सहा जाती पुरुषांच्या — १ शश, २ मृग, ३ अश्व, ४ गर्दभ, ५ वृषभ व ६ महिष (टोणगा). (तत्त्व निजबोध-विवेक)

सहा जाती स्त्रियांच्या — (अ) १ पद्मिनी, २ हरिणी, ३ हस्तिनी, ४ चित्रिणी, ५ वडवा आणि ६ शंखिनी. पैकीं सहावी शंखिनी वर्ज्य करून बाकीच्या पांच शुभ होत.

' शंखिनी प्रहरूनि अन्य सुंदरी । येरे पंच त्या शुद्धा ॥ '

(काशीखंड ४१–६९)

(आ) १ पद्मिनी, २ चित्रिणी, ३ हस्तिनी, ४ शंखिनी, ५ नागिणी व ६ डाकिणी. (तत्त्व–निजबोध–विवेक.)

सहा तत्त्वें अनादि — १ जीव, २ ईश्वर, ३ विशुद्ध परब्रह्म, ४ जीवेश्वरांचा भेद, ५ जीवाश्रित अविद्या आणि ६ माया. हीं सहा तत्त्वें वेदान्त शास्त्रानें अनादि मानलीं आहेत.

सहा तीर्थें — १ भक्तितीर्थ, २ गुरुतीर्थ, ३ मातृतीर्थ, ४ पितृ-तीर्थ, ५ पतितीर्थ आणि ६ पत्नीतीर्थ. हीं सहा तीर्थें मानवाला पावन करणारीं. (पद्म-भूमिखंड)

सहा दाते (पुराणप्रसिद्ध भारतीय) — १ बलि–सत्ययुग, २ भार्गवराम, ३ श्रीरामचंद्र–त्रेतायुग, ४ धर्मराज ५ कर्ण–द्वापरयुग व ६ व्यापारी–कलियुग.

सहा दुःखी — १ मत्सरी, २ दयाळू, ३ असंतुष्ट, ४ रागीट, ५ सदा शंकेखोर आणि ६ दुसऱ्याच्या भाग्यावर उपजीविका करणारे. हे सहा नित्याचे दुःखी असतात. (म. भा. उद्योग ३३–९०)

सहा दुःखें जीवितांतील — १ गर्भदुःख, २ जन्मदुःख, ३ व्याधि-दुःख, ४ दारिद्र्य-दुःख, ५ जरादुःख व ६ मृत्युदुःख.

सहा दोष (असुरी संपत्तीचे) —१ दंभ, २ दर्प, ३ अभिमान, ४ क्रोध, ५ पारुष्य (कठोरपणा) आणि ६ अज्ञान. (भ. गी. १६-४)

सहा दोष (अभ्युदयाच्या आड येणारे) – १ निद्रा, २ सुस्ती ३ भय, ४ क्रोध, ५ आळस आणि ६ दीर्घसूत्रीपणा. (म. भा उद्योग. ३३–७८).

सहा दोष (पाठकाचे–पठण करणाराचे) – १ गात म्हणणारा, २ जलद जलद म्हणणारा, ३ वाचतांना किंवा म्हणतांना डोकें

हलविणारा, ४ लिहिलेलें वाचणारा, ५ अर्थ न जाणणारा व ६ बारीक आवाजाचा.

गीती शीघ्री शिरःकंपी तथा लिखितपाठकः ।
अनर्थज्ञोऽल्पकंठश्च षडेते पाठकाधमाः ॥ (सु.)

सहा दोष (स्त्रियांचे बाबतींत) — (अ) १ मद्यपान, २ दुर्जन-संगति, ३ पतीपासून दूर राहणें, ४ इकडे तिकडे भटकणें, ५ परगृहीं निद्रा आणि ६ परगृहवास (मनु. ९-१३); (आ) १ अनृत, २ साहस, ३ माया, ४ जाणीव कमी, ५ अतिलोभ आणि ६ अशुचित्व.

अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभता ।
अशौचत्वं निर्दयत्वं स्त्रीणां दोषाः स्वभावजाः ॥ (वृ. चा.)

सहा द्वारें मसलत फुटण्याची (राजनीतिशास्त्र) — १ मद, २ निद्रा, ३ अज्ञान (शत्रूकडील गुप्त हेर वगैरेबद्दल), ४ चेहऱ्यावरील विकार, ५ दुष्ट मंत्र्यावर विश्वास आणि ६ अकुशल दूत. (म. भा. उद्योग ३९-३९)

सहा 'न' कार — १ मौन, २ विलंब, ३ भिवया चढविणें, ४ अधोवदन, ५ निघून जाणें आणि ६ विषयांतर.

मौनं कालविलम्बश्च प्रयाणं भूमिदर्शनम् ।
भ्रुकुट्यन्यमुखी वार्ता नकारः षड्विधः स्मृतः ॥ (सु.)

सहा नराधम — १ कोणतेंहि काम न करितां ज्यांत त्यांत घोटाळा करणारा, २ कामाकडे अति दुर्लक्ष करणारा, ३ नेहमीं खोटें बोलणारा, ४ दृढ प्रेम न करणारा, ५ स्नेहभावाचा त्याग केलेला आणि ६ स्वतःला शहाणा समजणारा. (म. भा. उद्योग ३७-३७)

सहा नास्तिक दर्शनें — १ चार्वाक, २ सौत्रांतिक, ३ वैभाषिक, ४ योगाचार, ५ माध्यमिक आणि ६ अर्हत्. (वृ. प्र.)

सहा निसर्गदत्त वैद्य — १ सूर्यप्रकाश, २ अन्न, ३ हवा, ४ पाणी, ५ व्यायाम आणि ६ विश्रांति. हे सहा निसर्गदत्त वैद्य परमेश्वरानें मनुष्याच्या सन्निध ठेविले आहेत. त्यांची आठवण ठेवावी. (प्रातःस्मरण)

सहा पारतंत्र्यें — १ स्वभाव-पारतंत्र्य, २ ईश्वर-पारतंत्र्य, ३ प्रकृति-पारतंत्र्य, ४ गुणपारतंत्र्य, ५ कर्मपारतंत्र्य आणि ६ काल-पारतंत्र्य.

सहा पाषंड दर्शनें — १ न्याय, २ वैशेषिक, ३ सांख्य, ४ योग, ५ बौद्ध व ६ पाशुपत. हीं सहा अवैदिक म्हणजे वेदांस प्रमाण न मानणारीं दर्शनें आहेत. (द्वैत सिद्धान्त सुधाकर)

सहा पुराणप्रसिद्ध सभा — १ इंद्रसभा, २ वरुणसभा, ३ कुबेर-सभा, ४ यमसभा, ५ ब्रह्मसभा आणि ६ धर्म (मय) सभा. (पांडव प्र. १६-४).

सहा प्रकार उन्मादाचे— १ वातोन्माद, २ पित्तोन्माद, ३ कफोन्माद, ४ सान्निपातिक उन्माद, ५ मानसिक उन्माद व ६ विषजन्य उन्माद. (आयुर्वेद)

सहा प्रकार (स्नानाचे) — १ नित्य, २ नैमित्तिक, ३ काम्य, ४ क्रियास्नान, ५ मलापकर्षण आणि ६ कर्मांग.

नित्यं नैमित्तिकं काम्यं क्रियाख्यं मलकर्षणम् ।
कर्माङ्गाश्चेति विज्ञेयं षट्प्रकाराः समासतः ॥ (भ. ब्राह्म)

सहा प्रकारचे गंध — १ लवंग, वेलदोडे वगैरेंचा खमंग वास, २ फुलें, अत्तर वगैरेंचा वास, ३ पक्क फळांचा स्वादिष्ट वास, ४ टरपेंटाईन वगैरेंचा दर्प, ५ कुजक्या पदार्थांचा दुर्गंध आणि ६ डांबर वगैरेंचा जळकट वास.

सहा प्रकारांनीं अंतरंग जाणतां येतें — १ चर्या (चाल रीत), २ इंगित (खाणाखुणा), ३ चेष्टा (हालचाल), ४ भाषण, ५ दृष्टि आणि ६ मुखचर्या. (मनु. ८·२६)

सहा प्रकारांनीं तीळ पाप नाश करणारे आहेत — १ तिल-मिश्रित पाण्यानें स्नान, २ तीळ वाटून अंगास लावणें, ३ तिळांनीं हवन करणें, ४ तिलोदकानें तर्पण, ५ तीळ भक्षण आणि ६ तिलदान.

तिलस्नायी तिलोद्वर्ती तिलहोमी तिलोदकी ।
तिलभुक् तिलदाता च षटतिलाः पापनाशकाः ॥ (सु.)

सहा प्रकारचीं दर्शनें (मतें) — १ शैव दर्शन, २ शाक्त दर्शन, ३ वैष्णव दर्शन, ४ गाणपत्य दर्शन, ५ सौर दर्शन आणि ६ कापालिक दर्शन.

दर्शनं षड्विधं प्रोक्तं शैवशाक्तेयवैष्णवम् ।
गाणपत्यं च सौरं च कापालिकमितिस्मृतम् ॥ (सु.)

सहा प्रकारचे दुर्ग — १ निर्जन प्रदेश दुर्ग, २ भूदुर्ग (भुइकोट किल्ला), ३ डोंगरी किल्ला, ४ नरदुर्ग–नगराभोंवतीं पहारा वा अनन्य-निष्ठ सेवक असणें, ५ मृद्दुर्ग–मातीचा तट आणि ६ नगराभोंवतीं दुर्गम अरण्य असणें. असे सहा प्रकार दुर्गांचे (किल्ल्यांचे) प्राचीन काळीं असत.

सहा प्रकार दूषित अन्नाचे — १ आश्रयदुष्ट, २ कालदुष्ट, ३ भाव-दुष्ट, ४ स्वभावदुष्ट, ५ वाग्दुष्ट आणि ६ संसर्गदुष्ट.

सहा प्रकारची वनस्पति–सृष्टि — १ वनस्पति–फुलाव्यांचून फळ येणारे वड, पिंपळ इ., २ औषधी–एक वार फुलें फळें येऊन नाश पावणारे–केळी, धान्यें इ., ३ लता–वृक्षाचा आधार लागतो असा, ४ त्वक्सार–त्वचा कठीण असे वेळू वगैरे, ५ विरुध्–आधाराशिवाय वाढतात अशा आणि ६ द्रुम–फुलें फळें येणारे आंबा इत्यादि वृक्ष.

सहा प्रकारचे विरह — १ प्रारंभ विरह–लग्नच न झाल्यामुळें बायको नाहीं म्हणून, २ क्षणिक विरह–नजरेआड झाल्यामुळें, ३ वाङ्मय-विरह–तंटाबखेडा होऊन अबोला झाल्यामुळें, ४ परोक्ष विरह–माहेरीं गेल्यामुळें, ५ प्रत्यक्ष विरह–बायको आजारी झाल्यामुळें आणि ६ चिर-विरह–पत्नी मृत झाल्यामुळें होणारा विरह. (भावबंधन अंक १)

सहा प्रकारचे वैष्णव — १ भक्त, २ भागवत, ३ वैष्णव, ४ पांच-रात्रागमाप्रमाणें चालणारे, ५ वैखानसशाखी व ६ कर्म न करणारे.

भक्ता भागवताश्चैव वैष्णवाः पांचरात्रिणः ।
वैखानसाः कर्महीनाः षड्विधा वैष्णवामताः ॥

सहा प्रकारचे पशुमानव — १ वेदपशु, २ शास्त्रपशु, ३ पुराण-पशु, ४ देवपशु, ५ नरपशु व ६ स्त्रीपशु. असे सहा प्रकारचे पक्षपाती अविचारी मानव जगांत असतात. (निर्पक्ष सत्य ज्ञानदर्शन)

सहा प्रकार भक्तीचे (जैनधर्म) — १ नामभक्ति, २ स्थापना-भक्ति, ३ द्रव्यभक्ति, ४ भावभक्ति, ५ क्षेत्रभक्ति आणि ६ कालभक्ति. (कल्याण-भक्ति अंक)

सहा प्रकारचें स्त्रीधन — १ विवाहसमयीं अग्नीसमक्ष दिलेलें, २ सासरीं जातांना मिळालेलें, ३ प्रेमानें दिलेलें, ४ भावाकडून मिळालेलें, ५ मातेकडून मिळालेलें व ६ पित्याकडून मिळालेलें. (मनु ९-१९४)

सहा प्रकारची समाधि — १ दृश्यानुविद्ध, २ शब्दानुविद्ध, ३ निः-संकल्प, ४ निर्विकल्प, ५ निर्वृत्तिक आणि ६ निर्वासन. (सरस्वती रहस्योपनिषद्)

सहा प्रकारची सिद्धि — १ प्रतिभा (त्रिकालज्ञान), २ श्रवणा, ३ वार्ता, ४ दर्शना, ५ आस्वादा आणि ६ वेदना (स्पर्शज्ञान). (लिंग अ. ९)

सहा प्रकारचें सैन्यबल — १ शारीरिक बल–कष्टाळूपणा, २ शूर असणें, ३ सैन्यबल-भरपूर संख्या असणें, ४ आस्त्रिक बल–तीक्ष्ण हत्यारें, ५ बुद्धिबल आणि ६ आयुर्बल–सैन्याचा सतत पुरवठा होत असणें. (शुक्र-नीति अ. ४)

सहा प्रकार हास्याचे — १ स्मित–गालांतल्या गालांत हसणें, २ दांत काढून हसणें, ३ विहसित–बोलत बोलत हसणें, ४ उपहसित–नाक फुगवून हसणें, ५ अपहसित–डोळ्याला आंसवें आणून हसणें आणि ६ अतिहसित–मोठमोठ्यानें टाळी वाजवून हसणें. (तत्त्व-निजबोध-विवेक)

सहा प्रमाणें — १ प्रत्यक्ष, २ अनुमान, ३ शब्द, ४ उपमान, ५ अर्थापत्ति व ६ अनुपलब्धि.

सहा प्रमुख नीतिशास्त्रकार — १ मनु, २ बृहस्पति, ३ शुक्र, ४ पराशर, ५ व्यास व ६ कौटिल्य.

सहा प्रसंगीं लाज अथवा भीड धरूं नये — १ स्त्रीसंग, २ गायन, ३ शिकणें, ४ व्याख्यान, ५ धान्य व द्रव्य यांचा व्यवहार आणि ६ आयव्यय. (अ. रा. सर्ग ७–७)

सहा प्राचीन पुराणवेत्ते — १ त्रैयारुणी, २ कश्यप, ३ सावर्णि, ४ अकृतव्रण, ५ वैशंपायन व ६ हारीत. (भा. स्कंध १२.७–५)

सहा प्रीतिलक्षणें — १ जो देतो, २ तसेंच घेतो, ३ आपलें गुह्य सांगतो, ४ तसेंच ऐकून घेतो, ५ पंक्तीला जेवतो, आणि ६ जेवूंहि घालतो. हीं सहा प्रीतिलक्षणें होत.

ददाति प्रतिगृह्णाति गुह्यमाख्याति पृच्छति ।
भुंक्ते भोजयतेश्चैव षड्विधं प्रीतिलक्षणम् ॥ (सु.)

सहा प्रेरणा ग्रंथलेखनाच्या — १ द्रव्य, २ कीर्ति, ३ असंगल स्थितींतून मुक्त होण्यासाठीं, ४ सरकार-दरबारची लोकांना माहिती पुरविण्यासाठीं, ५ तात्कालिक आनंद व ६ उपदेश करण्यासाठीं. अशा सहा प्रेरणा अथवा प्रयोजनें आहेत.

सहा ब्रह्मवादी — १ काश्यप, २ वत्सार, ३ विभ्रम, ४ रैभ्य, ५ असित आणि ६ देवल.

काश्यपश्चैव वत्सारो विभ्रमो रैभ्य एव च ।
असितो देवलश्चैव षडेते ब्रह्मवादिनः ॥ (वायुपु. ५९-१०३)

सहा राष्ट्रीय दुर्घटना — १ अतिवृष्टि, २ अनावृष्टि, ३ टोळधाड, ४ उंदीर फार होणें, ५ पोपट वगैरे प्राण्यांचा उपद्रव व ६ परकीय सत्तेचें आक्रमण.

अतिवृष्टिरनावृष्टिः शलभामूषकाशुकाः ।
प्रत्यासन्नाश्च राजानः षडेता ईतयः स्मृताः ॥ (सु.)

सहा लाभ (प्रवासापासूनच मिळणारे) — १ तीर्थावलोकन, २ सर्वत्र परिचय, ३ वित्तार्जन, ४ नानाश्चर्यनिरीक्षण, ५ चतुरता आणि ६ संभाषणकुशलता. (सु.)

सहा विघ्नें विद्येला येणारीं — (अ) १ द्यूत, २ पुस्तकशुश्रूषा, ३ नाटकाची आसक्ति, ४ स्त्रीचा ध्यास, ५ सुस्ती आणि ६ झोपाळूपणा.

द्यूतं पुस्तकशुश्रूषा नाटकासक्तिरेव च ।
स्त्रियस्तन्द्री च निद्रा च विद्याविघ्नकराणि षट् ॥ (सु.)

(आ) १ स्वछंदीपणा, २ द्रव्य मिळविण्याचा मोह, ३ प्रेमसंबंधांत पडणें, ४ चैन, ५ उद्धटपणा आणि ६ आळस.

स्वच्छन्दत्वं धनार्थित्वं प्रेमभावोऽथ भोगिता ।
अविनीतत्वमालस्यं विद्याविघ्नकराणि षट् ॥ (सु.)

सहा वैष्णव (प्रातःस्मरणीय) — १ बलि, २ बिभीषण, ३ भीष्म, ४ प्रल्हाद, ५ नारद आणि ६ ध्रुव.

बलिर्बिभीषणो भीष्मः प्रल्हादो नारदो ध्रुवः ।
षडेते वैष्णवा ज्ञेयाः स्मरणं पापनाशनम् ॥ (भा. रा. युद्धकांड)

सहा वाईट गोष्टी — १ चांगलें काम न करणारा–शहाणा मनुष्य, २ धर्म नसलेला–म्हातारा, ३ आज्ञाधारक नसलेला–तरुण, ४ दातृत्वहीन –श्रीमंत, ५ विनय नसलेली–स्त्री आणि ६ कोणताहि गुण नसलेला–धनी.

सहा शककर्ते — १ युधिष्ठिर, २ विक्रम, ३ शालिवाहन, ४ विजयाभिनन्दन (वैतरणी–सिंधुसंगमीं), ५ नागार्जुन व ६ कलकी (करवीर). हे सहा शककर्ते म्हणून पुराणांत वर्णिले आहेत. पांच यापूर्वी होऊन गेले व सहावा होणार आहे.

युधिष्ठिर विक्रमशालिवाहनौ । ततो नृपस्याद्विजयाभिनन्दनम् ।
ततस्तु नागर्जुनभूपतिः कलौ । कल्कि षडेते शककारकाः स्मृताः ॥
(नेपाळी पंचांग)

आधुनिक कालांत छत्रपति शिवाजीमहाराज हे एक शककर्ते होत.

सहा शत्रुरूपी रोग वृद्धापकालची वाट पाहणारे (मनुष्य शरिराच्या डाव्या बाजूला) — १ संभोगाचे रोग, २ चाळपुळी (कॅन्सर), ३ रक्ताशयाचे रोग, (उजव्या बाजूला) – ४ वेडेपणाचे रोग, ५ नाड्यांचा लवचिकपणा जाऊन जाड व बरड होणें व ६ मूत्रपिंडाचे रोग.

सहा शास्त्रें जगताचा चरितार्थ चालविणारीं — १ शिल्पशास्त्र, २ वैद्यशास्त्र, ३ सिद्धान्त (गणित) शास्त्र, ४ ज्योतिषशास्त्र, ५ कामशास्त्र आणि ६ ज्ञानशास्त्र. या सहा शास्त्रांच्या आधारानें लोक आपला निर्वाह करून घेतात.

सहा षाड्गुण्यसंपन्न सत्पुरुष — १ वासिष्ठ, २ वामदेव, ३ नारद, ४ व्यास, ५ वाल्मीकि आणि ६ प्रल्हाद. हे सहा षाड्गुण्यसंपन्न पुरुष म्हणून पुराणांतरीं प्रसिद्ध आहेत.

सहा संन्यास धर्माला दूषणें — १ पलंग, २ शुभ्रवस्त्र, ३ स्त्रीकथा, ४ जिह्वालौल्य, ५ दिवसा निद्रा आणि ६ वाहनांत बसणें. या सहा गोष्टी यतिधर्माला बाधक आहेत. (अ. स्मृ.)

सहा सद्भ्रम — १ कुल, २ गोत्र, ३ जाति, ४ वर्ण, ५ आश्रम आणि ६ नाम. हे सहा सद्भ्रम होत. (मो. प्र.)

सहा स्वभावधर्म (देहाचे) — १ आच्छादन, २ भोजन, ३ मैथुन, ४ भय, ५ निद्रा आणि ६ मोह. हे सहा देहाचे स्वभावधर्म मानले आहेत. (तत्त्व-निजबोध-विवेक)

सहा सर्व प्रसिद्ध अशा सार्थप्रतिज्ञा —१ भीष्मप्रतिज्ञा, २ भीमप्रतिज्ञा, ३ राणा प्रताप प्रतिज्ञा, ४ शिवराय प्रतिज्ञा, ५ लोकमान्य 'स्वराज्य-प्रतिज्ञा' आणि ६ महात्मा गांधी–' चलेजाव ' प्रतिज्ञा.

सहा सूत्रग्रंथ कर्ते — १ जैमिनी, २ आश्वलायन, ३ आपस्तंब ४ बौधायन, ५ कात्यायन व ६ कणाद.

सहा सूत्र लक्षणें — १ अल्पाक्षरत्व, २ असंदिग्धता, ३ सारग्रहण, ४ विश्वतोमुखम् म्हणजे सामान्य सिद्धान्त सांगणें, ५ अस्तोभम् म्हणजे निरर्थक शब्दांचा अभाव आणि ६ दोषराहित्य. हीं सहा सूत्रें म्हणजे त्या त्या शास्त्राच्या आचार्यांनीं लिहिलेले मूलग्रंथ–लक्षणें होत.

अल्पाक्षरत्वमसंदिग्धं सारवद्विश्वतोमुखम् ।
अस्तोभमनवद्यं च सूत्रं सूत्रंविदो विदुः ॥ (गी. र. तळटीप).

सहा स्त्रीचे आदर्शगुण — १ कार्यप्रसंगीं मंत्री अथवा सल्लागार, २ गृहकृत्यांत दासी, ३ भोजनसमयीं माता, ४ रतिप्रसंगीं रंभा, ५ धर्माला अनुकूल आणि ६ धरित्रीप्रमाणें क्षमायुक्त. हे सहा स्त्रीचे आदर्श गुण होत.

कार्येषु मंत्री करणेषु दासी भोज्येषु माता शयनेषु रंभा ।
धर्मानुकूला क्षमया धरित्री, भार्या च षाड्गुण्यवतीह दुर्लभा ॥ (सु.)

सहा स्थानीं क्षौर विहित आहे — १ गंगेच्या कांठीं, २ भास्कर-क्षेत्रांत, ३ माता-निधनप्रसंगीं, ४ पिता-निधनप्रसंगीं, ५ यज्ञ आणि ६ सोमपान. या सहा स्थलीं व काळीं क्षौर विहित मानलें आहे.

गंगायां भास्करे क्षेत्रे मातपित्रोर्मृतेऽहनि ।
आधाने सोमपाने च षट्सु क्षौरं विधीयते ॥ (सु.)

सहा हेतु (काव्याचे) — १ कीर्ति, २ धन, ३ व्यवहारज्ञान, ४ पापाचें परिमार्जन, ५ तात्कालिक परानंद व ६ कान्तेप्रमाणें सौम्य उपदेश.

सहाजण आततायी — १ घर जाळण्यास आलेला, २ विष घालणारा, ३ शस्त्र घेऊन वध करावयास आलेला, ४ धन लुटून नेणारा, ५ स्त्री किंवा ६ शेत हरण करणारा.

अग्निदोगरदश्चैव शस्त्रपाणिर्धनापहः ।
क्षेत्रदारहरश्चैव षडेते आततायिनः ॥ (व. स्मृ. ३-१६)

सहाजण आत्मघातकी — १ आळशी, २ गर्विष्ठ, ३ झोपाळू, ४ दुसऱ्याकडून लिहून घेणारा, ५ अल्पविद्या असलेला आणि ६ वितंडवादी.

सालस्यौ गर्वितो निद्रः परहस्तेन लेखकः ।
अल्पविद्यो विवादी च षडेते चात्मघातकाः ॥
(भा. रा. युद्धकांड ५८-५)

सहाजणांना कन्या देणें अनुचित — १ निकट असलेला, २ अति दूर असलेला, ३ अत्यंत धनवान, ४ अति दरिद्री, ५ उपजीविकेचें साधन नसलेला असा आणि ६ मूर्ख.

अत्यासन्ने चातिदूरे अत्याढ्ये धनवर्जिते ।
वृत्तिहीने च मूर्खे च कन्यादानं न शस्यते ॥ (स्कंद माहेश्वर २३-८)

सहाजण कार्य झाल्यानंतर अवमानित होतात — १ शिक्षण संपल्यानंतर आचार्य, २ बायको आल्यानंतर आई, ३ कार्य झाल्यानंतर नियोजक, ४ प्रौढा नारी, ५ नदीपार गेल्यावर नाव आणि ६ रोगपरिहारानंतर वैद्य. सहाजण तें तें कार्य झाल्यानंतर अवमानित होतात, म्हणजे त्यांचा आदर राखला जात नाहीं. (म. भा. उद्योग ३३–८७–८८)

सहाजण गुरुसमान — १ प्रेरणा करणारा, २ सुचविणारा, ३ तोंडानें सांगणारा, ४ दाखवून देणारा, ५ शिकविणारा व ६ उपदेश करणारा. हे सहाजण गुरुसमान होत.

प्रेरकः सूचकश्चैव वाचको दर्शकस्तथा ।
शिक्षको बोधकश्चैव षडेते गुरवः स्मृताः ॥ (कुलागम)

सहाजण त्याज्य होत — (अ) १ मृदु अंतःकरणाचा शासनाधिकारी, २ खादाड ब्राह्मण, ३ दुष्ट मनाचा सोबती, ४ आज्ञा सोडणारा नोकर, ५ कामांत गाफिल राहणारा अधिकारी व ६ केलेलें न स्मरणारा (पंचतंत्र); (आ) १ विवरण न करणारा आचार्य, २ अध्ययनहीन ऋत्विज, ३ रक्षण न करणारा राजा अथवा शासनाधिकारी, ४ अप्रियभाषिणी भार्या, ५ गांवांत राहूं इच्छिणारा गोपाळ (गुराखी) व ६ वनांतच राहूं इच्छिणारा नापित. हे सहा त्यागार्ह होत.

(म. भा. उद्योग ३३–८०)

सहाजण दुसऱ्यावर उपजीविका करणारे — १ चोर–बेसावध मनुष्यावर, २ चिकित्सक–व्याधिग्रस्तावर, ३ कुमार्गी स्त्रिया–विषयलंपटावर, ४ याजक–यज्ञ अथवा हव्यकाव्य करणारांवर, ५ शासनसंस्था –परस्पर कलह करणारावर आणि ६ पंडित (विद्वान्)—मूर्खांवर. (म. भा. उद्योग. ३३-८५)

सहाजण धर्मभिक्षुक होत — १ पांथस्थ (प्रवासी), २ उपजीविकेचें साधन नष्ट झालेला, ३ विद्यार्थी, ४ गुरूचें पालनपोषण करणारा, ५ संन्यासी आणि ६ ब्रह्मचारी.

अध्वगः क्षीणवृत्तिश्च विद्यार्थीगुरुपोषकः ।
यतिश्च ब्रह्मचारी च षडेते धर्मभिक्षुकाः ॥ (स्कंद ब्राह्मखंड)

सहाजण महान् परोपकारी — १ सूर्य, २ चंद्र, ३ घनदाट वृक्ष, ४ नदी, ५ गाय आणि ६ सज्जन.

रविश्चंद्रो घनावृक्षा नदी गावश्च सज्जनाः ।
एते परोपकाराय युगे देवेन निर्मिताः ॥ (सु.)

सहाजण मदनाचे अवतार — १ सुदर्शन, २ भरत, ३ प्रद्युम्न, ४ सांब, ५ सनत्कुमार व ६ स्कंद.

सुदर्शनश्च भरतः प्रद्युम्नः सांब एव च ।
सनत्कुमारः स्कंदश्च षडेते काम एव च ॥ (गरुड ब्रह्म. २९-३६)

सहाजणांकडे रिकाम्या हातानें जाऊं नये — १ राजा (अधिकारी), २ देवता, ३ गुरु, ४ ज्योतिषी, ५ लहान मूल आणि ६ मित्र. (सु.)

सहाजण श्राद्धास वर्ज्य — (अ) १ फलज्योतिषी, २ वैद्य, ३ पुराणिक, ४ कृषीवल, ५ गायक आणि ६ राजसेवक.

ज्योतिर्गण्यं तथा वैद्यं पुराणं कृषिकारिकाः ।
गायको राज्यसेवाश्च षडेते श्राद्धघातकाः ॥ (सु.)

(आ) १ मेहुणा, २ गोत्रज, ३ अतिवृद्ध, ४ व्याभिचारी व व्याभिचारी स्त्रीचा पति, ५ ज्ञानहीन आणि ६ मूर्ख.

शालकश्च स्वगोत्रश्च अतिवृद्धश्च वृषलीपती ।
ज्ञानहीनश्च मूर्खश्च षडेते श्राद्धघातकाः ॥ (सु.)

७

सप्तर्षि — (अ) प्रत्येक मन्वन्तरांतील सात ब्रह्मर्षि. चालू वैवस्वत मन्वन्तरांतील सप्तर्षि : १ कश्यप, २ अत्रि, ३ भरद्वाज, ४ विश्वामित्र, ५ गौतम, ६ जमदग्नि आणि ७ वसिष्ठ.

(आ) प्राचीन ऋषींपैकीं जे महर्षि विशेष प्रसिद्धीस आले त्यांचीं नांवें चिरस्मरणीय व्हावीं म्हणून उत्तरेकडील ध्रुवनक्षत्राभोंवतीं प्रदक्षिणा घालणाऱ्या तारकासमूहांतील सात तेजस्वी ताऱ्यांस दिलीं तीं अशीं— १ मरीचि, २ अत्रि, ३ अंगिरस, ४ पुलस्त्य, ५ पुलह, ६ क्रतु व ७ वसिष्ठ. यांत वसिष्ठांजवळच्या लहान ताऱ्यास अरुंधती असें नांव दिलें आहे.

कश्यपोऽत्रिर्भरद्वाजो विश्वामित्रोऽथ गौतमः ।
जमदग्निर्वासिष्ठश्च सप्तैते ऋषयः स्मृताः ॥ (ऋषिपंचमीव्रतकथा)

(इ) दोन डोळे, दोन कान, दोन नासिका–छिद्रें व एक मुख–वाणीचें इंद्रिय हे मस्तकावर असलेले सात ऋषि होत. ज्ञान घेणें व ज्ञान देणें हें यांचें कार्य अखंड चालू असतें. (वैदिक तत्त्वज्ञान)

(ई) (शरिरांतील) १ नाक, २ जिव्हा, ३ डोळे, ४ त्वचा, ५ कान, ६ वाणी आणि ७ मन.

" सप्तऋषयः प्रतिहिताः शरीरे " । (वा. यजु ३४.५५)

सप्त अप्सरा — १ रंभा, २ घृताची, ३ मेनका, ४ तिलोत्तमा, ५ मंजुघोषा, ६ ऊर्वशी आणि ७ सुकेशी.

घृताची मेनका रंभा उर्वशी च तिलोत्तमा ।
सुकेशी मंजुघोषाद्याः कथ्यन्तेऽप्सरसो बुधैः ॥ (सु.)

सप्त अनल — १ कालानल, २ कव्यानल–दिशाहुत अग्नि, ३ वडवानल–समुद्रांतील, ४ सहस्रानल–सूर्यांतील अग्नि, ५ विशानल–शेषमुखांतील, ६ भुवानल–पृथ्वीगर्भांतील आणि ७ हारानल–शिवाचे तृतीय नेत्रांतील अग्नि. असे सात प्रकारचे अग्नि आहेत. (दु. श. को.)

सप्त अरण्यें — १ दंडकारण्य, २ खंडारण्य, ३ चंपकारण्य, ४ वेदारण्य, ५ नैमिषारण्य, ६ ब्रह्मारण्य आणि ७ धर्मारण्य. (भा. रा. किष्किंधा १४-२२).

सप्त आशय — १ वाताशय, २ पित्ताशय, ३ श्लेष्माशय, ४ रक्ताशय, ५ आमाशय, ६ पक्काशय व ७ मूत्राशय. मानवी शरिरांत सात आशय आहेत. पण स्त्रियांनाच असणारा गर्भाशय हा एक अधिक आशय आहे. (सुश्रुत शारीर ५–८)

सप्त उपधातु (रसायनशास्त्र) — १ सुवर्णमाक्षिक, २ मोरचूद, ३ अभ्रक, ४ सुर्मा, ५ मनशीळ, ६ हरताळ आणि ७ कलखापरी. (रसायनसंग्रह)

सप्त उपधातु (शरिरांतील) — १ स्तन्य, २ आर्तव, ३ वसा, ४ घाम, ५ दांत, ६ केस आणि ७ ओज. हे शरिरांतील सप्तधातूंचे सात उपधातु होत. (भावप्रकाश)

सप्त उपरत्नें — १ वैक्रांत, २ सूर्यकांत, ३ चंद्रकांत, ४ राजावर्त, ५ लाल, ६ पेरोज आणि ७ स्फटिक.

सप्तोपरत्न गणिता मणयो लोकविश्रुताः ॥ (शा. नि.)

सप्त ऋषींची सात प्रकारची रोगचिकित्सा — १ पापराहित्य (ऋतुपरत्वें आहारविहार) भरद्वाज, २ प्राणायाम–कश्यप, ३ हवनचिकित्सा–गौतम, ४ मानसचिकित्सा–अत्रि, ५ प्रार्थनाचिकित्सा–विश्वामित्र, ६ जलचिकित्सा–जमदग्नि आणि ७ स्पर्शचिकित्सा–वसिष्ठ.

अशी सप्तऋषींची सात प्रकारची रोगचिकित्सा प्राचीन काळीं केली जात असे. (ऋग्वेद ८४ वा अनुवाक)

सप्त कला (शरिरांतील) — १ मांसधरा, २ रक्तधरा, ३ मेदोधरा, ४ कफधरा, ५ पुरीषधरा, ६ पित्तधरा व ७ रेतोधरा. शरिरावर त्वचेचीं आवरणें सात असतात. तशा कलाहि सात आहेत. (सुश्रुत शारीर अ. ४)

सप्त कांडें (रामायणाचीं) — १ बालकांड, २ अयोध्याकांड, ३ अरण्यकांड, ४ किष्किंधाकांड, ५ सुंदरकांड, ६ युद्धकांड व ७ उत्तरकांड. अशीं रामायणाचीं सात कांडें आहेत.

सप्त कीर्तिलक्षणें — १ दान, २ पुण्य, ३ विद्या, ४ वक्तृत्व, ५ काव्य, ६ आर्जव व ७ शौर्य.

सप्त कुलाचल — (अ) १ हिमवान, २ गंधमादन, ३ नैषध, ४ विंध्य, ५ माल्यवान्, ६ पारियात्रिक व ७ हेमकूट; (आ) १ महेन्द्र, २ मलय, ३ सह्य, ४ शुक्तिमान्, ५ ऋक्ष पर्वत, ६ विंध्य व ७ पारियात्र.

महेंद्रो मलयः सह्यः शुक्तिमानृक्षवानपि ।
विंध्यश्च पारियात्रश्च सप्तैते कुलपर्वताः ॥ (म. भा. भीष्म ९-११)

सप्त गीता — १ श्रीमद्भगवद्गीता, २ रामगीता, ३ गणेशगीता, ४ शिवगीता, ५ देवीगीता, ६ कपिलगीता आणि ७ अष्टावक्रगीता. अनेक गीताग्रंथांत या सात मुख्य गीता मानिल्या आहेत.

सप्त गंगा — (अ) १ गंगा, २ यमुना, ३ सरस्वती, ४ रथस्था, ५ सरयू, ६ गोमती व ७ गंडकी (म. भा. आदि–१७०–२०); (आ) १ जाह्नवी, २ वृद्धगंगा, ३ कालिंदी, ४ सरस्वती, ५ कावेरी, ६ नर्मदा आणि ७ वेण्णा.

जाह्नवी वृद्धगंगा च कालिन्दी च सरस्वती ।
कावेरी नर्मदा वेणी सप्त गङ्गा प्रकीर्तिता ॥ (स्कंद–वैष्णव ४-१५)

सप्त चिरंजीव (पौराणिक) — १ अश्वत्थामा, २ बलि, ३ व्यास, ४ हनुमंत, ५ बिभीषण, ६ कृप आणि ७ परशुराम.

अश्वत्थामा बलिर्व्यासो हनूमांश्च बिभीषणः ।
कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजीविनः ॥ (पद्म-सृष्टि.)

याखेरीज मार्कंडेय हे आठवे होत.

सप्तैतान् संस्मरेन् नित्यं मार्कंडेयमथाष्टमम् ॥ (सु.)

सप्त चिरंजीव (आधुनिक) — १ भगतसिंग, २ राजगुरु, ३ सखदेव (पंजाब), ४ शिंदे, ५ सारडा, ६ कुरबान हुसेन व ७ मल्लपा धनशेटी (सोलापूर). हे सात प्रस्थापित सरकारविरुद्ध राज्यक्रांतिकारक म्हणून ब्रिटिश राजवटींत बळी दिले गेले.

भगत्सिंगो राजगुरुः सखदेवश्च सारडाः ।
शिन्देहुसेनौ मल्लपाः सप्तैते चिरजीविनः ॥

(केसरी २८ मार्च १९३१)

सप्त चक्रें (देहांतील) — (अ) १ आधारचक्र–गुदस्थान, २ स्वाधिष्ठानचक्र–लिंगस्थान, ३ मणिपूरचक्र–नाभिस्थान, ४ अनुहत-चक्र–हृदयस्थान, ५ विशुद्धिचक्र–कंठस्थान, ६ ज्ञानचक्र–भ्रूमध्यस्थान व ७ सहस्रदलचक्र–तालुस्थान (हठयोग); (आ) १ आधार, २ स्वाधिष्ठान, ३ मणिपूर, ५ अनाहत, ५ विशुद्धि, ६ अग्निचक्र आणि ७ ब्रह्मरंध्रचक्र. (स्वानुभाव दिनकर)

सप्त चैतन्यें — १ ब्रह्मचैतन्य, २ ईशचैतन्य, ३ जीवचैतन्य, ४ प्रमाणचैतन्य, ५ प्रमातृचैतन्य, ६ प्रमेयचैतन्य व ७ फलचैतन्य. पहिलें शाश्वत ब्रह्मचैतन्य, बाकीचीं सहा मायिक चैतन्यें मानिलीं आहेत.

सप्त जिह्वा (अग्नीच्या) — १ कराली, २ धूमाली, ३ श्वेता, ४ लोहिता, ५ कनकप्रभा, ६ अतिरक्ता आणि ७ पद्मरागा. अशीं अग्नीच्या सात ज्वालांचीं नांवें आहेत. यावरून अग्नीला सप्तजिह्व म्हणतात. (भ. मध्यमपर्व १–२०)

सप्त तत्त्वें (जैन धर्मांचीं) — १ जीव, २ अजीव, ३ आस्रव, ४ बंध, ५ संवर, ६ निर्जरा आणि ७ मोक्ष. अशीं सात तत्त्वें जैन धर्मांत मानिलीं आहेत. कोणी कोणी यांचे जोडीला ८ पुण्य व ९ पाप हीं धरून नऊ मानतात.

सप्तर्षि तारे — १ मरीचि, २ अत्रि, ३ अंगिरा, ४ पुलस्त्य, ५ पुलह, ६ क्रतु आणि ७ वसिष्ठ. असा सात तेजस्वी ताऱ्यांचा उत्तरे-

कडील समूह. यांसच बृहदक्ष किंवा खाटलेंबाजलें म्हणतात. यांतच वसिष्ठाच्या ताऱ्याजवळ एक लहान तेजस्वी तारा दिसतो, त्यास अरुंधती म्हणतात. वैदिक विवाहपद्धतींत अरुंधतीदर्शन म्हणून सप्तपदीनंतरचा एक विधि. या वेळीं वरानें वधूला अरुंधती नक्षत्र दाखवून तूं अरुंधतीसारखी पतिनिष्ठ हो असें सांगावयाचें असतें.

सप्त तीर्थें — १ सत्य, २ क्षमा, ३ इंद्रियनिग्रह, ४ सर्वभूतदया, ५ सत्यवादिता, ६ ज्ञान व ७ तप. हे सात प्रकारचे दैवी गुण सप्त तीर्थें म्हणून मानले आहेत.

सत्यतीर्थं क्षमातीर्थं तीर्थमिन्द्रियनिग्रहः ।
सर्वभूतदयातीर्थं तीर्थानां सत्यवादिता ॥
ज्ञानतीर्थं तपस्तीर्थं कथितं तीर्थसप्तकम् ॥ (स्कंद अ. म. १०-४५)

सप्त त्वचा — १ अवभासिता, २ लोहिता, ३ श्वेता, ४ ताम्रा, ५ वेदिनी, ६ रोहिणी आणि ७ मांसधरा. अशा सात तऱ्हेच्या कमी अधिक जाडीच्या पापुद्र्यांची त्वचा बनलेली आहे. त्वचा हे एक शरिराचें सुंदर आवरण आहे. (शार्ङ्गधर)

सप्त द्वीपें — १ जंबुद्वीप, २ प्लक्षद्वीप, ३ शाल्मली द्वीप, ४ कुशद्वीप, ५ क्रौंचद्वीप, ६ शाकद्वीप आणि ७ पुष्करद्वीप. असे पृथ्वीचे प्राचीन काळचे सात मोठाले विभाग.

जंबुप्लक्षाभिधानौ च शाल्मलश्च कुशस्तथा ।
क्रौंचशाकौ पुष्करश्च ते सर्वे देवभूमयः ॥ (बृ. ना. पूर्वखंड)

सप्त देह — १ स्थूलदेह, २ सूक्ष्मदेह, ३ प्राणदेह, ४ वासनादेह, ५ मानसदेह, ६ बुद्धिदेह आणि ७ आत्मदेह. (पिशाच्चांच्या परिसरांत)

सप्त धातु (खनिज) — १ सोनें, २ रुपें, ३ तांबें, ४ शिसें, ५ जस्त, ६ कथिल, ७ लोखंड.

सप्त धातु (शरिरांतील सात रस) — (अ) १ रस, २ रक्त, ३ मांस, ४ मेद, ५ अस्थि, ६ मज्जा, आणि ७ शुक्र (सुश्रुत); (आ) १ वसा, २ रुधिर, ३ मांस, ४ मेद, ५ मज्जा, ६ अस्थि आणि ७ स्नायु. हे सात धातु असून हे देहाचें धारण करतात.

रसो रुधिरं मांसश्च मेदो मज्जास्थिरेतसः ।
सप्तधातवा इमे प्रोक्ताः सर्वदेहसमाश्रिताः ॥ (कर्णहंस)

सप्त धान्यें — (अ) १ सातु, २ गहूं, ३ साळ, ४ तीळ, ५ राळे, ६ सांवे आणि ७ हरभरे; (आ) १ साळी, २ यव, ३ तीळ, ४ उडीद, ५ राळे, ६ गहूं आणि ७ हरभरे.

सप्त नद — १ शोणनद, २ सिंधुनद, ३ हिरण्याक्ष, ४ कोक, ५ घर्घर (घगर), ६ लोहित आणि ७ शतलज्ज (सतलज). हे सात नद होत. (अ. म. ३०–१७)

सप्त पदार्थ (न्यायशास्त्र) — १ द्रव्य, २ गुण, ३ कर्म, ४ सामान्य, ५ विशेष, ६ समवाय आणि ७ अभाव.

सप्तपदी — (अ) विवाहविधींतील प्रमुख अंग–लाजाहोमानंतर वरानें वधूचा हात धरून अग्नि व द्विज यांसमक्ष एकेका अशा सात अक्षत-पुंजांवर चरण ठेवून सात पावलांनीं आपल्याजवळ आणणें याला सप्तपदी म्हणतात. सप्तपदीविना विवाह पूर्ण होत नाहीं.

विवाहहोम झाला संपूर्ण, सप्तपदी पाणीग्रहण (रुक्मि. स्वयं. १६.२६)

(आ) वधू आपल्या पतीबरोबर सात पावलें चालून आपल्या सात मागण्या मान्य करून घेते. पहिल्यांत अन्न, दुसऱ्यांत बल, तिसऱ्यांत धनवस्त्रादि, चौथ्यांत सुख, पांचव्यांत गाय, सहाव्यांत सर्व ऋतूंत सुख आणि सातव्यांत सख्य. सज्जनांची मैत्री सात पावलें बरोबर चालण्यानें होते.

सप्त पाश — १ काळपाश–आयुष्यघात, २ कर्मपाश–अनैश्वर्यवंत, ३ धर्मपाश–आश्रमगत, ४ ब्रह्मपाश–वेदविहितार्थ, ५ मोहपाश–देहममता, ६ आशापाश–मुख्यमाया आणि ७ जन्मपाश–कनककांता (भा. सुंदर १९-११).

सप्त पाताळ — (अ) १ अतल, २ वितल, ३ सुतल, ४ रसातल, ५ महातल, ६ वलातल आणि ७ पाताळ; असे सात पाताळ (अधो-लोक) आहेत (बृहन्नारदीय पूर्वखंड); (आ) १ अहितळ, २ महितळ, ३ सुतळ, ४ कर्मतळ, ५ वितळ, ६ शंकातळ आणि ७ रसातळ. (मूळस्तंभ कथासार)

सप्त प्रयाग — (अ) १ रुद्रप्रयाग–मंदाकिनी व अलकनंदा संगम, २ नंदप्रयाग, ३ कर्णप्रयाग, ४ देवप्रयाग, ५ पार्वतीप्रयाग, ६ विष्णुप्रयाग–विष्णुगंगा व अलकनंदा संगम आणि ७ प्रयागराज–गंगा व यमुना संगम. हे सात प्रयाग (महानद्यांचे संगम) आहेत; (आ) १ प्रयाग, २ देवप्रयाग, ३ कर्णप्रयाग, ४ नंदप्रयाग, ५ श्यामप्रयाग–श्यामगंगा व भागीरथी संगम, ६ गुप्तप्रयाग आणि ७ हरिप्रयाग.

सप्त महारथी — १ द्रोण, २ कर्ण, ३ कृपाचार्य, ४ कृतवर्मा, ५ अश्वत्थामा, ६ शल्य आणि ७ जयद्रथ. हे कौरव पक्षीय सात महारथी. या सातांनीं मिळून भारतीय युद्धांत एकाकी वीर अभिमन्यूचा वध केला.

सप्त महानद्या — १ गंगा, २ यमुना, ३ गोदावरी, ४ सरस्वती, ५ नर्मदा, ६ सिंधु, ७ कावेरी. यांचें स्नानसमयीं स्मरण करावें.

सप्त महापुरी (पवित्र स्थानें) — १ अयोध्या, २ मथुरा ३ माया (हरिद्वार), ४ काशी, ५ कांची, ६ अवंतिका आणि ७ द्वारका.

अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका ।
पुरीद्वारावतीश्चैव सप्तैते मोक्षदायिकाः ॥ (सु.)

सप्त मातृका —(अ) १ श्री, २ लक्ष्मी, ३ धृति, ४ मेधा, ५ श्रद्धा, ६ विद्या आणि ७ सरस्वती; (आ) १ ब्राह्मी, २ माहेश्वरी, ३ कौमारी, ४ वैष्णवी, ५ वाराही, ६ इंद्राणी आणि ७ चामुंडा. या सप्त मातृका देवता होत.

ब्राह्मी माहेश्वरीश्चैव कौमारीवैष्णवी तथा ।
वाराही च तथेंद्राणी चामुंडा सप्तमातरः ॥ (दे. भा. स्कंध १२)

सप्त मृत्तिका — १ अश्वाच्या जागेंतील, २ गजाच्या जागेंतील, ३ चव्हाट्यावरची, ४ वारूळ, ५ संगमावरची, ६ डोह आणि ७ गाईच्या गोठ्यांतील. या सात ठिकाणांहून आणलेली मृत्तिका वास्तुशांति इत्यादि कर्मांत लागतात. (धर्मशास्त्र)

सप्त रक्त — १ तळहात, २ पायाचे तळवे, ३ नेत्रांचे कोपर, ४ जीभ, ५ ओठ, ६ पडजीभ आणि ७ नखें. या सात ठिकाणांच्या रक्ताला सप्तरक्त ही संज्ञा आहे.

सप्त रंग — १ लाल, २ नारिंगी, ३ पिवळा, ४ हिरवा, ५ निळा, ६ पारवा आणि ७ जांभळा. हे सूर्यकिरणांच्या पृथक्करणानें अथवा इंद्र-धनुष्यांत दिसणारे सात रंग.

सप्त रश्मि (किरणें) सूर्याचीं — १ सुषुम्ना, २ हरिकेश, ३ विश्व-कर्मा, ४ विश्वश्रवा, ५ संयद्वसु, ६ अर्वावसु व ७ स्वरकु वा स्वरत. (कूर्म. ४३-३)

सप्त रश्मिमय सृष्टि — १ सूर्याचीं किरणें सात, २ पृथ्वीच्या धातु व उपधातुहि सात, ३ रत्नांचे रंग सात, ४ मनुष्याच्या शरिरांतील धातु व उपधातुहि सात, ५ त्वचा सात, ६ अग्नीच्या कला सात आणि ७ त्यांचीं राहण्याचीं ठिकाणेंहि सात. अशी सर्व सृष्टि सप्त रश्मिमय आहे. (आरोग्य मंदिर ऑगस्ट १९५४)

सप्त लोक — १ भूलोक – पृथ्वी, २ भुवर्लोक – पृथ्वी आणि सूर्य यांमधील, ३ स्वर्लोक – सूर्य आणि ध्रुव यांमधील, ४ महर्लोक सूर्य व नक्षत्रें यांचा, ५ जनलोक – ब्रह्मदेवाच्या मानसपुत्रांचा, ६ तपोलोक – तपस्वी लोकांचा आणि ७ सत्यलोक – ब्रह्मदेवाचा. असे सात ऊर्ध्व लोक पुराणांत वर्णिले आहेत. (वायु. पूर्वार्ध ५०-७९)

सप्तविध व्यसनें — (अ) १ द्यूत, २ मांस, ३ सुरा, ४ वेश्या, ५ दिवानिद्रा, ६ परनिंदा व ७ मृगया; (आ) १ हिंसा, २ चोरी, ३ व्यभिचार, ४ मद्यपान, ५ असत्य भाषण, ६ जुगार व ७ दुष्ट संगति; (इ) १ जारण, २ मारण, ३ विध्वंसन, ४ स्तंभन, ५ मोहन, ६ वशी-करण आणि ७ उच्चाटण; (ई) १ द्यूत, २ मृगया, ३ मद्यपान, ४ कठीण दंड, ५ अयोग्य दान, ६ कामिनी आणि ७ कठोर भाषण.

सप्तविध स्वप्नें — १ दृष्ट – पाहिलेल्या गोष्टी स्वप्नांत दिसणें, २ श्रुत – ऐकलेल्या दिसणें, ३ अनुभूत – मनानें अनुभवलेल्या, ४ प्रार्थित– इच्छिलेल्या, ५ संकल्पित, ६ भाविक – पुढील गोष्टी सुचविणारीं आणि ७ दोषज – वात, पित्त, कफ इत्यादि दोषांमुळें पडणारीं. (अष्टांगसंग्रह).

सप्तशती — (अ) सातशें श्लोकांचा ग्रंथ – भगवद्गीता.

कीं गीता हे सप्तशती । मंत्र प्रतिपाद्या भगवती । (ज्ञा. १८-१६६६).

(आ) मार्कंडेय पुराणांतर्गत देवीस्तुति. यांत सातशें मंत्र आहेत. आश्विनमासांतील देवीनवरात्रांत याचें पठण केलें जातें; (इ) राजा हाल यानें रचिलेला ग्रंथ. यांत सातशें गाथा आहेत, म्हणून त्यास गाथासप्तशती म्हणतात. त्यावरून मध्ययुगीन भारतांतील सामाजिक स्थितीचें सम्यक् ज्ञान होतें.

सप्त संपत्ति — १ जनसंपत्ति, २ धनसंपत्ति, ३ पुत्रसंपत्ति, ४ कलत्रसंपत्ति, ५ विद्यासंपत्ति, ६ इष्टफलसंपत्ति आणि ७ शरीरसंपत्ति.

सप्त सम्राट् — १ भरत, २ श्रेणिक, ३ चन्द्रगुप्त, ४ बिंदुसार, ५ अशोक, ६ खारवेल आणि ७ कुमारपाल. हे सात जैनधर्मीय सम्राट् भारतांत होऊन गेले. (सप्त सम्राट्)

सप्त सरस्वती — १ सुप्रभा—पुष्कर, २ कांचनाक्षी—नैमिष, ३ विशाला—गया, ४ मनोरमा—उत्तर कोसल, ५ आहेवती—कुरुक्षेत्र, ६ सुरेणु—हरिद्वार व ७ विमलोदका—हिमालय.

सप्त सागर — १ लवणाब्धि, २ ईक्षुसागर, ३ सुरार्णव, ४ आज्य-सागर, ५ दधिसमुद्र, ३ क्षीरसागर आणि ७ स्वादुजल (शुद्धोदक). असे सात सागर प्राचीनांनीं सांगितले आहेत. आजहि तांबडा समुद्र, काळा समुद्र अशीं आश्चर्योत्पादक नांवें रूढ आहेतच.

'सप्तमः स्यात्स्वादुजलं इत्येते सप्तसागराः ॥' (विश्वब्रह्मपुराण १०-२२)

'क्षीरसमुद्र क्षारसमुद्र । दधि मधु घृत समुद्र । सहावा तो इक्षुसमुद्र । सुरासमुद्र सातवा॥ ' (भा. रा. किष्किंधाः १०-९)

सप्तसिंधु — १ स्वात, २ गोमती, ३ वितस्ता, ४ चंद्रभागा, ५ इरावती, ६ सरस्वती व ७ सिंधु. या सात नद्यांना सप्तसिंधु अशी संज्ञा आहे.

सप्त सोमयज्ञसंस्था — १ अग्निष्टोम, २ अत्यग्निष्टोम ३ उकथ्य, ४ षोडशी, ५ वाजपेय, ६ अतिरात्र आणि ७ आप्तोर्याम.

सप्त स्मृतिगामी — १ दत्तात्रेय, २ नारद, ३ व्यास, ४ शुक, ५ मारुति, ६ कार्तवीर्य आणि ७ गोरक्ष. हे सात स्मृतिगामी म्हणजे स्मरण करणाराकडे जाणारे म्हणून प्रसिद्ध आहेत.

सप्त स्नानें — १ मांत्र–मंत्रानें जलप्रोक्षण, २ भौम–ओल्या वस्त्रानें अंग पुसून घेणें, ३ आग्नेय–भस्मधारण करण्यानें, ४ वायव्य–गोधूलीचा स्पर्श, ५ दिव्य–वृष्टिजलानें (पाऊस पडत असतां उन्हहि पडतें अशा वृष्टिजलांत), ६ वारुण–पाण्यांत बुडून आणि ७ मानस–परमेश्वरस्वरूपाचें ध्यान. हें मानस स्नान होय.

मांत्रं भौमं तथाग्नेयं वायव्यं दिव्यमेव च ।
वारुणं मानसं चैव सप्तस्नानं प्रकीर्तितम् ॥ (सु.)

सप्त स्वर — १ षड्ज, २ ऋषभ, ३ गांधार, ४ मध्यम, ५ पंचम, ६ धैवत व ७ निषाद. हे गायनशास्त्रांतील सात स्वर. यांचेच संक्षिप्त पर्याय— सा–रि–ग–म–प–ध–नी हे होत.

सप्त हविर्यज्ञसंस्था — १ अग्न्याधान, २ अग्निहोत्र, ३ दर्श–पूर्णमास, ४ चातुर्मास्य, ५ आग्रयणेष्टि, ६ निरूढ–पशुबंध आणि ७ सौत्रामणि.

सप्त हरीतकी — १ विजया, २ रोहिणी, ३ पूतना, ४ अमृता, ५ चेतकी, ६ अभया आणि ७ जीवंती. अशा हिरड्याच्या सात जाती आहेत. ' यस्य नास्ति गृहे माता तस्य माता हरीतकी । ' इतकें हिरड्याचें महत्त्व मानलें आहे. इंद्रानें अमृत प्राशन केलें. तेव्हां त्या अमृताचा एक थेंब जमिनीवर पडला. त्यापासून सात प्रकारचे हिरडे उत्पन्न झाले अशी पौराणिक कथा आहे. (भावप्रकाश)

सप्त क्षार — १ तिल, २ अपामार्ग, ३ करंज, ४ पालाश, ५ अर्क, ६ यव आणि ७ चिंचा.

सप्ताक्षरी मंत्र — (अ) १ ॐ नमः सूर्याय; (आ) श्रीगणेशायनमः हा मंगलवाचक आहे. कोणत्याहि कार्यारंभीं गणेशदेवतेस नमन करण्याची रूढि आहे.

सप्त ज्ञानभूमिका — १ शुभेच्छा, २ विचारणा–अध्यात्मशास्त्र आणि संतसमागम, ३ तनुमानसी––मनःक्षयकारिणी, ४ सत्त्वापत्ति–– चित्त निर्मळ होणें, ५ असंसक्ति—अनासक्ति, ६ पदार्थभावना—आत्म-

वस्तूची भावना आणि ७ तुर्यगा—अवस्थात्रयाच्या पलीकडे जाणें. सातव्या अवस्थेंत मनुष्य जीवन्मुक्त होतो. (रामगीता ७.३४)

सात अर्थ ज्ञानाचे (गीतोक्त) — १ तत्त्वज्ञान, २ सांख्यज्ञान, ३ परोक्षज्ञान, ४ साधनज्ञान, ५ विवेकज्ञान, ६ लौकिक ज्ञान आणि ७ शास्त्रज्ञान. (तत्त्वचिंतामणी)

सात अनुष्ठानें (देवीचीं) — १ नवरात्र विधान, २ नित्यचंडी विधान, ३ नवदुर्गानुष्ठान, ४ कालरात्रि, ५ नवचंडी, ६ शतचंडी आणि ७ सहस्रचंडी. (देवमाहात्म्य अ. १५)

सात अरण्यवासी प्राणी — १ सिंह, २ वाघ, ३ डुक्कर, ४ रेडे, ५ हत्ती, ६ रीस आणि ७ वानर. (म. भा. भीष्म ४–१७)

सात अवतार दुर्गा देवतेचे (भविष्यकालीन) — १ विंध्याचलवासिनी, २ रक्तदंतिका, ३ शताक्षी, ४ शाकंबरी, ५ दुर्गा, ६ भीमा आणि ७ भ्रामरी. (कल्याण शक्ति अंक)

सात अवस्था जीवाच्या — (अ) १ अज्ञान, २ आवरण, ३ विक्षेप, ४ परोक्षज्ञान, ५ अपरोक्षज्ञान, ६ शोकनिवृत्ति व ७ निरंकुशातृप्ति (रा. गी. ७–२४); (आ) १ ब्रह्मत्व, २ प्रकृति, ३ पुरुषत्व, ४ ईशत्व, ५ अविद्याहरण, ६ जीवत्व आणि ७ विकारत्व. (रा.गी.७-३५)

सात अंगें (चिकित्सेचीं) — १ रोगी, २ दूत, ३ वैद्य, ४ दीर्घायुष्य, ५ द्रव्य, ६ चांगला नोकर आणि ७ उत्तम औषध.

रोगी दूतो भिषक् दीर्घमायुर्द्रव्यं सुसेवकः ।
सदौषधं चिकित्साया इत्यङ्गानि बुधा जगुः ॥ (नि. र.)

सात आश्चर्यें — १ आकाशाला–खांब नाहीं, २ तळहाताला–केस नाहींत, ३ समुद्राला–झांकण नाहीं, ४ घोड्याला–स्तन नाहीं, ५ देवाला –आईबाप नाहींत, ६ जिभेला–हाड नाहीं आणि ७ केसांना–रक्त नाहीं. हीं सात आश्चर्यें आहेत.

सात आश्चर्यें (प्राचीन जगांतील) — (अ) १ इजिप्तमधील मनोरे, २ एफिसस येथील डियाना देवतेचें मंदिर, ३ बाबिलोन मधील भिंती (उंची ३३५ फूट, जाडी ८५ फूट) व इष्टिका लेख, ४ ऑलिंपिया

येथील ज्युपिटरचा पुतळा (ग्रीस), ६ हॅलिकार्नेस येथील कबर (आशिया मायनर), ६ ऱ्होडस येथील सूर्यदेवतेचा पुतळा आणि ७ अलेक्झांड्रिया बंदराच्या प्रवेशद्वारावरील दीपगृह; (आ) (मध्ययुगीन) — १ रोम येथील अँफी थिएटर, २ रोम येथील शववापिका, ३ चीनमधील मोठी भिंत (लांबी १५०० मैल), ४ इंग्लंडमधील पाषाणवलय, ५ पिसा येथील झुकता मनोरा, ६ ईजिप्तमधील पिरामिड अगर राजांचीं थडगीं आणि ७ कॉन्स्टँटिनोपल येथील सेंट सोफियाचें मंदिर हीं जगांतील सात आश्चर्यें होत; (इ) (अर्वाचीन) — १ बिनतारी संदेश यंत्र, २ दूरध्वनि यंत्र (रेडिओ), ३ टेलिव्हिजन व बोलपट, ४ विमान, ५ रेडियमचा शोध, ६ विच्छिन्न किरणद्वारा पृथक्करण आणि ७ 'क्ष' किरण आणि अतिनील किरण यांचा शोध; (इ) १ एम्पायर स्टेट बिल्डिंग (न्यूयॉर्क), २ पनामा कालवा, ३ लंडनमधील तळघरें, ४ गोल्डन गेट ब्रिज (सॅन्फॉन्सिस्को), ५ अस्वान धरण (ईजिप्त), ६ वॉशिंग्टनचें स्मारक आणि ७ सिंधु नदीवरील लॉइड बराज.

सात आश्चर्यें (भरतांतील) — (अ) १ आग्र्याचा ताजमहाल, २ वेरुळचीं लेणीं, ३ विजापुरचा गोलघुमट, ४ कुतुबमिनार–दिल्ली, ५ मीनाक्षी मंदिर–मदुरा, ६ श्रवणबेळगोळ (म्हैसूर राज्य) येथील गोमटेश्वरचा प्रचंड पुतळा उंची ७० फूट (या पुतळ्यावर असलेल्या आद्य ज्ञात मराठी लेखांतील 'श्री'ची उंची सुमारें दीड फूट आहे) आणि ७ चितोड येथील जयस्तंभ (१२२ फूट उंची व ९ मजल्याचा) इतका भव्य स्तंभ जगांत कोठेंहि नाहीं (वैदिक संस्कृतीचा विकास). ब्राह्मणांनीं वेदग्रंथ मुखोद्गत करून वेदांचें रक्षण केलें हें आठवें आश्चर्य आहे; (आ) १ अमृतसरचें सुवर्णमंदिर, २ म्हैसूरचें वृंदावन उद्यान, ३ काश्मीरमधील शालीमार बगीचा, ४ गिरसप्पा धबधबा (म्हैसूर राज्य), ५ अजिंठा लेणीं, ६ बावनगजा ऋषभ-देवमूर्ति (अखंड शिळेंत कोरलेली. उंची ८४ फूट. बडवानीहून ५ मैल–मध्यभारत) व ७ भाकरा–नानगल धरण (पूर्व पंजाब).

सात आसरा (अप्सरा) अथवा जलदेवता — १ मच्छी, २ कूर्मी, ३ कर्कटी, ४ दर्दुरी, ५ जतुपी, ६ सोमपा व ७ मकरी. (प्रसाद)

सात उपाय — १ साम, २ दाम, ३ भेद, ४ दंड, ५ मंत्र, ६ औषधि व ७ इंद्रजाल. हे सात उपाय राजनीतिशास्त्रांत सांगितले आहेत. (म. भा. सभा. ५-२२).

सात कसोट्या (ग्रंथतात्पर्यनिर्णयाच्या) — १ आरंभ, २ शेवट, ३ आभास म्हणजे पुनरुक्ति किंवा वारंवार काय सांगितलें आहे हें पाहणें, ४ अपूर्वता, ५ फल (ग्रंथाच्या अभ्यासाचा वाचकांवर घडलेला परिणाम), ६ अर्थवाद (पोकळ स्तुति) आणि ७ उपपात्ति (तर्कशुद्ध विचारसरणी).

उपक्रमोपसंहारौ अभ्यासोऽपूर्वताफलम् ।
अर्थवादोपपत्ती च लिंगं तात्पर्यनिर्णये ॥ (गी. र. २१).

सात कारणें (पापाचीं) — १ प्रगतीचा रूढ मार्ग बंद होणें, २ मद्यपान, ३ क्रोधी स्वभाव, ४ जुगार, ५ कामाकडे लक्ष लागेनासें होणें, ६ हीन माणूस थोर हुद्यावर येणें आणि ७ आळस वाढणें. हीं पापाकडे प्रवृत्ति होण्याचीं सात कारणें आहेत. (ऋग्वेद ७-८६-६)

सात कुलीन लक्षणें — १ तप, २ इंद्रियदमन, ३ अध्ययन, ४ अध्यापनादि कर्में, ५ पवित्र विवाह, ६ सतत अन्नदान आणि ७ सदाचरण.

सात कोंकणें (महाराष्ट्राचीं) — १ लाट, २ डांग, ३ शूर्पारक, ४ अष्टागर, ५ तळकोंकण, ६ गोमंतक आणि ७ वनवासी.

सात कोंकणें (सह्याद्रीचीं) — १ कूपक, २ केरळ, ३ मूषक, ४ आलुक, ५ प्रशु, ६ कोंकण आणि ७ परकोंकण. (प्रपंच हृदय)

सात गुण ऋषींचे — १ दीर्घजीवन, २ मंत्रसाक्षात्कार, ३ शापानुग्रहशक्ति, ४ दिव्यदृष्टि, ५ प्रबुद्धता, ६ धर्म प्रत्यक्ष दिसणें आणि ७ गोत्रप्रवर्तन.

सात गुण दूतास आवश्यक — १ कुलीनत्व, २ कुटुंबवत्सल, ३ भाषणचातुर्य, ४ दक्षता, ५ प्रियभाषित्व, ६ स्मरणशक्ति व ७ सांगितलें असेल तेंच बोलणें.

कुलीनः कुलसंपन्नो वाग्मीदक्षः प्रियंवचः ।
यथोक्तवादी स्मृतिमान्दूतः स्यात्सप्तभिर्गुणैः ॥
(म. भा. शांति ८५-२९)

सात गुण वक्ता व श्रोता या उभयतांसहि आवश्यक — १ सिंहावलोक, २ वक्ष्यमाण । ३ उपमा, ४ रूपक, ५ विशेषण । ६ उपक्रम व ७ उपसंहरण । ' हे सप्तगुण उभयांसी ॥ ' (हरिवरदा १–७७५)

सात गुण (वधूचे) — १ कुल, २ शील, ३ शरीर, ४ वय, ५ विद्या, ६ वित्त आणि ७ सनाथता.

सात गुण (वराचे) — १ कुल, २ शील, ३ पालक, ४ विद्या, ५ द्रव्य, ६ शरीर आणि ७ वय.

कुलं च शीलं च वयश्च रूपं विद्यां च वित्तं च सनाथतां च ।
एतान् गुणान् सप्त परीक्ष्य देया कन्या बुधैः शेषमचिंतनीयम् ॥ (सु.)

सात गुण (सन्मित्राचे) — १ प्रामाणिकपणा, २ औदार्य, ३ शौर्य, ४ सुखदुःखांत समरसता, ५ प्रेम, ६ दक्षता व ७ खरेपणा.

शुचित्वं त्यागिता शौर्यं सामान्यं सुखदुःखयोः ।
दाक्षिण्यं चानुरक्तिश्च सत्यता च सुहृद्गुणाः । (हितो.)

सात गुण (क्षत्रियाचे) — १ शौर्य, २ तेजस्विता, ३ मनोधैर्य, ४ कर्तव्यजागरुकता, ५ युद्धपराङ्मुख न होणें, ६ दातृत्व आणि ७ शासनप्रभुत्व. (भ. गी. १८-४३)

सात गुरु — १ मातापिता, २ सुईण (लेकरू असतांना न्हाऊंमाखूं घालते), ३ विद्यागुरु, ४ उपाध्याय, ५ ज्योतिषी, ६ गुरुमंत्र देणारा आणि ७ मोक्षदाता सद्गुरु. (सि. बो. ५०-१८)

सात गोष्टींत अनृत भाषण निंद्य होत नाहीं — १ स्त्रीला वश करतांना, २ विनोदप्रसंगीं, ३ विवाह, ४ उपजीविकेचें साधन मिळवतेवेळीं, ५ प्राणसंकट आल्यावेळीं, ६ गोब्राह्मणहितार्थ व ७ एखाद्याची हिंसा टाळण्यासाठीं.

स्त्रीषु नर्मविवाहेच वृत्त्यर्थे प्राणसंकटे ।
गोब्राह्मणार्थे हिंसायां नानृतं स्याज्जुगुप्सितम् ॥(भा.८–१९–४३)

सात गोष्टींत श्रीमद्भागवताचें सार -- १ श्रीकृष्णजन्मकथन, २ श्रीकृष्णाचें बालपण, ३ पूतनावध, ४ गोवर्धन पर्वत उचलून धरिला, ५ कंसवध, ६ कौरवांचा निःपात आणि ७ पांडवांचा प्रतिपाळ (भा.)

सात गोष्टी विद्यासंपादनास विघ्न आणणाऱ्या -- १ आळस, २ उद्धटपणा, ३ दुश्चित्तपणा, ४ गप्पेबाजी, ५ घुम्मेपणा, ६ स्वतःला सगळें येतें असा अभिमान आणि ७ दुराग्रह. (म. भा. उद्योग. ४०-५)

सात गोष्टी श्रद्धेय होत — १ मंत्र, २ तीर्थ, ३ ब्राह्मण, ४ देव, ५ ज्योतिषी, ६ औषधी व ७ गुरु.

मंत्रे तीर्थे द्विजे देवे दैवज्ञे भेषजे गुरौ ।
यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी ॥ (पंचतंत्र)

सात गोष्टी सेवेला आवश्यक — १ विश्वास, २ पवित्रता, ३ गौरव, ४ संयम, ५ शुश्रूषा, ६ प्रेम आणि ७ मधुर भाषण.

सात ग्रामवासी प्राणी — १ गाय, २ शेळी, ३ मेंढी, ४ मनुष्य, ५ घोडा, ६ खेचर आणि ७ गाढव.

गौरजानि मनुष्यश्च अश्वाश्वतरगर्दभः ।
एते ग्राम्याः समाख्याताः पशवः सप्तसाधुभिः ॥ (म. भा. भीष्म.)

सात देवता सिद्धि देणाऱ्या — १ नृसिंह, २ राम, ३ विष्णु, ४ शंकर, ५ अंबिका, ६ गजानन आणि ७ गुरु.

नृसिंहरामविष्णुश्च शंकरश्चांबिका तथा ।
गजाननेन गुरुश्चैव सप्तैते सिद्धमंत्रदाः ॥ (सु.)

सात दोष (वधूचे बाबतींत) — १ भुरे केस असलेली, २ अधिक अवयवांची, ३ असाध्य रोगग्रस्त, ४ मुळींच केस नसलेली, ५ अति केस असलेली, ६ वाचाळ आणि ७ मांजरासारखे डोळे असलेली.

नोद्वहेत्कपिलां कन्यां नाधिकाङ्गीं न रोगिणीम् ।
नालोमिकां नातिलोमां न वाचालं न पिङ्गलाम् ॥ (मनु. ३–८)

सात दोष (स्त्रियांच्या बाबतींत) — १ अनृत, २ साहस, ३ माया, ४ मूर्खत्व, ५ अति लोभ, ६ अशुचिता व ७ निदर्यत्व.

अनृतं साहसं माया मूर्खत्वमतिलोभता ।
अशौचं निदर्यत्वं च स्त्रीणां दोषाः स्वभावजाः ॥ (देवी भाग.)

सात द्वारें (उच्चार न करितां खोटें सांगण्याचीं) — १ दोन डोळे, २ दोन कान, ३ दोन नाकपुड्या व एक मुख. या सात द्वारांनीं मनांतील उद्देश खरा किंवा खोटा सांगता येतो. डोळे मिचकावणें, कानांवर हात ठेवणें, नाक वांकडें करणें, वगैरें प्रकारांनीं खोटें सांगतां अगर कळवितां येतें. (राम. गी. १५–५७)

सात पद्धति (द्रव्य मिळविण्याच्या) — १ दाय–वडिलार्जित धन, २ लाभ–निधि प्राप्त होणें, ३ क्रय–व्यापार, ४ जय (विजय), ५ प्रयोग–व्याजबट्टा, ६ कर्मयोग–शेती आणि ७ सत्परिग्रह. (मनु. १०–११५)

सात पिण्डफल वृक्ष — १ खजूर, २ ताड, ३ शिंदी, ४ ताल, ५ खजूरी, ६ पोफळ व ७ माड. हे सात पिण्डासारखीं फळें असलेले वृक्ष होत.

खर्जूरस्तालहिंतालौताली खर्जूरिकास्तथा ।
गुवाका नारिकेलश्च सप्तपिण्डफलद्रुमाः ॥ (सु.)

सात पाश — १ अहं, २ स्त्री, ३ पुत्र, ४ गृह, ५ धन, ६ स्वजन आणि ७ आशा. असे सात प्रकारचे पाश मनुष्यास असतात.

सात प्रकारचे ऋषि — १ देवर्षि, २ ब्रह्मर्षि, ३ राजर्षि, ४ महर्षि, ५ परमर्षि, ६ श्रुतर्षि आणि ७ कांडर्षि.

सात प्रकारचे गुरु — १ गुरु, २ माता, ३ पिता, ४ सूर्य, ५ चंद्र, ६ अग्नि आणि ७ मंत्रदाता. हे सात प्रकारचे गुरु होत.

' मन्त्रदाता गुरुः ख्यातः सप्तमः परिकीर्तिताः ॥ '

सात प्रकारचें जल – १ आसिजल, २ मासीजल, ३ महीजल, ४ अहीजल, ५ पाण्याजल, ६ वंजालजल आणि ७ ? सृष्टीच्या उत्पत्तिकालीं जल उत्पन्न झालें तेव्हां असें सात प्रकारचें जल होतें अशी गोंडी लोककथा आहे. (प्रतिष्ठान मार्च १९५४).

सात प्रकारचे दर्भ — १ दर्भ, २ काश (एक प्रकारचें गवत), ३ दूर्वा, ४ सातूचीं पानें, ५ व्रीहि, ६ मोळ व ७ पांढरसाळ.

कुशाः काशास्तथा दूर्वा यवपत्राणि व्रीहयः ।
बल्वजाः पुण्डरीकाश्च कुशाः सप्त प्रकीर्तिताः ॥ (पद्मसृष्टि.४९-३५)

सात प्रकारचीं दानें — १ अन्नदान, २ संपत्तिदान, ३ भूदान, ४ बुद्धिदान, ५ श्रमदान, ६ रक्तदान व ७ जीवदान.

सात प्रकारचे दुष्टजन — १ सदोदित दुष्कृत्याकडे धावणारा, २ धर्माकडे मुळींच लक्ष न देणारा, ३ झोपाळू, ४ व्यसनासक्त, ५ मद्यपि, ६ अगम्य स्त्रीशीं गमन करणारा आणि ७ सदोदित दुष्टांशीं संभाषण करणारा.

अकार्ये भ्रमते नित्यं धर्मार्थे न व्यवस्थितः ।
निद्रालुर्व्यसनासक्तो मद्यपः स्त्रीनिषेवकः ।
दुष्टैःसह सदालापः स दुष्टः सप्तधा स्मृतः ॥

(भविष्य–मध्यम ५-५४)

सात प्रकारचे देशविशेष — १ जंगली प्रदेश, २ गांव वसलेला प्रदेश, ३ डोंगराळ, ४ पाणथळीचा, ५ वाळवंटाचा, ६ पठार व ७ उंचसखल. असे युद्धशास्त्राच्या दृष्टीनें सात प्रकारचे देशविशेष होत. (कौटिल्य अधिकरण ९-१)

सात प्रकार भयाचे — १ इहलोकभय, २ परलोकभय, ३ मरण-भय, ४ वेदान्तभय, ५ अनुरक्षकभय, ६ अगुप्तभय आणि ७ अकस्मात् भय. (जैनधर्म सुधासागर)

सात प्रकारांनीं मिळालेलें धन धर्मसंमत -- १ परंपरागत म्हणजे वारसाहक्कानें मिळालेलें, २ निधिलाभ, ३ क्रयविक्रय, ४ विजय, ५ न्याय्य वृद्धि, ६ कृषि-वाणिज्य आणि ७ शास्त्रसंमत दान.

(मनु. १०-११५)

सात प्रकारचे यज्ञ — १ ब्रह्मयज्ञ, २ द्रव्ययज्ञ, ३ शरीरयज्ञ, ४ वाग्यज्ञ, ५ प्राणयज्ञ, ६ बुद्धियज्ञ आणि ७ कर्मयज्ञ.

सात प्रकारचें युद्ध — १ धनु, २ चक्र, ३ कुंत (भाला), ४ खड्ग, ५ क्षुरिका, ६ गदा आणि ७ बाहुयुद्ध. असे युद्धाचे सात प्रकार प्राचीन काळीं असत. (जामदग्न्य धनुर्वेद अ. १)

सात प्रकारच्या लज्जा -- १ जनलज्जा, २ मनलज्जा, ३ वयोलज्जा, ४ धर्मलज्जा, ५ कर्मलज्जा, ६ जातिलज्जा आणि ७ कुललज्जा.

सात प्रकारचे वायु अंतरिक्षांतले — १ प्रवह, २ आवह, ३ उद्वह, ४ संवह, ५ विवह, ६ परिवह व ७ परावह. असे अंतरिक्षांत संचरणारे वायुमंडलाचे सात मार्ग आहेत.

परावहो नाम वरो वायुः स दुरतिक्रमः ।
एवमेते दितेः पुत्रा मरुतः परमाद्भुताः ॥ (बृहन्नारदीय पूर्व ६०-३२)

सात प्रकारचे विडे — १ कातरविडा, २ कापूरविडा, ३ कुलपीविडा, ४ गोविंदविडा, ५ गोंदविडा, ६ मोडविडा आणि ७ मोदकविडा. यांखेरीज बोंडीविडा, गोपाळविडा असे आणखी कांहीं प्रकार आहेत.

सात प्रकारच्या व्याधि — १ आदिबलप्रवृत्त–आनुवंशिक, २ जन्मबलप्रवृत्त, ३ दोषबलप्रवृत्त, ४ संघातबलप्रवृत–अपघात वगैरेमुळें होणारे, ५ कालबलप्रवृत्त–स्वाभाविक ऋतुमानामुळें उत्पन्न होणारे, ६ दैवबलप्रवृत्त आणि ७ स्वभावबलप्रवृत्त म्हणजे तहान, भूक, निद्रा इत्यादि शरीरधर्मांमुळें स्वाभाविकपणें होणारे व्याधींचे सात प्रकार.
(सुश्रुत–शारीर)

सात प्रकारचें संतान — १ विहीर बांधणें, २ तलाव बांधणें, ३ उद्यान तयार करणें, ४ सभागृह बांधणें, ५ पाणपोई, ६ सत्पात्रीं धर्म व ७ पुत्रोत्पत्ति. असें सात प्रकारचें संतान म्हणून सांगितलें आहे.

कूपस्तडागमुद्यानं मंडपं च प्रपा तथा ।
सद्धर्मकरणं पुत्रः संतानं सप्तधोच्यते ॥ (वै. म. ३–३४)

सात प्रकारच्या संवेदना (मानसशास्त्र) — १ जीवनव्यापी संवेदना, २ त्वचिक संवेदना, ३ चलन-संवेदना, ४ रस-संवेदना, ५ गंध-संवेदना, ६ ध्वनि-संवेदना आणि ७ दृष्टि-संवेदना.

सात प्रकारचे साधकांचे अधिकार -- १ दीक्षा, २ महादीक्षा, ३ पुरश्चरण, ४ महापुरश्चरण, ५ आभिषेक, ६ महाभिषेक व ७ तद्भाव.

सात प्रकारचे स्वर काढणारे सात प्राणी — १ षड्ज–मयूर, २ रिषभ-वृषभ, ३ गंधार–अज, ४ मध्यम–क्रौंच, ५ पंचम–कोकिळा, ६ धैवत–हय आणि ७ निषाद–गज. सा, री, ग, म, प, ध, नी–या सप्त स्वरांची पुरातन शास्त्रीय उपपत्ति अशी मानिली आहे. (गायनाचार्य माला)

सात प्रमुख धर्म (जगांतील) — १ वैदिक धर्म (सनातन), २ कन्फ्यूशियस (चीन), ३ जैन धर्म, ४ बौद्ध धर्म, ५ झरतुष्ट्र धर्म, ६ खिस्ती धर्म व ७ महमदी धर्म.

सात प्रमुख पद्धति योगाच्या — १ हठयोग, २ भक्तियोग, ३ मंत्रयोग, ४ कर्मयोग, ५ ज्ञानयोग, ६ राजयोग व ७ लयक्रियायोग. (Yoga explained)

सात प्रलयकालचे मेघ — १ संवर्त, २ भीमनाद, ३ द्रोण, ४ चंड, ५ बलाहक, ६ विद्युत्पताक व ७ शोण. (मत्स्य २-८)

सात प्रसंगीं वपन विहित आहे — १ गंगातीरीं, २ भास्कर-क्षेत्रांत, ३ माता, ४ पिता, ५ गुरु यांच्या निधन प्रसंगीं, ६ अग्न्या-धानकाळीं व ७ सोमयाग. अशा सात प्रसंगीं धर्मशास्त्रानें वपन विहित मानिलें आहे.

गङ्गायां भास्कर[1]क्षेत्रे मातापित्रोर्गुरोर्मृतौ ।
आधानकाले सोमे च वपनं सप्त सुस्मृतम् ॥ (मिताक्षरा ३-१०)

सात मित्रदूषणें — १ गुह्य प्रकट करणें, २ याचना, ३ निष्ठुरता धरणें, ४ चंचल स्वभाव, ५ राग, ६ खोटें भाषण आणि ७ जुगार.

रहस्यभेदोयाच्ञा च नैष्ठुर्यं चलचित्तता ।
क्रोधो निःसत्यता द्यूतमेतान्मित्रदूषणम् ॥ (सु.)

सात मुद्रा — १ खेचरी, २ भूचरी, ३ चाचरी, ४ अलक्ष, ५ अगोचरी, ६ त्राटक आणि ७ षण्मुखी मुद्रा. (योगशास्त्र)

सात मोक्षधर्मप्रवर्तक — १ सन, २ सनत्सुजात, ३ सनक, ४ सनंदन, ५ सनत्कुमार, ६ कपिल आणि ७ सनातन. हे सात प्रमुख सांख्यज्ञानविशारद व मोक्षधर्मप्रवर्तक होत.

एते योगविदो मुख्याः सांख्यज्ञानविशारदाः ।
आचार्या धर्मशास्त्रेषु मोक्षधर्मप्रवर्तकाः ॥ (सु.).

---

१. भारतांत भास्करक्षेत्रें दहा आहेत. तीं १० अंकाखालीं पाहा.

सात मौक्तिक स्थानें — १ शिंपा, २ डुकराचें मस्तक, ३ सर्प-मस्तक, ४ शंख, ५ मत्स्य, ६ बेडूक आणि ७ हत्ती. (मु. व्यवहार कोश)

सात मंत्रसिद्धीचे उपाय — १ भ्रामण, २ रोधन, ३ वश्य, ४ पीडन, ५ पोषण, ६ शोषण आणि ७ दाहन. (कल्याण साधनांक)

सात यज्ञ — १ अग्निष्टोम, २ अश्वमेध, ३ बहुसुवर्णक, ४ राजसूय, ५ गोमेध, ६ वैष्णव आणि ७ माहेश्वर. असे सात प्रकारचे यज्ञ करून रावणपुत्र इंद्रजितानें सिद्धि मिळविली होती. (भा. रा. उत्तर. अ. २९)

सात रथी यादव सैन्यांतील — १ चारुदेष्ण, २ चक्रदेव, ३ सात्यकि, ४ श्रीकृष्ण, ५ बलराम, ६ सांब व ७ प्रद्युम्न. (म. भा. सभा. १४।५८)

सात महारथी यादव सैन्यांतील — १ कृतवर्मा, २ अनाधृष्टि, ३ समीक, ४ समितिंजय, ५ कंक, ६ शंकु व ७ कुंति. (म. भा. सभा. १४।५९).

सात रानधान्यें — १ कुलित्थक – कुळीथ, २ श्यामक – सांवे, ३ नीवार – देवसाळी, ४ जर्तिल – रानतीळ, ५ गवेधुक – तृण-धान्य, ६ वेणुयन – वेळूचें बीं आणि ७ मर्कटक – एक प्रकारचें धान्य. (वि. पु.)

सात रुद्रगण — १ शंकुकर्ण, २ महाकर्ण, ३ कुंभकर्ण, ४ सागरा-लय, ५ गजेंद्रकर्ण, ६ गोकर्ण आणि ७ पाणिकर्ण. असे सात रुद्रगण आहेत. परंतु शंकराशीं अभिन्न असल्यामुळें त्यांचींच नांवें शंकरास दिलीं आहेत.

सात रेषा (हस्तसामुद्रिक शास्त्रांत) — (अ) १ आयुष्यरेषा, २ मस्तकरेषा, ३ अंतःकरणरेषा, ४ धनरेषा, ५ आरोग्यरेषा, ६ रविरेषा आणि ७ मन्मथ (विवाह) रेषा. अशा हातावरील रेषा हस्तसामुद्रिकांत सांगितल्या आहेत (ब्रह्मलिखित); (आ) १ आयुष्यरेषा, २ मस्तकरेषा, ३ अंतःकरणरेषा, ४ भाग्यरेषा, ५ विद्यारेषा, ६ बुधरेषा आणि ७ चंद्ररेषा.

सात ललितकला — १ काव्य, २ गायन, ३ चित्रकला, ४ मूर्तिकला, ५ वास्तुकला, ६ नर्तनकला व ७ नाट्यकला. अनेक माणसें एकसमयावच्छेदेंकरून जिचा आस्वाद घेऊं शकतात ती ललितकला.

सात वस्तूंचा संग्रह कोठूनहि करावा — १ स्त्रिया, २ रत्नें, ३ विद्या, ४ धर्म, ५ सदाचार, ६ सुभाषित आणि ७ विविधकला.

स्त्रियो रत्नान्यथो विद्या धर्मः शौचं सुभाषितम् ।
विविधानि च शिल्पानि समादेयानि सर्वतः ॥ (मनु. २-२४०)

सात वार — १ रविवार, २ सोमवार, ३ मंगळवार, ४ बुधवार, ५ गुरुवार, ६ शुक्रवार आणि ७ शनिवार.

आदित्यः सोमो भौमश्च तथा बुधबृहस्पतिः ।
भार्गवः शनैश्चरश्चैव एते सप्तदिनाधिपाः ॥ (अथर्व ज्योतिष)

याच अर्थाचीं वारांचीं नांवें सर्व भाषांतून सर्वत्र आढळतात.

सात वैदिक छंद — १ गायत्री, २ उष्णिह्, ३ अनुष्टुभ् , ४ बृहती, ५ पंक्ति, ६ त्रिष्टुभ् आणि ७ जगती. छंद याचा अर्थ " मनाला प्रसन्न करणारें गानामध्यें रुचिर असें वृत्ताचें रूप."

सात वैदिक देणग्या (वेदमातेच्या) — १ आयु, २ प्राण, ३ प्रजा, ४ पशु, ५ कीर्ति, ६ द्रविणं (धन) आणि ७ ब्रह्मवर्चसम् (ब्रह्मतेज).

सात व्यसनें राज्यशासकांनीं त्यागावींत — १ कटु भाषण, २ कठोर दंड करणें. ३ धनाचा अपव्यय, ४ मद्यपान, ५ स्त्रियांसंबंधीं आसक्ति, ६ शिकारींत कालहरण व ७ जुगार.

सात शल्यें — (अ) १ दिवसाचा निस्तेज चंद्र, २ यौवन संपलेली स्त्री, ३ कमलहीन सरोवर, ४ निरक्षर सुंदर मुख, ५ द्रव्यलोभी प्रभु अथवा धनी, ६ दारिद्र्य असलेला सज्जन आणि ७ राजगृहांत दुर्जनांचा प्रवेश. हीं सात शल्यें होत.

शशी दिवसधूसरो गलितयौवना कामिनी
सरो विगतवारिजं मुखमनक्षरं स्वाकृतेः ।
प्रभुर्धनपरायणः सततदुर्गतः सज्जनो
नृपाङ्गनतः खलो मनसि सप्त शल्यानि मे ॥ (भ.नी.५६)

(आ) १ समाजकंटकापासून होणारा उपद्रव, २ गर्विष्ठ लोकांचा उद्दामपणा, ३ प्रेमभंगामुळें होणाऱ्या मानसिक वेदना, ४ न्यायाच्या कामीं लागणारा विलंब, ५ अधिकाऱ्यांचें उद्दाम आचरण, ६ सहनशील गुणी माणसांना अज्ञ लोकांकडून मिळणारे लत्ताप्रहार व ७ दुर्वह प्रपंच-भार डोकीवर घेऊन दुःसह आयुष्य कंठण्याचा प्रसंग. (हॅम्लेट अंक ३)

सात शारीर–संस्था–१ अस्थिसंस्था, २ स्नायुसंस्था, ३ अभिसरण-संस्था, ४ श्वसनसंस्था, ५ पचनसंस्था, ६ उत्सर्जकसंस्था व ७ मज्जासंस्था.

अस्थि स्नायूचाभिसरणं श्वसनं पचनं तथा ।
उत्सर्जकं च मज्जा च सप्त संस्था विशेषतः ॥ (सु.)

सात षड्गुणसंपन्न भगवद्भक्त – १ वसिष्ठ, २ वामदेव, ३ नारद, ४ व्यास, ५ वाल्मीकि, ६ प्रल्हाद आणि ७ शुक्राचार्य. (चतुःश्लोकी भागवत)

सात 'स'कार दुर्लभ — १ संपत्ति, २ सरस्वती, ३ सत्य (सचोटी), ४ संतति, ५ सदनुग्रह, ६ सत्ता आणि ७ सुकृतसंचय.

'सत्तासुकृतसंभारः सकाराः सप्त दुर्लभाः ।' (सु.)

सात सत्याग्रही (रामायणकालीन) — १ विश्वामित्र, २ सीतामाई, ३ लक्ष्मण, ४ केवट, ५ भरत, ६ श्रीराम आणि ७ शम्बूक. या सातांनीं आपल्या ध्येयसिद्धीसाठीं सत्याग्रह केला होता. (कल्याण–रामायणांक).

सात सहज प्रेरणा — १ प्रेप्सा–आशा, २ जिहासा–जगण्याची इच्छा, ३ चिकीर्षा–करण्याची इच्छा, ४ जिज्ञासा, ५ शोक, ६ भय आणि ७ अतृप्ति. या सात सहज प्रेरणा होत. (पातंजल योगसूत्रें)

सात साधनें उत्कर्षप्राप्तीचीं — १ उद्योग, २ स्वार्थत्याग, ३ अहंपणाचा विसर, ४ विश्वव्यापक प्रेम, ५ उल्हास, ६ निर्भयता व ७ स्वावलंबन. (स्वामी रामतीर्थ)

सात साधनें कीर्तीचीं – १ दान, २ पुण्य, ३ विद्या, ४ वक्तृत्व, ५ काव्य, ६ अर्जव व ७ शौर्य.

सात सिद्धान्त — १ पांचरात्र सिद्धान्त, २ कापिल सिद्धान्त, ३ अपान्तरतम सिद्धान्त, ४ ब्राह्मिष्ठ सिद्धान्त, ५ पाशुपत सिद्धान्त, ६ हैरण्यगर्भ सिद्धान्त आणि ७ शिवसिद्धान्त. प्राचीन चौदा विद्यांखेरीज हे सात स्वतंत्र सिद्धान्त मानले आहेत. (कल्याण–हिन्दु संस्कृति अंक).

सात सिद्धमंत्र — १ नृसिंह, २ राम, ३ विष्णु, ४ शंकर, ५ देवी, ६ गणेश व ७ गुरु.

नृसिंह राम विष्णुश्च शंकरश्चाम्बिका तथा ।
गजाननो गुरुश्चैव सप्तैते सिद्धमंत्रदाः ॥ (सु.).

सात सौभाग्य द्रव्यें — १ हळद, २ कुंकू, ३ शेंदूर, ४ काजळ, ५ गळसरी, ६ मंगळसूत्र आणि ७ चुडा.

हरिद्राकुंकुमश्चैव सिंदुरादिसमन्वितम् ।
कज्जलं कंठसूत्रं च सौभाग्यद्रव्यमुच्यते ॥ (वार्षिक व्रतपूजाविधि)

सात संकटें (शेतीला) — १ अतिवृष्टि, २ अनावृष्टि, ३ उंदीर फार होणें, ४ टोळधाड, ५ पांखरांचा उपद्रव, ६ स्वसैन्याकडून अथवा ७ परसैन्याकडून लुटालूट.

अतिवृष्टिरनावृष्टिः शलभा मूषकाः शुकाः ।
स्वचक्रं परचक्रं च सप्तैता ईतयः स्मृताः ॥ (सु.)

सात स्त्रीजातीय विभूति – १ कीर्ति, २ संपत्ति, ३ वाणी, ४ स्मृति, ५ बुद्धि, ६ धैर्य आणि ७ क्षमा. या सात स्त्रीजातींतील सात विभूति (परमेश्वरी अंश) होत.

एवं नारी माझारी । या सातहि शक्ति अवधारी ॥
ऐसे संसार गजकेसरी । म्हणतां जाहला ॥ (ज्ञा. १०·२८०)

सात स्वदेशी शृंखला (सावरकरप्रणीत) — १ वेदोक्तबंदी, २ व्यवसायबंदी, ३ स्पर्शबंदी, ४ सिंधुबंदी, ५ शुद्धिबंदी, ६ रोटीबंदी, आणि ७ बेटीबंदी. महान् हिंदु राष्ट्राच्या एकतेला बाध आणणाऱ्या पण समाजांत फार खोलवर रुजलेल्या या सात बंद्या अथवा सात शृंखलाच होत. त्या उच्छेदून टाकल्याच पाहिजेत, असें स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीं आग्रहानें प्रतिपादिलें आहे.

सात स्वातंत्र्यें — १ भाषण-स्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य, २ शांततेनें शस्त्राशिवाय एकत्र जमणें, ३ संस्था व संघस्वातंत्र्य, ४ संचारस्वातंत्र्य, ५ वास्तव्य-स्वातंत्र्य, ६ संपत्तीचें संपादन, धारण व वासलात लावणें आणि ७ व्यवसाय-स्वातंत्र्य. हीं सात स्वातंत्र्यें भारतीय नागरिकांना घटनेनें दिलीं आहेत. (हिन्दी राज्यघटना)

सात होम द्रव्यें — १ समिधा, २ तूप, ३ चरु (भात), ४ लाह्या, ५ मोहरी, ६ यव आणि ७ तीळ. हीं सात प्रकारचीं द्रव्यें हवनीय होत.

सातजण आश्रयास अपात्र — १ निरुद्योगी, २ अधाशी, ३ लोकांच्या द्वेषास पात्र झालेला, ४ कपटी, ५ निर्दय, ६ देशकाल न जाणणारा आणि ७ अनिष्ट वेष धारण करणारा. (म.भा.उद्योग३७-३५)

सातजण झोपले तरीहि जागृत करावे — १ विद्यार्थी, २ सेवक, ३ मार्गस्थ, ४ भुकेलेला, ५ भयभीत, ६ कोठीवाला आणि ७ राखणदार.

विद्यार्थी सेवकः पांथः क्षुधार्थी भयकातरः ।
भाण्डारी प्रतिहारी च सप्त सुप्तान्प्रबोधयेत् ॥ (वृ. चा. ९–६)

सातजण परभक्षक होत — १ माश्या, २ डांस, ३ वेश्या, ४ उंदीर, ५ याचक, ६ ग्रामाधिकारी आणि ७ ज्योतिषी.

मक्षिकामशकोवेश्या मूषको याचकस्तथा ।
ग्रामणीर्गणकश्चैव सप्तैते परभक्षकाः ॥ (सौर. ६८–१८)

सातजण पित्यासमान — १ जन्म देणारा, ६ पालन करणारा, ३ सासरा, ४ थोरला भाऊ, ५ मंत्रदीक्षा देणारा, ६ अभय देणारा व ७ ज्ञान देणारा. (तत्त्व-निज-विवेक)

सातजणांमुळें पृथ्वीची धारणा होते — १ गाय, २ ब्राह्मण, ३ वेद, ४ सती स्त्री, ५ सत्यवादी पुरुष, ६ लोभहीन मनुष्य व ७ दानशूर.

गोभिर्विप्रैश्च वेदैश्च सतीभिः सत्यवादिभिः ।
अलुब्धैर्दानशीलैश्च सप्तभिर्धार्यते मही ॥ (स्कंद माहेश्वर २-७१)

सातजण सत्कर्मी क्षीण झाल्यामुळें अधिक शोभतात — १ सहाणेवर घासलेला हिरा, २ जखमी झालेला पराक्रमी असा शूर, ३ मदस्रावानें क्षीण झालेला हत्ती, ४ शरदृतूंत ओसरलेल्या नद्या, ५ प्रतिपदेचा चंद्र, ६ सुरतश्रमानें म्लान झालेली नवयौवना आणि ७ दान दिल्यामुळें धनहीन झालेले दाते.

मणिः शाणोल्लीढः समरविजयी हेतिनिहतो
मदक्षीणो नागः शरदि सरितः श्यानपुलिनाः ॥
कलाशेषश्चन्द्रः सुरतमृदिता बालललना-
स्तानिम्ना शोभन्ते गलितविभवाश्चार्थिषु जनाः ॥ (भर्तृ. नीति. ४४)

सातजण साक्षीस वर्ज्य — १ सामुद्रिक जाणणारा, २ पूर्वीचा चोर पण नंतर व्यापारी बनलेला, ३ शकुन वगैरे सांगून दुसऱ्यास फसविणारा, ४ वैद्य, ५ शत्रु, ६ मित्र आणि ७ नट. (म. भा. उद्योग ३५-४४)

सातजणी मातेसमान — १ जन्मदात्री, २ गुरुपत्नी, ३ ब्राह्मणी, ४ राजपत्नी, ५ गाय, ६ दाई व ७ मातृभूमि. (तत्त्व-निज-विवेक)

७॥

साडेसाती — एखाद्याची जन्मराशी व तिची मागची व पुढची या तीन राशी क्रमण्याला शनिग्रहाला लागणारा प्रत्येक राशीला अडीच वर्षें याप्रमाणें साडेसात वर्षांचा काल.

८

अष्ट अभिमानस्थानें — (अ) १ कुळ, २ रूप, ३ तारुण्य, ४ गर्व, ५ तप, ६ संपत्ति, ७ राज्य (अधिकार) आणि ८ विद्या; (आ) जात्यभिमान, २ कर्माभिमान, ३ विद्याभिमान, ४ धनाभिमान, ५ मूर्खपणाचा अभिमान, ३ बलाभिमान, ७ मद्यप्राशन आणि ८ अहंकार.

सातवी मद्य प्राशनाची मस्ती ।
आठवी मस्ती मीपणाची ॥ (सि. बो. ४७–७७)

अष्ट अमात्य (रामायणकालीन) — १ धृष्टि, २ जयंत, ३ विजय, ४ सुराष्ट्र, ५ राष्ट्रवर्धन, ६ अकोप, ७ धर्मपाल आणि ८ सुमंत्र.

धृष्टिर्जयन्तो विजयः सुराष्ट्रो राष्ट्रवर्धनः ।
अकोपो धर्मपालश्च सुमन्त्रश्चाष्टमोऽर्थवित् ॥ (वा. रा. बाल. ७–३)

अष्ट आत्मगुण — १ अनसूया – निर्मत्सरता, २ भूतदया, ३ सहनशक्ति, ४ अनायास–क्षुद्र कामासाठीं शरिरास कष्ट न देणें, ५ मांगल्य, ६ दैन्यवाणें नसणें, ७ अंतर्बाह्य–पवित्रता आणि ८ अभिलाष-बुद्धि नसणें. (भ. ब्राह्म.)

अष्ट आयुधें (श्रीकृष्णाचीं) — १ शंख, २ चक्र, ३ गदा, ४ पद्म, ५ गोशृंग, ६ गोवर्धन, ७ पांवा व ८ मुरली. भागवतांत वर्णन केल्याप्रमाणें ही अशी अष्टभुजा असलेली मूर्ति मोहाडी (जि. नाशिक) येथें आहे. (केसरी १४–९–५६)

अष्ट आयुधें (देवीचीं) — १ खड्ग, २ शूल, ३ गदा, ४ चक्र, ५ शंख, ६ धनुर्बाण, ७ भुशुंडी व ८ परिघ. (दुर्गा सप्तशती १–८०)

अष्ट आय (आकार–स्वरूप) — १ ध्वज, २ धूम, ३ सिंह, ४ श्वान, ५ वृषभ, ६ खर, ७ गज आणि ८ उंट. जागेच्या लांबीरुंदीच्या गुणाकारास आठानें भागून जी बाकी (जो अंक) राहील तीस आय म्हणतात. वास्तूसाठीं नियोजिलेल्या क्षेत्राच्या क्षेत्रफळास आठांनीं भागून जो शेष राहतो त्यास आय म्हणतात. असे आय आठ आहेत. (शिल्पशास्त्र)

सभा रचिली येवेळीं । आठही आय साधिलें तळीं ।
अष्टदिक्पाळ महाबळी । पायाचे मुळीं स्थापिले (पां. प्र. १५-२५)

ध्वजो धूमश्च सिंहश्च शुनको वृषभस्तथा ।
खरश्चैव गजश्चैव वायसो वास्तु योनयः ॥ (पाशुपत तंत्र समुच्चय)

अष्ट उपांगें (वेदाचीं) — १ प्रातिपद–व्याकरण, २ अनुपद, ३ छंद, ४ भाषा, ५ धर्म, ६ मीमांसा, ७ न्याय आणि ८ कर्मसंहिता.

अष्ट उपद्वीपें — १ स्वर्णप्रस्थ, २ शुक्र, ३ आवर्तन, ४ रमणक, ५ मंदर हरिण, ६ पांचजन्य, ७ सिंहल आणि ८ लंका. हीं आठ उपद्वीपें जंबुद्वीपाच्या आसमंतात् क्षार समुद्रांत आहेत. (भाग.स्कंध५अ.१९)

अष्ट उपरस —(अ) १ गंधक, २ गेरु, ३ हिराकस, ४ तुरटी, ५ हरताळ, ६ मनशीळ, ७ अंजन आणि ८ कुकुष्ट. (र. र. समुच्चय); (आ) १ हिराकस, २ गेरु, ३ शिलाजित, ४ सुर्मा, ५ गंधक, ६ हरताळ, ७ तुरटी आणि ८ रसकापूर. (रसायनसार)

अष्टाध्यायी — पाणिनीकृत व्याकरण सूत्रांचे आठ अध्याय.

अष्ट ऐश्वर्यें — १ दासदासी, २ नौकर, ३ पुत्र, ४ बंधुवर्ग, ५ वास्तु, ६ वाहन, ७ धन आणि ८ धान्य.

दासीभृत्यः सुतो बंधुवर्गास्तु वाहनमेव च ।
धनं धान्यमिदं प्रोक्तमष्टैश्वर्यं प्रकीर्तितम् ॥ (सु.)

अष्ट कमल (हठयोग) — १ मूलाधार, २ विशुद्ध, ३ मणिपूर, ४ स्वाधिष्ठानचक्र, ५ अनाहत, ६ आज्ञाचक्र, ७ सहस्रारचक्र आणि ८ ब्रह्मरंध्र. हठयोगांत मूलाधारापासून कपाळापर्यंत भिन्न भिन्न स्थानीं हीं आठ कमलें मानलीं गेलीं आहेत.| त्यांस अष्ट कमल म्हणतात.

अष्ट कुलाचल — १ नील, २ निषध, ३ विंध्याचल, ४ माल्यवान्, ५ मलय, ६ गंधमादन, ७ हेमकूट आणि ८ हिमालय.

अष्ट कृष्ण – १ श्रीनाथ, २ नवनीतप्रिय, ३ मथुरानाथ, ४ विठ्ठलनाथ, ५ द्वारकानाथ, ६ गोकुळनाथ, ७ गोकुळचंद्रमा आणि ८ मनमोहन. अशा श्रीकृष्णाच्या आठ प्रतिमांस वल्लभ संप्रदायांत अष्टकृष्ण अशी संज्ञा आहे. (आदर्श हिंदी शब्दकोश)

अष्ट गणेश – १ विनायक, २ विघ्नराज, ३ द्वैमातुर, ४ गणाधिप, ५ एकदंत, ६ हेरंब, ७ लंबोदर आणि ८ गजानन. (अमरकोश)

अष्टगंध -- (अ) १ चंदन, २ अगरु, ३ देवदार, ४ कोष्टकोळींजन, ५ कुसुम, ६ शैलज, ७ जटामांसी आणि ८ सुरगोरोचन. हीं आठ सुगंधी द्रव्यें एकत्र करून केलेलें गंध; (आ) १ कस्तुरी, २ केशर, ३ कृष्णागरु, ४ गोरोचन, ५ चंदन, ६ रक्तचंदन, ७ गोपीचंदन

आणि ८ मलयागर; (इ) (देवीचें) — १ अगरु, २ कस्तुरी, ३ गोरोचन, ४ कुंकू, ५ जटामांसी, ६ नखला, ७ चंदन आणि ८ तगराचें गंध.

' अष्टम तगराचें गंध जाण । गंधाष्टक देवीचें ' ॥ (देवीमाहात्म्य.)

अष्टगुण (बुद्धीचे) — १ शुश्रूषा, २ श्रवण, ३ ग्रहण, ४ धारण, ५ चिंतन, ६ ऊहापोह, ७ अर्थविज्ञान आणि ८ तत्त्वज्ञान.

शुश्रूषा श्रवणं चैव ग्रहणं धारणं तथा ।
ऊहापोहोऽर्थविज्ञानं तत्त्वज्ञानं च धीगुणाः ॥ (का. नीति.)

अष्ट छाप—१ सूरदास, २ कृष्णदास, ३ परमानंददास, ४ कुंभनदास, ५ चतुर्भुजदास, ६ छीतस्वामी, ७ नंददास व ८ गोविंदस्वामी. हे श्रीवल्लभाचार्यांचे प्रमुख शिष्य व आचार्य होत. यांना अष्ट छाप असें म्हणतात.

अष्ट तैल — १ कुसुंब – करडी, २ अतसी – जवस, ३ सर्षप – मोहरी, ४ शिरस, ५ नारळ, ६ करंज, ७ मधु आणि ८ खसखस.

अष्ट दर्शन —(अ) १ गुरु, २ भाग्यवान, ३ दाता, ४ कामधेनु, ५ आरसा, ६ प्रभु, ७ सूर्य आणि ८ ईश्वर. (पांडवप्रताप); (आ) १ दहीं, २ तूप, ३ आरसा, ४ मोहऱ्या, ५ बैल, ६ गोरोचन, ७ सुवर्ण आणि ८ पुष्पमाला.

अष्ट द्वारपाल (श्रीविष्णूचे) — १ जय, २ विजय, ३ प्रचंड, ४ चंड, ५ नंद, ६ सुनंद, ७ कुमुद आणि ८ कुमुदाक्ष.

नंदसुनंदः कुमुदः कुमुदाक्षस्तथैवच ।
अष्टैहि द्वारपालाश्च कालाद्या अपि पार्षदाः ॥ (गरुड ब्रह्मकांड १७-२)

अष्ट द्वारपाल (श्रीशिवाचे) — १ नंदी, २ भृंगी, ३ रट, ४ स्कंद, ५ गणेश, ६ उमामहेश्वर, ७ वृषभ आणि ८ महाकाल. (बृ. ना. पूर्व ६६–८३)

अष्ट दिक्पाल — आठ दिशा पालन करणाऱ्या देवता. १ पूर्वेस–इंद्र, २ आग्नेयीचा–अग्नि, ३ दक्षिणेचा-यम, ४ नर्ऋत्येचा–निर्ऋति, ५ पश्चिमेचा–वरुण, ६ वायव्येचा–मरुत्. ७ उत्तरेचा–कुबेर आणि ८ ईशान्येचा–ईश. हे अष्ट दिक्पाल होत. (अमरकोश)

अष्ट दिग्गज — १ ऐरावत, २ पुंडरीक, ३ वामन, ४ कुमुद, ५ अंजन, ६ पुष्पदंत, ७ सार्वभौम आणि ८ सुप्रतिक. असे आठ दिशांस ज्यांच्या आधारावर हें सर्व ब्रह्मांड स्थिर होऊन राहिलें आहे असे आठ हत्ती आहेत. (बृहन्नारदीय)

अष्ट दिशा — १ पूर्व, २ आग्नेय, ३ दक्षिण, ४ नैर्ऋत्य, ५ पश्चिम, ६ वायव्य, ७ उत्तर आणि ८ ईशान्य.

अष्ट देवयोनि — (अ) १ ब्रह्मा, २ प्रजापति, ३ देव, ४ गंधर्व, ५ यक्ष, ६ राक्षस, ७ पितर आणि ८ पिशाच्च; (आ) १ किन्नर, २ चारण, ३ यक्ष, ४ विद्याधर, ५ गंधर्व, ६ सिद्ध, ७ योगी आणि ८ मुनि. (तुलसी शब्दप्रकाश)

विद्याधरोप्सरो यक्ष रक्षो गंधर्वकिन्नराः ।
पिशाचो गुह्यकः सिद्धो भूतोऽमि देवयोनयः ॥ (अमरकोश)

अष्ट देवांगना — १ उर्वशी, २ मेनका, ३ रंभा, ४ पूर्वचित्ती, ५ स्वयंप्रभा, ६ भिन्नकेशी, ७ जनवल्लभा आणि ८ घृताची (तिलोत्तमा).

अष्टदेह – १ स्थूल, २ सूक्ष्म, ३ कारण, ४ महाकारण, ५ विराट, ६ हिरण्य, ७ व्याकृत व ८ मूळ प्रकृति.

अष्ट दोष (जैन धर्म) —१ शंका, २ कांक्षा, ३ विचिकित्सा, ४ मूढ दृष्टि, ५ अनुपगूहन, ६ अवात्सल्य, ७ अस्मितिकरण आणि ८ अप्रभावना.

अष्टधातु — १ सोनें, २ रुपें, ३ तांबें, ४ कथील, ५ शिसें, ६ पितळ, ७ लोखंड आणि ८ तिखें (पोलाद).

अष्ट धामें श्रीविष्णूचीं स्थानें — १ त्रिजुगी नारायण–हिमालय, २ मुक्तिनाथ – नेपाळ, ३ बद्रीनाथ, ४ जगन्नाथपुरी, ५ रंगनाथ–श्रीरंगम्, ६ गया, ७ पंढरपूर आणि ८ तिरुपती.

अष्टधा प्रकृति — १ प्रकृति, २ महत्तत्त्व, ३ अहंकार, ४ शब्द, ५ स्पर्श, ६ रस, ७ रूप आणि ८ गंध. या अष्टधा प्रकृतीपासून ब्रह्मांड-कोश उत्पन्न झाला. (भागवत स्कंध ३ अ. ११ तळटीप)

अष्ट (देह) प्रकृति — १ पृथ्वी, २ आप, ३ तेज, ४ वायु, ५ आकाश, ६ मन, ७ बुद्धि आणि ८ अहंकार.

आप तेज गगन । मही मारुत मन ॥
बुद्धि अहंकार हे भिन्न । आठै भाग ॥ (ज्ञा. ७–१८)

अष्ट नाग — १ अनंत, २ वासुकि, ३ तक्षक, ४ कर्कोटक, ५ शंख, ६ कुलिक, ७ पद्म आणि ८ महापद्म. अशीं नागजातीचीं आठ कुलें.

अष्टनायिका (अ) (**श्रीकृष्ण स्त्रिया**) — १ रुक्मिणी, २ सत्यभामा, ३ जांबवंती, ४ कालिंदी, ५ मित्रविंदा, ६ याज्ञजिती, ७ भद्रा आणि ८ लक्ष्मणा; (आ) **साहित्यांतील** — १ वासकसज्जा, २ विरहोत्कंठिता, ३ स्वाधीनभर्तृका, ४ कलहांतरिता, ५ खंडिता, ६ विप्रलब्धा, ७ प्रोषितभर्तृका आणि ८ अभिसारिका; (इ) १ गुप्ता, २ विदग्धा, ३ लक्षिता, ४ कुलटा, ५ अनुसमना, ६ मुदिता, ७ कन्यका आणि ८ सामान्या; (ई) १ स्वीया, २ परकीया, ३ वेश्या, ४ मुग्धा, ५ प्रौढा, ६ मध्या, ७ मानववती व ८ धीरा. (शृंगारनायिका)

नायिकांचे एकंदर ११५२ प्रकार भानुभट्टकृत रसमंजिरींत वर्णिलेले असून त्यांतील या प्रमुख आठ प्रकारच्या नायिका होत. (नाट्यशास्त्र)

अष्ट पाश — (अ) १ घृणा (दया), २ शंका, ३ भय, ४ लज्जा, ५ जुगुप्सा (निंदा), ६ कुल, ७ शील आणि ८ जाती.

घृणाशङ्का भयं लज्जा जुगुप्सा चेति पञ्चमी ।
कुलशीलं च मानं च अष्टौ पाशाः प्रकीर्तिताः ॥ (सु.)

(आ) १ आशा, २ भय, ३ लज्जा, ४ भीति, ५ जुगुप्सा, ६ काम, ७ क्रोध आणि ८ अतिलोभ. (वेदान्तसूर्य)

अष्टपुत्रा सौभाग्यवती भव — विवाहित सौभाग्यसंपन्न स्त्रीस आशीर्वाद देण्याविषयींचा संकेत. स्त्रीस किमान आठ पुत्र व्हावेत अशी वैदिक ऋषींची मागणी असे.

अष्टपुत्रा भवत्यं च सुभगा च पतिव्रता । (ऋग्वेद आठवें अष्टक)

अष्ट पुष्पें (पूजेचीं) — १ अहिंसा, २ इंद्रियसंयम, ३ भूतदया, ४ क्षमा, ५ शम, ६ दम, ७ ध्यान, ८ सत्य. या आठ पुष्पांनीं केलेली पूजा भगवंताला प्रिय आहे.

अष्ट प्रकार (गणिताचे) — १ संकलन–मिळवणी, २ वेवकलन–वजाबाकी, ३ गुणन–गुणाकार, ४ भाजन–भागाकार, ५ वर्ग, ६ वर्गमूळ, ७ घन व ८ घनमूळ. असे गणिताचे आठ प्रकार आहेत. त्यास गणिताचें परिकर्माष्टक म्हणतात.

अष्ट प्रतिमा — १ शिला, २ मृत्तिका, ३ धातु, ४ रत्न, ५ काष्ठ, ६ वालुका, ७ चित्रलेखन आणि ८ मनोमय. अशा आठ प्रकारांनीं प्रतिमापूजन करतां येतें. (देवीमाहात्म्य)

अष्ट प्रधान (शिवनिर्मित) — १ पंतप्रधान, २ पंत अमात्य, ३ पंतसचिव, ४ मंत्री, ५ सुमंत, ६ सेनापति, ७ न्यायाधीश आणि ८ पंडितराव.

अष्ट भाव — १ धर्म, २ ज्ञान, ३ वैराग्य, ४ ऐश्वर्य, ५ अधर्म, ६ अज्ञान, ७ अवैराग्य (राग) आणि ८ अनैश्वर्य. (शांकरभाष्य)

अष्ट भैरव — भैरव म्हणजे भयंकर, शिवाचें एक नांव आहे. (अ) १ असितांग, २ संहार, ३ रुरु भैरव, ४ काल, ५ क्रोध, ६ ताम्रचूड, ७ चंद्रचूड आणि ८ महाभैरव. हीं शिवगणांतील देवतेचीं आठ स्वरूपें होत; (आ) १ असितांग, २ रुरु, ३ चुणभैरव, ४ क्रोध, ५ उन्मत्त भैरव, ६ कपाल भैरव, ७ भीषण आणि ८ संहार भैरव. (ब्रह्मवैवर्त)

अष्ट भोग — (अ) १ सुगंध, २ स्त्री, ३ वस्त्र, ४ गायन, ५ तांबूल, ६ भोजन, ७ शय्या आणि ८ पुष्पें.

सुगंधं वनिता वस्त्रं गीतं तांबूलभोजनम् ।
शय्या च कुसुमं चैव भोगाष्टकमुदाहृतम् ॥ (कायस्थप्रदीप)

(आ) १ अन्न, २ उदक, ३ तांबूल, ४ पुष्प, ५ चंदन, ६ वसन, ७ शय्या आणि ८ अलंकार.

अष्ट मद — (जैन धर्म) (अ) १ ज्ञानमद, २ पूजामद, ३ शरीरमद, ४ कुलमद, ५ जातिमद, ६ तपोमद, ७ धनमद आणि

८ बलमद; (आ) १ कुल, २ दुष्टपणा, ३ धन, ४ रूप, ५ यौवन, ६ विद्या, ७ अधिकार आणि ८ तपस्या.

कुलं छलं धनं चैव रूपं यौवनमेव च ।
विद्या राज्यं तपश्चैव एते चाष्टमदाः स्मृताः ।। (कर्ण हंस)

(इ) १ धनमद, २ पुत्रमद, ३ राज्यमद, ४ यौवनमद, ५ स्त्रीमद, ६ विद्यामद, ७ स्थानमद आणि ८ पानमद; (ई) १ देहमद, २ यौवनमद, ३ स्त्रीमद, ४ धनमद हे चार प्रापंचिकदृष्ट्या आणि ५ विद्यामद, ६ तपमद, ७ सिद्धिमद आणि ८ ज्ञानमद हे चार पारमार्थिकदृष्ट्या असे आठ मद होत. (निर्पक्षसत्यज्ञानदर्शन)

अष्ट मधु — १ माक्षिक, २ भ्रामर, ३ रौद्र, ४ पौतिक, ५ छात्र, ६ आर्घ्य, ७ औद्दालक आणि ८ दाल. अशा मधाच्या आठ जाति आहेत. त्यांत माक्षिक मधु श्रेष्ठ मानिली जाते.

पित्तिकं भ्रामरं क्षौद्रं माक्षिकं छात्रमेव च ।
आर्घ्यं औद्दालकं दालं इत्यष्टौ मधुजातयः ।। (सुश्रुत)

अष्ट मंगल — (अ) १ ब्राह्मण, २ अग्नि, ३ गाय, ४ सुवर्ण, ५ घृत, ६ सूर्य, ७ जल आणि ८ राजा. या आठ गोष्टी मंगलप्रद होत; (आ) १ सिंह, २ वृषभ, ३ गज, ४ पूर्णोदक कुंभ, ५ व्यजन, ६ निशाण, ७ वाद्य आणि ८ दीप.

मृगराजो वृषोनागः कलशो व्यजनं तथा ।
वैजयंती तथा भेरी दीप इत्यष्टमंगलम् ।। (सु.)

अष्ट मंगलचिन्हें (जैनधर्म) — १ मत्स्ययुगुलम्, २ नन्दावर्त, ३ भद्रासन ४ कुंभ, ५ श्रीवत्स, ६ दर्पण, ७ सम्पुट आणि ८ स्वस्तिक.

अष्ट मंगल घृत — १ वेखंड, २ कोष्ठ, ३ ब्राह्मी, ४ मोहरी, ५ उपळसरी, ६ सेंधेलोण, ७ पिंपळी आणि ८ तूप. यांच्या मिश्रणानें विधियुक्त बनविलेलें तूप. हें बुद्धिवर्धक आहे. (योगरत्नाकर)

अष्ट मंजरी (विदूषकी अथवा थट्टेखोर सख्या)—१ रूपमंजरी, २ मंजुलीलामंजरी, ३ रसमंजरी, ४ रतिमंजरी, ५ गुणमंजरी,

६ विलासमंजरी, ७ लवंगमंजरी व ८ कस्तुरीमंजरी. अशा श्रीकृष्णपत्नी राधेच्या आठ सखी होत्या. (कल्याण ऑक्टो. १९५४)

अष्ट मंत्री (रामायणकालीन) — १ वसिष्ठ, २ वामदेव हे दोन ऋषि ऋत्विज, ३ सुयज्ञ, ४ जाबालि, ५ काश्यप, ६ गौतम, ७ मार्केंडेय व ८ कात्यायन. अशी राज्ययंत्रावर नियमन करणारी मंत्रिसंस्था रामायण-कालीं होती.

वसिष्ठोवामदेवश्च मंत्रिणश्च तथापरे ।
सुयज्ञोऽप्यथ जाबालिः काश्यपोऽप्यथ गौतमः ॥
मार्केंडेयस्तु दीर्घायुस्तथा कात्यायनो द्विजः ॥ (वा. रा. बा. ७-४)

अष्ट मर्यादागिरी — १ हिमालय, २ हेमकूट, ३ निषध, ४ गंध-मादन, ५ नील, ६ श्वेत, ७ शृंगवार आणि ८ माल्यवान. हे आठ मोठे पर्वत जंबुद्वीपांत असून ते त्यांतील नऊ भागांच्या मर्यादा आहेत.

अष्ट महासिद्धि—१ अणिमा—शरीर सूक्ष्म होणें, २ महिमा—शरीर मोठें होणें, ३ हलकें होणें, ४ प्राप्ति—सर्व प्राण्यांच्या इंद्रियांशीं त्या त्या इंद्रियांच्या अधिष्ठात्री देवतांच्या रूपानें संबंध घडणें, ५ प्राकाश्य—ऐहिक व पारलौकिक स्थानीं भोग व दर्शनाचें सामर्थ्य येणें, ६ ईशिता—मायेची ईशाच्या ठिकाणीं असणारी प्रेरणा, ७ वशिता—आसक्त न होणें आणि ८ प्राकाम्य—इच्छा करावी तें सुख अमर्याद प्राप्त होणें. (ए. भा. १५-४२ ते ४७)

अष्ट माता (काव्याच्या) — १ स्वास्थ्य, २ प्रतिभा, ३ अभ्यास, ४ भक्ति, ५ विद्वत्कथा, ६ बहुश्रुतता, ७ स्मृतिदार्ढ्य आणि ८ अनिर्वेद (समाधान).

स्वास्थ्यं प्रतिभाभ्यासो भक्तिर्विद्वत्कथा बहुश्रुतता ।
स्मृतिदार्ढ्यमनिर्वेदश्च मातरोऽष्टौ कवित्वस्य ॥ (सु.)

अष्ट मातृका (देवशक्ति) — (अ) १ ब्राह्मी, २ माहेश्वरी, ३ कौमारी, ४ वैष्णवी, ५ वाराही, ६ इंद्राणि, ७ चामुंडा आणि ८ महालक्ष्मी. या आठ देवशक्ति आहेत. विवाहादि मंगलप्रसंगीं यांची पूजा करतात; (आ) १ रौद्री, २ वैष्णवी, ३ ब्राह्मी, ४ कुमारी, ५ वाराही, ६ नारसिंही, ७ चामुंडा, ८ माहेन्द्री (काशीखंड).

अष्ट मूर्ति— (अ) १ पृथ्वी, २ आप, ३ तेज, ४ वायु, ५ आकाश, ६ सूर्य, ७ चंद्र आणि ८ ऋत्विज. या ब्रह्माच्या आठ मूर्ति होत. (वज्रकोश); (आ) (शिवदेवतेच्या)—१ शर्व, २ भव, ३ रुद्र, ४ उग्र, ५ भीम, ६ पशुपति, ७ ईशान आणि ८ महादेव. या शिवदेवतेच्या आठ मूर्ति आठ तत्त्वामध्यें अधिष्ठित आहेत. (वायुपुराण)

अष्ट योगिनी — १ मंगला, २ पिंगला, ३ धन्या, ४ भ्रामरी, ५ भद्रिका, ६ उलका, ७ सिद्धा आणि ८ संकटा. या पार्वतीच्या आठ सख्या. या शुभाशुभ फल देणाऱ्या आहेत. (ज्योतिष)

अष्ट रस—१ शृंगार, २ हास्य, ३ करुण, ४ रौद्र, ५ वीर, ६ भयानक, ७ बीभत्स आणि ८ अद्भुत. हे आठच रस नाट्यशास्त्रांत भरतकालीं मानीत असत.

शृंगार हास्य करुणा रौद्रवीरभयानकाः ।
बीभत्साद्भुत संज्ञौ चेत्यष्टौ नाट्ये स्मृताः ॥ (भ. नाट्य ६.१६)

अष्ट रस (अध्यात्म) — १ पृथ्वी, २ जल, ३ वनस्पति, ४ मनुष्य, ५ वाचा, ६ ऋचा, ७ साम आणि ८ उद्गीथ म्हणजे ओंकार. हा आठवा श्रेष्ठ रस असें उपनिषदांत मानलें आहे.

स एष रसानां रसतमः परमः परार्ध्योऽष्टमो य उद्गीथः । (छांदोग्य)

अष्ट लवण — १ पादेलोण, २ ओंवा, ३ अमसुलें, ४ आम्लवेतस हीं एकेक भाग, ५ दालचिनी, ६ वेलदोडा, ७ मिऱ्यें प्रत्येकीं अर्धा भाग आणि ८ साखर सर्वांबरोबर घालून केलेलें चूर्ण.

अष्ट लोकपाल—१ चंद्र, २ अग्नि, ३ सूर्य, ४ वायु, ५ इंद्र, ६ कुबेर, ७ यम व ८ वरुण.

'अष्टानां लोकपालानां वपुर्धारयते नृपः ॥' (मनु. ५-९६)

अष्ट वर्ग—(अ) वर्णमालेंतील आठ वर्ण. अ, क, च, ट, त, प, य, श.

'अकचटतपयश हे ख्यात । अष्टवर्ग असती शास्त्रांत ॥' (क. माहात्म्य)

अष्ट वसु — (अ) १ ध्रुव, २ घोर, ३ सोम, ४ आप, ५ नल, ६ अनिल, ७ प्रत्यूष आणि ८ प्रभास. हे आठ चालू मन्वतरांतील

धर्मर्षि व प्रचेतस दक्षकन्या वसु हिचे ठायीं झालेले वसुसंज्ञक देव. (पद्म सृष्टिखंड); (आ) १ द्रोण, २ प्राण, ३ ध्रुव, ४ अर्क, ५ अग्नि, ६ दोष, ७ वसु आणि ८ विभावसु. (भागवत)

अष्ट वायन — १ हळकुंड, २ सुपारी, ३ दक्षिणा, ४ खण, ५ सूप, ६ कंकण, ७ धान्य आणि ८ मणी (एकसर). या आठ सौभाग्यसंपन्न पदार्थांचें वाण देतात. त्यास अष्ट वायन म्हणतात.

अष्ट विकृति — वेदमंत्रांतील अक्षरांचें रक्षण करण्यासाठीं केलेले प्रकार अथवा वेदपठणाच्या विशिष्ट पद्धति या आठ आहेत. १ जटा, २ माला, ३ शिला, ४ लेखा, ५ ध्वज, ६ दंड, ७ रथ आणि ८ घन. (विकृतवल्ली १-५)

अष्टविधार्चन — १ जल, २ गंध, ३ अक्षता, ४ पुष्प, ५ धूप, ६ दीप, ७ नैवेद्य व ८ तांबूल. या आठ पदार्थांनीं देवतेचें पूजन करतात.

अष्टविध परीक्षा (रोग्याची) — १ नाडी, २ मूत्र, ३ मल, ४ जिव्हा, ५ शब्द, ६ स्पर्श, ७ नेत्र व ८ रूप (चर्या). अशी आठ प्रकारची परीक्षा आयुर्वेदांत सांगितली आहे. (नि. र.)

अष्टविध पूजास्नानें (परमेश्वराचीं) — १ प्रतिमा, २ स्थंडिल, ३ अग्नि, ४ सूर्य, ५ जल, ६ हृदय, ७ ब्राह्मण आणि ८ गुरु.

एवं हीं आठ पूजास्थानें। तुज सांगितलीं सुलक्षणें।
तेथलीं पूजेचीं लक्षणें। तें ही भिन्नपणें सांगेन॥ (ए.भा.२७-८२)

अष्टविध प्रमाणें — १ प्रत्यक्ष, २ अनुमान, ३ उपमान, ४ शब्द, ५ ऐतिह्य, ६ अर्थापत्ति, ७ संभव व ८ अभाव. अशीं आठ प्रमाणें मानिलीं आहेत. (सत्यार्थप्रकाश)

अष्टविध प्राणायाम — १ सूर्यभेदन, २ उज्जयी, ३ सीत्कारी, ४ शीतली, ५ भस्त्रिका, ६ भ्रामरी, ७ मूर्च्छा आणि ८ प्लाविनी.

अष्टविध समाधि — १ यम, २ नियम, ३ आसन, ४ प्राणायाम ५ प्रत्याहार, ६ धारणा, ७ ध्यान व ८ समाधि. असे समाधि—योगाचे आठ प्रकार.

अष्ट विनायक — १ मोरेश्वर गणनाथ–मोरगांव जि. पुणें, २ बल्लाळेश्वर–पाली, ३ गणपति–रांजणगांव, ४ गजमुख विनायक–कर्जत-नजीक, ५ चिंतामणि-थेऊर जि. पुणें; ६ लेण्याद्रि–जुन्नरजवळ, ७ विघ्नेश्वर –ओझर जि. पुणें आणि ८ सिद्धिविनायक–सिद्धटेक–दौण्डज़वळ हीं महाराष्ट्रांतील अष्टविनायक स्थानें होत.

अष्ट विवाह — १ ब्राह्म विवाह–सालंकृत कन्यादान, २ दैव विवाह-यज्ञप्रसंगीं ऋत्विजास दान म्हणून, ३ आर्ष–धन घेऊन, ४ प्राजापत्य–धर्माचरणार्थ कन्यादान देणें, ५ आसुर–शुल्क घेऊन, ६ गांधर्व विवाह–परस्पर अनुमतीनें, ७ राक्षस–जबरीनें कन्यादान करून आणणें, ८ पैशाच विवाह–चोरून आणून विवाह करणें. असे विवाहाचे आठ प्रकार प्राचीनांनीं कल्पिलेले आहेत. (मनु. ३–२१)

अष्ट व्यूह (शरीरस्थ) — १ अस्थिव्यूह, २ स्नायुव्यूह, ३ पचनेंद्रिय-व्यूह, ४ अभिसरण व्यूह, ५ श्वासेंद्रिय व्यूह, ६ उत्सर्जक व्यूह, ७ शोषण–व्यूह व ८ मज्जातंतु–व्यूह. मानव शरिरांत अंतरिंद्रायांच्या नैसर्गिक योजनेच्या ज्या आठ व्यवस्था आहेत, त्यांस व्यूह अशी संज्ञा शास्त्रकारांनीं दिली आहे. (म. जा. को. वि. २०)

अष्ट शब्दकोशकार — १ इंद्र, २ चंद्र, ३ काशकृत्स्न, ४ आपिशली, ५ शाकटायन, ६ पाणिनी, ७ अमर आणि ८ जैनेंद्र. हे आद्य शब्दशास्त्र-प्रणेते व व्याकरणकार होत.

इंद्रश्चन्द्रः काशकृत्स्नापिशली शाकटायनः ।
पाणिन्यमरजैनेंद्रा जयन्त्यष्टादि शाब्दिकाः ॥ (बोपदेवकृत मुक्तबोध)

अष्ट सात्त्विक गुण — १ शोभा, २ विलास, ३ माधुर्य, ४ गांभीर्य, ५ स्थैर्य, ६ तेज, ७ ललित व ८ औदार्य. (भ. ना.)

अष्ट सात्त्विक भाव — (अ) १ कंप, २ रोमांच, ३ स्फुरण, ४ प्रेमाश्रु, ५ स्वेद, ६ हास्य, ७ प्रलास्य आणि ८ गायन. हे शरिराचे सत्त्वगुणांचे आठ भाव–प्रकार आहेत (हंसकोश); (आ) १ स्तंभ–गतिनिरोध, २ स्वेद, ३ रोमांच, ४ वैरस्य, ५ वेपथु–कंप, ६ वैवर्ण्य–वर्ण पालटणें, ७ अश्रुपात आणि ८ प्रलय–चेष्टानिरोध (भ. ना. ७-१४८).

अष्ट सौभाग्य द्रव्यें — १ ऊंस, २ पावटे, ३ जिरे, ४ धने, ५ दूध, ६ करडी, ७ केशर किंवा कुंकू आणि ८ मीठ. या आठ पदार्थांस सौभाग्य अष्टक म्हणतात.

' लवणं चाष्टमं तद्वत् सौभाग्याष्टकमुच्यते । ' (मत्स्य. अ. ५९)

अष्ट स्वभावधर्म — १ क्षुधा, २ पिपासा, ३ मल, ४ मूत्र, ५ शीत, ६ उष्ण, ७ भय व ८ निद्रा. हे आठ स्वभाव किंवा देहधर्म होत.

अष्ट स्थायीभाव — १ रति, २ हास, ३ शोक, ४ उत्साह, ५ क्रोध, ६ भय, ७ निंदा व ८ विस्मय. हे आठ स्थायीभाव. ज्या मनोविकारांस रस ही संज्ञा प्राप्त होते अशा आठ मनोवृत्ति वा रस भरतकालीं साहित्यशास्त्रांत मानले जात, त्यांना स्थायीभाव म्हणत.

रतिर्हासश्च शोकश्च क्रोधोत्साहौ भयं तथा ।
जुगुप्सा विस्मयश्चेति स्थायीभावाः प्रकीर्तिताः ॥ (भ. ना. ६-१८)

अष्ट क्षार — १ पळस, २ निवडुंग, ३ सज्जी, ४ आघाडा, ५ रुई, ६ तीळ, ७ जव व ८ टांकणखार.

अष्टाक्षरी मंत्र (पारमार्थिक) (अ) १ " ॐ नमो नारायणाय " नमो नारायणेति तारकं मंत्रमुत्तमम् (रा. गी. १३–११); (आ) " ॐ नमो वासुदेवाय "; (ई) "कृष्ण कृष्ण हरि हरि"; (उ) (वल्लभ संप्रदाय) "श्रीकृष्ण शरणं मम;" (ऊ) (व्यावहारिक) "कसें करूं काय करूं."

अष्टाक्षरी मंत्र — (अ) " ॐ भवति भिक्षां देहि " हा वैदिक अष्टाक्षरी मंत्र-समर्थांनीं लोककार्यार्थ प्रसृत केला. (दा. बो. १४-२१); (आ) (वारकारी संप्रदाय) " ज्ञानदेव–तुकाराम " हा वारकरी संप्रदायांत उच्चारला जाणारा व भाविक मनाला मुग्ध करणारा महामंत्र.

अष्टावरण — १ विभूति लावणें, २ रुद्राक्ष धारण करणें, ३ मंत्र (नमः शिवाय) जपणें, ४ गुरु आज्ञापालन, ५ लिंगपूजा, ६ जंगमाविषयीं आदर, ७ पादोदक घेणें आणि ८ प्रसाद. हीं वीरशैव संप्रदायाचीं मुख्य आठ आवरणें अथवा तत्त्वें व आचार आहेत. (कल्याण गो. अंक)

अष्टांग वैद्यक — १ द्रव्याभिधान, २ गदानिश्चय, ३ कामसौख्य, ४ शल्यादि, ५ भूतनिग्रह, ६ विषनिग्रह, ७ बालवैद्यक आणि

८ रसायन. हीं आयुर्वेदाचीं आठ अंगें; (आ) १ कायचिकित्सा, २ बालचिकित्सा, ३ ग्रहचिकित्सा, ४ ऊर्ध्वांगचिकित्सा, ५ शल्यतंत्र, ६ विषचिकित्सा, ७ रसायन व ८ वाजीकरण. (वाग्भट अ. १)

अष्टांगिक मार्ग — (अ) १ सम्यक् दृष्टि, २ सम्यक् संकल्प, ३ सम्यक् वाचा, ४ सम्यक् कर्मान्त, ५ सम्यक् आजीव, ६ सम्यक् व्यायाम, ७ सम्यक् स्मृति आणि ८ सम्यक् समाधि. असे बुद्धधर्मांचे आठ मार्ग; (आ) १ श्रद्धा, २ संकल्प, ३ भाषण, ४ कृति, ५ धंदा, ६ योग, ७ स्मृति व ८ ध्यान.

अष्टांग — (अ) १ शिर, २ वक्ष, ३ हृदय, ४ बाहु, ५ ऊरु, ६ जंघा, ७ ढोपरें व ८ पादांगुली. हीं शरिराचीं आठ अंगें (उड्डीश शास्त्र); (आ) दोन हात, दोन पाय, दोन गुडघे, वाचा व मन अशीं आठ अंगें.

अष्टांगें (अर्घ्याचीं) — १ जल, २ दूध, ३ दर्भाग्रें, ४ दहीं, ५ तूप, ६ तांदूळ, ७ सातु व ८ पांढऱ्या मोहऱ्या. या आठ वस्तूंनीं अर्घ्यप्रदान करावयाचें,

'यवासिद्धार्थकाश्चेति ह्यर्घ्योष्टांगप्रकीर्तितः ।' (व्रतरत्न)

अष्टांगें (औषधीचीं) — १ मूळ, २ कंद, ३ पान, ४ फळ, ५ पुष्प, ६ सर्वांग, ७ डिंक व ८ साल. अशीं औषधींचीं आठ अंगें. (नि. र.)

अष्टांगें (गायत्रीचीं) — १ नाद, २ बिंदु, ३ कला, ४ ज्योति, ५ रूप, ६ रेखा, ७ स्वरवर्ण व ८ आवृत्ति. (प्रणवोपासना)

अष्टांगें (चिकित्सेचीं) — १ निदान, २ पूर्वलिंग, ३ रूप, ४ उपशम, ५ संप्राप्ति, ६ औषधि, ७ रोगी व ८ परिचारिका.

अष्टांगें (नमनाचीं) — १ मस्तक, २ छाती, ३ हात, ४ गुडघे, ५ पाय, ६ दृष्टि, ७ वाणि व ८ मन. हीं नमनाचीं आठ अंगें. या आठ अंगांनीं करावयाच्या नमस्कारास साष्टांग नमस्कार म्हणतात.

पद्भ्यां कराभ्यां जानुभ्यामुरसा शिरसस्तथा ।
मनसावचसा दृष्ट्याप्रणामोऽष्टांगमुच्यते ॥ (सु.)

अष्टांगें (धर्माचीं) — (अ) १ देवपूजा, २ धार्मिक ग्रंथांचें पठण, ३ दान, ४ तप, ५ सत्य, ६ क्षमा, ७ इंद्रियनिग्रह आणि ८ निर्लोभता. (म. भा. व. २–७५); (आ) १ तप, २ सत्य, ३ क्षमा, ४ दया, ५ शौच, ६ दान, ७ योग व ८ ब्रह्मचर्य. (वामन. पु. अ. २२)

अष्टांगें (न्यायाचीं) — १ स्मृति (निर्बंध), २ न्यायाधीश, ३ पंच-न्यायाचे कामीं सहाय्यक सभासद, ४ लेखक, ५ ज्योतिषी, ६ सुवर्ण, ७ अग्नि व ८ जल. हीं न्यायाचीं आठ अंगें अथवा न्यायसाधनें म्हणून मानिलीं आहेत.

अष्टांगें (पात्रतेचीं) — १ क्षमा, २ निरिच्छता, ३ सत्य भाषण, ४ दान, ५ सुस्वभाव, ६ सदाचार, ७ तप आणि ८ शास्त्रज्ञान.

क्षान्त्यस्पृहा तथा सत्यं दानं शीलं तपःश्रुतम् ।
एतदष्टांगमुद्दिष्टं परं पात्रस्य लक्षणम् ॥ (ब्राह्म १७२–३३)

अष्टांगें (मैथुनाचीं) — १ स्त्रीविषयक चिंतन, २ वर्णन, ३ क्रीडा करणें, ४ कटाक्षयुक्त पाहणें, ५ एकान्तीं भाषण, ६ संकेत, ७ अध्यवसाय (परस्पर निश्चय), आणि ८ प्रत्यक्ष संभोग.

स्मरणं कीर्तनं केलिः प्रेक्षणं गुह्यभाषणम् ।
संकल्पोऽध्यवसायश्च क्रियानिर्वृत्तिरेव च ॥ (बृ. स्मृति)

अष्टांगें (योगाचीं) — १ यम, २ नियम, ३ आसन, ४ प्राणायाम, ५ प्रत्याहार, ६ ध्यान, ७ धारणा व ८ समाधि. (पा. योगसूत्रें)

अष्टांगें (साधनेचीं) — १ सत्यविश्वास, २ नम्रवचन, ३ उच्चलक्ष्य, ४ सदाचरण, ५ सद्वृत्ति, ६ सद्गुणांचें परिपालन, ७ बुद्धीचा सदुपयोग आणि ८ सद्ध्यान. भगवान् बुद्धानें हीं साधनेचीं आठ अंगें सांगितलीं आहेत. (कल्याण हिं. सं. अंक)

अष्टांगें (सैन्याचीं) — १ रथ, २ हत्ती, ३ घोडे, ४ पायदळ, ५ मजूर, ६ नाविकदल, ७ गुप्तहेर आणि ८ टेहळणी पथक. हीं सैन्याचीं आठ अंगें भारतकालीं होतीं.

रथा नागा हयाश्चैव पादाताश्चैव पांडव ।
विष्टिर्नावश्चराश्चैव देशिका इति चाष्टमः ॥ (म. भा. शांति.)

अष्टांगें (संस्कृतीचीं) — १ मानवी परिश्रम, २ शासनसंस्था, ३ नीति, ४ धर्म, ५ शास्त्र, ६ तत्त्वज्ञान, ७ वाङ्मय व ८ कला.

अष्टाधिकार — १ जलाधिकार, २ स्थलाधिकार, ३ ग्रामाधिकार, ४ ब्रह्मासन (बेलीफाचा अधिकार), ५ कुललेखन, ६ दंडविनियोग, ७ पौरोहित्य व ८ ज्योतिष. अशीं आठ खातीं पूर्वकालीं खेडेगांवांतून असत. (म. ज्ञा. को. विभाग ७)

अष्टक — ऋग्वेद संहितेचे पठणाऱ्या सोयीकरतां आठ भाग केले आहेत. प्रत्येक भागांत आठ अध्याय आहेत. त्या प्रत्येक भागास अष्टक अशी संज्ञा आहे.

आठ आग्र्याच्या ताजमहालाचे प्रमुख कारागीर — १ अमानत खां शिराजी–कंदाहार, २ इसा गवंडी–आग्रा, ३ पिरा सुतार–दिल्ली, ४ बन्नुहार, ५ जातमल्ल, ६ जोरावर (नक्षी काम करणारा), ७ इस्माइल खान रुमी (घुमट बनविणारा) आणि ८ रामलाल (काश्मिरी बाग बनविणारा). हे प्रमुख कारागीर व निर्माते होत.

(Studies in Moghul India)

आठ उपरस (रसायनशास्त्र) — १ गंधक, २ गेरु (सोनकाव), ३ हिराकस, ४ तुरटी, ५ हरताळ, ६ मनशीळ, ७ सुरमा आणि ८ कंकुष्ट. (र. समुच्चय अ. ३–१)

आठ गुण दूतास आवश्यक — १ गर्वरहित, २ दुर्बल नसलेला, ३ चेंगटपणा न करणारा, ४ दयाळु, ५ प्रामाणिक, ६ फितुर न होणारा, ७ निरोगी, ८ संयुक्तिक तसेंच अर्थपूर्ण भाषण करणारा. (म. भा. उ. ३७-२७)

आठ गुण पुरुषाची योग्यता वाढविणारे — १ बुद्धि, २ कुलीनता, ३ विद्या, ४ इंद्रियदमन, ५ पराक्रम, ६ मितभाषण, ७ यथाशक्ति दान व ८ कृतज्ञता. (म. भा. उद्योग ३७-३१)

आठ गुण राज्यशासकांना विहित — १ दम, २ शांति, ३ क्षमा, ४ धर्म, ५ धैर्य, ६ सत्य, ७ पराक्रम आणि ८ उपद्रव देणाऱ्यांना दंड. वा. रा. अयोध्या.)

आठ गुण आदर्श विद्यार्थ्यांचे — १ सुशील, २ चतुर, ३ कर्तव्यांत जागरुक, ४ ज्ञानवान, ५ सेवापरायण, ६ कल्पक, ७ इष्ट व योग्य काम करणारा व ८ अप्रमादी (निरलस). (सु.)

आठ गुण हनुमंतस्मरणानें प्राप्त होतात — १ बुद्धि, २ बल, ३ कीर्ति, ४ धैर्य, ५ निर्भयपणा, ६ निरोगीपणा, ७ चापल्य आणि ८ वाक्पटुत्व.

बुद्धिर्बलं यशोधैर्यं निर्भयत्वमरोगता ।
अजाड्यं वाक्पटुत्वं च हनुमंतस्मरणाद्भवेत् ॥ (वायुस्तुति)

आठ महारस (रसायन शास्त्र) — १ अभ्रक, २ वैक्रांत (तुरमळी), ३ माक्षिक (सुवर्ण माक्षिक), ४ विमला (रौप्य माक्षिक), ५ शिलाजतु, ६ मोरचूद, ७ चपला व ८ कलखापरी (र. र. समुच्चय अ २-१).

आठ साधारण रस (रसायन शास्त्र) — १ कपिला, २ गौरीपाषाण (सोमल), ३ नवसागर, ४ कवडी, ५ अंबर, ६ गिरिसिंदुर, ७ हिंगुळ आणि ८ मुरदाड शिंगी. (र. र. समुच्चय अ. ३-१२०)

आठ गोष्टी विद्यार्थ्यांस वर्ज्य — १ काम, २ क्रोध, ३ लोभ, ४ जिभेचे चोचले, ५ शृंगाराची आवड, ६ उत्सव-समारंभ, ७ अतिनिद्रा आणि ८ अति कामधाम.

कामं क्रोधं तथा लोभं स्वादुशृंगारकौतुके ।
अतिनिद्रातिसेवा च विद्यार्थी ह्यष्टवर्जयेत् ॥ (वृ. चा.)

आठ गोष्टींच्या स्वीकारानें व्रतभंग होत नाहीं — १ जल, २ मूळ, ३ फळ, ४ दूध, ५ हवि, ६ ब्राह्मणाची इच्छा, ७ गुरूची आज्ञा व ८ औषध. (म. भा. उद्योग ३९-७१)

आठ गोष्टी सुराज्याला आवश्यक — १ कृषि, २ व्यापारधंदा, ३ दुर्ग, ४ फूल, ५ हत्ती धरणें, ६ रत्नांच्या खाणी, ७ सुवर्णादि धातूंच्या खाणी आणि ८ करवसुली. (म. भा. सभा अ. १५ टीप)

आठ गोष्टी स्थानभ्रष्ट झाल्यास न शोभणाऱ्या — १ राजाअधिकारी, २ कुलवधू, ३ ब्राह्मण, ४ मंत्री, ५ स्तन, ६ दांत, ७ केश, ८ नखें.

आठ जाती शब्दांच्या — १ नाम, २ सर्वनाम, ३ विशेषण, ४ क्रियापद, ५ क्रियाविशेषण अव्यय, ६ उभयान्वयी अव्यय, ७ केवलप्रयोगी अव्यय आणि ८ शब्दयोगी अव्यय. (व्याकरण)

आठ जीवनसत्त्वें — ए, बी, सी, डी, ई, एफ्, जी व एच्. हीं आतांपर्यंत ज्ञात अशीं आठ प्रमुख जीवनसत्त्वें मानवी देहधारणेला अवश्य असतात, व तीं अनेक तऱ्हेचीं व महत्त्वाचीं कार्यें करतात असें आधुनिक जीवनशास्त्र सांगतें.

आठ दुर्गुणांनीं मनुष्याच्या शक्तींचा संकोच होतो — १ अहंकार, २ बल, ३ दर्प, ४ काम, ५ क्रोध, ५ वस्तुसंग्रह, ७ ममत्व आणि ८ अशांति.

आठ दोष क्रोधामुळें उत्पन्न होणारे — १ चहाडी, २ साहस, ३ कपटाचरण, ४ मत्सर, ५ दोषदर्शन, ६ अर्थदूषण (परद्रव्यापहार), ७ वाणीनें कठोर आणि ८ हातघाईवर येणें. (मनु. ७-४८)

आठ दोष मैथुनापासून उत्पन्न होणारे — १ ग्लानि, २ मूर्च्छा, ३ भ्रम, ४ कांपरें, ५ श्रम, ६ घाम, ७ अंग अगर इंद्रियामध्यें लुळेपणा येणें व ८ क्षयरोगादि दोष.

ग्लानिर्मूर्च्छा भ्रमः कंपः श्रमः स्वेदोऽङ्गविक्लयः ।
क्षयरोगादयो दोषा मैथुनोत्थाः शरीरिणः ॥ (सु.)

आठ दोष (मंत्रसंबंधीं) — १ अभक्ति, २ अक्षरभ्रांति, ३ लुप्त (अक्षर सोडून म्हणणें), ४ छिन्न, ५ ऱ्हस्व, ६ दीर्घ (उच्चार दोष), ७ जागृतींत मंत्र दुसऱ्यास सांगणें आणि ८ स्वप्नकथन (स्वप्नांत दुसऱ्यास सांगणें). (कल्याण साधनांक)

आठ धर्ममार्ग — १ यजन, २ अध्ययन, ३ दान, ४ तप, ५ सत्य, ६ क्षमा, ७ दया आणि ८ लोभशून्यता. (म. भा. उद्योग ३५-५६)

आठ धन वाढविण्याचीं साधनें — १ संथपणा, २ दक्षता, ३ मनोनिग्रह, ४ बुद्धिमत्ता, ५ विचारशीलता, ६ धैर्य, ७ शौर्य व ८ स्थलकालविषयक सावधानता. (म. भा. शांति १२०-३७)

आठ परमेश्वराचीं स्वरूपें — १ पृथ्वी, २ जल, ३ अग्नि, ४ वायु, ५ आकाश, ६ सूर्य, ७ चंद्र आणि ८ यज्ञकर्ता.

पृथ्वी सलिलं तेजो वायुराकाशमेव च ।
सूर्याचन्द्रमसौ सोमयाजी चेत्यष्टमूर्तयः ॥ (रघुवंशटीका).

आठ प्रकार आलिंगनाचें (कामशास्त्र) — १ वृक्षाधिरूढ, २ तिल-तंडुल, ३ ललाटिक, ४ जांघन, ५ विद्धक, ६ उरूपगूढ, ७ क्षीरनीर आणि ८ वल्लरिवेष्टित. (अनंगरंग)

आठ प्रकारच्या जपमाळा — १ रुद्राक्ष, २ तुळसी, ३ स्फटिक, ४ मोती, ५ प्रवाल (पोंवळे), ६ पुत्रजीव, ७ सुवर्ण आणि ८ रत्न.

आठ प्रकार बीजमंत्रांचे — १ गुरुबीज, २ शक्तिबीज, ३ रमाबीज, ४ योगबीज, ५ कामबीज, ६ तेजबीज, ७ शांतिबीज व ८ रक्षाबीज. (नामजपाचें महत्त्व भाग २)

आठ प्रकार मधुराभक्तीचे — १ स्वरूप माधुरी, २ चिंतन माधुरी, ३ विरह माधुरी, ४ मीलन माधुरी, ५ ब्रह्मानंद माधुरी, ६ लीला माधुरी, ७ मुरली माधुरी, ८ रास माधुरी. (म. सा. मधुराभक्ति)

आठ प्रकारचे दैवी कोप — १अग्नि, २जल, ३ रोग, ४ दुष्काळ, ५ उंदीर, ६ हिंस्रपशु, ७ सर्प व ८ भूत-पिशाच्च. या आठांपासून होणारे उपसर्ग दैवी कोप मानले आहेत. (कौटिल्य अ. ८०)

आठ प्रकारचें शौच — १ कालशौच, २ अग्निशौच, ३ भस्मशौच, ४ मृत्तिकाशौच, ५ गोमयशौच, ६ जलशौच, ७ पवनशौच व ८ ज्ञानशौच. (रत्नकरण्डकश्रावकाचार अ. १)

आठ प्रकारचे व्यूह — १ भोग (सर्प) व्यूह, २ दंडव्यूह, ३ मंडल-व्यूह, ४ असंहतव्यूह, ५ गरुडव्यूह, ६ सर्वतोभद्रव्यूह, ७ असह्यव्यूह, ८ विजयव्यूह. असे सैन्यरचनेचे मुख्य प्रकार असत. खेरीज वराहव्यूह, चक्रव्यूह वगैरे प्रकार महाभारतकालीं होते. (म. ज्ञा. को. विभाग १९)

आठ प्रमुख वैष्णव क्षेत्रें — १ श्रीरंग, २ श्रीमुष्ण, ३ वेंकटस्थल, ४ शालग्राम (नेपाळ), ५ नैमिष, ६ तोताद्रि, ७ पुष्कर आणि ८ बदरिकाश्रम. (कल्याण तीर्थांक)

आठ प्रमुख शैव क्षेत्रें — १ श्रीसूर्यदेवतामंदिर, २ सोमनाथ, ३ पशुपतिनाथ (यजमान मूर्ति), ४ शिव कांची (पृथ्वी), ५ जंबुकेश्वर

(आप), ६ अरुणाचल (तेज), ७ कालहस्ती (वायु) आणि ८ चिंदबरम् (आकाशलिंग). (कल्याण तीर्थांक)

आठ प्रमुख स्मृतिकार — १ मनु, २ याज्ञवल्क्य, ३ नारद, ४ विष्णु, ५ कात्यायन, ६ आपस्तंब, ७ व्यास व ८ देवल. एकंदर ऐशी स्मृतिकारांत हे आठ प्रमुख स्मृतिकार होत.

आठ मंगल वस्तु — १ डाव्या कुशीकडे निजलेल्या पुण्यवती पत्नीचें मुख, २ आरसा, ३ भरलेली घागर, ४ बैल, ५ दोन चामर, ६ श्रीवत्स, ७ कमल व ८ शंख. अशा आठ मंगल वस्तु सकाळीं पाहाव्या.

वामभागस्थितां नारी निजपुण्यप्रकाशिनीम् ।
दर्पणं पूर्णकुंभं च वृषभं युग्मचामरम् ।
श्रीवत्सं स्वस्तिकं शंखमेवमष्टमंगलम् ॥ (वी. प्र.)

आठ मराठी छंद (शब्दांची गायनयोग्य विशिष्ट रचना) — १ अभंग, २ दिंडी, ३ साकी, ४ घनाक्षरी, ५ सवाई, ६ छप्पा, ७ ओंवी आणि ८ कटिबंध. (मराठी छंद)

आठ महा पंडित जनकसभेचे — १ अश्वल, २ जारत्कारव आर्तभाग, ३ भुज्युः, ४ उषस्त, ५ कहोल कौषीतकेय, ६ गार्गी, ७ उद्दालक आणि ८ विदग्ध–शाकल्य. (बृहदारण्यक अ. ३)

आठ महारोग — १ वातव्याधि, २ प्रमेह, ३ कुष्ठ, ४ अर्श (मूळव्याधि), ५ भगदर, ६ अश्मरी, ७ मूढगर्भ आणि ८ उदररोग. या अशा महारोगांची चिकित्सा व निदान करणें कठीण असतें.

वातव्याधि प्रमेहश्च कुष्ठमर्शो भगन्दरम् ।
अश्मरी मूढगर्भश्च तथैवोदरस्मृतम् ॥ (सुश्रुत ३३-४)

आठ वस्तु लौकिकांत मंगलप्रद — १ दीप, २ आरसा, ३ सुवर्ण, ४ धान्यपात्र, ५ फल, ६ दहीं, ७ हस्तलिखित ग्रंथ आणि ८ पूर्णपात्र.

दीपिका दर्पणं हेमं धान्यपात्रं फलं दधि ।
पुस्तामङ्गलमात्राणि लौकिकं मङ्गलाष्टकम् ॥ (शिवरत्नम् २३-३७)

आठ विवाह (घटित) कूटें — १ वर्ण, २ वश्य, ३ तारा, ४ योनि, ५ ग्रह, ६ गण, ७ भकुट (सत्कूट) आणि ८ नाडी. हीं

आठ घटित कूटें असून यांस घटिताष्टक म्हणतात. यांचे क्रमानें १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, अशी संख्या मिळून ३६ गुण होतात आणि १८ चे वर गुणांचें मेलन विवाहास ग्राह्य मानलें जातें. कोणी कोणी बारा विवाह-कूटें मानतात. (विवाहसार)

आठ विद्येचे अधिपति — १ अनंतेश, २ सूक्ष्म, ३ शिवोत्तम, ४ एकमूर्ति, ५ एकरूप, ६ त्रिमूर्ति, ७ श्रीकंठ आणि ८ शिखंडी.

अनंतेशश्च सूक्ष्मश्च तृतीयश्च शिवोत्तमः ।
एकमूर्त्येक रूपस्तु त्रिमूर्तिपरस्तथा ।
श्रीकण्ठश्च शिखण्डी च अष्टौ विद्येश्वराः स्मृताः ॥ (अग्नि)

आठ शिष्टाचाराचीं लक्षणें — १ दान, २ सत्य, ३ तपस्या, ४ ज्ञान, ५ विद्या, ६ स्वार्थत्याग, ७ पूजा व ८ इंद्रियनिग्रह.

दानं सत्यं तपो लोको विद्येऽज्या पूजनं दमः ।
अष्टौ तानि चरित्राणि शिष्टाचारस्य लक्षणम् ॥ (मत्स्य. अ.१४४ ,

आठ सन्मित्र लक्षणें — १ कृतज्ञ, २ धार्मिक, ३ सत्यनिष्ठ, ४ अक्षुद्र-मनाचा मोठेपणा असणें, ५ दृढभक्ति करणारा, ६ जितेंद्रिय) ७ योग्यतेप्रमाणें वागणारा व ८ कोणताहि प्रसंग आला तरी त्याग न करणारा.

आठ साधारण धर्म — १ अक्रोध, २ सत्यभाषण, ३ संविभाग (आपण मिळवितो त्यांत सर्वांचा भाग आहे असें समजणें), ४ स्वस्त्रीचे ठायीं प्रजोत्पत्ति, ५ शुचिर्भूतता, ६ द्रोहाचा अभाव, ७ प्रामाणिकपणा आणि ८ पोष्यवर्गाचें पोषण.

अक्रोधः सत्यवचनं संविभागश्च सर्वशः ।
प्रजनं स्वेषु दारेषु शौचमद्रोह एव च ।
आर्जवं भृत्यभरणं त एते सार्ववर्णिकाः ॥ (म. भा. शांति ५९-९)

आठ हर्ष स्थानें — १ सन्मित्र समागम, २ विपुलद्रव्य, ३ पुत्राचें आलिंगन, ४ रतिसमयीं उभयतांची एक कालीं तृप्ति, ५ समयानुरूप प्रिय भाषण, ६ समाजांत उन्नतस्थिति, ७ इष्ट वस्तूंचा लाभ आणि ८ चारचौघांत प्रतिष्ठा. (म. भा. उद्योग ३३-९८)

आठजण परदुःख जाणत नाहींत — १ राजा–अधिकारी. २ अग्नि, ३ यम, ४ वेश्या, ५ चोर, ६ बाल, ७ याचक आणि ८ गांवगुंड,

राजा वेश्या यमोवह्निः प्राघूर्णो बालयाचकौ ।
परदुःखं न जानाति ह्यष्टमो ग्रामकंटकः । ॥ (सु.)

आठजण विशिष्ट कालपर्यंतच स्वाधीन राहतात — १ मुलगा झाला नाहीं तोंपर्यंत बायको, २ सोळा वर्षें होईतों मुलगा, ३ लग्न होईपर्यंत मुलगी, ४ यौवनदशा येईपर्यंत सून, ५ सासऱ्याकडून मिळकत होते तोंपर्यंत जांवई, ६ आपण बरें आहों तोंपर्यंत मित्र, ७ गुरुकिल्ली मिळाली नाहीं तोंपर्यंत शिष्य आणि ८ पैसा आहे तोंपर्यंत इतर जन. हे आठजण त्या त्या कालपर्यंत स्वाधीन राहतात. (सु.)

आठजण स्वर्गाचे अधिकारी होत -- १ मातृपितृभक्त पुत्र, २ पतिव्रता स्त्री, ३ निःस्वार्थी सेवक, ४ गुरुजनांची सेवा करणारा, ५ प्रजापालन करणारा राजा, ६ कर्मनिष्ठ ब्राह्मण, ७ परोपकारार्थ देह झिजविणारा आणि ८ युद्धांत पाठ न दाखविणारा वीर पुरुष. (चंद्रकांत भाग २ रा.)

आठजण हिंसक होत — १ खाणारा, २ संमति देणारा, ३ पाक करणारा, ४ विकणारा, ५ विकत घेणारा, ६ प्रत्यक्ष हिंसा करणारा, ७ वाढणारा अथवा वाटणारा आणि ८ सांगून हिंसा करविणारा.

भोक्तानुमन्ता संस्कर्ता क्रयिविक्रयी हिंसकाः ।
उपहर्ता घातयिता हिंसकाश्च अष्टधा स्मृताः ॥(स्कंद काशी ४०-२२)

गीताष्टक — १ कपिल गीता, २ गर्भगीता, ३ परमहंस गीता, ४ उद्धव गीता, ५ अवधूत गीता, ६ हंसगीता, ७ भिक्षुगीता आणि ८ ऐलगीता. या आठ ज्ञानप्रतिपादक ग्रंथांस गीताष्टक म्हणतात. (भागवत)

९

नऊ अभिमान स्थानें — १ सत्ता, २ संपत्ति, ३ बल, ४ रूप, ५ कुल, ६ विद्वत्ता, ७ अनुभव, ८ कर्तृत्व आणि ९ चारित्र्य. (विचार पोथी)

नऊ अरण्यें मुक्तिदायक — १ दंडकारण्य, २ सैंधव, ३ जंबूमार्ग, ४ पुष्कर, ५ उत्पलावर्त, ६ नैमिषारण्य, ७ कुरुजांगल, ८ हिमवान, आणि ९ अर्बुद.

' हिमवानर्बुदश्चैव नवारण्याश्च मुक्तिदाः । ' (अ. म.)

नऊ अवतार (देवीचे) — १ शैलपुत्री, २ ब्रह्मचारिणी, ३ चंद्रघंटा, ४ कूष्मांडा, ५ स्कंदमाता, ६ कात्यायनी, ७ कालरात्री, ८ महागौरी आणि ९ सिद्धिदात्री.

' नवमं सिद्धिदात्री च नवदुर्गाः प्रकीर्तिता ॥ ' (चंडीकवचम्)

नऊ अवस्था (शरिराच्या) — १ मातेच्या उदरांत निषेक-रेतोरूपानें असणें, २ गर्भावस्था (गर्भ), ३ जन्म, ४ बाल्य, ५ कौमार्य, ६ तारुण्य, ७ प्रौढत्व, ८ वृद्धत्व आणि ९ मृत्यु.

निषेकगर्भजन्मानि बाल्यकौमारयौवनम् ।
वयोमध्यं जरा मृत्यु इत्यवस्थास्तनोर्नव ॥ (भा.ग. ११-२२-४६)

नऊ उपरत्नें— १ पोंवळें, २ शंख, ३ शिंप, ४ कवडी, ५ वैक्रांत, ६ सूर्यकांत, ७ चंद्रकांत, ८ लाल आणि ९ पेरोज–नील व पीतवर्ण मणी वगैरे. (रसायनसार)

नऊ उपविषें — १ रुईचा चीक, २ त्रिधारी निवडुंग, ३ कळलावी, ४ गुंज, ५ कण्हेर, ६ विषमुष्टि, ७ धोतरा, ८ अफू आणि ९ जयपाळ. (यो. रत्नाकर)

नऊ कर्में ब्राह्मणाचीं स्वभावजन्य — १ शम, २ दम, ३ तप, ४ शुद्धता, ५ सहनशक्ति, ६ सरळपणा, ७ ज्ञान, ८ विज्ञान आणि ९ आस्तिकता (ईश्वरावर विश्वास). (भ. गी. १८–४३)

एवं नवही शमादिक । गुण जेथ निर्दोख ।
तें कर्म जाण स्वाभाविक । ब्राह्मणाचें ॥ (ज्ञा. १८–८५१)

नऊ कुलपरीक्षेचीं लक्षणें — १ आचरण, २ नम्रता, ३ शास्त्रज्ञान, ४ लोकांतील (सभा) मान्यता, ५ शुचिता, ६ श्रद्धा, ७ जीवनाचा धंदा, ८ पाळावयाचे नियम आणि ९ अनुभव ज्ञान.

आचारो विनम्रो विद्या प्रतिष्ठा तीर्थदर्शनम् ।
निष्ठावृत्तिस्तपो ज्ञानं नवधा कुललक्षणम् ।। (शब्दार्थ चिंतामणि)

नऊ गुण ब्राह्मण्याचे — (अ) १ धृति, २ क्षमा, ३ दम, ४ अस्तेय, ५ शौच, ६ इंद्रियनिग्रह, ७ बुद्धि, ८ विद्या व ९ क्रोधत्याग; (आ) १ शुद्ध आचरण, २ तपस्वी, ३ संतोषी, ४ क्षमावान्, ५ सुशील, ६ जितेंद्रिय, ७ दाता, ८ ब्रह्मज्ञानी व ९ दयाळु.

ऋजुस्तपस्वी सन्तुष्टः क्षमाशीलो जितेन्द्रियः
दाता ज्ञानी दयालुश्च ब्राह्मणो नवभिर्गुणैः ।। (राजनीति)

नऊ गोष्टी पदरीं बाळगाव्या — १ शेळ्या, २ कांसें, ३ रुपें, ४ मध, ५ विषघ्न औषध, ६ पक्षी, ७ वेदवेत्ता ब्राह्मण, ८ वृद्ध नातलग, ९ खालावलेला कुलीन मनुष्य. (म. भा. उद्योग ४०—९)

नऊ गोष्टी सर्व साधारण धर्मांत अंतर्भूत होतात — १ अहिंसा, २ सत्य, ३ अस्तेय, ४ शौच, ५ इंद्रियनिग्रह, ६ दम, ७ क्षमा, ८ सरळपणा आणि ९ दान.

अहिंसा सत्यमस्तेयशौचमिंद्रियनिग्रहः ।
दमः क्षमार्जवं दानं धर्मं साधारणं विदुः ।। (सु.)

नऊ गोष्टी सेवनानें वाढणाऱ्या — १ उद्योग, २ कलह, ३ कण्डू, ४ द्यूत, ५ मद्य, ६ मैथुन, ७ आहार, ८ व्यसन आणि ९ निद्रा.

उद्योगः कलहः कण्डूर्मद्यं द्यूतं च मैथुनम् ।
आहारो व्यसनं निद्रा सेवनात्तु विवर्धते ।। (सु.)

नऊ गोष्टींत महाभारताचें सार — १ कौरव-पांडवांचें जन्मकथन, २ लाक्षागृहांतील अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडणें, ३ पांडव द्यूतांत हरतात, ४ पांडवांचा वनवास, ५ विराटाच्या घरीं अज्ञातवास, ६ उत्तरगोग्रहण, ७ श्रीकृष्णशिष्टाई विफळ होणें, ८ युद्धारंभ आणि ९ भीमाकडून दुर्योधनाचा वध. (महाभारत)

नऊ गोष्टींत रामायणाचें सार — १ रामवनवास, २ मारीचवध, ३ सीताहरण, ४ जटायुपतन, ५ सुग्रीव-संधि, ६ वालिवध, ७ समुद्रोल्लंघन, ८ लंकादहन आणि ९ रावण-कुंभकर्ण-वध. (रामायण)

नऊ चक्रें (शरीरांतर्गत) — १ मूलाधार चक्र (पृष्ठवंशाच्या मुळाशीं), २ स्वाधिष्ठानचक्र (जननेंद्रियाच्या मागें), ३ नाभिचक्र, ४ हृदयचक्र, ५ कंठचक्र, ६ तालुचक्र, ७ भ्रूचक्र, ८ आज्ञाचक्र (भ्रूमध्यांत) आणि ९ आकाशचक्र. अशीं नऊ चक्रें मानव शरिरांत आहेत असें श्रुतींत सांगितलें आहे. हठयोगांत सहा चक्रांचेंच वर्णन बहुधा येतें. (रा. गी. अ. १५)

नऊ चतुर सभानायक (रामायणकालीन) — १ विजय, २ मधुमंत, ३ कश्यप, ४ मंगल, ५ पुराजित्, ६ कालिय, ७ दंतवक्र, ८ भद्र, आणि ९ सुमागध.

हे नवविध सभानायक परम । यांचा विश्वास मानी श्रीराम ।
अति चतुर म्हणोनी ॥ (भा. रा. उत्तर ४३-५)

नऊ दोष (बुद्धीचे) — १ काम, २ क्रोध, ३ भय, ४ लोभ, ५ दैन्य, ६ दर्प, ७ लज्जा, ८ कृपा आणि ९ अभिमान. हे बुद्धीचे नऊ दोष म्हणून सांगितले आहेत.

नऊ द्रव्यें (न्यायशास्त्र) — १ पृथ्वी, २ आप, ३ तेज, ४ वायु, ५ आकाश, ६ काल, ७ दिशा, ८ आत्मा व ९ मन. (न्याय भारती)

नऊ नाथपंथाचीं वैशिष्ट्यें — १ मेखला, २ शृंगी, ३ पुंगी, ४ कंथा, ५ कर्णमुद्रा, ६ कौपीन, ७ व्याघ्रांबर, ८ खडावा व ९ झोळी.

नऊ नित्यकर्में ब्राह्मणाचीं — १ स्नान, २ संध्या, ३ जप, ४ होम, ५ स्वाध्याय, ६ देवपूजन, ७ वैश्वदेव, ८ अतिथिपरामर्ष ९ पितृतर्पण.

स्नानसंध्या जपो होमः स्वाध्यायो देवतार्चनम् ।
वैश्वदेवस्तथाऽऽतिथ्यं नवमं पितृतर्पणम् ॥ (स्कंद. काशी.)

नऊ प्रकारचा संसर्ग — १ एका पलंगावर शयन, २ एका पंक्तीला भोजन, ३ निषिद्ध मनुष्याचें अन्न सेवन, ४ एकाच भांड्यांतील, अन्न सेवन, ५ एकाच पातेल्यांत घेतलेलें अन्न वाढणें, ६ बहिष्कृताच्या घरीं याजन, ७ अध्यापन, ८ शरीरसंबंध आणि ९ एकत्र भोजन. या नऊ प्रकारांमुळें संसर्ग-दोष उत्पन्न होतो. (वृद्ध. बृह. स्मृति)

नऊ प्रकारचीं भक्तीचीं साधनें — १ सज्जनसंगति, २ ईशकथा-वर्णन, ३ त्याचें गुणगान, ४ त्याच्या वचनांचें व्याख्यान करणें, ५ गुरूची उपासना, ६ ईशपूजनीं एकनिष्ठा, ७ मंत्रांची सांग उपासना, ८ भूत-मात्राचे ठिकाणीं ईशभाव, बाह्येंद्रिय-निग्रह आणि ९ परमेश्वरी स्वरूपाचा तत्त्वविचार.

'एवं नवविधा भक्तिः साधनम् ।' (अ. रा. अरण्य. सर्ग १०-२७).

नऊ प्रकारची सृष्टि — १ महत्तत्त्वांची उत्पत्ति, २ अहंकार, ३ सूक्ष्म तन्मात्रांची उत्पत्ति, ४ पंच ज्ञानेंद्रियें व पंच कर्मेंद्रियें, ५ मन, ६ अविद्या, ७ स्थावर, ८ पशु आणि ९ मनुष्य. अशी नऊ प्रकारची सृष्टि परमेश्वरानें क्रमानें उत्पन्न केली. (भाग. स्कंध. ३-१०-१३)

नऊ प्रमुख तत्त्वें (मध्वसिद्धान्त) — १ विष्णुसर्वोत्तमत्व, २ जगत्-सत्यत्व, ३ जीवेशभेद, ४ सेवकसेव्यभाव, ५ जीवाजीवभेद, ६ मोक्ष-भक्ति, ७ मोक्षाचें साधन निर्मळभक्ति, ८ प्रमाणत्रय (प्रत्यक्ष, अनुमान व आगम) व ९ सर्व वेदमयत्व. हीं मध्व संप्रदायांत नऊ प्रमुख तत्त्वें मानिलीं आहेत. (मध्वाचार्य आणि त्यांचें तत्त्वज्ञान)

नऊ ब्रह्मदेवाचे मानसपुत्र — १ भृगु, २ पुलस्त्य, ३ पुलह, ४ क्रतु, ५ अंगिरा, ६ दक्ष, ७ अत्रि, ८ मरीचि आणि ९ वसिष्ठ. हे नऊ ब्रह्मदेवाचे मानसपुत्र होत.

भृगुं पुलस्त्यं पुलहं क्रतुमङ्गिरसं तथा ।
मरीचिं दक्षमत्रिं च वसिष्ठं चैव मानसम् ॥
नव ब्रह्माण इत्येते पुराणे निश्चयंगताः ॥ (पद्म. सृष्टि. खंड)

अन्यत्र महर्षि नारद हे ब्रह्मदेवाचे दहावे मानसपुत्र म्हणून सांगितले आहेत. (मत्स्य. ३·८; मनु. १·३५)

नऊ महारोग — १ राजयक्ष्मा, २ कुष्ठ, ३ रक्तपिती, ४ उन्माद, ५ श्वास, ६ मधुमेह, ७ भगंदर, ८ उदर आणि ९ मुतखडा.

नऊ महौषधी व नवग्रह — ज्या ग्रहाच्यामुळें जो विकार उत्पन्न झाला असेल त्याचा नाश त्या ग्रहाचा वृक्ष करतो असें वैद्यक ज्योतिषांत सांगितलें आहे. समिधा–चिकित्साशास्त्रानुसार जगांत एकंदर उत्तम औषधी वृक्ष नऊ असून त्यास महौषधी म्हणतात. ते पुढीलप्रमाणें—

वृक्ष	ग्रह	वृक्ष	ग्रह
१ मांदार	रवि	६ उंबर	शुक्र
२ पळस	सोम	७ शमी	शनि
३ खैर	मंगळ	८ कळकीचें झाड	राहू
४ जाडेंबिरें	बुध	९ कुश	केतु
५ पिंपळ	गुरु		

(फलाहारचिकित्सा)

नऊ महाविषें — १ कालकूट, २ बचनाग, ३ शृंगक, ४ प्रदीपन, ५ हालाहल, ६ ब्रह्मपुत्र, ७ हरिद्र, ८ सक्तक आणि ९ सौराष्ट्रिक.

'सौराष्ट्रिक इति प्रोक्ता विषभेदा अमीनव.' (यो. रत्नाकर)

नऊ योगाचे अन्तराय (विघ्नें) — १ रोग, २ कर्मामध्यें अप्रवीणता, ३ संशय, ४ साधनांकडे दुर्लक्ष, ५ देह आणि मन यांचें जाड्य, ६ विषयासक्ति, ७ विपरीतज्ञान, ८ समाधि लावावयाच्या स्थानाची प्राप्ति न होणें आणि ९ चित्त स्थिर न होणें. (योगसूत्रें १–३०)

नऊ व्याकरणशास्त्रकार — १ इंद्र, २ चंद्र, ३ काशकृत्स्न, ४ कौमार, ५ शाकटायन, ६ सारस्वत, ७ शाकल, ८ अपिशल आणि ९ पाणिनी. (लघुसिद्धान्त कौमुदी)

नऊ सच्छिष्याचीं लक्षणें — १ सन्मानाची अपेक्षा नसणें, २ निर्मत्सरता, ३ दक्षता, ४ अहंमन्यता सुटणें, ५ सद्‌गुरूशीं सहृदयपण, ६ निष्ठा, ७ परमार्थ जिज्ञासा, ८ अनसूया आणि ९ वितंडवाद न करणें.

एवं शिष्याचीं नव लक्षणें। नवखंड पृथ्वीचीं आभरणें॥
निजकृपेनें नारायणें। भक्ताकारणें दीधलीं॥ (ए. भा. १०-२३७)

नऊ संवेदना — १ प्रेम, २ हास, ३ आश्चर्य, ४ उत्साह, ५ घृणा, ६ क्रोध, ७ भीति, ८ शोक व ९ शांति. कोणताहि प्राणी जन्माला येतांना या नऊ संवेदनांनीं युक्त असतो. (सह्याद्रि एप्रिल १९५३)

नऊ स्थायी भाव — १ रति, २ उत्साह, ३ शोक, ४ विस्मय, ५ भय, ६ हास्य, ७ जुगुप्सा, ८ क्रोध आणि ९ निर्वेद (वीट येणें किंवा विरक्ति). हे नऊ स्थायीभाव अथवा मनोवृत्ति होत.

'निर्वेद स्थायिभावोस्ति शांतोऽपि नवमो रसः।' (काव्यप्रकाश)

नऊ हस्त-वाद्यें — १ झांज, २ टाळ, ३ चिपळी. ४ करताळ, ५ जलतरंग, ६ घंटा, ७ तास, ८ घुंगुर आणि ९ घागऱ्या.

नऊजणांकडे विपत्कालीं देखील याचना करूं नये — १ कृपण, २ निंदक (शिवीगाळ करणारा), ३ मूर्ख, ४ पारधी, ५ जुगारी, ६ पूज्यांना मान न देणारा, ७ निष्ठुर, ८ वैरबुद्धीनें वागणारा व ९ कृतघ्न. (म. भा. उद्योग ३७-३६)

नव खंड पृथ्वी — (अ) पौराणिक कालीन पृथ्वीवरील नऊ मोठाले भूभाग. – १ इलावृत्त, २ भद्राश्व, ३ हरिवर्ष, ४ किंपुरुष वर्ष, ५ केतुमाल, ६ रम्यक, ७ भरतवर्ष, ८ हिरण्मय आणि ९ उत्तर कुरु. हीं नव खंडें होत. " नव खंड पृथ्वी व दहावें खंड काशी असें म्हणतात "; (आ) १ भरतखंड, २ पुष्करखंड, ३ हरिखंड, ४ रम्यखंड, ५ सुवर्ण-खंड, ६ इलावृत्त खंड, ७ कौरव खंड, ८ किन्नर खंड आणि ९ केतुला-खंड. (मूळ स्तंभ कथासार)

नवग्रह — १ सूर्य, २ चंद्र, ३ मंगळ, ४ बुध, ५ गुरु, ६ शुक्र, ७ शनि, ८ राहू आणि ९ केतु. यांखेरीज हर्शल व नेपच्यून हेहि ग्रह आधुनिक मानतात. यांनाच अनुक्रमें वरुण व प्रजापति असें म्हणतात. या शिवाय प्लूटो नामक एक ग्रह अलीकडे (१९३०) पाश्चिमात्यांनीं नवीन शोधून काढला आहे.

सूर्यः सोमो महीपुत्रः सोमपुत्रो बृहस्पतिः ।
शुक्रः शनैश्चरो राहुः केतुश्चैते ग्रहाः स्मृताः ॥ (या. स्मृति)

नव ग्रहांचीं नऊ रत्नें — १ सूर्य-माणिक, २ चंद्र-मोतीं, ३ मंगळ-प्रवाळ, ४ बुध–पाच, ५ गुरु–पुष्पराग, ६ शुक्र–हिरा, ७ शनि–नीळ, ८ राहू–गोमेद आणि ९ केतु–वैडूर्य मणि. हीं क्रमानें नवग्रहांचीं रत्नें असून त्या त्या रत्नांची आंगठी धारण केल्यानें त्या त्या ग्रहांची प्रसन्नता होऊन इष्टसिद्धि होते. (र. र. समुच्चय)

नवगोप्यें — १ आयुष्य, २ वित्त, ३ गृहच्छिद्र, ४ मंत्र, ५ मैथुन, ६ औषध, ७ दान, ८ मान आणि ९ अपमान. या नऊ गोष्टींची वाच्यता करूं नये.

आयुर्वित्तं गृहच्छिद्रं मन्त्रमौषधमैथुने ।
दानं मानापमानौ च नव गोप्यानि कारयेत् ॥ (सु.)

नवदुर्गा — १ शैलपुत्री, २ ब्रह्मचारिणी, ३ चंद्रघंटा, ४ कुष्मांडा, ५ स्कंदमाता, ६ कात्यायनी, ७ कालरात्री, ८ महागौरी आणि ९ सिद्धिदात्री.

' नवमं सिद्धिदात्री च नवदुर्गाः प्रकीर्तिताः । ' (चण्डी कवचम्)

नवद्वारें — २ डोळे, २ कान, २ नाकपुड्या, १ तोंड, १ गुदद्वार आणि १ मूत्रद्वार. अशीं मानवी शरिराचीं नऊ द्वारें आहेत.

'नवद्वारें देही । तो असुतची परि नाहीं. । ' (ज्ञा. ५-७५)

नव नाग — १ अनंत, २ वासुकि, ३ शेष, ४ पद्मनाभ, ५ कंबल, ६ शंखपाल, ७ धृतराष्ट्र, ८ तक्षक आणि ९ कालिया. (नवनाग स्तोत्र)

नव नाथ — (अ) १ मच्छिंदर, २ गोरख, ३ जालंधर, ४ कानिफ, ५ चरपटी, ६ नागेश, ७ भरत, ८ रेवण आणि ९ गहिनीनाथ. हे नव नारायणाचे अवतार होत. (नवनाथ भक्तिसार); (आ) १ ओंकारनाथ, २ शैलनाथ, ३ संतोकनाथ, ४ अकलकंबुनाथ, ५ गजबली गजकांतनाथ, ६ उदयनाथ, ७ मत्स्येंद्रनाथ, ८ गोरखनाथ आणि ९ पूर्ण भरत. (Gorakhanath and Kanphatas)

नव नारायण — १ कवि, २ हरि, ३ अंतरिक्ष, ४ प्रबुद्ध, ५ पिप्पलायन, ६ आविर्होत्र, ७ द्रुमिल, ८ चमस आणि ९ करभाजन. हे नऊहि मुनि आत्मविद्याविशारद होते. (भाग. ११·२·२१).

कीं ते नवही नारायण । स्वयें प्रगटलें आपण ।
नवही नृसिंह जाण । देदीप्यमान पैं आले ॥ (ए. भा. २-१८९)

नवनिधि — (अ) १महापद्म, २पद्म, ३शंख, ४मकर, ५कच्छप, ६ मुकुंद, ७ कुंद, ८ नील आणि ९ खर्व. असे कुबेराचे नवनिधि आहेत. (स्कंद वैष्णव खंड अ.मा.७–५१); (आ) १ हय, २ गज, ३ रथ, ४ दुर्ग, ५ भांडार, ६ अग्नि, ७ रत्न, ८ धान्य आणि ९ प्रमदा; (इ) १ कामधेनु, २ अंजन, ३ सिद्ध पादुका, ४ अन्नपूर्णा, ५ कल्पतरु, ६ चिंतामणि, ७ घुटिका, ८ कलक आणि ९ परिस. (दुर्बोध श. कोश)

नव बालग्रह — १ स्कंद, २ स्कंदापस्मार, ३ शकुनीग्रह, ४ पूतनाग्रह, ५ अन्धपूतनाग्रह, ६ शीतपूतना, ७ रेवती, ८ मुखमंडिका ग्रह आणि ९ नैगमग्रह. हे नव बालग्रह बालकांना पीडा देणारे आहेत. (सुश्रुत)

नव मूलभूत जीवन प्रेरणा — १ पोषणेच्छा, २ संरक्षणेच्छा, ३ विश्रामेच्छा, ४ कार्येच्छा, ५ उत्सर्जनेच्छा, ६ कामेच्छा, ७ वात्सल्येच्छा, ८ प्रभुत्वेच्छा आणि ९ अनुसरणेच्छा. (नवभारत सप्टेंबर १९५७)

नवरत्नें — १ हिरा, २ मोती, ३ प्रवाळ, ४ गोमेद, ५ इंद्रनील, ६ वैडूर्य, ७ पुष्कराज, ८ पाच व ९ माणिक.

वज्रं मुक्ता प्रवालं च गोमेदश्चेंद्रनीलकः ।
वैडूर्यः पुष्करजश्च पाचिमाणिक्यमेव च ॥
महारत्नानि चैतानि नवप्रोक्तानि सूरिभिः ॥ (सु.)

नवरत्नें (अ) (विक्रमाच्या सभेंतील)—१ धन्वंतरी (वैद्य), २ क्षपणक (फलज्योतिषी), ३ अमरसिंह (कोशकार), ४ शंकु (भूमापन शास्त्रज्ञ), ५ वेतालभट्ट (मंत्रशास्त्रज्ञ), ६ घटकर्पर (शिल्पशास्त्रज्ञ), ७ कालिदास (कवि), ८ वराहमिहिर (ज्योतिषी), आणि ९ वररुचि (वैयाकरणी).

ख्यातो वराहमिहिरो नृपतेः सभायां रत्नानि वै ।
वररुचिर्नव विक्रमस्य । (ज्योतिर्विदाभरण)

(आ) (अकबरकालीन) — १ राजा बिरबल, २ अबुल फजल (वैज्ञानिक), ३ अबुल फैजी, ४ राजा तोडरमल, ५ तानसेन (संगीतज्ञ), ६ अबदुल रहीम (कवि), ७ मानसिंह, ८ खानखाना आणि ९ भगवानदास.

नवरस — १ शृंगार, २ वीर, ३ करुण, ४ अद्‌भुत, ५ हास्य, ६ भयानक, ७ बीभत्स, ८ रौद्र आणि ९ शांत. असे नऊ रस साहित्यशास्त्रांत मानले आहेत. कोणी कोणी भक्ति हा दहावा रस मानतात.

शृंगारवीरकरुणाद्‌भुतहास्यभयानकाः ।
बीभत्सरौद्रशांतश्च नवधा कीर्तिता रसाः ॥ (रसगंगाधार)

नवरस व त्यांचे स्थायीभाव — १ शृंगार–रति, २ हास्य–आनंद, ३ करुण–शोक, ४ रौद्र–क्रोध, ५ वीर–उत्साह, ६ भयानक–भय, ७ बीभत्स–जुगुप्सा, ८ अद्‌भुत–विस्मय, ९ शांत–शम. (प्रतापरुद्र)

नवलक्षणें ब्राह्मणाचीं — १ आचार, २ विनय, ३ विद्या, ४ प्रतिष्ठा, ५ तीर्थदर्शन, ६ निष्ठा, ७ वेदपठण, ८ तपस्या व ९ दान.

नवविधा भक्ति व नऊ भक्तश्रेष्ठ — १ श्रवण–परीक्षिति, २ कीर्तन–शुकाचार्य, ३ स्मरण–प्रल्हाद, ४ पादसेवन–लक्ष्मी, ५ अर्चन–पृथु राजा, ६ वंदन–अक्रूर, ७ दास्य–हनुमान्, ८ सख्य–अर्जुन आणि ९ आत्मनिवेदन–बालि.

श्रवणं कीर्तनं स्मरणं पादसेवनम् ।
आर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥ (भाग. स्कंध ७-५-२३)

नवसमिधा — १ रुई, २ पळस, ३ खैर, ४ आघाडा, ५ पिंपळ, ६ उंबर, ७ शमी, ८ हरळी व ९ दर्भ.

नवसाक्षिदेवता — १ सूर्य, २ चंद्र, ३ यम, ४ काल, ५ पृथ्वी, ६ आप, ७ तेज, ८ वायु व ९ आकाश.

सूर्यः सोमो यमः कालो महाभूतानि पंच च ।
एते शुभाशुभाख्येऽहं कर्मणा नवसाक्षिणः ॥ (सु.)

१०

दश आयुधें — (अ) (देवीचीं) १ खड्ग, २ बाण, ३ गदा, ४ शूल, ५ शंख, ६ चक्र, ७ भुशुंडी, ८ परिघ, ९ कार्मुक आणि १० रुधिरपात्र. (सप्तशती १–१); (आ) (शंकराचीं) — १ खड्ग, २ त्रिशूळ, ३ परशु, ४ शंख, ५ डमरू, ६ नागपाश, ७ अक्षमाला, ८ धनुष्य (पिनाक), ९ शर आणि १० पाशुपत (क. क.)

दशग्रंथ (अ) — १ संहिता, २ पद, ३ क्रम, ४ ब्राह्मण, ५ व्याकरण, ६ शिक्षा, ७ कल्प, ८ ज्योतिष, ९ छंद व १० निरुक्त; (आ) १ संहिता, २ ब्राह्मण, ३ आरण्यक, ४ शिक्षा, ५ कल्प, ६ व्याकरण, ७ निघंटु, ८ निरुक्त, ९ छंद व १० ज्योतिष. या वेद व त्यांचीं उपांगें असलेल्या दहा ग्रंथांस दशग्रंथ म्हणतात.

दशदशा (जीवाच्या) — १ गर्भवास, २ जन्म, ३ बाल्य, ४ कौमार, ५ पौगण्ड, ६ यौवन, ७ स्थावीर्य, ८ जरा, ९ प्राणरोध आणि १० नाश.

दशदिशा व त्यांच्या देवता — १ पूर्व–इंद्र, २ पश्चिम–वरुण, ३ उत्तर–कुबेर, ४ दक्षिण–यम, ५ ईशान्य–ईश, ६ नैर्ऋत्य–निऋति, ७ वायव्य–वायु, ८ आग्नेय–अग्नि, ९ ऊर्ध्व–ब्रह्मा व १० अधोदिशा–शेषनाग.

दशांगें (वृक्षाचीं) — १ मूळ, २ साल, ३ पान, ४ फूल, ५ फळ, ६ बोखी, ७ चीक, ८ नार, ९ कांटे व १० देठ पानांचा किंवा फुलांचा.

दशांगधूप — (अ) १ कोष्ठ, २ गूळ, ३ लाख, ४ हरीतकी, ५ राळ, ६ जटामांसी, ७ शिलारस, ८ साखर, ९ मोथ व १० गुग्गुळ; (आ) १ नखला, २ वाळा, ३ चंदन, ४ ऊद, ५ विशेष, ६ आगरु, ७ तूप, ८ कापूर, ९ मध आणि १० गुलाबाचीं फुलें. या दहा सुगंधी द्रव्यांच्या मिश्रणानें तयार होणारा धूप. (दुर्बोध श. को.); (इ) १ कृष्णागरु, २ चंदन, ३ गुग्गुळ, ४ श्वेतागरु, ५ लाख, ६ बेलफळ, ७ तूप, ८ मध, ९ सर्जरस आणि १० कापूर. हीं दहा धूपाचीं साधनें होत.

' साधनानि दशांगानि धूपश्च चतुरानन । ' (वी. प्र.)

दश नाड्या — १ इडा, २ पिंगला, ३ सुषुम्ना, ४ गांधारी, ५ हस्तिजिह्वा, ६ पूषा, ७ यशस्विनी, ८ अलम्बुषा, ९ कुहू व १० शंखिनी. मानव शरिरांत एकंदर बहात्तर सहस्र नाड्या असून त्यांत प्राणवहा अशा प्रधान बहात्तर नाड्या आहेत, त्यांत या दशनाड्या मुख्य होत.

'चक्रवत्संस्थिता ह्येताः प्रधाना दश नाड्यः' (अग्नि. २१४-३)

दशनाम संन्यासी — १ गिरी, २ पुरी, ३ पर्वत, ४ सागर, ५ बन, ६ तीर्थ, ७ भारती, ८ सरस्वती, ९ अरण्य आणि १० आश्रम.
(दर्शनप्रकाश)

दश महादानें — १ सुवर्ण, २ अश्व, ३ तीळ, ४ हत्ती, ५ दासी, ६ रथ, ७ भूमि, ८ घर, ९ कन्या आणि १० कपिला धेनू. या दहा वस्तूंपैकीं कोणत्याहि वस्तूचें दान तें महादान म्हणून मानलें जातें.

कनकाश्वातिलानागादासीरथीमहीगृहाः ।
कन्या च कपिला धेनुर्महादानानि वै दश ॥ (अग्नि २०९-२४)

दश महाविद्या — १ काली, २ तारा, ३ षोडशी, ४ भुवनेश्वरी, ५ भैरवी, ६ छिन्नमस्ता, ७ धूमवती, ८ बगला, ९ मातंगी आणि १० कमला. या दहा महाविद्या म्हणून शक्ति उपासनेंत सांगितल्या आहेत. (कल्याण शक्ति अंक)

दशमुळें — (अ) १ शालिपर्णी (रानगांजा), २ पुष्टिपर्णी, ३ रिंगणी, ४ डोरली, ५ गोखरू, ६ बिल्व, ७ ऐरण (टाहाकळा), ८ टेंटू, ९ पहाडमूळ व १० शिवणमूळ; (आ) १ बेल, २ टाकळा, ३ टेंटू, ४ शिवण, ५ पाडळ, ६ सालवण, ७ गोखरू, ८ पिठवण, ९ डोरली व १० रिंगण. या दहा वनस्पतींचीं मुळें यांचा आर्य वैद्यकांत उपयोग करतात.

दशामृत — १ दहीं, २ दूध, ३ मध, ४ तूप, ५ साखर, ६ सुंठ, ७ जिरे, ८ सेंदेलोण, ९ वेलदोडे व १० मिरे. या पदार्थांच्या मिश्रणास दशामृत म्हणतात. अशी दशामृत पूजा वीरशैवांस विहित आहे (सि. पु.)

दशलक्षणें भागवत पुराणाचीं — १ सर्ग–संसार, २ विसर्ग–संहार, ३ स्थान–वैकुंठ, ४ पोषण–भगवद्भजन, ५ ऊति–कर्मानुसार होणारी वासना, ६ मन्वन्तरें–चौदा मनूंची व्यवस्थिति, ७ ईशानुकथन–दशावतारचरित, ८ निरोध–एकाग्रता, ९ मुक्ति–ज्ञानयोग, १० आश्रय –सर्व प्रकाशक परमात्मा. सर्व पुराणें पंचलक्षणात्मक पण भागवत पुराण दशलक्षणात्मक आहे. दशलक्षणांनीं तें महापुराण व पांच लक्षणांनीं युक्त तें उपपुराण अशी सर्वसाधारणपणें व्यवस्था आहे. (भाग. १२–७)

सर्ग, विसर्ग, स्थान, पोषण । ऊति मन्वन्तरें ईशानुकथन ।
निरोध मुक्ति आश्रयपूर्ण । एवं दश लक्षण भागवत ॥
(चतुः श्लोकी भागवत)

दशवायु — १ प्राण, २ अपान, ३ व्यान, ४ उदान, ५ समान, हे पिंडींचे व ६ नाग, ७ कूर्म, ८ कृकल, ९ देवदत्त आणि १० धनंजय हे ब्रह्मांडींचे. (दासबोध)

दशविघ्नें (योगाला) — १ आळस, २ व्याधिपीडा, ३ प्रमाद, ४ संशय, ५ अनवास्थितचित्त, ६ अश्रद्धा, ७ भ्रान्तिदर्शन, ८ दुःख, ९ दौर्मनस्य (इच्छा सफल न झाल्यामुळें मन क्षुब्ध होणें) आणि १० अयोग्य विषयासंबंधानें लोलुपता. (लिंग ९-४)

दशोपनिषदें — १ ईश, २ केन, ३ कठ, ४ प्रश्न, ५ मुण्ड, ६ माण्डुक्य, ७ तैत्तिरीय, ८ ऐतरेय, ९ छांदोग्य आणि १० बृहदारण्यक.

दशावतार व त्यांच्या जयंत्या — १ मत्स्य-चैत्र शु. ३ प्राह्णीं, २ कूर्म-वैशाख शु. १५ सायंकाळीं, ३ वराह-भाद्रपद शु. ३ प्राह्णीं, ४ नृसिंह-वैशाख शु. १४ सायंकाळीं, ५ वामन-भाद्रपद शु. १२ मध्याह्नीं, ६ परशुराम-वैशाख शु. ३ सायंकाळीं, ७ राम-चैत्र शु. ९ मध्याह्नीं, ८ कृष्ण-श्रावण व. ८ मध्यरात्रीं, ९ बौद्ध-आश्विन शु. १० सायंकाळीं, १० कल्की-श्रावण शु. ६ सायंकाळीं. (धर्मसिंधु)

दशविध द्विदल धान्यें — १ चणक, २ मसूर, ३ मूग, ४ उडीद, ५ लाख, ६ वाटाणे, ७ तूर, ८ वाल, ९ चवळी व १० कुळीथ.

दशविध नाद — १ चिनचिनी नाद, २ शिंगी नाद, ३ तंती नाद, ४ ताळ नाद, ५ सुस्वर नाद, ६ गर्जना नाद, ७ शंख नाद, ८ घोष नाद, ९ भेरी नाद, १० मेघ नाद. असे दहा प्रकारचे नाद साधकांस कोटी जप पूर्ण झाल्यावर ऐकूं येतात व नादाचा अनुभव येतो असें योगशास्त्रांत सांगितलें आहे. ' दशमो मेघनादः ' (हंसोपनिषत्)

दहा अपराध नामजपासंबंधीं — १ संतांची निंदा, २ असत् मार्गी मनुष्यापुढें नामगुणांचें कीर्तन, ३ दैवतामध्यें भेदबुद्धि, ४ वेदांवर अश्रद्धा, ५ शास्त्रावर अविश्वास, ६ गुरुवचनावर अश्रद्धा, ७ परमेश्वर नाममहिमा याला अर्थवाद समजण्याचा भ्रम, ८ नुसत्या नामानें पापक्षालन होतें असें समजून पाप करीत राहणें, ९ नामानेंच पुण्यलाभ होतो म्हणून आश्रमविहित कर्म न करणें आणि १० परमेश्वर नामस्मरण हें इतर यज्ञ, तप, व्रत आदि शुभकर्मांबरोबर समजणें. (कल्याण साधनांक)

दहा अवस्था (कामविकाराच्या) — १ दृष्टादृष्ट, २ चित्त अस्वस्थ होणें, ३ निश्चय, ४ निद्रानाश, ५ क्लेश होणें, ६ लक्ष न लागणें, ७ निर्लज्जता, ८ उन्माद, ९ मूर्च्छा, १० मरण. (रतिरहस्य)

दहा आरोग्याचीं सूत्रें — १ स्वच्छता, २ मोकळी हवा व सूर्यप्रकाश, ३ व्यायाम, ४ आहार, ५ विश्रांति, ६ ताठ बसणें, ७ नियमित आहारविहार, ८ पाणी, ९ वस्त्र आणि १० मनःप्रवृत्ति. (Health May 1951)

दहा आज्ञा (बायबलमधील) — १ रविवार हा विश्रांतीचा दिवस, २ परद्रव्याचा लोभ धरूं नको, ३ परस्त्रीचा लोभ धरूं नको, ४ व्यभिचार करूं नको, ५ हिंसा करूं नको, ६ चोरी करूं नको, ७ खोटी साक्ष देऊं नको, ८ मातापितरांची आज्ञा पाळ, ९ मूर्तिपूजा करूं नको व १० ईश्वराचें नांव व्यर्थ घेऊं नको. या दहा आज्ञा ख्रिस्ती धर्मग्रंथांत (जुना करार) सांगितलेल्या आहेत. (जुना करार Exodus अ. २०).

दहा ईश्वर प्राप्तीच्या वैदिक विद्या — १ उद्गीथाविद्या, २ संवर्गविद्या, ३ मधुविद्या, ४ पंचाग्निविद्या, ५ उपकोसल आत्मविद्या, ६ शांडिल्यविद्या, ७ दहराविद्या, ८ भूमविद्या, ९ दीर्घायुष्यविद्या, १० मंथविद्या. (रामगीता)

दहा उपाय (उपजीविकेचे) — १ विद्या (वेदव्यतिरिक्त), २ शिल्प, ३ रोजगार, ४ नौकरी, ५ गोरक्षण, ६ व्यापार, ७ शेती, ८ अंतःकरणाची विविध वृत्ति, ९ भिक्षेवर निर्वाह आणि १० व्याजबट्टा.

विद्या शिल्पं भृतिः सेवा गोरक्ष्यं विपणिः कृषिः ।
धृतिं भैक्ष्यं कुसीदं च दशजीवनहेतवः ॥ (मनु १०-११६)

दहा कुलें विवाहास वर्ज्य — १ क्रियाहीन, २ पुरुषरहित, ३ वेदरहित, ४ रोमश, ५ अर्शस (मूळव्याधि रोग असलेले), ६ क्षयरोगयुक्त, ७ आमयनी (अग्निमांद्य), ८ अपस्मार, ९ श्वेतकुष्ठयुक्त व १० कुष्ठयुक्त. (मनु. ३-७)

दहा गुण — १ श्लेष, २ प्रसाद, ३ समता, ४ समाधि, ५ माधुर्य, ६ ओज, ७ सौकुमार्य, ८ अर्थव्यक्त, ९ उदारता, १० कांति.

औदार्य समता कांतिरर्थव्यक्तिः प्रसन्नता ।
समाधि श्लेष ओजोऽथ माधुर्य सुकुमारता ॥ (भ. ना.)

दहा गुण (गायनाचे) — १ सुरक्त–वाद्यें स्वरांत मिळवून घेणें, २ पूर्ण–उच्चार उत्तम तऱ्हेनें करणें, ३ अलंकृत–आवाज यथायोग्य लावणें, ४ प्रसन्न–निःशंक होऊन गंभीर आवाजानें गाणें, ५ व्यक्त–उच्चार अर्थानुरूप व स्पष्ट करणें, ६ विकृष्ट–आलापांचे स्वर स्पष्ट रीतीनें लावणें, ७ श्लक्ष्ण–लयीमध्यें स्वरांचा विप्रस्तार करवून दाखविणें, ८ सम–तालबद्ध गाणें, ९ सुकुमार–मृदुस्वर येतील तेथें मृदु उच्चार करणें आणि १० मधुर–गाणें मधुर गाऊन दाखविणें.

दशैते स्युर्गुणागीते । (संगीत रत्नाकर)

दहा गुण स्नानाचे — (अ) १ रूप, २ तेज, ३ बल, ४ शुचिता, ५ दीर्घायुष्य, ६ आरोग्य, ७ पवित्रता, ८ दुःस्वप्ननाश, ९ तप व १० बुद्धि. (दक्ष स्मृति); (आ) १ बल, २ रूप, ३ शुद्धध्वनि, ४ वर्णांचा स्पष्ट उच्चार, ५ मृदुपणा, ६ सुगंध, ७ स्वच्छता, ८ संपत्ति, ९ लावण्य व १० उत्कृष्ट स्त्रिया. हे दहा गुण स्नानशील पुरुषाचा आश्रय करतात. (म. भा. उद्योग ३७.३३)

दहा गोष्टी वर्ज्य (व्यवहारांत) — १ चाकर–गर्विष्ठ, २ मुलगा –अति लाडका, ३ शत्रु–वर्म जाणणारा, ४ भाऊ–बाईलबुद्धीचा, ५ जामात–हट्टी व वेडा, ६ वक्ता–भित्रा अथवा भिडस्त, ७ मित्र–कपटी, ८ विद्वान्–स्तुतिपाठक, ९ रोगी–पथ्य न करणारा, १० गायक–मानी. या दहा गोष्टी व्यवहारांत वर्ज्य म्हणून सांगितल्या आहेत.

दहा गुरु (शीखपंथाचे) — १ गुरु नानक, २ गुरु अंगदशहा, ३ अमरदास, ४ रामदास, ५ गुरु अर्जुन, ६ हरिगोविंद, ७ हरिराय, ८ हरिकृष्णजी, ९ तेज बहाद्दर व १० गुरु गोविंदसिंग.

दहा गुणजन्य सिद्धि — १ क्षुधा-तृषाप्रभृति ऊर्मींच्या पलीकडे जाणें, २ दूरचें पाहणें, ३ दूरश्रवण, ४ शीघ्रगति, ५ रूपसिद्धि, ६ परकायाप्रवेश, ७ इच्छामरण, ८ स्वर्गांगनाप्राप्ति, ९ संकल्पसिद्धि व १० निरंकुश आज्ञा. या दहा गुणजन्य सिद्धि होत. (भाग.स्कं.११–१५)

दहा ग्राम धान्यें — १ तांदूळ, २ जव, ३ तीळ, ४ उडीद, ५ अणु, ६ प्रियंगु (राळे), ७ गहूं, ८ मसूर, ९ वाल आणि १० कुळीथ. (तैत्तिरीय ब्राह्मण अ. ८)

दहा घन वाद्यें — १ चिपळ्या, २ करताल, ३ झांज, ४ टाळ, ५ मंजरी, ६ तास, ७ घंटा, ८ घुंगरू, ९ टिपऱ्या व १० जलतरंग. हीं दहा घन म्हणजे एकावर एक आघात करून वाजविलीं जाणारीं वाद्यें होत.

दहा तामस ऋषि — १ काणाद, २ गौतम, ३ शक्ति, ४ उपमन्यु, ५ जैमिनि, ६ कपिल, ७ दुर्वास, ८ मृकंडु, ९ बृहस्पति आणि १० जामदग्न्य (परशुराम).

भार्गवं जामदग्न्यं च दशैतान्तामसानृषीन् । (पद्म उत्तर खंड)

दहा थाट (गायनशास्त्र) — १ कल्याणथाट, २ बिलावल, ३ खमाज, ४ भैरव, ५ पूर्वी थाट, ६ मारवा, ७ काफी, ८ असावरी, ९ भैरवी व १० तोडी थाट. थाट म्हणजे स्वरानुरोधानें रागाचें वर्गीकरण.

दहा देवयोनि— १ विद्याधर, २ अप्सरा, ३ यक्ष, ४ राक्षस, ५ गंधर्व, ६ किन्नर, ७ पिशाच्च, ८ गुह्यक, ९ सिद्ध आणि १० भूत. (अमर)

दहा दोष काव्याचे — १ गूढार्थ, २ अर्थांतर, ३ अर्थहीन, ४ भिन्नार्थ, ५ एकार्थ, ६ अभिप्लुप्तार्थ (तुटकतुटक), ७ न्यायाला सोडून, ८ कठीण, ९ विसंगत व १० शब्द गाळून.

शब्दच्युतं वै दश काव्यदोषाः । (भरत नाट्य १६-८४)

दहा दोष (वरासंबंधीं) — (अ) १ मुका, २ आंधळा, ३ बहिरा, ४ खुज्या बांध्याचा, ५ मूर्ख, ६ पांगळा, ७ नपुंसक, ८ कुष्ठी, ९ महारोगी आणि १० फेंपरें येणारा (विवाहसार); (आ) १ उन्मत्त, २ उपजीविकेचें साधन नसलेला, ३ फेंपरें येणारा, ४ दूरदेशीं वास करणारा, ५ कुष्ठ असलेला, ६ मूर्ख, ७ मोक्षमार्गाला अनुसरलेला, ८ शूर सैनिक पेशा पत्करलेला, ९ अक्षरशून्य व १० विवाह परावृत्त असलेला. अशांना कन्या देऊं नये.

उन्मत्ता वृत्तिहीनाश्च तथापस्मारदूषिताः ।
दूरस्था कुष्ठिनो मूर्खा मोक्षमार्गानुसारिणः ॥
शूरा अवेद्या निर्वृत्ता दश दोषयुता वराः ।
तथा षंढाश्च पतिता चक्षुः श्रोत्रविवर्जिताः ॥ (ज्योतिर्मयूख)

दहा दोष (वाणीचे)— १ विरोधी भाषण, २ एखाद्याला कासावीस करील असें, ३ उपहास, ४ छळ, ५ वर्मस्पर्श, ६ कोरडें आवेशाचें बोलणें, ७ कोटीबाज, ८ आशा पोटांत ठेवून बोलणें, ९ शंका उत्पन्न होईल असें व १० प्रतारणा (फसवेगिरी). हे भाषणप्रसंगीं दहा दोष मानले आहेत.

आड्ड वेगु विंदाणु । आशा शंका प्रतारणु ।
हे सन्यसिले अवगुणु । जया वाचा ॥ (ज्ञाने. १३-२७२)

दहा धर्मलक्षणें — १ धृति (धैर्य), २ क्षमा, ३ सहिष्णुता, ४ चोरी न करणें, ५ पवित्रता, ६ इंद्रियनिग्रह, ७ बुद्धि, ८ विद्या, ९ सत्य व १० अक्रोधता.

धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिंद्रियनिग्रहः ।
धीर्विद्या सत्यक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ॥ (मनु. ६-९२)

दहा धर्मसाधनें — १ अहिंसा, २ क्षमा, ३ सत्य, ४ लोभ—लज्जा, ५ श्रद्धा, ६ इंद्रियनिग्रह, ७ दान, ८ यज्ञ, ९ तप व १० ध्यान. हीं दहा धर्मसाधनें होत. (भ. ब्रह्म. १८९-३५)

दहा नांवें अर्जुनाचीं — १ अर्जुन, २ फाल्गुन, ३ जिष्णु, ४ किरीटि, ५ श्वेतवाहन, ६ बीभत्सु, ७ विजय, ८ कृष्ण, ९ सव्यसाचि आणि १० धनंजय.

अर्जुनो फाल्गुनो जिष्णुः किरीटी श्वेतवाहनः ।
बीभत्सुर्विजयः कृष्णः सव्यसाची धनंजयः ॥ (म.भा.विराट ४४-९)

दहा नांवें शनीचीं — १ कोणस्थ, २ पिंगल, ३ बभ्रु, ४ कृष्ण, ५ रौद्र, ६ अंतक, ७ यम, ८ सूर्यपुत्र, ९ शनैश्चर (शनि) आणि १० मंद.

कोणस्थः पिंगलो बभ्रुः कृष्णो रौद्रोऽन्तको यमः ।
सौरिः शनैश्चरो मंदः पिप्पलादेन संस्तुतः ॥ (श्रीशनैश्चरस्तोत्र)

दहा नियम — (अ) १ तप, २ संतोष, ३ आस्तिकता, ४ इंद्रियदमन, ५ देवपूजा, ६ सच्छास्त्रश्रवण, ७ लज्जा, ८ बुद्धि, ९ जप आणि १० हवन. हे दहा नियम म्हणजे आत्मसंयमनासाठीं करावयाचीं कृत्यें.

तपः संतोष आस्तिक्यं दान्तदेवस्य पूजनम् ।
सिद्धान्तं श्रवणं चैव ह्रीर्मतिश्च जपो हुतम् ।
दशैते नियमाः प्रोक्ता मया पर्वतनायक । (देवीगीता)

दहा निरनिराळे अर्थ " योग " शब्दाचे — १ ध्यान, धारणा–अध्यात्मशास्त्र, २ औषधी योजना–वैद्यशास्त्र, ३ दोन वस्तूंना जोडणें–वास्तुशास्त्र, ४ कामधंदा–व्यवहारशास्त्र, ५ हस्तलाघव–इंद्रजाल, ६ युद्धसाहित्य जुळवणी–युद्धशास्त्र, ७ कुशाग्रतेनें होणारें कर्म–कर्मयोग, ८ ग्रहांची युति–ज्योतिष, ९ अनेक रसांचें मिश्रण–रसायन आणि १० कुशलतापूर्ण शासनप्रबंध–राज्यशासन. असे योग शब्दाचे अर्थ निरनिराळ्या शास्त्रांत अभिप्रेत आहेत. (गीतेंतील राजकीय तत्त्वज्ञान)

दहा पापकर्मे — (शारीरिक तीन) १ हिंसा, २ चोरी व ३ निषिद्ध कामवासना; (वाचिक चार)–१ चहाडी, २ कठोर, ३ खोटें व ४ अप्रसिद्ध असें बोलणें आणि (मानसिक तीन)–१ दुसऱ्याचा घात करण्याची इच्छा, २ मत्सर व ३ खोटी समजूत.

दहा पुराणकालीन मूर्ख — १ दुर्योधन, २ रावण, ३ शिशुपाल, ४ जरासंध, ५ कंस, ६ हिरण्यकशिपु, ७ भस्मासुर, ८ रुक्मि, ९ जयद्रथ आणि १० शकुनि. हे दहा पुराणकालीन मूर्ख होत असें भीष्म सांगतात.

'ऐसे दशमूर्ख संसारीं । म्यां ऐकिले पाहिले नेत्रीं ॥ ' (सिद्धान्तबोध)

दहा प्रकारच्या कपिला गाई — १ सुवर्ण कपिला, २ गौर पिंगला, ३ आरक्त पिंगाक्षी, ४ जल पिंगला, ५ बभ्रुवर्णाभा, ६ श्वेत पिंगला, ७ रक्त पिंगाक्षी, ८ खूर पिंगला, ९ पाटला आणि १० पुच्छ पिंगला (जिच्या शेपटाच्या केसाचा रंग पिवळा असती). (म. भा. अश्वमेध)

दहा प्रकार चुंबनाचे — १ मिलित, २ स्फुरित, ३ घाटिक, ४ तिर्यक्, ५ उत्तरोष्ठ, ६ पीडित, ७ संपुट, ८ हनुवक्त्र, ९ प्रतिबोध आणि १० समौष्ठ चुंबन. (अनंगरंग)

दहा प्रकारचीं बलें — १ विद्या, २ कुलीनता, ३ मित्रपरिवार, ४ बुद्धि, ५ सत्त्व, ६ धन, ७ तपस्या, ८ सहाय्यता, ९ सामर्थ्य आणि १० दैव.

दहा प्रकारच्या मुद्रा (योगशास्त्र) — १ महामुद्रा, २ महाबन्ध, ३ महाभेद, ४ खेचरी, ५ जालंदरबंध, ६ मूलबंध, ७ विपरीत कृति, ८ उड्डीयान, ९ वज्रोली, १० शक्ति चालना. (शिवसंहिता)

दहा प्रकारचे यज्ञ — १ अग्निहोत्र, २ दर्शपौर्णमास, ३ चातुर्मास्य, ४ पशुयाग, ५ सोमयाग हे पांच नैमित्तिक व १ देवयज्ञ, २ पितृयज्ञ, ३ ब्रह्मयज्ञ, ४ भूतयज्ञ आणि ५ मनुष्ययज्ञ. हे पांच नित्य मिळून दहा यज्ञ होत.

दहा प्रकारची व्यूहरचना — १ गरुड, २ मकर, ३ श्येन, ४ अर्धचंद्र, ५ वज्र, ६ शकट, ७ मंडल, ८ सर्वतोभद्र, ९ चक्र आणि १० सूची. अशी दहा प्रकारची व्यूहरचना प्राचीन काळीं युद्धांत करीत असत. (अग्नि २-३६)

दहा प्रकारचीं स्नानें — १ आग्नेय-भस्मस्नान, २ वारुण-पर्जन्य-स्नान, ३ ब्रह्म-गायत्र्यस्नान, ४ वायव्य-गाईच्या पायांच्या धुळीचें, ५ अवगाहन-बुडी मारणें, ६ कंठस्नान, ७ कटिस्नान, ८ कापिल-ओल्या वस्त्रानें अंग पुसणें, ९ मंत्रस्नान-मंत्रानें मार्जन आणि १० मानस-स्नान.

आग्नेयं वारुणं ब्राह्मं वायव्यं चावगाहनम् ।
कंठस्नानं कटिस्नानं कापिलं मंत्र मानसे ॥ (विश्वब्रह्मपुराण)

दहा प्रमुख स्थानें चुंबनाचीं — १ ललाट, २ केश, ३ कपोल, ४ नयन, ५ वक्ष, ६ स्तन, ७ ओष्ठ अंतर्मुख, ८ वंक्षण, ९ कक्षा आणि १० वरांग. हीं दहा चुंबनाचीं प्रमुख स्थानें कामशास्त्रांत सांगितलीं आहेत.
(वा. कामसूत्रें)

दहा प्रमुख दार्शनिक वाद — १ आरंभवाद, २ संघातवाद, ३ असत्ख्यातिवाद, ४ आत्मख्यातिवाद, ५ परिणामवाद, ६ विवर्तवाद, ७ दृष्टसृष्टिवाद, ८ प्रतिबिंबवाद, ९ सत्ख्यातिवाद आणि १० अख्यातिवाद. असे दहा प्रमुखवाद दर्शन ग्रंथांतून सांगितले आहेत.

दहा प्राण (तालांचे) — १ काल, २ मार्ग, ३ क्रिया, ४ अंग, ५ ग्रह, ६ जाति, ७ कला, ८ लय, ९ यति व १० प्रस्तार असे तालाचे दहा प्राण संगीतशास्त्रांत मानिले आहेत.

दहा भास्करक्षेत्रें — १ काशी, २ पुष्पगिरि, ३ कांची, ४ निवृत्ताख्या (निवृत्ति संगम), ५ अलंपुरी, ६ श्रीशैल्य, ७ श्रीविरूपाक्ष, ८ सेतुबंध रामेश्वर, ९ केदार व १० गोकर्ण.

काशी पुष्पगिरिः कांची निवृत्ताख्या अलंपुरी ।
श्रीशैलः श्रीविरूपाक्षः सेतुः केदार एव च ।
गोकर्णं च दशैतानि भास्कराण्याहुरुत्तमाः ॥ (स्कंद-गोकर्ण अ. ६६)

दहा मर्मस्थानें (शरिराचीं) — १ नाभि, २ कंठ, ३ नाक, ४ हृदय, ५ टाळू, ६ वृषण, ७ खांद्याचे सांधे, ८ कपाळ, ९ मांडी व १० गुदद्वार. (वैद्यसुधानिधि)

दहा 'म' कार चंचल होत — १ मन, २ मधुकर, ३ मेघ, ४ मानिनी, ५ मदन, ६ मरूत्–वारा, ७ मा (लक्ष्मी), ८ मद, ९ मर्कट आणि १० मत्स्य. हे दहाजण अति चंचल होत. त्यांत मनाला अग्रपद दिलें आहे.

मनो मधुकरो मेघो मानिनी मदनो मरुत् ।
मा मदो मर्कटो मत्स्यो मकरा दशचंचलाः ॥ (सु.)

दहा मंत्रब्राह्मण ग्रंथकार व विधर्माचा नाश करणारे — १ वासिष्ठ, २ शाक्त, ३ पराशर, ४ इंद्रप्रमति, ५ भरद्वसु, ६ मैत्रावरुण, ७ कुण्डिन, ८ सुद्युम्न, ९ बृहस्पति आणि १० भरद्वाज.

'दशमस्तु भरद्वाजो मन्त्रब्राह्मणकारकाः ।
एते चैव हि कर्तारो विधर्मध्वंसकारिणः ॥ ' (वायु पूर्वार्ध)

दहा मंत्री (श्रीकृष्णसभेचे) — १ उद्धव, २ वसुदेव, ३ कंक, ४ विपृथु, ५ श्वफल्क, ६ चित्रक, ७ गद, ८ सत्यक, ९ बलभद्र व १० पृथु. हे दहा यदुकुळांतील ज्येष्ठ व श्रेष्ठ असे दहा मंत्री श्रीकृष्णाच्या सभेंत होते. (हरिवंश विष्णुपर्व)

दहा यतिधर्म — १ क्षमा, २ निर्लोभता, ३ आर्जव, ४ मार्दव, ५ तप, ६ संयम, ७ सत्य, ८ शौच, ९ आकिंचन्य व १० ब्रह्मचर्य. (जैनधर्म)

दहा यम (नियमन आत्मसंयमन) — (अ) १ अहिंसा, २ सत्य, ३ चोरी न करणें, ४ ब्रह्मचर्य, ५ दया, ६ सरळपणा, ७ क्षमा, ८ धैर्य, ९ मिताहार आणि १० पवित्रता; (आ) १ सत्य, २ क्षमा, ३ आर्जव, ४ ध्यान, ५ आनृशंस्य (क्रौर्याचा अभाव), ६ अहिंसा, ७ इंद्रियदमन, ८ प्रसन्न चित्त, ९ सद्वर्तन आणि १० सर्वाभूतीं दया.

दहा यमकें (अलंकारप्रकार) — १ दोन चरणांतील शेवटचीं कांहीं अक्षरें एकाच ध्वनीचीं किंवा तींच तीं असलीं तर यमक हा अलंकार होतो. त्याचे प्रकार–१ आद्ययमक, २ अंत्ययमक, ३ चरणयमक, ४ पूर्णयमक, ५ ठामयमक, ६ अश्वघाटी यमक, ७ पुष्पयमक, ८ संदष्टयमक, ९ संयुतावृत्ति यमक व १० पांक्तियमक.

दहा व्यसनें (कामवासनेपासून उत्पन्न होणारीं) — १ मृगया, २ अक्षक्रीडा, ३ दिवसा निद्रा, ४ परदोषकथन, ५ स्त्रीसंभोग (अमर्यादित), ६ मद्यपान, ७ अतिगायन, ८ अतिवादन, ९ अतिनर्तन आणि १० अकारण भ्रमण. (मनु ७-४७)

दहा वाहनें (श्रीविष्णूचीं) — १ हंस, २ सिंह, ३ हनुमान्, ४ शेष, ५ गुरुड, ६ दंतावळ, ७ रथ, ८ अश्व, ९ शिबिर आणि १० पुष्पक. (कल्याण भागवतांक)

दहा शिक्षणानुग्रहास पात्र — १ आचार्यपुत्र, २ सेवक, ३ अन्य कोणतेंहि ज्ञान सांगणारा, ४ धार्मिक, ५ पवित्र, ६ आप्त, ७ ग्रहण करण्यास समर्थ, ८ धनदाता, ९ हितेच्छु व १० ज्ञातिवर्ग. (मनु २-१०९)

दहा सत्पुरुषांचीं लक्षणें — १ भक्ति, २ परमेश्वरावर निष्ठा, ३ निर्भयता, ४ ध्यान, ५ वैराग्य, ६ सरलता, ७ करुणा, ८ निर्जनप्रियता, ९ अनिंदा आणि १० शास्त्रनिष्ठा. (कल्याण संतांक)

दहा संस्कार (मंत्रसिद्धीसाठीं) — १ जनन, २ दीपन, ३ बोधन, ४ ताडन, ५ अभिषेक, ६ विमलीकरण, ७ जीवन, ८ तर्पण, ९ गोपन व १० आप्यायन. हे संस्कार मंत्रसिद्धीसाठीं करावे लागतात, असा सांस्कारिक मंत्र लवकर सिद्ध होतो. (कल्याण संतांक)

दहाजण धर्म जाणत नाहींत — १ मद्यपि, २ बेसावध, ३ उन्माद-ग्रस्त, ४ थकलेला, ५ क्रुद्ध, ६ बुभुक्षित, ७ उतावळा, ८ लुब्ध, ९ भित्रा आणि १० विषयलंपट. तेव्हां शहाण्यानें यांशीं संबंध ठेवूं नये.

मत्तः प्रमत्तः उन्मत्तः श्रान्तः क्रुद्धो बुभुक्षितः ।
त्वरमाणश्च लुब्धश्च भीतः कामी च ते दश ॥ (म. भा. उद्योग)

दहाजण पोष्य होत — १ आई, २ बाप, ३ गुरु, ४ पत्नी, ५ प्रजा, ६ दीन, ७ आश्रित, ८ पाहुणा, ९ अतिथी आणि १० अग्नि.

पितामाता गुरुर्भार्या प्रजा दीनः समाश्रिताः ।
अभ्यागतोऽतिथीश्चाग्निः पोष्यवर्ग उदाहृतः ॥ (दक्षस्मृति)

दहाजण षड्मुद्रा साध्य झालेले — १ ध्रुव, २ प्रल्हाद, ३ मारुति, ४ लक्ष्मण, ५ मयूरध्वज, ६ हरिश्चंद्र, ७ रुक्मांगद, ८ अंबरीष, ९ अर्जुन आणि १० श्रीकृष्ण.

११

अकरा करण — तिथीच्या अर्धास करण म्हणतात. १ बव, २ बालव, ३ कौलव, ४ तैतिल, ५ गर, ६ वणिज, ७ भद्रा, हे सात करण चल आणि ८ शकुनि, ९ चतुष्पाद, १० नाग व ११ किंस्तुघ्न हे चार करण स्थिर असे मिळून अकरा करण आहेत. (ज्योतिष)

अकरा कौरवपक्षीय रथी — १ दुर्योधन, २ दुःशासन, ३ दुःसह, ४ दुर्मर्षण, ५ विकर्ण, ६ चित्रसेन, ७ विविंशति, ८ जय, ९ सत्यव्रत, १० पुरुमित्र व ११ युयुत्सु. (म. भा. आदि ६३-१२०)

अकरा चर्म वाद्यें — १ मृदंग, २ तबला, ३ डफ, ४ समेळ, ५ खंजीर, ६ नौबत, ७ तास, ८ मर्फा, ९ चौघडा, १० डंका व ११ ढोल.

अकरा पांडवांचे प्रमुख साहाय्यकर्ते — १ सात्यकि, २ धृष्टकेतु, ३ जयत्सेन, ४ पाण्डय, ५ द्रुपद, ६ विराट्, ७ श्रीकृष्ण, ८ चेकितान, ९ केकय, १० काशीपति आणि ११ घटोत्कच. (म. भा. सभापर्व)

अकरा पूजास्थानें — १ सूर्य, २ अग्नि, ३ ब्राह्मण, ४ गाय, ५ वैष्णव, ६ आकाश, ७ वायु, ८ जल, ९ भूमि, १० आत्मा व ११ सर्व प्राणिमात्र. हीं परमेश्वरपूजेचीं अकरा पूजास्थानें होत. (भागवत स्कंध ११-११-४२)

इयें अकराहीं अधिष्ठानें । मत्प्राप्तिकर अतिपावनें ।
म्यां सांगितलीं अनुसंधानें । पूजा करणें यथाविधी ॥

(ए. भा. ११-१४५५)

अकरा प्रकार भक्तीचे — १ गुणमाहात्म्यासक्ति, २ रूपासक्ति, ३ पूजासक्ति, ४ स्मरणासक्ति, ५ दासासक्ति, ६ सख्यासक्ति, ७ कांतासक्ति, ८ वात्सल्यासक्ति, ९ आत्मनिवेदनासक्ति, १० तन्मयासक्ति आणि ११ परमविरहासक्ति. (नारदभक्ति सूत्रें ८२)

अकरा प्रमुख कुलें सपुष्प वनस्पतींचीं — १ ज्वारीकुल, २ तूरकुल, ३ कोबीकुल, ४ वांगीकुल, ५ हळदकुल, ६ कर्दळकुल, ७ लिंबुकुल, ८ कापूसकुल, ९ तुलसीकुल, १० कारळाकुल आणि ११ मिरीकुल. (आमची शेती)

अकरा मारुती (समर्थस्थापित कालानुक्रमें) — १ शहापूर, २ मसूर, ३ व ४ चाफळ येथें, ५ शिंगणवाडी, ६ माजगांव, ७ उंब्रज, ८ बत्तीस शिराळें, ९ पारगांव, १० मनपाडळें व ११ बाहेबोरगांव. हीं अकरा समर्थस्थापित मारुतिस्थानें सातारा जिल्ह्यांत आहेत. (दासायन)

अकरा वानर सेनापति — १ गज, २ गवाक्ष, ३ गवय, ४ शरभ, ५ गंधमादन, ६ मैंद, ७ द्विविद, ८ सुषेण, ९ जांबुवंत, १० नळ व

११ सुनीळ. सुग्रीवाच्या वानर–सैन्यांत हे अकरा प्रमुख सेनापति होते. (भा. रा. किष्किंधा).

अकरा विद्या (भगवान शंकरापासून आविर्भूत) — १ व्याकरण, २ गांधर्ववेद, ३ सामुद्रिक, ४ वैद्यक, ५ अस्त्र-विद्या, ६ योगशास्त्र, ७ भक्तिशास्त्र, ८ रुद्रयामल आदि तंत्रशास्त्र, ९ साबर आदि मंत्रशास्त्र, १० स्वरोदय आणि ११ सर्व प्रकारच्या कथा. (कल्याण शिवांक)

अकरा शुद्ध आहार —१ भैक्ष्य, २ यवागू (भाताची पेज), ३ ताक, ४ दूध, ५ सातूचा पदार्थ, ६ फल, ७ मूल, ८ राळे, ९ कण, १० पेंड व ११ सातु. हे अकरा आहार योग्यांना सिद्धि देणारे आहेत. (मार्कंडेय ३८-११).

अकरा स्त्री-पुरुष स्वभाव अथवा गुणवैशिष्ट्यें — स्त्री — १ सौंदर्य, २ कोमलता, ३ धर्मनिष्ठा, ४ साहस, ५ कलानिपुणता, ६ सहनशीलता, ७लज्जाशीलता, ८तेजस्विता, ९ चातुर्य, १० वत्सलता व ११ त्यागवृत्ति. **पुरुष** — १ सामर्थ्य, २ सुदृढता, ३ तर्कनिष्ठा, ४ धैर्य, ५ कल्पकता, ६ काटकपणा, ७ उच्छृंखलपणा, ८ मानीपणा, ९ बुद्धिमत्ता, १० न्यायनिष्ठुरता व ११ उपभोगवृत्ति. (गृहसौख्य)

एकादश रुद्र — अकरा रुद्रांचीं नांवें निरनिराळ्या पुराणांत निरनिराळीं आढळतात. त्यांत एकवाक्यता नाहीं. सामन्यतः (अ) १ वीरभद्र, २ शंभु, ३ गिरीश, ४ अजैकपाद, ५ अहिर्बुध्न्य, ६ पिनाकी, ७ अपराजित, ८ भुवनाधीश्वर, ९ कपाली, १० स्थाणु व ११ भव; (आ) १ मन्यु, २ मनु, ३ महिनस्, ४ महान्, ५ शिव, ६ ऋतुध्वज, ७ उग्ररेता, ८ भव, ९ काल, १० वामदेव व ११ धृतव्रत (भागवत स्कंध ३-१२-१२); (इ) (कलियुगांतलीं नांवें) १ भूतेश, २ नीलरुद्र, ३ कपाली, ४ वृजवाहन, ५ त्र्यंबक, ६ महाकाल, ७ भैरव, ८ मृत्युंजय, ९ कामेश, १० योगेश आणि ११ शंकर.

एकादश रुद्राणि — १ धृ, २ वृत्ति, ३ उशना, ४ उमा, ५ नित्युत्सर्पि, ६ इला, ७ अंबिका, ८ इरावती, ९ सुधा, १० दीक्षा व ११ रुद्राणि. हीं अकरा रुद्रदेवतेच्या स्त्रियांचीं नांवें. (भा. स्कंध ३-१२-१३)

१२

द्वादश अंगें व्याकरणाचीं — १ समास, २ वचन, ३ लिंग, ४ विभक्ति, ५ प्रत्यय, ६ अव्यय, ७ काल, ८ नाम, ९ उपसर्ग, १० प्रयोग, ११ धातु आणि १२ संहिता.

समासो वचनं लिंगं विभाक्तिः प्रत्ययोऽव्ययम् ।
कालो नामोपसर्गश्च प्रयोगो धातुसंहिते ॥ (सु.)

द्वादश अप्सरा — १ कृतस्थला, २ पुंजिकस्थला, ३ मेनका, ४ सहजन्या, ५ प्रम्लोचा, ६ अनुम्लोचा, ७ घृताची, ८ विश्वाची, ९ उर्वशी, १० पूर्वचिती, ११ तिलोत्तमा आणि १२ रंभा. (लिंग अ.५५)

द्वादश अक्षरी मंत्र — 'ॐनमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र म्हणजे सिद्ध वाणी.

द्वादश आदित्य — हीं बारा सूर्यांचीं नांवें निरनिराळीं आढळतात : (अ) १ मित्र, २ रवि, ३ सूर्य, ४ भानु, ५ खग, ६ पूषा, ७ हिरण्यगर्भ, ८ मरीचि, ९ आदित्य, १० सविता, ११ अर्क आणि १२ भास्कर. हीं प्रचलित सूर्यनमस्कारांतील बारा नांवें; (आ) १ धाता, २ मित्र, ३ अर्यमा, ४ शुक्र, ५ वरुण, ६ अंशु, ७ भग, ८ विवस्वान्, ९ पूषा, १० सविता, ११ त्वष्टा आणि १२ विष्णु. (स्कंदपुराण)

द्वादशकला सूर्याच्या — १ जालिनी, २ कीरनी, ३ दाहिनी, ४ दीपिनी, ५ ज्योतिणी, ६ तेजनी, ७ विद्या, ८ मोहिनी, ९ जीतनी, १० शंखिनी, ११ प्रकाशिनी आणि १२ दीपकलिका. (मूळ स्तंभ). खेरीज स्वप्रकाशिका ही तेरावी कला मानली आहे.

द्वादश गंधर्व — १ तुंबरू, २ नारद, ३ हा हा, ४ हू हू, ५ विश्वावसु, ६ उग्रसेन, ७ सुरुचि, ८ परावसु, ९ चित्रसेन, १० ऊर्णायु, ११ धृतराष्ट्र आणि १२ सूर्यवर्मा. (लिंग. अ. ५५)

द्वादश गुण स्त्रीचे — १ रूप, २ शील, ३ सत्य, ४ कुलीन, ५ धर्म, ६ सतीत्व, ७ खंबीरपणा, ८ साहस, ९ सुलक्षणी, १० उद्योगी, ११ रति आणि १२ मधुरभाषिणी.

'एकादश्यस्तथा स्त्रीणां कामाधिक्यं प्रकीर्तितम् ।
मधुरं वचनं प्रोक्तं द्वादशं वरवर्णिनी ॥' (पद्म. भूमि अ. ३३)

द्वादश ज्योतिर्लिंगें — १ सोरटी सोमनाथ—सौराष्ट्र, २ श्रीशैल्य –नंद्याळ स्टेशनवर उतरून जातात, ३ महांकाळेश्वर–उज्जयिनी, ४ ओंकार मांधाता–मध्यभारत, ५ परळी वैजनाथ–परभणीजवळ, ६ भीमाशंकर–पुणें जिल्ह्यांत, ७ काशी विश्वेश्वर–वाराणशी, ८ त्र्यंबकेश्वर–नाशिकजवळ, ९ सेतुबंध–रामेश्वर, १० औंढ्या नागनाथ–मराठवाड्यांत, ११ केदार–हिमालयांत आणि १२ घृष्णेश्वर–वेरूळजवळ.

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैल्ये मल्लिकार्जुनम् ।
उज्जयिन्यां महाकालमोंकारममलेश्वरम् ॥ १ ॥
परल्यां वैजनाथं च डाकिन्यां भीमशंकरम् ।
सेतुबंधे तु रामेशं नागेशं दारुकावने ॥ २ ॥
वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे ।
हिमालये तु केदारं घृष्णेशं तु शिवालये ॥३॥ (द्वा. ज्योर्लिंगस्तोत्र)

द्वादश पदार्थ (अर्घ्यांचे) — १ दूध, २ दर्भाग्रें, ३ अक्षता, ४ जल, ५ दही, ६ पांढऱ्या मोहऱ्या, ७ सातू, ८ दूर्वा, ९ तीळ, १० मध, ११ कुंकु आणि १२ गोरोचन. या बारा पदार्थांनीं देवीला अर्घ्यप्रदान करावयाचें असतें. (देवीमाहात्म्य)

द्वादश पुंड्र (द्वादश टिळे–गोपीचंदनाचे) — १ ललाट, २ उदर, ३ हृदय, ४ कंठमूल, ५–६ दोन कुशी, ७–८ दोन बाहु, ९–१० दोन कर्ण, ११ पाठ आणि १२ पाठीचा कणा. स्नानानंतर गोपी-चंदन ॐ नमो नारायणाय या मंत्रानें मंत्रून शरिराच्या ज्या बारा भागां-वर वैष्णव संप्रदायांत तिलक लावतात त्यांस द्वादश पुंड्र म्हणतात.

द्वादश प्रमुख स्थानें देवींचीं — १ कामाक्षी (कांचीपूर), २ भ्रामरी (मलयगिरि), ३ कन्याकुमारी, ४ अंबा (गुजरात), ५ महालक्ष्मी (कोल्हापूर), ६ कालिका (उज्जयिनी), ७ ललिता (प्रयाग), ८ विंध्यवासिनी (विंध्याद्रि), ९ विशालाक्षी (वाराणसी), १० मंगलवती (गया), ११ सुंदरी (बंगाल) आणि १२ गुह्यकेश्वरी (खाटमांडू).

'इति द्वादशरूपेण संस्थिता भारते शिवा ।'

(त्रिपुरारहस्यमाहात्म्य खंड)

द्वादश भागवत धर्मज्ञाते — १ स्वयंभु, २ नारद, ३ शंभु, ४ कुमार, ५ कपिल, ६ मनु, ७ प्रल्हाद, ८ जनक, ९ भीष्म, १० बलि, ११ व्यास व १२ शुकाचार्य.

'द्वादशैते विजानीमो धर्मं भागवतं भटाः ।' (भा.स्कं. ६-३-२१)

द्वादश वनें (मथुरेच्या आसमंतांतलीं) — १ मधुवन, २ तालवन, ३ कुमदवन, ४ बहुलाख्यवन, ५ खादिरवन, ६ बिल्वकवन, ७ लोहसंश्मकवन, ८ भांडीरवन, ९ भद्रकवन, १० काम्यकवन, ११ छत्रवन आणि १२ वृंदावन. हीं बारा वनें मथुरेच्या परिसरांत होतीं.

(आदिपुराण)

द्वादश स्थानें अथवा भाव (कुंडलींतील) — १ तनुस्थान, २ धनस्थान, ३ सहज अथवा पराक्रमस्थान, ४ सुहृद्-मातृस्थान अथवा सुखस्थान, ५ सुत–बुद्धि–संततिस्थान, ६ शत्रुस्थान–रोगस्थान, ७ जायास्थान, ८ मृत्युस्थान अथवा गंडांतरस्थान, ९ धर्म अथवा भाग्यस्थान, १० कर्म अथवा पितृस्थान, ११ आय अथवा लाभस्थान आणि १२ व्ययस्थान. (ज्योतिष)

द्वादश स्थानें (मदनाचीं) — १ स्त्रीचे नेत्रकटाक्ष, २ केशपाश, ३ जघन (मांड्या), ४ स्तन, ५ नाभि, ६ कक्षा, ७ अधरोष्ठ, ८ कंकण, ९ वसंत, १० कोकिलालाप, ११ चंद्रिका व १२ वर्षाऋतु. हीं द्वादश स्थानें ब्रह्म्यानें मदनास नेमून दिलीं.

'तस्मात्स्थानानि दत्तानि तव द्वादश संख्यया ।'

(स्कंद. आवंत्यखंडम्)

बारा अलुते — १ तेली, २ तांबोळी, ३ साळी, ४ माळी, ५ जंगम, ६ कलावंत, ७ डौरी, ८ ठकार, ९ घडशी, १० तराळ, ११ सोनार आणि १२ चौगुला. हे बारा अलुते म्हणजे खालच्या वर्गाचे बारा कामगार अथवा गांवगाड्यांतले दुसऱ्या क्रमांकाचे हक्कदार पूर्वीं असत.

बारा अन्नाचे परिणाम — १ पाक, २ रस, ३ मल, ४ रक्त, ५ रोम, ६ मांस, ७ कोश, ८ स्नायु, ९ अस्थि, १० मज्जा, ११ वसा आणि १२ वीर्य. (कल्याण पद्मपुराणांक)

बारा आनद्ध वाद्यें -- १ पखवाज, २ नाल, ३ तबला, ४ डफ, ५ संबळ, ६ चौघडा, ७ ताशा, ८ ढोल, ९ मर्फा, १० खंजिरी, ११ डौर व १२ कुडमुडें. हीं बारा आनद्ध वाद्यें (कातड्यानें मढवून वाजविलीं जाणारीं) होत.

बारा आभरणें (स्त्रियांचीं) — १ नूपुर, २ किंकिणी, ३ हार, ४ चूरी, ५ मुदरी, ६ कंकण, ७ बाजुबंध, ८ कंठश्री, ९ बेसर, १० बिरीया, ११ टीका आणि १२ शिरफूल.

पादाग्र गुल्फ नाळिका कंठीं । बोटें मनगटें बाहुवटीं ।
कंठ नासिक श्रवणपुटीं । भाळ मस्तकीं वेणिका ।
द्वादशांगी स्त्री भूषणें ॥ (मुक्तेश्वर सभापर्व)

बारा कापालिक -- १ आदिनाथ, २ अनाथ, ३ काल, ४ अतिकालक, ५ कराल, ६ विकराल, ७ महाकाल, ८ कालभैरवनाथ, ९ बाहुक, १० भूतनाथ, ११ वीरनाथ आणि १२ श्रीकंठ. हे बारा कापालिक तंत्रशास्त्रप्रणेते होत. (तंत्रशास्त्र)

बारा काव्याचीं उत्पत्तिस्थानें -- १ श्रुति, २ स्मृति, ३ इतिहास, ४ पुराणें, ५ प्रमाणविद्या, ६ समयविद्या (दार्शनिकसिद्धान्त आणि धर्मपंथांचीं रहस्यें), ७ नाट्यशास्त्र, ८ कामशास्त्र, ९ अर्थशास्त्र, १० कोक, ११ विरचना (प्रत्यक्ष व काल्पनिक व्यक्तींचीं व स्थलांचीं वर्णनें) आणि १२ प्रकीर्णक (हस्तिपरीक्षा, रत्नपरीक्षा वगैरे)

' प्रकीर्णं च काव्यार्थानां द्वादशयोनयः । ' (काव्यमीमांसा अ. ८)

बारा गुण भिक्षा मागणारास आवश्यक – १ मोठ्यानें म्हणणें, २ पुरातन कथा सांगणें, ३ स्त्रियांबरोबर इकडचा तिकडच्या गोष्टी सांगणें, ४ त्यांच्या मुलाबाळांना कुरवाळणें, ५ त्यांच्या पतींची स्तुति करणें, ६ त्यांच्या पाकक्रियेची अवास्तव स्तुति, ७ किरकोळ पडेल तें काम करण्याची तयारी, ८ लेखनिपुणता, ९ ज्योतिष पाहतां येणें, १० गारुड विद्या,

११ मंत्र आणि १२ जादूटोणा. हे बारा गुण भिक्षा मागणाराचे अंगीं असावे लागतात.

बारा गुण ज्ञानी पुरुषाच्या नित्याचरणाचे — १ धर्म, २ सत्य, ३ दम, ४ तप, ५ निर्मत्सरता, ६ लोकापवादाचें भय, ७ काटकपणा, ८ हेवादावा न करणें, ९ यज्ञ, १० ज्ञान, ११ धैर्य आणि १२ गुरुजनांच्या उपदेशाचें श्रद्धापूर्वक श्रवण. (म. भा. उद्योग ४३–२०)

बारा गोष्टींत शिवचरित्रसार — १ शहाजीची सुटका, २ अफजलखानाचा वध, ३ पन्हाळ्याहून निघून जाणें, ४ उंबरखिंडीचें युद्ध, ५ राजापूर लुटलें, ६ फिरंग्यांना कैद, ७ शाहिस्तेखानाचीं बोटें छाटलीं, ८ सुरतेची लूट, ९ आग्र्याहून सुटका, १० सिंहगड घेतला, ११ राज्याभिषेक व १२ दाक्षिणदिग्विजय. (दत्तोपंत आपटे लेखसंग्रह)

बारा दोष वर्ज्य करावेत — १ क्रोध, २ काम, ३ लोभ, ४ मोह, ५ अनावर हाव, ६ निर्दयता, ७ दुसऱ्यास नांवें ठेवण्याची वृत्ति, ८ विषयासक्ति, ९ परोत्कर्ष न पाहवणें, १० परनिंदा, ११ आढ्यता, १२ इष्टानिष्ट गोष्टीविषयीं मनास लावून घेणें. हे बारा दोष माणसानें मग तो ज्ञानी असो वा साधारण संसारी असो–टाळावेत. (म.भा.उद्योग४३-१६)

बारा नक्षत्रें विवाहास वर्ज्य — १ भरणी, २ कृत्तिका, ३ आर्द्रा, ४ पुनर्वसु, ५ पुष्य, ६ आश्लेषा, ७ पूर्वा, ८ विशाखा, ९ ज्येष्ठा, १० पूर्वाषाढा, ११ शततारका आणि १२ पूर्वा भाद्रपदा. हीं बारा नक्षत्रें विवाहास वर्ज्य मानलीं आहेत. (धर्मसिंधु)

बारा नांवें गणेश देवतेचीं — १ सुमुख, २ एकदंत, ३ कपिल, ४ गजकर्णक, ५ लंबोदर, ६ विकट, ७ विघ्ननाश, ८ गणाधिप, ९ धूमकेतु, १० गणाध्यक्ष, ११ भालचंद्र व १२ गजानन. (पूजेचे मंत्र)

बारा नियम (मंत्रसिद्धीस) — १ भूमिशयन, २ ब्रह्मचर्य, ३ मौन, ४ गुरुसेवन, ५ त्रिकाळ स्नान, ६ पापकर्मपरित्याग, ७ नित्यपूजा, ८ नित्यदान, ९ देवतेचें स्तवन, १० नैमित्तिक पूजा, ११ इष्ट देवता व गुरूवर विश्वास आणि १२ जपनिष्ठा. हे बारा नियम पाळणारांचा मंत्र सिद्ध होतो. (कल्याण साधनांक)

बारा नियम — (आत्मसंयमनासाठीं करावयाचीं कृत्यें व व्रत-परिपालन) — १ शरीर स्वच्छता, २ मन निर्मळ, ३ जप, ४ तप, ५ होम, ६ श्रद्धा असणें, ७ अतिथिसत्कार, ८ भजनपूजन, ९ तीर्थाटन, १० परोपकार, ११ समाधान आणि १२ गुरुशुश्रूषा.

शौचं जपस्तपो होमः श्रद्धाऽऽतिथ्यमदर्चनम् ।
तीर्थाटनं परार्थेहा तुष्टिराचार्यसेवनम् ॥ (भा. स्कं. ११–१९–३४)

बारा प्रकारचे गुरु — १ धातुर्वादी, २ चंदन, ३ विचार, ४ अनुग्रह, ५ परिस, ६ कच्छप (कासवी), ७ चंद्र, ८ दर्पण, ९ छायानिधि, १० नादानिधि, ११ क्रौंचपक्षी आणि १२ सूर्यकांत. (पां. प्र. अ. ५)

बारा प्रमुख गोपाळ अथवा श्रीकृष्णाचे सवंगडी – १ श्रीदामा, २ सुदामा, ३ वसुदामा, ४ सुबल ५ सुपार्श्व, ६ शुभांग, ७ सुंदर, ८ चंद्रभान, ९ वीरभान, १० सूर्यभान, ११ वसुभान आणि १२ रत्नभान. असे बारा गोपाळ भगवान श्रीकृष्ण आणि बलरामांचे प्रमुख सवंगडी होते.

'वसुभानो रत्नभानो गोपाला द्वादशस्मृताः ।'
(ब्रह्मवैवर्त–श्रीकृष्णखंड २७-६०)

बारा बलुते — १ सुतार, २ लोहार, ३ महार, ४ मांग, ५ कुंभार, ६ चांभार, ७ परिट, ८ न्हावी, ९ भट, १० मुलाणा, ११ गुरव आणि १२ कोळी. हे बारा बलुते म्हणजे गांवगाड्यांतले जुने प्रमुख हक्कदार होत.

बारा मल (शरिरांतील) — १ रेत, २ रक्त, ३ मज्जा, ४ मूत्र, ५ विष्ठा, ६ नाकांतील मल, ७ कानांतील मल, ८ कफ, ९ अश्रु, १० डोळ्यांतील मल, ११ घाम आणि १२ नखांतील मल.

कर्णाक्षिनासिका जिह्वा दन्ताः शिश्नं गुदं नखाः ।
मलाश्रयौ कफस्वेदो विण्मूत्रे द्वादश स्मृताः ॥ (वी. प्र.)

बारा महिन्यांचीं नांवें — (अ) (**वेदकालीन**) १ मधु, २ माधव (वसंत), ३ शुक्र, ४ शुचि (ग्रीष्म), ५ नभ, ६ नभस्य (वर्षा), ७ इष, ८ ऊर्ज (शरद्), ९ सहस्, १० सहस्य (हेमंत), ११ तपस आणि १२ तपस्य (शिशिर); (आ) (**भारतीय**) १ चैत्र, २ वैशाख, ३ ज्येष्ठ, ४ आषाढ, ५ श्रावण, ६ भाद्रपद, ७ आश्विन, ८ कार्तिक,

९ मार्गशीर्ष, १० पौष, ११ माघ आणि १२ फाल्गुन; (इ) (**इंग्रजी**) १ जानेवारी, २ फेब्रुवारी, ३ मार्च, ४ एप्रिल, ५ मे, ६ जून, ७ जुलै, ८ ऑगस्ट, ९ सप्टेंबर, १० ऑक्टोबर, ११ नोव्हेंबर व १२ डिसेंबर; (ई) (**पारशी**) १ फर्वर्दीन, २ अर्दिबेहस्त, ३ खुर्दाद, ४ तीर, ५ अमर्दाद, ६ शेहरेवार, ७ मेहेर, ८ आबान, ९ आजुर, १० दय, ११ बहमन व १२ इस्पिंदर; (उ) (**हिजरी**) १ मोहरम, २ सफर, ३ राबिलावल, ४ राबिलाखर, ५ जमादिलवाल, ६ जमादिलाखर, ७ रज्जब, ८ साबान, ९ रमजान, १० शव्वाल, ११ जिल्काद, १२ जिल्हेज.

बारा महारथी (कौरवांकडील) — १ दुर्योधन, २ भीष्म, ३ द्रोण, ४ कर्ण, ५ शल्य, ६ भूरिश्रवा, ७ अश्वत्थामा, ८ कृतवर्मा, ९ विकर्ण, १० कृपाचार्य, ११ दुःशासन आणि १२ जयद्रथ. असे भारतीय युद्धांत कौरवांकडील बारा महारथी होते.

बारा मूर्खलक्षणें — १ परमेश्वराचें विस्मरण, २ वेळेचें मोल न समजणें, ३ आपण मोठे मानणें, ४ दोघे बोलत असतां मधेंच जाऊन बसणें, ५ मोठ्यांची कुचेष्टा करणें, ६ प्राप्तीपेक्षां अधिक खर्च करणें, ७ सभेंत उच्चासनावर बसणें, ८ भारी बटबट करणें, ९ उधार घेणें, १० आगांतुकी करणें, ११ अतिथी होऊन धन्यावर सत्ता गाजविणें व १२ स्त्रियांच्या अवयवांकडे नजर टाकणें. (ढाईहजार अनमोल बोल)

बारा यम (नियमन—आत्मसंयमन) — १ अहिंसा, २ यथार्थ भाषण, ३ परापहार न करणें, ४ विषयाची अनासक्ति, ५ मर्यादा ठेवणें, ६ संग्रह न करणें, ७ वेदांवर श्रद्धा, ८ ब्रह्मचर्य, ९ मौन, १० मन स्थिर ठेवणें, ११ क्षमा व सहनशीलता आणि १२ सर्वांस अभय देणें. हे बारा यम होत. (भागवत स्कंध ११·१९·३३).

बारा राशी — १ मेष, २ वृषभ, ३ मिथुन, ४ कर्क, ५ सिंह, ६ कन्या, ७ तूल, ८ वृश्चिक, ९ धन, १० मकर, ११ कुंभ आणि १२ मीन. (ज्योतिष)

बारा राजनीतिशास्त्रप्रणेते — १ ब्रह्मा, २ महेश्वर, ३ स्कंद, ४ इंद्र, ५ प्राचेतस, ६ मनु, ७ बृहस्पति, ८ शुक्र, ९ भारद्वाज, १० वेदव्यास, ११ भगवान् श्रीकृष्ण आणि १२ गौरशिरामुनि.

ब्रह्मा महेश्वरः स्कंदश्चेंद्राः प्राचेतसो मनुः ।
बृहस्पतिश्च शुक्रश्च भारद्वाजो महातपाः ॥
वेदव्यासश्च भगवान् तथा गौरशिरामुनिः ।
एते हि राजशास्त्राणां प्रणेतारः परंतपाः ॥ (धनुर्वेदसंग्रह)

बारा श्रीविद्येचे उपासक — १ मनु, २ चंद्र, ३ कुबेर, ४ लोपामुद्रा, ५ मन्मथ (कामदेव), ६ अगस्ति, ७ अग्नि, ८ सूर्य, ९ इंद्र, १० स्कंद, ११ शिव आणि १२ क्रोधभट्टारक (दुर्वास). हे बारा श्रीविद्येचे उपासक म्हणून प्रसिद्ध आहेत.

मनुश्चन्द्रः कुबेरश्च लोपामुद्रा च मन्मथः ।
अगस्तिरग्निः सूर्यश्च इन्द्रः स्कन्दः शिवस्तथा ॥
क्रोधभट्टारको देव्या द्वादशामी उपासकाः ॥ (कल्याण शक्ति अंक)

बारा सुषिर वाद्यें (भोकांतून वारा भरून वाजणारीं) — १ सनई, २ सुंदरी, ३ सूर, ४ अलगुज, ५ मुरली (बांसरी), ६ पांवा, ७ पुंगी, ८ शिंग, ९ कर्णा, १० तुतारी, ११ शंख आणि १२ मोरचंग.

बाराजण दुर्गुणी होत — १ चांगलें काम न करणारा-शहाणा, २ धर्म नसलेला म्हातारा, ३ आज्ञाधारक नसलेला तरुण, ४ दातृत्व नसलेला श्रीमंत, ५ विनय सोडलेली स्त्री, ६ कोणताहि सद्‌गुण नसलेला धनी, ७ भांडखोर, ८ गरीब असून गर्विष्ठ, ९ अधर्माचरणी ब्राह्मण, १० अन्यायी शासनाधिकारी, ११ शिस्त नसलेले लोक व १२ कांहींच निर्बंध नसलेलें राष्ट्र. (भाग्यरेषा)

बाराजणांच्या बारा लक्ष्मी — १ ज्ञानलक्ष्मी–देवांची, २ मदलक्ष्मी –दैत्यांची, ३ विषलक्ष्मी–सर्पांची, ४ द्रव्यलक्ष्मी–मानवांची, ५ संचयलक्ष्मी–वैश्यांची, ६ संतोषलक्ष्मी–विप्रांची, ७ प्रतापलक्ष्मी–राजांची, ८ नम्रतालक्ष्मी–शूद्रांची, ९ वैराग्यलक्ष्मी-साधकांची, १० शांतीलक्ष्मी–सिद्धांची, ११ श्रद्धालक्ष्मी–भक्तांची व १२ आनंदलक्ष्मी–संतांची. (देवीविजय)

बाराजणांना बांधून समुद्रांत बुडवावें — १ कुपुत्र, २ कुलक्षणी स्त्री, ३ भांडखोर शेजारी, ४ लाजिरवाणा मनुष्य, ५ दुष्ट बुद्धीचा बंधु,

६ लंपट पुरोहित, ७ चोरटा चाकर, ८ आचरट पाहुणा, ९ मूर्ख धनी, १० अडणारा घोडा, ११ वाईट शेतकरी आणि १२ सदैव नकारघंटा वाजविणारा कारभारी. या बाराजणांना बांधून समुद्रांत बुडवावें. (बिरबल)

१३

तेरा गुण (गार्हस्थ्य जीवनाचे) — १ मनुष्यत्वाची प्राप्ति, २ सत्कुलांत जन्म, ३ ऐश्वर्य, ४ दीर्घायुष्य, ५ स्वस्थ शरीर, ६ सन्मित्र-समागम, ७ सत्पुत्र, ८ सती भार्या, ९ परमेश्वरभक्ति, १० विद्वत्ता, ११ सुजनता, १२ इंद्रियनिग्रह आणि १३ सत्पात्रीं दानांत प्रीति. हे तेरा गुण पूर्व पुण्याईनें प्राप्त होतात. (सु.)

तेरा गुण (तांबुलाचे) — १ कडसर, २ सुवासिक, ३ उष्ण, ४ मधुर, ५ खारट, ६ तुरट, ७ जंतुहारक, ८ दुर्गंधिनाशक, ९ पित्त-शामक, १० कफनाशक, ११ मुखाची शोभा वाढविणारा, १२ मुखशुद्धि करणारा आणि १३ कामवासना प्रदीप्त करणारा.

तांबूलं कटुतिक्तमुष्णमधुरं क्षारं कषायान्वितम् ।
पित्तघ्नं कफनाशनं कृमिहरं दुर्गंधिनिर्नाशनम् ॥
वक्त्रस्याभरणं विशुद्धकरणं कामाग्निसंदीपनम् ।
तांबूलं सखये त्रयोदशगुणाः स्वर्गेऽपि ते दुर्लभः ॥ (सु.)

तेरा यम नक्षत्रें — १ अनुराधा, २ ज्येष्ठा, ३ मूळ, ४ पूर्वाषाढा, ५ उत्तराषाढा, ६ श्रवण, ७ धनिष्ठा, ८ शततारका, ९ पूर्वाभाद्रपदा, १० उत्तराभाद्रपदा, ११ रेवती, १२ आश्विनी व १३ भरणी. (तै. ब्रा.)

तेराजण शोच्य होत — १ भित्रा क्षत्रिय, २ पडेल तें खाणारा ब्राह्मण, ३ निराकांक्षी व्यापारी, ४ आळशी शूद्र, ५ शीलहीन विद्वान्, ६ दुर्वृत्त कुलीन, ७ भ्रष्ट ब्राह्मण, ८ व्यभिचारिणी ब्राह्मण स्त्री, ९ विषय-लंपट योगी, १० आपलें अन्न स्वहस्तें शिजविणारा, ११ अक्कल नसून वक्तृत्व करणारा, १२ शासनावांचून राष्ट्र आणि १३ प्रजेविषयीं बेपर्वा राज्यकर्ते. हे तेराजण शोच्य म्हणजे कींव करण्यासारखे होत.

त्रयोदशाक्षरी मंत्र—" श्रीराम जय राम जय जय राम "

त्रयोदशगुणी विडा — १ पान, २ सुपारी, ३ चुना, ४ कात, ५ लवंग, ६ वेलदोडा, ७ जायफळ, ८ जायपत्री, ९ कंकोळ, १० केशर, ११ खोबरें, १२ बदाम आणि १३ कापूर. ह्या तेरा जिनसा मिळून तयार केलेला विडा. (सु.)

१४

चतुर्दशाक्षरी मंत्र—(अर्वाचीन) " स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे. " (लो. टिळक)

चौदा अन्नामध्यें सांपडणारीं पोषक द्रव्यें—१ सोडियम्, २ पोटॅशियम, ३ कॅल्शियम्, ४ मॅग्नेशियम्, ५ लोह, ६ ताम्र, ७ मॅंगनीझ, ८ जस्त, ९ क्लोरीन, १० ब्रोमीन, ११ आयोडिन, १२ फ्लोरीन, १३ फॉस्फरस आणि १४ गंधक. (Modern Diatory Treatment)

चौदा इंद्रियांचे चौदा विषय—पंच ज्ञानेंद्रियें – १ श्रोत्र – शब्द, २ त्वचा–स्पर्श, ३ चक्षु–रूप, ४ जिह्वा–रस, ५ घ्राण–गंध; पंच कर्मेंद्रियें– ६ वाक्–वचन, ७ पाणि–आदान, ८ पाद–गमन, ९ उपस्थ–रतिभोग, १० गुद–मलत्याग; चार अंतःकरणें– ११ मन–संकल्प-विकल्प, १२ बुद्धि–निश्चय, १३ चित्त-चिंतन व १४ अहंकार–अहंपणा. (विचारचंद्रोदयदर्शन)

चौदा कुलमातृका–१ गौरी, २ पद्मा, ३ शची, ४ मेधा, ५ सावित्री, ६ विजया, ७ जया, ८ देवसेना, ९ स्वधा, १० स्वाहा, ११ मातर, १२ धृति, १३ पुष्टि व १४ तुष्टि. (पुण्याहवाचन)

चौदा कुलें अप्सरांचीं —१ ब्रह्मदेवाची मानससृष्टि, २ वेदापासून, ३ अग्नि, ४ वायु, ५ अमृतापासून, ६ जलापासून, ७ सूर्यकिरण, ८ चंद्रकिरण, ९ पृथ्वी, १० विद्युत्, ११ मृत्यु, १२ मदन, १३ मुनि आणि प्रजापतिकन्या यांपासून व १४ अरिष्टा. यापासून झालेलीं हीं चौदा अप्सरकुलें होत. (बाणभट्ट कादंबरी)

चौदा टाळकरी—(तुकारामाचे) १ निळोबाराय, २ रामेश्वरभट, ३ गंगाराम मवाळ, ४ महादजी कुलकर्णी, ५ कोंडोपंत लोहकरे, ६ मालजी गाडे, ७ गवरशेट वाणी, ८ मल्हारपंत कुळकर्णी, ९ अंबाजीपंत लोहगांवकर, १० कान्होबा, ११ संताजी जगनाडे, १२ कोंड पाटील, १३ नावजी माळी व १४ शिवबा कासार. (तुकारामचरित्र)

चौदा देवनक्षत्रें— १ कृत्तिका, २ रोहिणी, ३ मृग, ४ आर्द्रा, ५ पुर्नवसु, ६ पुष्य, ७ आश्लेषा, ८ मघा, १० उत्तरा, ११ हस्त, १२ चित्रा, १३ स्वाति व १४ विशाखा. (तै. ब्रा.)

चौदा दोष (राज्यशासकांस)—१ नास्तिकता–ईश्वर व धर्म नाहीं असें मानणें, २ अनृत, ३ क्रोध, ४ प्रमाद (लक्ष न ठेवणें), ५ दीर्घसूत्रता (चेंगटपणा), ६ तज्ज्ञांचा सल्ला न घेणें, ७ आळस, ८ इंद्रियसुखाविषयीं आसक्ति, ९ अनावर द्रव्यलोभ, १० मूर्खांशीं मसलत, ११ निश्चय करून ते न करणें, १२ गुप्तता न राखणें, १३ उत्सव वगैरे न करणें व १४ एकाच वेळीं अनेकांशीं शत्रुत्व करणें. (म. भा. सभा ५–११२)

चौदा परम भागवत (पुराणान्तर्गत) — १ प्रल्हाद, २ नारद, ३ पराशर, ४ पुंडरीक, ५ व्यास, ६ अंबरीष, ७ शुक, ८ शौनक, ९ भीष्म, १० दालभ्य, ११ अर्जुन, १२ रुक्मांगद, १३ वसिष्ठ व १४ बिभीषण.

चौदा प्रकारचे जप — १ नित्यजप, २ नैमित्तिक जप, ३ काम्य-जप, ४ निषिद्ध जप, ५ प्रायश्चित्त जप, ६ अचल जप, ७ चल जप, ८ वाचिक जप, ९ उपांशु जप, १० भ्रमर जप, ११ मानस जप, १२ अखंड जप, १३ अजपा जप आणि १४ प्रदक्षिणा जप.

चौदा प्रकारच्या शालिग्राम शिला — १ प्रलंबघ्न, २ पुंडरीक, ३ वैकुंठ, ४ मधुसूदन, ५ सुदर्शन, ६ नर, ७ राम, ८ लक्ष्मीनारायण, ९ वीरनारायण, १० क्षीराब्धिशयन, ११ माधव, १२ हयग्रीव, १३ परमेष्ठी व १४ विष्वक्सेन. असे एकचक्र असलेले शालिग्रामाचे चौदा प्रकार. माध्व संप्रदायांत शालिग्रामपूजनाचें विशेष महत्त्व मानलें आहे.

" विष्वक्सेनश्च विज्ञेयो एकचक्राश्चतुर्दश । " (द्वैतसिद्धान्त केसरी)

चौदा प्राकृत भाषा — १ शौरसेनी, २ महाराष्ट्री, ३ मागधी, ४ अर्धमागधी, ५ प्राच्य किंवा गौडी, ६ अवन्तिका, ७ दाक्षिणात्य, ८ शाकरी, ९ बाल्हिकी, १० द्राविडी, ११ आभीरी, १२ चाण्डाली, १३ शाबरी व १४ पैशाची. (भारतीय साम्राज्य)

चौदा प्रांत भाषा — १ आसामी, २ बंगाली, ३ गुजराथी, ४ हिन्दी, ५ कानडी, ६ काश्मिरी, ७ मल्याळी, ८ मराठी, ९ ओरिया, १० पंजाबी, ११ संस्कृत, १२ तामिळ, १३ तेलगु व १४ उर्दू. या चौदा प्रमुख भाषा प्रांत भाषा म्हणून भारतीय घटनेनें मान्य केल्या आहेत. अनेक पोटभाषा मिळून एकंदर भारतांत २५० वर भाषा प्रचलित आहेत.
(हिन्दी राज्यघटना)

चौदा बलें राज्यशासकांचीं — १ देश, २ दुर्ग, ३ रथ, ४ हत्ती, ५ घोडे, ६ योद्धे, ७ राज्याधिकारी, ८ अंतःपुर, ९ अन्नव्यवस्था, १० अश्वरथादिकांचा पुरवठा, ११ नीति, १२ आयव्यय, १३ द्रव्य-पुरवठा आणि १४ गुप्तशत्रु. हीं चौदा राज्यशासकांचें बलाबल अजमावण्याचीं स्थानें होत. (मुक्तेश्वर सभा. ३-१९)

चौदा ब्रह्में — १ शब्दब्रह्म, २ नित्येकाक्षरब्रह्म, ३ खंब्रह्म, ४ सर्वब्रह्म, ५ चैतन्यब्रह्म, ६ सत्ताब्रह्म, ७ साक्षिब्रह्म, ८ सगुणब्रह्म, ९ निर्गुणब्रह्म, १० वाच्यब्रह्म, ११ अनुभवब्रह्म, १२ आनंदब्रह्म, १३ तदाकारब्रह्म व १४ अनिर्वाच्यब्रह्म. (दासबोध ७-३)

चौदा मनु — १ स्वायंभुव, २ स्वारोचिष, ३ उत्तममनु, ४ तामस मनु, ५ रैवत, ६ चाक्षुष, ७ वैवस्वत, ८ सावर्णि, ९ दक्षसावर्णि, १० ब्रह्मसावर्णि, ११ धर्मसावर्णि, १२ रुद्रसावर्णि, १३ देवसावर्णि व १४ इंद्रसावर्णि. सृष्टिचक्रांत असलेली लोकस्थिति कांहीं कालानें बिघडते व पुन्हा ती ताळ्यावर आणण्यासाठीं जुळवाजुळव होते. हा जो जुळवाजुळव होऊन मोडेपर्यंतचा काल त्यास मन्वन्तर म्हणतात. त्या मन्वन्तराचा अधिपति तो मनु. असे चौदा मनु आहेत, अशी कल्पना आहे. (भागवत स्कंध ८-१३)

चौदा मन्वन्तरें — १ स्वायंभुव, २ स्वारोचिष, ३ उत्तम, ४ तामस, ५ रैवत, ६ चाक्षुष, ७ वैवस्वत, ८ सावर्णि, ९ धर्म, १० सावर्णिक,

११ पिशंग, १२ अपिशंगाभ, १३ शबल आणि १४ वर्णक. ब्रह्मदेवाचें एक अहोरात्र म्हणजे कल्प, असे तीस कल्प सांगितले आहेत. एका कल्पांत चौदा मन्वन्तरें होतात. सध्यां चालू असलेल्या वाराह कल्पांतल्या सातव्या मन्वन्तराचें नांव वैवस्वत आहे. (लिंगपुराण अ. ७-२२-२३)

चौदा महारत्नें — १ हत्ती, २ घोडा, ३ रथ, ४ स्त्री, ५ पुरुष, ६ धन, ७ माला, ८ वस्त्र, ९ वृक्ष, १० शक्ति, ११ पाश, १२ रत्न, १३ छत्र व १४ विमान.

गजवाजिरथस्त्रीपुंनिधिमालांबरद्रुमाः ।
शक्तिपाशं मणिं छत्रं विमानानि चतुर्दश ॥ (सु.)

चौदा यज्ञ (गीतोक्त) — १ ब्रह्मयज्ञ, २ द्रव्ययज्ञ, ३ देवयज्ञ, ४ ज्ञानेंद्रिययज्ञ, ५ विषययज्ञ, ६ स्वाध्याय—ज्ञानयज्ञ, ७ प्राणयज्ञ, ८ अपानयज्ञ, ९ प्राणापानयज्ञ, १० आंतरपानयज्ञ, ११ योगयज्ञ, १२ तपोयज्ञ, १३ जपयज्ञ व १४ इंद्रियप्राण—कर्मयज्ञ. या सर्वांत जपयज्ञ महत्त्वाचा होय. (भ. गी. अ. ४ श्लोक २४ ते ३३)

चौदा यमधर्म — १ यमधर्मराज, २ मृत्यु, ३ अंतक, ४ वैवस्वत, ५ काल, ६ सर्वभूत, ७ क्षय, ८ औदुंबर, ९ दध्न, १० नील, ११ परमेष्ठी, १२ वृकोदर, १३ वित्त व १४ चित्रगुप्त. (सु.)

चौदा रत्नें — देव आणि दानव यांनीं समुद्रमंथन करून चौदा रत्नें अथवा मूल्यवान् वस्तु काढल्या त्या— १ लक्ष्मी, २ कौस्तुभ, ३ पारिजातक, ४ सुरा, ५ धन्वंतरी, ६ चंद्र, ७ कामधेनु, ८ ऐरावत, ९ रंभा (आदि अप्सरा), १० उच्चैःश्रवा नामक सप्तमुखी अश्व (हा श्वेतवर्ण व उन्नतकर्ण असा होता), ११ कालकूट विष, १२ शार्ङ्ग धनुष्य, १३ पांचजन्य शंख व १४ अमृत होय. पंधरावें रत्न—दाता.

लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुरा धन्वतरिश्चन्द्रमाः
गावः कामदुघाः सुरेश्वरगजो रम्भादिदेवाङ्गनाः ।
अश्वः सप्तमुखो विषं हरिधनुः शङ्खोऽमृतं चांबुधेः
रत्नानीह चतुर्दश प्रतिदिनं कुर्वन्तु वो मङ्गलम् ॥ (मंगलाष्टक)

चौदा राज्यें भारतीय संघराज्यान्तर्गत — १ आंध्र, २ आसाम, ३ उत्तर प्रदेश, ४ ओरिसा, ५ केरळ, ६ जम्मू व काश्मिर, ७ पूर्व पंजाब, ८ पश्चिम बंगाल, ९ बिहार, १० मद्रास, ११ मध्यभारत, १२ द्वैभाषिक मुंबई, १३ म्हैसूर आणि १४ राजस्थान.

चौदा रोगभेद — १ सहजरोग, २ गर्भजरोग, ३ जातज्ञातरोग, ४ पीडाजनितरोग, ५ कालरोग, ६ प्रभावजरोग, ७ स्वभावजरोग, ८ देशजरोग, ९ आगंतुकरोग, १० कायिकरोग, ११ आंतररोग, १२ कर्मजरोग, १३ दोषजरोग आणि १४ कर्मदोषजरोग. (नूतनामृतसागर)

चौदा लाभ शिखा धारणानें प्राप्त होणारे — १ निष्णातता, २ जीवनशक्ति, ३ दीर्घायुष्य, ४ बल, ५ तेज, ६ अन्न, ७ धन, ८ सुमन, ९ दृष्टि, १० देवताप्रसाद, ११ यश, १२ प्रजननशक्ति, १३ सुप्रजा आणि १४ उत्तम वीर्य. (प्रेरणा शके १८७१ अंक २)

चौदा विद्या — (अ) १ ऋग्वेद, २ यजुर्वेद, ३ सामवेद, ४ अथर्ववेद हे चार वेद व १ छंद, २ शिक्षा, ३ व्याकरण, ४ निरुक्त, ५ ज्योतिष व ६ कल्प हीं सहा वेदांगें आणि १ न्याय, २ मीमांसा, ३ पुराणें व ४ धर्मशास्त्र हीं सर्व मिळून चौदा विद्या होत.

अङ्गानि वेदाश्चत्वारो मीमांसा न्यायविस्तरः ।
पुराणं धर्मशास्त्रं च विद्यास्त्वेता चतुर्दश ॥ (भ. ब्राह्म. २-६)

(आ) १ आत्मज्ञान, २ वेदपठण, ३ धनुर्विद्या, ४ लिहिणें, ५ गणित, ६ पोहणें, ७ विणणें, ८ शस्त्र धरणें, ९ वैद्यक, १० ज्योतिष, ११ रमलविद्या, १२ सूपशास्त्र, १३ गायन व १४ गारुड (मूळ स्तंभ); (इ) १ ब्रह्मज्ञान २ रसायन, ३ श्रुतिकथा, ४ वैद्यक, ५ ज्योतिष, ६ व्याकरण, ७ धनुर्विद्या, ८ संगीत, ९ अश्वारोहण, १० जलतरण, ११ नाट्य, १२ चौर्य, १३ कोक आणि १४ चातुर्य.

ब्रह्मज्ञानं रसायनं स्वरगरं वैद्यं नटं ज्योतिषं ।
व्याकरणं च धनुर्धरं जलतरं स्वल्पं च सामुद्रिकम् ।
तन्त्रं मन्त्रं तथा परेशहरणं एतं च चातुर्दशम् ॥ (सु.)

चालू युगांत जाहिरात ही पंधरावी विद्या आहे. (केळकर)

चौदा वेग मानव शरिरांतले — १ अधो वायुवेग, २ रेचन (मल) वेग, ३ मूत्रवेग, ४ ढेकर, ५ शिंक, ६ तृषा, ७ क्षुधा, ८ निद्रा, ९ खोकला, १० श्रमजनित श्वासवेग, ११ जांभई, १२ अश्रुवेग, १३ वमन (ओकारी) आणि १४ कामवेग. या वेगांचा अवरोध केला असतां शरिरांत विकृति निर्माण होते. (नूतनामृत सागर)

चौदा शिलाशासन लेख व विषय (अशोकाचे) — १ अहिंसा, २ धार्मिक कृत्यें, ३ अधिकाऱ्याची पंचवार्षिक फिरती, ४ धर्माचरण, ५ धर्म महासभा, ६ कामाचा उरक, ७ धार्मिक गुण, ८ धर्मयात्रा, ९ मंगल समारंभ, १० यश व कीर्ति, ११ दानधर्म, १२ परमतसहिष्णुता, १३ धर्मविजय व १४ उपसंहार. असे चौदा महत्त्वाचे शिलाशासन लेख सर्व भारतांत अनेक ठिकाणीं आढळले असून त्यावरून भारताच्या प्राचीन इतिहासाची महत्त्वाची माहिती मिळते. (म. ज्ञा. कोश विभाग ७)

चौदा शैव (वेदकालीन) — १ दुर्वास, २ विश्वामित्र, ३ चतुरानन, ४ मार्कंडेय, ५ इंद्र, ६ बाणासुर, ७ नारायण, ८ कार्तिकेय, ९ दधिचि, १० श्रीराम, ११ कण्व, १२ भार्गव, १३ बृहस्पति व १४ गौतम. (दे. मा. अ. १)

चौदा समाधिस्थानें चांगदेवाचीं — १ ब्रह्मगिरि, २ पुण्यस्तंभ, ३ नारायण डोह, ४ गिरनार, ५ निर्मळ, ६ प्रयाग, ७ निर्गुंद, ८ सेतुबंध, ९ जगन्नाथपुरी, १० मणिपुरी, ११ चंद्रगिरि, १२ शरयूतीर, १३ अविमुक्त क्षेत्र (वाराणशी), १४ गोदातीरीं पुणतांबें. चांगदेव महायोगी होते. दर शंभर वर्षांनीं योगसामर्थ्यानें जुना देह टाकून नवा देह धारण करीत. अशा रीतीनें ते चवदाशें वर्षें जगले. शेवटची समाधि पुणतांबें येथें गोदातीरीं आहे.

चौदा सहजप्रवृत्ति व त्यांच्या जोडीनें प्रगट होणाऱ्या भावना — १ विमोचन प्रवृत्ति–भीति, २ युद्ध प्रवृत्ति–राग, ३ जुगुप्सा प्रवृत्ति–तिटकारा, ४ वात्सल्य प्रवृत्ति–मृदुभाव, ५ याचना प्रवृत्ति–आर्तभाव, ६ संभोग प्रवृत्ति–कामभाव, ७ आत्मसमर्पण प्रवृत्ति–हीनभाव, ८ जिज्ञासा प्रवृत्ति–आश्चर्य, ९ आत्माविधान प्रवृत्ति–अहंभाव, १० संघ प्रवृत्ति–

एकाकी भाव, ११ अन्नसंशोधन प्रवृत्ति–क्षुधा, १२ निर्माण प्रवृत्ति–कर्तृभाव, १३ संपादन प्रवृत्ति–स्वाम्यभाव व १४ हास्य प्रवृत्ति–विनोद-भाव. (मानसशास्त्र–प्रवेश)

चौदा हेर प्राणिमात्रांच्या वर्तनावर देखरेख करणारे — १ सूर्य, २ चंद्र, ३ वायु, ४ अग्नि, ५ आकाश, ६ भूमि, ७ जल, ८ अंतःकरण, ९ यम, १० दिवस, ११ रात्र, १२ सूर्योदय व १३ सूर्यास्त समयींचे संधिकाल आणि १४ धर्म.

आदित्यचंद्रावनिलो नलश्च द्यौर्भूमिरापो हृदयं यमश्च ।
अहश्च रात्रिश्च उभे च संधे धर्मो हि जानाति नरस्य वृत्तम् (पंचतंत्र)

१५

पंधरा अनर्थ द्रव्यामुळें उद्भवतात — १ चोरी, २ हिंसा, ३ असत्य अथवा फसवाफसवीचा व्यवहार, ४ दंभ, ५ काम, ६ क्रोध, ७ गर्व, ८ मद, ९ भेद, १० वैर, ११ अविश्वास, १२ स्पर्धा, १३ स्त्री, १४ द्यूत व १५ मद्यपान.

'एते पञ्चदशानर्था ह्यर्थमूला मता नृणाम् ।' (भाग ११-२३-१९)
एवं ही पंधरा अनर्थ । मूर्ख अथवा पंडित ।
जें अर्थसंग्रह करित। अवश्य हे तेथ उठती ।। (ए. भा. २३–३४५)

पंधरा प्रकार नमनाचे — १ दंडवत, २ रामराम, ३ मुजरा, ४ सलाम, ५ कुरनिसात, ६ कुरनिस, ७ अभिनंदन, ८ आदेश, ९ जयगोपाळ, १० जोहार, ११ आशीर्वाद, १२ जय सीताराम, १३ शिरसाष्टांग, १४ नमस्कार, १५ साष्टांग नमस्कार. (शब्दरत्नावली) आधुनिक हस्तांदोलन हा सोळावा प्रकार होय.

पंधरा प्रतिष्ठा — १ मान, २ कीर्ति, ३ पत, ४ लौकिक, ५ प्रसिद्धि, ६ बहुमानाच्या जागीं स्थापना, ७ देवालयाच्या सन्मानार्थ उभारलेल्या स्मारकाची स्थापना, ८ देवमूर्तीची यथाविधि स्थापना, ९ वास्तुशांति, १० स्वतःचें घर असणें, ११ देवाचें वर्षासन इत्यादि, १२ सालंकृत

कन्यादान, १३ आयुष्यांत स्थिर व स्थायिक होणें, १४ टोपण नांव व सभा वगैरे ठिकाणीं घेऊन जाण्याचा पोषाख आणि १५ एखादी सन्माननीय पदवी. (म. श. को.)

पंधरा प्रमुख गंधर्व — १ विराध, २ तुंबरु, ३ दनु, ४ चित्ररथ, ५ धृतराष्ट्र, ६ किशोर, ७ हुहु, ८ हाहा, ९ विद्याधर, १० उग्रसेन, ११ विश्वावसु, १२ परावसु, १३ चित्रसेन, १४ गोपाल व १५ बल.

' चित्रसेनश्च गोपालो बलः पंचदशस्मृताः ॥ ' (ग. ब्रह्म. ९-३)

पंधरा स्थितप्रज्ञाचीं लक्षणें — १ कामनात्याग, २ आत्मसंतुष्ट, ३ दुःखानें उदास होत नाहीं, ४ सुखाची आसक्ति नाहीं, ५ प्रीति, भय व क्रोध यांपासून अलिप्त, ६ ममत्वत्याग, ७ आसक्तिरहित, ८ शुभप्रातीचा आनंद नाहीं, ९ अशुभाचा द्वेष नाहीं, १० इंद्रियनिग्रह करून परमेश्वरपरायण, ११ संयमी, १२ प्रसन्नचित्त, १३ भोगासंबंधीं उदासीन, १४ स्वस्वरूपीं स्थिर, १५ कामना, ममता व अहंकार वगैरेंचा त्याग, निरिच्छता. (भ. गीता. २. ५५–७१)

१६

षोडशाक्षरी मंत्रः—" हरेराम हरेराम रामराम हरेहरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरेहरे । "
इति षोडशकं नाम्नां कलिकल्मशनाशनम् ।

या मंत्राच्या जपानें सर्व पापांचा नाश होतो असें कलियुगांतील महान् साधन म्हणून हिरण्यगर्भानें नारदास उपदेशिलें आहे. (कलि–संतरणोपनिषद्).

षोडशकला (चंद्राच्या) — १ शंखिनी, २ पद्मिनी, ३ लक्ष्मणी, ४ कामिनी, ५ पोषिणी, ६ पुष्टिवर्धनी, ७ आल्हादिनी, ८ अश्वपादिनी, ९ व्यापिनी, १० प्रयोदिनी, ११ मोहिनी, १२ प्रभा, १३ क्षीरवर्धनी, १४ वेधवर्धनी, १५ विकाशिनी, १६ शौभिनी (क.क.); (आ) १ अमृता, २ मानदा, ३ पूषा, ४ तुष्टि, ५ पुष्टि, ६ रति, ७ धृति, ८ शशिनी, ९ चंद्रिका, १० कांति, ११ ज्योत्स्ना, १२ श्री, १३ प्रीति, १४ अंगदा, १५ पूर्णा आणि १६ पूर्णामृता.

अमृता मानदा पूषा तुष्टिः पुष्टि रतिर्धृतिः ।
शशिनी चंद्रिका कांतिर्ज्योत्स्ना श्रीः प्रीतिरेव च ।
अंगदा च तथा पूर्णामृता षोडश वै कलाः ॥

अशा चंद्राच्या सोळा कला असून सतरावी अमृतकळा म्हणून मानिली आहे.

ऐशा तुझ्या षोडशकला । सत्रावी बोलिजे अमृतकळा ॥
(काशीखंड–१७·१९)

सोळा आणे — सोळा आण्यांचा एक बंदा रुपया होतो. तसें कोणतेंहि काम संपूर्णपणें पूर्ण झाल्यावर उत्तम या अर्थी ' सोळा आणे ' असा संकेत मानला जातो.

सोळा आधारस्थानें (मानवी शरिरांतील जीवनकार्य चालविणारीं) — १ पादांगुष्ठाधार, २ मूलाधार, ३ गुदाधार, ४ मेंढ्राधार, ५ उड्डियानाधार, ६ नाभ्याधार, ७ हृदयाधार, ८ कंठाधार, ९ घंटिकाधार, १० तत्त्वाधार, ११ जिह्वामूलाधार, १२ ऊर्ध्व दंतमूलाधार, १३ नासाग्राधार, १४ भ्रूमध्याधार, १५ ललाटाधार व १६ ब्रह्मरंध्राधार.

षट् चक्रं षोडशाधारं द्विकल्पं योगपञ्चकम् ।
स्वदेहे ये न जानन्ति कथं सिध्यन्ति योगिनः ॥ (गोरक्षशतक)

सोळा आश्चर्यें (गीतेंतील) — १ अनंत अर्थ, २ संज्ञा, क्रिया, सर्वनाम आणि अव्यय यांचें आधिक्य, ३ मंत्रोद्धार, ४ कोट्यवधि सूक्तें, ५ सर्व धातूंची प्राप्ति, ६ सूत्ररूप लिखाण, ७ सुलभता, ८ स्पष्ट शब्दांत नामोच्चार, ९ अर्थचमत्कार, १० वर्ण्य विषयाची इतर ग्रंथांशीं साम्यता, ११ सर्व शब्दशास्त्रांची उपपत्ति, १२ सर्व शास्त्रज्ञांची एकवाक्यता, १३ सर्व तत्त्ववेत्त्यांची निष्ठा, १४ गूढार्थ, १५ दुर्जनांना अगम्य आणि १६ सर्व वर्णोच्चारांचा समावेश. (कल्याण–श्रीमद्भगवद्गीतांक).

सोळा कामधेनु — १सुमना, २ सुनंदा, ३ सुशीला, ४ सुरभी-५ कपिला, ६ कपिलधारा, ७ कमोदिनी, ८ मधुगा, ९ सिद्धि, १० पूर्ण, भद्रा, ११ महासिद्धि, १२ कामभूता, १३ ब्रह्मघातिनी, १४ मोक्षावती-१५ वसुमती व १६ त्रिपदा अथवा प्रणवी. या सोळा कामधेनु दधि, समुद्रमंथनांतून निघाल्या अशी कथा आहे. (काशीखंड ६१·५७)

सोळा तिथींचे सोळा अधिपति — १ प्रतिपदा–अग्नि, २ द्वितीया–ब्रह्मा, ३ तृतीया–यक्षराज, ४ चतुर्थी–गणेश, ५ पंचमी–नागराज, ६ षष्ठी–कार्तिकेय, ७ सप्तमी–सूर्य, ८ अष्टमी–रुद्र, ९ नवमी–दुर्गा, १० दशमी–यमराज, ११ एकादशी–विश्वेश्वर, १२ द्वादशी–विष्णु, १३ त्रयोदशी–मदन, १४ चतुर्दशी–शंकर, १५ पौर्णिमा–चंद्र व १६ अमावास्या–पितर.

देवेभ्यस्तिथयो दत्ता भास्करेण महात्मना ।
यस्यैव यद्दिनं दत्तं सत्तस्यैवाधिपः स्मृतः ॥ (भ. ब्रा. १०२-९).

सोळा प्रकारच्या जपमाळा–१ करमाला, २ वर्णमाला, ३ मणिमाला, ४ रुद्राक्ष, ५ तुळसी, ६ शंख, ७ पद्मबीज, ८ जीवपुत्रक, ९ मोतीं, १० स्फटिक, ११ मणि, १२ रत्न, १३ सुवर्ण, १४ चांदी, १५ चंदन आणि १६ कुशमूळ (दर्भमूळ). (श्रीगायत्रीजप–यज्ञविधि)

सोळा प्रकारची पत्री—१ अशोक, २ अघाडा, ३ कण्हेर, ४ चाफा, ५ जाई, ६ डाळिंब, ७ तुळस, ८ दूर्वा, ९ धोतरा, १० पुन्नाग (नागचाफा), ११ बकुल, १२ बेल, १३ बोर, १४ रुई, १५ विष्णुक्रांता व १६ हदगा. अशी सोळा प्रकारची पत्री मंगलागौरीच्या पूजेला लागते. (व्रतराज)

सोळा प्रकारचे संधि (तह) — १ कपालसंधि–बरोबरीचा तह, २ उपहारसंधि–खंडणी देऊन, ३ संतानसंधि–सोयरीक करून, ४ संगतसंधि–मैत्री करून, ५ कांचनसंधि, ६ उपन्याससंधि–हेतु धरून, ७ प्रतिकारसंधि–परस्पर कार्य साधेल असा, ८ संयोगसंधि–सामायिक उद्देशानें, ९ पुरुषांतरसंधि–शर्त ठेवून केलेला, १० अदृष्टपुरुषसंधि–शत्रूची शर्त पतकरून, ११ आदिष्टसंधि–प्रदेश देऊन, १२ आत्मादिष्टसंधि–प्राण संरक्षण करण्याकरितां, १३ परिक्रयसंधि–सन्मान्यांचें रक्षण व्हावें म्हणून, १४ उच्छिन्नसंधि–भूमि देऊन, १५ वरभूषणसंधि–जमिनीचें सर्व उत्पन्न देऊन, १६ स्कंधोपनेयसंधि - जमिनींतील पीक आपण वाहून नेऊन देऊन. (हितोपदेश)

सोळा भारतीय संवत् (कालगणना) — १ कल्पाब्द, २ सृष्टिसंवत् ३ वामन संवत्, ४ श्रीराम संवत्, ५ श्रीकृष्ण संवत्, ६ युधिष्ठर

संवत्, ७ बौद्ध संवत्, ८ महावीर (जैन संवत्), ९ श्रीशंकराचार्य संवत्, १० विक्रम संवत्, ११ शालिवाहन संवत्, १२ कलचुरी संवत्, १३ वलभी, १४ नागार्जुन, १५ बंगला आणि १६ हर्षाब्द संवत् (कल्याण हिं.सं.अंक) शिवशक हा सतरावा संवत् होय.

सोळा माता — १ स्तनपान करविणारी, २ गर्भधानी, ३ भक्ष्यदात्री, ४ गुरुपत्नी, ५ इष्टदेवपत्नी, ६ सापत्न माता, ७ कन्या, ८ गर्भार-भगिनी, ९ स्वामिपत्नी, १० सासू, ११ आईची आई, १२ बापाची आई, १३ बन्धुपत्नी, १४ मावशी, १५ आत्या व १६ मामी.

मातृः पितुश्च भगिनी मातुलानी तथैव च ।
जनानां वेदविहिता मातरः षोडश स्मृता ॥ (ब्रह्मवैवर्त गणपति खंड)

सोळा मातृका (पुण्याहवाचनांतील) — १ गौरी, २ पद्मा, ३ शची, ४ मेधा, ५ सावित्री, ६ विजया, ७ जया, ८ देवसेना, ९ स्वधा, १० स्वाहा, ११ माता, १२ लोकमाता, १३ धृति, १४ पुष्टि, १५ तुष्टि व १६ कुलदेवता. या सोळा मातृकांचें सर्व शुभकार्यांत गणपतिपूजनाबरोबर पूजन केलें जातें.

सोळा विद्या — १ सत्य विद्या, २ दहर विद्या, ३ वैश्वानर विद्या, ४ पंचाग्नि विद्या (ओंकाराचें ध्यान), ५ पोडष कला विद्या (ह्या विद्येच्या साहाय्यानें विवेकी पुरुषाला प्रत्यक्ष ब्रह्मात्मा प्रसन्न होतो), ६ उद्गीथविद्या, ७ शांडिल्य विद्या, ८ पुरुषविद्या ९ पर्यंक विद्या–पर्यंकावर बसून अभ्यासाकरितां ब्रह्माकडे जाणें, १० अक्षरविद्या, ११ संवर्गविद्या, १२ मधुविद्या–सृष्टीची उपासना, १३ प्राणविद्या, १४ उपकोसलविद्या–उपकोसल नामक शिष्याला सांगितलेली, १५ सद्विद्या–सत्यब्रह्माचें परोक्ष ज्ञान, १६ भूमविद्या–अपरोक्ष ज्ञान. वेदान्तांत (उपनिषदांत) सांगितलेल्या विद्यांपैकीं या सोळा मुख्य विद्या होत. (रागगीता अ. १७)

सोळा शृंगार — (अ) १ मज्जन, २ चीर, ३ हार, ४ तिलक, ५ अंजन, ६ कुंडल, ७ नासा मौक्तिक, ८ केशपाशरचना, ९ कंचुक, १० नूपुर, ११ सुगंध (अंगराग), १२ कंकण, १३ चरणराग (अलक्तक), १४ मेखलारणन (क्षुद्रघंटिका), १५ तांबूल आणि

१६ करदर्पण (आंगठ्यांत घालावयाचा एक अलंकारविशेष. यावर आरसा बसविलेला असे. त्यांत मुखावलोकन करतां येत असे).

आदौ मज्जनचीरहारतिलकं नेत्राञ्जनं कुंडले
नासामौक्तिककेशपाशरचनासत्कंचुकं नूपुरौ ।
सौगन्धं करकङ्कणं चरणयो रागो रणन्मेखला
ताम्बूलं करदर्पणं चतुरता शृंगारकाः षोडश। (सु.) (कवि-वल्लभदेव–पंधरावें शतक).

(आ) १ मज्जन, २ वस्त्र, ३ आलक्तक, ४ केशपाश, ५ सौगंध्य, ६ भूषण, ७ मुखसुवास, ८ कज्जल, ९ भाषण, १० हास्य, ११ चातुर्य, १२ चालन, १३ पातिव्रत्य, १४ गान, १५ कटाक्ष व १६ क्रीडा (दुर्बोध श. कोष); (इ) १ शौच, २ उटणें, ३ स्नान, ४ वेणीफणी, ५ वस्त्र–आभूषणें, ६ काजळ, ७ अळत्याचा रंग, ८ दंतरंजन, ९ तांबूल, १० वसंत, ११ अलंकार, १२ सुगंध, १३ पुष्पहार, १४ कुंकू, १५ तिलक व १६ हनुवटीवर गोंदणें (तत्त्व-निज-विवेक).

सोळा संस्कार — १ गर्भाधान, २ पुंसवन, ३ सीमंतोन्नयन, ४ जातकर्म, ५ नामकरण, ६ निष्क्रमण, ७ अन्नप्राशन, ८ चौल, ९ उपनयन, १० ते १३ वेदव्रतचतुष्टय — (१० महानाम्नीव्रत, ११ महाव्रत, १२ उपनिषद्व्रत व १३ गोदान), १४ केशान्त, १५ समावर्तन आणि १६ विवाह.

गर्भाधानं पुंसवनं सीमंतोन्नयनं तथा ।
जातकं नामसंस्कारो निष्क्रमश्चान्नभोजनम् ॥
चौलकर्मोपनयनं वेदव्रतचतुष्टयम् ।
केशान्तः स्नानमुद्वाहः संस्काराः षोडशस्मृताः ॥ (ज्योतिर्मयूख)

सोळा स्वर -- अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ॡ, ए, ओ, औ, अं, अः.

सोळा स्त्री–जीवनाचे अंतर व बाह्य शृंगार – अंतर शृंगार— १ दया, २ क्षमा, ३ शांति, ४ प्रीति, ५ नीति, ६ भक्ति, ७ चातुर्य, ८ धैर्य, ९ पातिव्रत्य, १० परोपकार, ११ मनमिळाऊपणा, १२ समाधान,

१३ सत्यवचन, १४ नम्रता, १५ सहिष्णुता व १६ ज्ञानलालसा; **बाह्य शृंगार** — १ चोळी, २ डोकीवरून पदर घेणें, ३ दागिने बेतानें घालणें, ४ हळू चालणें, ५ हरिणाक्षी, ६ वेणीफणी नित्य करणें, ७ वस्त्र व्यवस्थित असणें, ८ काजळ घालणें, ९ कुंकू लावणें, १० सडपातळ असणें, ११ गौर वर्ण, १२ अल्प निद्रा, १३ हंसतमुख, १४ मधुर भाषण, १५ हात राखून खर्च करणें व १६ आदरातिथ्य राखणें. हे सोळा स्त्री जीवनाचे अनुक्रमें अंतर व बाह्य शृंगार शास्त्रकारांनीं सांगितले आहेत. (सर्वसंग्रह)

१७

सत्रा तंतवाद्यें (तारा व ताती लावून वाजणारीं) — १ तंबोरा, २ तंबोरी, ३ सूरसोटा, ४ एकतारी, ५ रुद्रवीणा, ६ बीन, ७ सतार, ८ कछवा, ९ ताऊस, १० दिलरुबा, ११ सारंगी, १२ सारमंडल, १३ रबाब, १४ सुरसिंघार, १५ सरोद, १६ फिडल व १७ तुणतुणें.

सत्रा प्रकारचे गुरु — १ गुरु, २ मंत्रगुरु, ३ यंत्रगुरु, ४ तंत्रगुरु, ५ वस्ताद गुरु, ६ राजगुरु, ७ कुलगुरु, ८ मानिला गुरु, ९ विद्यागुरु, १० अविद्यागुरु, ११ असद्‌गुरु, १२ यतिगुरु, १३ मातागुरु, १४ पितागुरु, १५ राजगुरु, १६ देवगुरु, १७ जगद्‌गुरु. (दासबोध ५·२)

सत्रा शब्ददोष — १ अप्रयुक्त, २ अपुष्टार्थ, ३ असमर्थ, ४ निरर्थक, ५ नेयार्थ, ६ च्युतसंस्कार, ७ संदिग्ध, ८ अप्रयोजक, ९ क्लिष्ट, १० गूढार्थ, ११ ग्राम्य, १२ अन्यार्थ, १३ अप्रतीतिक, १४ अविसृष्ट विधेयांश, १५ विरुद्धमतिकृत, १६ अश्लील व १७ परुष (श्रुतिकटु). (प्रतापरुद्र)

सत्राजण मूढ होत — १ उपदेशास अपात्र अशास उपदेश करणारा, २ अल्प लाभानें संतुष्ट होणारा, ३ आपला द्वेष करणाराशींहि दीर्घकाळ व्यवहार करणारा, ४ स्त्रीच्या जिवावर मोठेपणा मिळविणारा, ५ न मागण्यासारखी वस्तु मागणारा, ६ आत्मस्तुति करणारा, ७ चांगल्या कुलांतील असूनहि निंद्य कृत्य करणारा, ८ दुर्बल असूनहि बलवानाशीं वैर

करणारा, ९ श्रद्धा नसलेल्यास उपदेश करणारा, १० भलतीच इच्छा करणारा, ११ सुनेच्या माहेरच्या साहाय्यानें भीतींतून पार पडला असूनहि तेथें मानमान्यतेची इच्छा करणारा, १२ सुनेची थट्टा करणारा सासरा, १३ परस्त्रीगमन करणारा, १४ वेळीं अवेळीं पत्नीची निंदा करणारा, १५ एखादी गोष्ट माहीत असूनहि आठवत नाहीं म्हणणारा, १६ याचनेनंतर आत्मप्रशंसा करणारा आणि १७ असत्य गोष्टींचें सत्यत्व प्रतिपादन करणारा. (म. भा. उद्योग १७·१ ते ६)

१८

अठरा अधिकारी (राज्याचे) — १ मंत्री अथवा मुख्य प्रधान, २ पुरोहित, ३ युवराज, ४ सेनापति, ५ द्वारपाल, ६ अंतरवेशक, ७ कारागृहाचा अधिकारी, ८ कोशाध्यक्ष, ९ आयव्यय–निरीक्षक, १० उपदेशक, ११ नगराध्यक्ष, १२ नवीन कामांची योजना करणारा, १३ धर्माध्यक्ष, १४ सभाध्यक्ष, १५ दंडाध्यक्ष, १६ दुर्गाध्यक्ष, १७ सीमेवरील रक्षक आणि १८ अरण्यरक्षक. यावरूनच ' अठरा अधिकार ' म्हणजे सर्व अधिकार असा संकेत रूढ झाला असावा. (म. भा. सभा. अ. ५)

अठरा अक्षौहिणी* दळभार — ११ अक्षौहिणी कौरवपक्षीय व ७ अक्षौहिणी पांडवपक्षीय असे अठरा अक्षौहिणी सैन्य भारतीय युद्धांत होतें.

एक अक्षौहिणी – २१८७० रथ, २१८७० हत्ती, १,०९,३५० पायदळ व ६५,६१० घोडे. एकूण दोन लक्ष अठरा हजार सतराशें. (म. भा. भीष्म १६-२५)

---

* प्रत्येक अक्षौहिणींतील घटक म्हणजे रथ, हत्ती वगैरेंच्या संख्या मांडिल्या असतां त्यांतील अंकांची बेरीज १८ च येते. अक्षौहिणीच काय पण एकएका चमू (पलटण) ची गंमत अशीच आहे. जसे—रथ ७२९ (७ + २ + ९ = १८) एक चमू म्हणजे २७ रथांचा औरसचौरस चौकोन होय. म्हणजे एका ओळींत २७ रथ अशा २७ ओळी.

(केळकरांची निबंधमाला)

अठरा आयुर्वेद संहिता — १ हारीत, २ सुश्रुत, ३ पराशर, ४ भोज, ५ भेड, ६ भृगु, ७ अग्निवेश, ८ चरक, ९ च्यवन, १० अगस्ति, ११ वाराह, १२ नारायण, १३ नारसिंह, १४ आत्रेय, १५ अत्रि, १६ चंद्रमा, १७ शिव व १८ सूर्य. अशा आयुर्वेदाच्या प्राचीन अठरा संहिता व शास्त्रकार होत. (हारित संहिता)

अठरा उपधान्यें — १ सजगुरा (बाजरी), २ भादली, ३ वरी, ४ नाचणी, ५ बरग, ६ कांग, ७ खपले गहूं, ८ मका, ९ करडई, १० राजगिरा, ११मटकी, १२पावटा, १३ वाल,१४ मूग,१५ कारळ, १६ देवभात, १७ सातु आणि १८ अंबाडी.

अठरा उपपुराणें — (अ) १ भागवत, २ माहेश्वर, ३ ब्रह्मांड, ४ आदित्य, ५ पराशर, ६ सौर, ७ नंदिकेश्वर, ८ सांब, ९ कालिका, १० वारुण, ११ औशनस, १२ मानव, १३ कापिल, १४ दुर्वासस्, १५ शिवधर्म, १६ बृहन्नारदीय, १७ नरसिंह व १८ सनत्कुमार; (आ) १ सनत्कुमार, २ नृसिंह, ३ नंदी, ४ दुर्वास, ५ नारद, ६ कापिल, ७ मानव, ८ उशनस, ९ वारुण, १० काली, ११ वासिष्ठलिंग, १२ माहेश्वर, १३ सांब, १४ सौर, १५ पाराशर ,१६ शिव (धर्म), १७ मारिच व १८ भागवत (भार्गव); (इ) (देवी भागवत) १ लघुकालिका, २ बृहत्कालिका, ३ पराशर, ४ सिंह, ५ नारद, ६ सनत्कुमार, ७ सौर, ८ दुर्वास, ९ कपिल, १० मानव, ११ विष्णुधर्मोत्तर, १२ शैवधर्म, १३ महेश्वर, १४ नंदी, १५ कुमार, १६ औशनस, १७ देवी व १८ वरुण. (सरस्वती कोश).

अठरा कारखाने — १ उष्ट्र, २ खबुतर, ३ जनान, ४ जवाहीर, ५ जामदार, ६ जिकीर, ७ तालीम, ८ तोफ, ९ थट्टी, १० दप्तर, ११ दारु, १२ दिवान, १३ नगार, १४ पील, १५ फरास, १६ बंदी, १७ मोदी व १८ शिकार. असे अठरा कारखाने मराठ्यांच्या राजवटींत सरकारी असून त्यांवर स्वतंत्र अधिकारी असत.

अठरा ज्योतिःशास्त्रप्रवर्तक — १ सूर्य, २ पितामह, ३ व्यास, ४ वासिष्ठ, ५ अत्रि, ६ पराशर, ७ कश्यप, ८ नारद, ९ गर्ग,

१० मरीचि, ११ मनु, १२ अंगिरा, १३ लोमश, १४ पुलिश, १५ च्यवन, १६ पवन, १७ भृगु व १८ शौनक.

लोमशः पुलिशश्चैव च्यवनोपवनो गुरुः (भृगुः) ।
शौनकोऽष्टादशैवेते ज्योतिःशास्त्रविशारदाः॥ (सम्प्रदायवृत्तम्)

अठरा धान्यें — १ गहूं, २ साळ, ३ तूर, ४ जव, ५ जोंधळा, ६ वाटाणा, ७ लाख, ८ चणा, ९ जवस, १० मसूर, ११ मूग, १२ राळा, १३ तीळ, १४ हरीक, १५ कुळीथ, १६ सांवा, १७ उडीद व १८ चवळी. यांत नऊ एकदल व नऊ द्विदल धान्यें आहेत.

गोधूम शालि तुवरी यव यावनाल ।
वातनलंक चणका अतसामसूराः ॥
मुद्ग प्रियंगुतिलकोद्रवकाः कुलित्थाः ।
श्यामाक माषचवला इति धान्यवर्गः ॥ (म. ज्ञा. को.)

अठरा नांवें (श्रीगीतेचीं) — १ गीता, २ गंगा, ३ गायत्री, ४ सीता, ५ सत्या, ६ सरस्वती, ७ ब्रह्मविद्या, ८ ब्रह्मवल्ली, ९ त्रिसंध्या, १० मुक्तिगेहिनी, ११ अर्धमात्रा, १२ चिदानंदा, १३ भवघ्नी, १४ भयनाशिनी, १५ वेदत्रयी, १६ परानन्ता, १७ तत्त्वार्थ व १८ ज्ञानमंजिरी.

गीता गङ्गा च गायत्री सीता सत्या सरस्वती ।
ब्रह्मविद्या ब्रह्मवल्ली त्रिसंध्या मुक्तिगेहिनी ॥
अर्धमात्रा चिदानंदा भवघ्नी भयनाशिनी ।
वेदत्रयी परानन्ता तत्त्वार्थ ज्ञानमंजिरी ॥ (कल्याण गीतातत्त्वांक)

अठरा नांवें (शिवाचीं) — १ शिव, २ पशुपति, ३ मृत्युञ्जय, ४ त्रिनेत्र, ५ कृतिवास, ६ पञ्चवक्त्र, ७ शितिकण्ठ, ८ खण्डपरशु, ९ प्रमथाधिप, १० गङ्गाधर, ११ महेश्वर, १२ रुद्र, १३ विष्णु, १४ पितामह, १५ संसारवैद्य, १६ सर्वज्ञ, १७ परमात्मा, १८ कपाली.
(कल्याण शिवांक)

अठरा न्याय — १ हंसक्षीर न्याय, २ उदंडापूप न्याय, ३ बीजांकुर याय, ४ लोहचुंबक न्याय, ५ वन्हिधूम न्याय, ६ स्थालिपुलक न्याय,

७ स्वामिभृत्य न्याय, ८ रविघूक न्याय, ९ कूपमंडूक न्याय, १० सिंहावलोकन न्याय, ११ अरुंधतिदर्शन न्याय, १२ अंधचटक न्याय, १३ सूर्यजयद्रथ न्याय, १४ काकदंतगवेषण न्याय, १५ पंकप्रक्षालन न्याय, १६ पिष्ठपेषण न्याय, १७ काकाक्षिगोलक न्याय, १८ घुणाक्षर न्याय. असे अठरा न्याय तर्कशास्त्रांत सांगितले आहेत. न्याय म्हणजे निर्दोष विचारचर्चा, अनुमानें यांना आवश्य असे नियम.

अठरा पगड जात — १ तांबट, २ पाथरवट, ३ लोहार, ४ सुतार, ५ सोनार, ६ कासार, ७ कुंभार, ८ गुरव, ९ धनगर, १० गवळी, ११ वाणी, १२ जैन, १३ कोळी, १४ साळी, १५ चितारी, १६ माळी, १७ तेली व १८ रंगारी.

अठरा पर्वें (महाभारताचीं) — १ आदि, २ सभा, ३ आरण्यक, ४ विराट्, ५ उद्योग, ६ भीष्म, ७ द्रोण, ८ कर्ण, ९ शल्य, १० सौप्तिक, १३ स्त्री, १२ शांति, १३ अनुशासन, १४ अश्वमेध, १५ आश्रमवासिक, १६ मौसल, १७ महाप्रस्थान व १८ स्वर्गारोहण.

अठरा पक्वान्नें — १ मांडे, २ वडे, ३ घृतपुऱ्या, ४ लाडू, ५ तिळवे, ६ गुळवऱ्या, ७ तेळवऱ्या, ८ फेण्या, ९ कुरवंडीया, १० घाऱ्या, ११ घारगे, १२ वडोरीया, १३ चोरवे, १४ वेठनीगे, १५ खांडवी, १६ शिखरणी, १७ सांजोऱ्या व १८ खिरी. (क. क.)

अठरा पुराणें — १ बृहद्विष्णु, २ शिव उत्तर खंड, ३ लघुबृहन्नारदीय, ४ मार्कंडेय, ५ वन्हि, ६ भविष्योत्तर, ७ वराह, ८ स्कंद, ९ वामन, १० बृहद्वामन, ११ बृहन्मत्स्य, १२ स्वल्पमत्स्य, १३ लघुवैवर्ण आणि पांच प्रकारचीं भविष्य पुराणें. या सर्वा मिळून अठरा पुराणें होत.

अठरा प्रकारचीं व्यसनें — १ मृगया, २ जुगार, ३ दिवसा झोंप, ४ निंदा, ५ स्त्रियांबद्दल आसक्ति, ६ निशा करणें, ७ गीत, ८ वाद्य, ९ नृत्य, १० उगीचच भटकणें, ११ चहाडी, १२ वाईट काम, १३ विश्वासघात, १४ मत्सर, १५ द्वेष, १६ चौर्य, १७ कटु भाषण आणि १८ मारझोड करणें. (तत्त्व-निज-विवेक)

अठरा प्रकारचे सत्त्वगुण — १ प्रीति, २ प्रसिद्धि, ३ उन्नति, ४ विनयशीलता, ५ सुख, ६ दैन्य न दाखविणें, ७ निर्भयता, ८समाधान,

९ श्रद्धाळूपणा, १० क्षमा, ११ धैर्य, १२ अहिंसा, १३ शुचिर्भूतता, १४ अक्रोध, १५ आर्जव, १६ समता, १७ सत्य व १८ निर्मत्सरता, (म. भा. शांति–अ ३४१ तळटीप)

अठरा महारथी[१] (पांडवांकडील) — १ भीम, २ अर्जुन, ३ सात्यकि, ४ विराट्, ५ द्रुपद, ६ धृष्टकेतु, ७ चेकितान, ८ काशिराज, ९ पुरुजित् कुंतिभोज, १० शैब्य, ११ युधामन्यु, १२ उत्तमौज, १३ अभिमन्यु, १४ प्रतिविंध्य, १५ श्रुतसोम, १६ श्रुतकीर्ति, १७ शतानीक आणि १८ श्रुतकर्मा. हे शेवटचे पांच द्रौपदेय होत.

अठरा महारथी (श्रीकृष्णपुत्रांत) — १ प्रद्युम्न, २ अनिरुद्ध, ३ दीप्तिमान, ४ भानु, ५ सांब, ६ मधु, ७ बृहद्भानु, ८ चित्रभानु, ९ वृक, १० अरुण, ११ पुष्कर, १२ वेदबाहु, १३ श्रुतदेव, १४सुनंदन, १५ चित्तभानु, १६विरूप, १७ कवि व १८ न्यग्रोध. भगवान् श्रीकृष्णाच्या पुत्रांत हे अठरा महारथी होते.

'तेषामुद्दामवीर्याणामष्टादश महारथाः ॥' (भा.स्कं. १०.९०-३२)

अठरा महापुराणें — १ ब्राह्म, २ पद्म, ३ विष्णु, ४ शिव अथवा वायु, ५ भागवत, ६ नारद, ७ मार्कंडेय, ८ अग्नि, ९ भविष्य, १० ब्रह्मवैवर्त, ११ नृसिंह किंवा लिंग, १२ वाराह, १३ स्कंद, १४ वामन, १५ मत्स्य, १६ कूर्म, १७ गारुड आणि १८ ब्रह्माण्ड.

मात्स्यं च गारूडं चैव ब्रह्माण्डं च ततः परम् ।
अष्टादशपुराणानां नामधेयानि यः पठेत् ॥ (मा. १३५)

अठरा पुराणकर्ते — १ बकदालभ्य–मत्स्य पुराण, २ मृकंडी–मार्कंडेय पुराण, ३ व्यास–भारत, ४ लोमहर्षण–भविष्योत्तर, ५ कूर्म–बृहन्नारदीय, ६ अगस्ति–ब्रह्मांड, ७ कश्यप–ब्रह्मवैवर्त, ८ भारद्वाज–वराहपुराण, ९ अंगिरा–वायुपुराण, १० शृंगऋषि–विष्णुपुराण, ११ कण्व–वामनपुराण, १२ अत्रि–आदित्यपुराण, १३ पराशर–लिंगपुराण,

---

१. दहा हजार वीरांशीं एकटा युद्ध करूं शकतो त्याला महारथी म्हणतात.

१४ पद्मऋषि–पद्मपुराण, १५ विभांडक–अग्निपुराण, १६ वसिष्ठ–कूर्मपुराण, १७ कार्तिक–स्कंदपुराण आणि १८ बृहस्पति–गरुडपुराण. (सिद्धान्तबोध अ. २३)

अठरा योग (गीतेंतील) — १ अर्जुनविषादयोग, २ सांख्ययोग, ३ कर्मयोग, ४ कर्मब्रह्मार्पणयोग, ५ कर्मसंन्यासयोग, ६ आत्मसंयमयोग, ७ ज्ञानविज्ञानयोग, ८ अक्षरब्रह्मयोग, ९ राजविद्याराजगुह्ययोग, १० विभूतियोग, ११ विश्वरूपदर्शनयोग, १२ भक्तियोग, १३ क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग, १४ गुणत्रयविभागयोग, १५ पुरुषोत्तमयोग, १६ देवासुरसंपद्विभागयोग, १७ श्रद्धात्रयविभागयोग आणि १८ मोक्षसंन्यासयोग. (अर्जुन उत्थानयोग–गीतातत्त्व मंजिरी) हे श्रीमद्भगवद्गीतेंतील अठरा अध्यायांत वर्णिलेले अठरा योग होत. हे अठराहि योग मिळून गीतेचें योगशास्त्र होतें.

अठरा वादस्थानें (व्यवहारांत) — १ कर्ज घेणें, २ ठेव ठेवणें, ३ धनी नाहीं अशा वस्तूंचा केलेला विक्रय, ४ समाईक व्यापार, ५ दिलेलें दान परत घेणें, ६ सेवकांचें वेतन, ७ केलेल्या संकेतांचें उल्लंघन, ८ विकत घेतलेली वस्तु पसंत न पडल्यानें उत्पन्न होणारा वाद, ९ धनी व गुराखी यांत जनावरांसंबंधीं होणारा वाद, १० ग्रामादि सीमा, ११ शिवीगाळ, १२ चोरी, १३ अपहार, १४ स्त्री, १५ स्त्री व पुरुषांची धर्मामध्यें व्यवस्था, १६ वडिलोपार्जित धनविभाग, १७ द्यूत आणि १८ पक्षीक्रीडा वगैरे बाबत. अशीं व्यवहारांत वाद उत्पन्न होण्याचीं अठरा वादस्थानें आहेत.

> स्त्रीपुंधर्मो विभागश्च द्यूतमाह्वय एव च ।
> पदान्यष्टादशैतानि व्यवहारस्थिताविह ॥ (मनु. ८-७)

अठरा विद्या — चौदा विद्या (चौदाचे अंकीं पाहा) आणि १ आयुर्वेद, २ धनुर्वेद, ३ गांधर्व वेद आणि ४ अर्थशास्त्र हीं चार मिळून अठरा विद्या होतात.

> आयुर्वेदो धनुर्वेदो गांधर्वश्चैव ते त्रयः ।
> अर्थशास्त्रं चतुर्थं तु विद्या ह्यष्टादशैव तु ॥ (सु.)

अठरा विदेशीय कालगणना (जगांतील विविध देशीय सन्) — १ चिनी, २ खताई, ३ पारसी, ४ मिश्री, ५ तुर्की, ६ आदम, ७ इसवी, ८ यहुदी, ९ इब्राहीम, १० मूसा, ११ युनानी, १२ रोमन , १३ ब्रह्मा, १४ मलयकेतु, १५ पार्थियन, १६ इराणी, १७ जावा आणि १८ हिजरी. (कल्याण हिंदु. सं. अंक).

अठरा वैदिक सूक्तकर्त्या (ऋषिका) — १ अपाला, २ घोषा, ३ सूर्या, ४ शाचि, ५ गोधा, ६ अश्विनी, ७ विश्वावारा, ८ आत्रेयी, ९ वाक् अथवा वाग्देवी, १० श्रद्धा, ११ वैवस्वती, १२ यमी, १३ गार्गी, १४ लोपामुद्रा, १५ सुलभा, १६ वडवा, १७ रोमशा आणि १८ वृताचि. (भारतीय साम्राज्य)

अठरा विश्वे दारिद्र्य — विसवा म्हणजे रुका अथवा पै याचा $\frac{१}{२०}$ भाग म्हणजे कमालीचें दारिद्र्य.

अठरा शिल्पशास्त्रप्रणेते — १ भृगु, २ अत्रि, ३ वसिष्ठ, ४ विश्वामित्र, ५ मय, ६ नारद, ७ नग्नजित्, ८ विशालाक्ष, ९ पुरंदर, १० ब्रह्मा, ११ कुमार, १२ नंदीश, १३ शौनक, १४ गर्ग, १५ वासुदेव, १६ अनिरुद्ध, १७ शुक्र आणि १८ बृहस्पति.

> अष्टादशैते विख्याता शिल्पशास्त्रोपदेशकाः ।
> संक्षपेणोपदिष्टं सन्मनवे मत्स्यरूपिणा ।। (मत्स्य. २५२–४)

अठरा संख्यान पदें (संख्यागणनेचीं स्थानें) — १ एकम्, २ दहम्, ३ शतम्, ४ सहस्र, ५ दशसहस्र, ६ लक्ष, ७ दशलक्ष, ८ कोटि, ९ दशकोटि, १० अब्ज, ११ खर्व, १२ निखर्व, १३ महापद्म, १४ शंकु, १५ जलधि, १६ अंत्य, १७ मध्य व १८ परार्ध. अशीं हीं दहाच्या पटीनें वाढणारीं अठरा संख्यान पदें होत. हीच प्राचीन भारतीय दशमानपद्धति होय.

अठरा सिद्धि — १ अणिमा, २ गरिमा, ३ लघिमा, ४ प्राप्ति, ५ प्राकाश्य, ६ ईशिता, ७ वशिता आणि ८ प्राकाम्य या आठ स्वाभाविक सिद्धि आणि १ अनूर्मिमत्व, २ दूरश्रवण, ३ दूरदर्शन, ४ मनोजव, ५ कामरूप, ६ परकायाप्रवेश, ७ स्वेच्छा मृत्यु, ८ सुरक्रीडादर्शन,

९ संकल्पासीद्धि आणि १० अकुंठितता. या दहा गुणमूलक सिद्धि. या दोन्ही मिळून अठरा सिद्धि योगशास्त्रांत सांगितल्या आहेत. (मो. प्रदीप)

अठरा सिद्ध पुरुष —सिद्धि प्राप्त करून घेणें हेंच मुख्य कर्तव्य मानणारे अगस्ति वगैरे अठरा सिद्ध पुरुष होऊन गेले. ते अधिकारी असल्यामुळें त्यांना (सिद्धि व मुक्ति) दोन्ही प्राप्त झाल्या होत्या.

अष्टादश प्रसिद्धास्ते सिद्धिप्राधान्यवादिनः ।
अगस्त्यप्रमुखाः सिद्धीस्त्वधिकाराद्दुभेगताः ॥ (रामगीता १६·१५)

अठरा सिद्धान्त (ज्योतिषशास्त्राचे) — १ ब्रह्मसिद्धांत, २ सूर्यसिद्धांत, ३ सोमसिद्धांत, ४ वसिष्ठसिद्धांत, ५ रोमक, ६ पौलस्त्य, ७ बृहस्पति, ८ गर्गसिद्धांत, ९ व्यास, १० पाराशर, ११ भोज, १२ वराह, १३ ब्रह्मगुप्त, १४ सिद्धांतशिरोमणि, १५ सुंदरसिद्धांत, १६ तत्त्वविवेक, १७ सार्वभौमसिद्धांत व १८ लघु आर्यसिद्धांत. असे अठरा सिद्धांत ज्योतिषांत मानले आहेत. (बर्जेस–सूर्यसिद्धांत)

अठरा संख्याविशेष — १ जाति अठरा, २ पोषाख अठरा, ३ धान्यें अठरा, ४ उपधान्यें अठरा, ५ वनस्पति अठरा, ६ ज्योतिषी अठरा, ७ पुराणें अठरा, ८ महापुराणें अठरा, ९ अतिपुराणें अठरा, १० उपपुराणें अठरा, ११ स्मृति अठरा, १२ शिल्पशास्त्रप्रवर्तक अठरा, १३ गीतोक्त योग अठरा, १४ युगें अठरा, १५ तत्त्वें अठरा, १६ महापुराणकर्ते अठरा, १७ सिद्धि अठरा आणि १८ यज्ञांत ऋत्विज अठरा (छां. उपनिषद). असा अठरा संख्याविशेष भारतांत मानला आहे. त्यावरून भारताचे प्राचीन काळीं अठरा प्रमुख भाग असावे असा तर्क आहे. (प्रा. हिंदी शिल्पशास्त्रसार); (**महाभारतांतर्गत**) — १ महाभारताचीं पर्वें अठरा, २ भारतांतर्गत भगवद्गीतेचे अध्याय अठरा, ३ भारतीय युद्ध अठरा दिवस झालें, ४ भारतीय युद्धांत सैन्य अठरा अक्षौहिणी होतें, ५ भारतीय युद्धानंतर अठरा वर्षांनीं व्यासांनीं महाभारत लिहिलें, ६ पांडवांकडील प्रमुख वीर अठराच होते, ७ भारतीय युद्धानंतर अठरा वर्षांनीं धृतराष्ट्राचें पतन झालें, ८ युद्धारंभीं अठराहि दिवस राजा युधिष्ठिरानें पतिव्रता गांधारीचा 'यतो धर्मस्ततो जयः' असा आशीर्वाद घेतला होता, ९ राजा जनमेजयानें परीक्षितीच्या मृत्यूचा सूड म्हणून पिपीलिका पर्वतावर अठरा दिवसांनीं

पूर्णाहुति करावयाचा नरयाग आरंभिला, १० या यज्ञांना अठरा ऋत्विज होते. पण त्यांजवर भगवंतांनीं मोहिनी घातली तेव्हां यज्ञकार्य बंद पडलें. जनमेजयानें सिंचन केलेल्या जलकणांमुळें ते ब्राह्मण मृत झाले, ११ व्यासांनीं तीं अठरा प्रेतें मंडपांत आणून अठरा हात कृष्णवस्त्र मधें धरून वैशंपायनाकडून जनमेजयास भारत ऐकविलें. प्रत्येक पर्वाबरोबर एकेक हात कृष्णवस्त्र पांढरें होत गेलें. संपूर्ण अठरा पर्वें भारत ऐकल्यावर ते अठराहि ब्राह्मण जिवंत झाले.

व्यास गुरु आज्ञेप्रमाणें । भारत सांगितलें वैशंपायनें ।
अठरा पर्वें संपूर्णें । अनुक्रमेंसी ॥ (क. क. स्तबक ८-५-५५)

अठरा स्मृतिकार — १ विष्णु, २ पराशर, ३ दक्ष, ४ संवर्त, ५ व्यास, ६ हारीत, ७ शातातप, ८ वसिष्ठ, ९ यम, १० आपस्तंब, ११ गौतम, १२ देवल, १३ शंख, १४ लिखित, १५ भारद्वाज, १६ उशना, १७ शौनक आणि १८ याज्ञवल्क्य.

'शौनको याज्ञवल्क्यश्च दंशाष्टौ स्मृतिकारिणः ।' (सु.)

१९

एकोणिस धन संपादनाचे कामीं साहाय्यक सद्गुण — १ शास्त्र, २ बुद्धि, ३ धैर्य, ४ दक्षता, ५ प्रगल्भता, ६ धारणाशक्ति, ७ उत्साह, ८ वक्तृत्व, ९ औदार्य, १० संकटकालीं सहनशीलता, ११ तेज, १२ पावित्र्य, १३ मित्रत्व, १४ त्याग, १५ सत्य, १६ कृतज्ञता, १७ कुल, १८ शील आणि १९ हेम.

शास्त्रं प्रज्ञा धृतिर्दाक्ष्यं प्रागल्भ्यं धारयिष्णुता ।
उत्साहो वाग्मितौदार्यमापत्कालसहिष्णुता ॥
प्रभावः शुचिता मैत्री त्यागः सत्यं कृतज्ञता ।
कुलं शीलं दमश्चेति गुणाः सम्पत्तिहेतवः ॥ (अग्नि. २३८–५)

२०

वीस धर्मशास्त्रप्रवर्तक — १ मनु, २ अत्रि, ३ विष्णु, ४ हारीत, ५ याज्ञवल्क्य, ६ उशना, ७ अंगिरा, ८ यम, ९ आपस्तंब, १० संवर्त,

११ कात्यायन, १२ बृहस्पति, १३ पराशर, १४ व्यास, १५ शंख, १६ लिखित, १७ दक्ष, १८ गौतम, १९ शतातप आणि २० वसिष्ठ. हे धर्मशास्त्रकर्ते होत.

" शतातपो वसिष्ठश्च धर्मशास्त्रप्रयोजकाः "। (स्मृति)

वीस स्मृति ग्रंथ — प्राचीन ऋषींनीं केलेले धर्मशास्त्रविवेचक असे अनेक स्मृतिग्रंथ होत. १ मनु, २ याज्ञवल्क्य, ३ बृहस्पति, ४ विष्णु, ५ वसिष्ठ, ६ गौतम, ७ व्यास, ८ बौधायन, ९ शंख व लिखित, १० अत्रि, ११ हारीत, १२ उशना, १३ अंगिरा, १४ यम, १५ आपस्तंब, १६ संवर्त, १७ कात्यायन, १८ पराशर, १९ दक्ष व २० शतातप स्मृति.

वीस उपस्मृतिकार — १ अंगिरस, २ अत्रि, ३ आपस्तंब, ४ औशनस, ५ गोभिल, ६ दक्ष, ७ देवल, ८ प्रजापति, ९ बृहस्पति, १० यम, ११ विष्णु, १२ शंख, १३ शातातप, १४ हारीत, १५ अश्वलायन, १६ लिखित, १७ वसिष्ठ, १८ व्यास, १९ संवर्त आणि २० बौधायन. (स्मृतिसमुच्चय)

वीस कुलें वनस्पतींचीं — १ सीताफळ, २ मोहरी, ३ कार्पास, ४ नारंग, ५ शिंबा, ६ गुलाब, ७ जंबू, ८ कूष्मांड, ९ कुसुम, १० जाती, ११ करवीर, १२ धत्तुर, १३ तुलसी, १४ औदुंबर, १५ एरंड, १६ नारिकेल, १७ कुमारी, १८ कदली, १९ नागदन आणि २० तृण-धान्य कुल.

२१

एकवीस पत्रीं गणेश पूजेची — १ मालती, २ माका, ३ बेल, ४ दूर्वा, ५ बोर, ६ धोतरा, ७ तुळस, ८ आघाडा, ९ शमी, १० केवडा, ११ कण्हेर, १२ आपटा, १३ मांदार, १४ अर्जुन (जास्वंद), १५ विष्णुक्रांत, १६ डाळिंबी, १७ देवदार, १८ मरवा, १९ निर्गुडी, २० जाई आणि २१ अगस्ति (हादगा). (पूजेचे मंत्र)

एकवीस प्रथमश्रेणीच्या तारका — १ शालिनी (व्याध), २ अगस्ति, ३ सित्र, ४ जिद्, ५ ब्रह्म, ६ स्वाति, ७ चक्रासन, ८ राजन्य, ९ श्वानक, १० अग्रिम, ११ मित्रक, १२ श्रवण, १३ त्रिशंकू, १४ रोहिणी, १५ पुनः, १६ चित्रा, १७ ज्येष्ठ, १८ मीनास्य, १९ हंस, २० मघा आणि २१ क्रतु.

"अवश्यं लक्षणीया हि एकविंशति तारकाः।"

एकवीस मृत्युलोकींचीं रत्नें — १ माणिक अथवा पद्मराग, २ मोतीं, ३ प्रवाल, ४ मरकतमणि, ५ पुष्पराग, ६ वज्रमणि, ७ इंद्रनील मणि, ८ मेदकमणि (गोमेदक), ९ सूत्रमणि (लसणी), १० वैडूर्यमणि, ११ चंद्रकांतमणि, १२ घृतमणि, १३ तैलमणि, १४ भीष्मकमणि, १५ अमृतमणि, १६ उपलकमणि (ओपल), १७ पारसमणि, १८ उल्का-मणि, १९ लाजावर्तमणि, २० मासरमणि आणि २१ भीष्मक पाषाण अथवा मणि. हीं सर्व एकवीस रत्नें देवदानव युद्धांत पडलेल्या राजा बलीच्या निरनिराळ्या अंगापासून उत्पन्न झालीं अशी कथा आहे. (रत्नदीपिका)

एकवीस मूर्च्छना (संगीतशास्त्र) — १ उत्तरमन्द्रा, २ रजनी, ३ उत्तरायता, ४ शुद्ध षड्जा, ५ मत्सरीकृता, ६ अश्वक्रान्ता, ७ अभिरुद्रता, ८ सौवीरी, ९ हरिणाश्वा, १० कलोपनता, ११ शुद्धमध्या, १२ मार्गी, १३ पौरवी, १४ हृश्यका, १५ नन्दा, १६ विशाला, १७ सुमुखी, १८ चित्रा (विचित्रा), १९ चित्रावती (मोहिनी), २० सुरवा आणि २१ आलापा (आलापन). (सुरतरंगिणी) सप्त स्वरांचा आरोह अवरोह करणें त्यास अथवा त्या स्वरसमुदायांस मूर्च्छना म्हणतात. (रागविलास).

"सप्त स्वरास्त्रयो ग्रामामूर्च्छना एकविंशतिः।" (नारदीय पूर्वखंड)

(आ) १ नंदा, २ विशाला, ३ सुमुखी, ४ चित्रा, ५ चित्रवती, ६ सुरवा आणि ७ बला या सात (देवतांच्या) मूर्च्छना, ८ अप्यावती, ९ विश्वभृता, १० चंद्रा, ११ हेमा, १२ कपर्दिनी, १३ मैत्री व १४ बार्हती या सात (पितरांच्या) मूर्च्छना आणि १५ उत्तरचंद्र, १६ अभि-रूढता, १७ अश्वक्रांता, १८ सौवीरा, १९ हृषिका, २० उत्तरायता

आणि २१ रजनी. या सात ऋषींच्या मूर्च्छना होत. गंधर्वगण देवतांच्या मूर्च्छनांचा स्वीकार करतात व मानव ऋषींच्या मूर्च्छना घेतात.

२२

बावीस अक्षरी मंत्र—

" श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे । हे नाथ नारायण वासुदेव ॥ "

बावीस श्रुति (गायनोपयोगी नाद) — १ गायनोपयोगी नादास श्रुति हा पारिभाषिक शब्द शास्त्रकारांनीं योजिला आहे. नाद हा गायनाचा आत्मा आहे. असे हे नाद अथवा श्रुति बावीस आहेत त्या— १ तीव्रा, २ कुमुद्वती, ३ मंदा, ४ छंदोवती, ५ दयावती, ६ रंजनी, ७ रतिका, ८ रौद्री, ९ क्रोधी, १० वज्रिका, ११ प्रस्तरिणी, १२ प्रीति, १३ मार्जिनी, १४ क्षिति, १५ रक्ता, १६ संदीपनी, १७ आलापिनी, १८ मदन्ती, १९ रोहिणी, २० रम्या, २१ उग्रा आणि २२ क्षोभिणी. (नारदप्रणीत)

२३

तेवीस प्राचीन व्याकरण प्रवक्ते — १ इंद्र, २ वायु, ३ भरद्वाज, ४ भागुरि, ६ पौष्करसादि, ६ चारायण, ७ काशकृत्स्न, ८ वैयाघ्रपाद, ९ माध्यंदिनी, १० रौडि, ११ शौनकि, १२ गौतम, १३ व्याडि, १४ आपिशली, १५ काश्यप, १६ गार्ग्य, १७ गालव, १८ चाक्रवर्मण, १९ भारद्वाज, २० शाकटायन, २१ शाकल्य, २२ सेनक व २३ स्फोटायन.

(कल्याण हिं. सं. अंक)

२४

चोवीस अक्षरी मंत्र व **त्याच्या देवता** —

ॐ तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥ (गायत्री मंत्र)

देवता — १ अग्नि, २ वायु, ३ सूर्य, ४ आकाश, ५ यम, ६ वरुण, ७ बृहस्पति, ८ पर्जन्य, ९ इंद्र, १० गंधर्व, ११ पूषा, १२ मित्र, १३ त्वष्टा, १४ वसु, १५ मरुद्गण, १६ सोम, १७ अंगिरा, १८ विश्वेदेव, १९ अश्विनीकुमार, २० प्रजापति, २१ संपूर्ण देवता, २२ रुद्र, २३ ब्रह्मा आणि २४ श्रीविष्णु. गायत्री मंत्र हा चोवीस अक्षरांचा आहे. प्रत्येक अक्षराची एक देवता अशा या चोवीस देवता मानल्या आहेत. (देवी. भाग. स्कंध १२–१)

चोवीस एकादशा — प्रत्येक मासांत दोन एकादशा असतात. एक शुद्ध पक्षांत आणि एक कृष्ण पक्षांत. त्यांचीं नांवें मासपरत्वें—

कामदा शु. वरुथिनी कृ.	चैत्र	मोहिनी शु. अपराजिता कृ.	वैशाख
निर्जला शु. योगिनी कृ.	ज्येष्ठ	शयनी शु. कामिका कृ.	आषाढ
पुत्रदा शु. अजा कृ.	श्रावण	परिवर्तिनी शु. इंदिरा कृ.	भाद्रपद
पाशांकुशा शु. रमा कृ.	आश्विन	प्रबोधिनी शु. उत्पत्ति कृ.	कार्तिक
मोक्षदा शु. सफला कृ.	मार्गशीर्ष	पुत्रदा शु. षट्तिला कृ.	पौष
जया शु. विजया कृ.	माघ	आमलकी शु. पापमोचनी कृ.	फाल्गुन

अधिक महिना आल्यास दोन एकादशा अधिक येतात त्या—

कमला अधिक शु.
कमला अधिक कृ. (धर्मसिंधु)

चोवीस गुरु (अवधूताचे) — अवधूतानें एकंदर चोवीस गुरु केले होते, अशी भागवतांत कथा आहे. ते गुरु व त्यापासून घेतलेले गुण अनुक्रमें— १ पृथ्वी–क्षमावृत्ति व परोपकारित्व, २ वायु–निर्लेपता,

३ आकाश–सर्वत्र व्यापून असंग राहणें, ४ उदक–स्वच्छता आणि पवित्रता, ५ अग्नि–तेजस्विता उपयोग करून घेणारा भेटेल त्याप्रमाणें होणें, ६ चंद्रमा–आत्मा अविनाशी आहे, विकार देहाला असतात, ७ सूर्य–भेदाभेदशून्यत्व, ८ कपोत–अति आसक्ति नाशास कारण होते, ९ अजगर–निरलस उदासीनता, १० समुद्र–सदैव स्थिर, ११ पतंग–बाह्य स्वरूपाला भुलूं नये, १२ मधुकर–गुणाला भुलून आसक्त झाले असतां नाश होतो, १३ हत्ती–विषयाला लंपट झालें असतां नाश होतो, १४ मधुहा (मधुमक्षिका)–उपभोग न घेतां केलेला संचय नष्ट होतो, १५ हरिण–नादमोहित झालें असतां नाश होतो, १६ मीन–रसना ताब्यांत ठेवतां आली नाहीं तर मरण ओढवतें, १७ पिंगला (वेश्या)–आशेनें दुःख व निराशेपासून सुख होतें, १८ कुरर (बहिरी ससाणा)–पक्षी–प्रियवस्तूचा त्याग, १९ बाल–चिंताशून्यता, २० कुमारी–एकाकी असणें, २१ शरकृत्–चित्ताची एकाग्रता, २२ सर्प–संगरहित, एकट्यानें संचार करणें योग्य, २३ ऊर्णनाभि (कोळी)–एकाकी–ईश्वर जगत् कसें निर्माण करतो व कसा संहार होतो हें ज्ञान आणि २४ सुपेशकृत (भिंगुरटी)–ध्यानसामर्थ्य. (भागवत स्कंध ११ अ. ६–२४)

चोवीस तीर्थंकर (जैन धर्म) — १ ऋषभ (आदिनाथ), २ अजितनाथ, ३ संभवनाथ, ४ अभिनंदननाथ, ५ सुमतिनाथ, ६ पद्मप्रभ, ७ सुपार्श्वनाथ, ८ चंद्रप्रभ, ९ पुष्पदंत, १० शीतलनाथ, ११ श्रेयांसनाथ, १२ वासुपूज्य, १३ विमलनाथ, १४ अनंतनाथ, १५ धर्मनाथ, १६ शांतिनाथ, १७ कुंथुनाथ, १८ अरनाथ, १९ मल्लिनाथ, २० मुनिसुव्रत, २१ नमिनाथ, २२ नेमिनाथ, २३ पार्श्वनाथ आणि २४ महावीर अथवा वर्धमान. असे चोवीस तीर्थंकर होऊन गेले असें जैन धर्मांत मानलें आहे. (म. ज्ञा. को.)

चोवीस धमन्या — मानव शरिरांत रस वाहणाऱ्या धमनी म्हणजे नाड्या चोवीस आहेत. (सुश्रुत शरीर)

चोवीस नांवें (श्रीविष्णूचीं) — १ केशव, २ नारायण, ३ माधव, ४ गोविंद, ५ विष्णु, ६ मधुसूदन, ७ त्रिविक्रम, ८ वामन, ९ श्रीधर, १० हृषिकेश, ११ पद्मनाभ, १२ दामोदर, १३ संकर्षण, १४ वासुदेव,

१५ प्रद्युम्न, १६ अनिरुद्ध, १७ पुरुषोत्तम, १८ अधोक्षज, १९ नारसिंह, २० अच्युत, २१ जनार्दन, २२ उपेंद्र, २३ हरि आणि २४ श्रीकृष्ण. हीं संध्यावंदनाचे वेळीं घेतलीं जातात तीं चोवीस नांवें.

चोवीस बुद्ध — १ दीपंकर, २ कौंडिण्य, ३ मंगल, ४ सुमन, ५ रैवत, ६ शोभित, ७ अनोमदर्शी, ८ पद्म, ९ नारद, १० पद्मोत्तर, ११ सुमेध, १२ सुजात, १३ प्रियदर्शी, १४ अर्थदर्शी, १५ धर्मदर्शी, १६ सिद्धार्थ, १७ तिपय, १८ पुष्प, १९ विपश्यी, २० शिखी, २१ वेस्तभू, २२ ककुसंध, २३ कनकमुनि आणि २४ काश्यप. असे चोवीस बुद्ध होऊन गेले. गौतमबुद्ध हे पंचविसावे बुद्ध होत. (बुद्धवंसो)

चोवीस शब्दगुण — १ श्लेष, २ प्रसाद, ३ समता, ४ माधुर्य, ५ सुकुमारता, ६ अर्थव्यक्ति, ७ कांति, ८ उदारत्व, ९ उदात्तत्व, १० ओज, ११ और्जित्य, १२ प्रेयान, १३ सुशब्दता, १४ समाधि, १५ सौक्ष्म्य, १६ गांभीर्य, १७ विस्तार, १८ संक्षेप, १९ संमितत्व, २० भाविकत्व, २१ गति, २२ रीति, २३ उक्ति आणि २४ प्रौढी.

(म. भा. शांति ३२० तळटीप)

चोवीस रत्नें — देव-दानवांनीं केलेल्या समुद्रमंथनापासून निघालेल्या रत्नांचीं नांवें, संख्या व क्रम चोहींकडे सारखीं नाहींत. कोठें चौदा तर कोठें चोवीस रत्नें सांगितलीं आहेत तीं अशीं — १ हालाहल विष, २ चंद्र, ३ सुरभि धेनु, ४ कल्पवृक्ष, ५ पारिजातक, ६ आम्र, ७ संतानक, ८ कौस्तुभरत्न (चिंतामणि), ९ उच्चैःश्रवा, १० ऐरावत — चौसष्ट हस्तींच्या कळपासह, ११ मदिरा, १२ विजया, १३ भांग, १४ लसूण, १५ गाजर, १६ धोतरा, १७ पुष्कर, १८ ब्रह्मविद्या, १९ सिद्धि, २० ऋद्धि, २१ माया, २२ लक्ष्मी, २३ धन्वंतरी आणि २४ अमृत. (स्कंद. १-१-११)

२५

पंचवीस तत्त्वें (सांख्यशास्त्र) — १ प्रकृति, २ पुरुष, ३ बुद्धि, किंवा महत्तत्त्व, ४ अहंकार, ५ मन, ६ ते १० पंच ज्ञानेंद्रियें, ११ ते १५ पंच कर्मेंद्रियें, १६ ते २० पंच तन्मात्रें म्हणजे पंचमहाभूतांचे सूक्ष्म अंश.

उदा.– १शब्दतन्मात्रा, २स्पर्शतन्मात्रा, ३ रूपतन्मात्रा,४रसतन्मात्रा आणि ५ गंधतन्मात्रा व २१ ते २५ पंचमहाभूतें. या पंचवीस तत्त्वांवर सृष्टीची उभारणी आहे, असें सांख्यशास्त्र मानतें. सांख्य शब्दाचे दोन अर्थ आहेत– एक ज्ञान अथवा तत्त्वज्ञान. विशेषेंकरून कपिलमुनींनीं प्रतिपादिलेलें दर्शन असा बोध होतो. सांख्यशास्त्रांत सृष्टीची उभारणी पंचवीस तत्त्वांवर झाली असल्यामुळें व इतर अनेक प्रकारांतहि विवक्षित संख्या निर्दिष्ट केली असल्यामुळें सांख्य म्हणजे मोजणारें शास्त्र असाहि दुसरा अर्थ आहे.

पंचवीस तत्त्वें (स्थूल शरिराचीं) — १ अस्थि, २ मांस, ३ त्वचा, ४ नाडी, ५ केंस (पृथ्वीचे गुणधर्म), ६ लाळ, ७ मूत्र, ८ रक्त, ९ रेत आणि १० स्वेद (आप), ११ क्षुधा, १२ तृषा, १३ आलस्य, १४ निद्रा, १५ मैथुन (तेज), १६ चलन, १७ वलन, १८ निरोधन, १९ प्रसरण, २० आकुंचन (वायु), २१ काम, २२ क्रोध, २३ लोभ, २४ मोह आणि २५ भय (आकाश गुण). (दासबोध १७-८)

पंचवीस दोष (गायकाचे) — १ दांत चावून गाणें, २ ओरडून गाण्याचा विरस करणें, ३ सू सू असा आवाज निघणें, ४ भीत भीत गाणें, ५ गडबडीनें गाणें, ६ कंपयुक्त, ७ तोंड वेडेंवाकडें करणें, ८ बेसूर, ९ कर्कश, १० बेताल, ११ मान उंच करून गाणें, १२ बकऱ्याप्रमाणें तोंड करून गाणें, १३ चेहरा फुगवणें, १४ मान वांकडी करणें, १५ तुंब्याप्रमाणें तोंड फुगवून गाणें, १६ हात व पाय आपटणें, १७ डोळे मिचकावून गाणें, १८ रसहीन, १९ रागांत न लागणारे स्वर लावून गाणें, २० स्वर आणि वर्ण यांचा उच्चार बरोबर न करणें, २१ स्वरांच्या योग्य जागीं ज्यांचा आवाज लागत नाहीं असे, २२ नियमाप्रमाणें न गाणें, २३ एका रागांत अनेक अयोग्य राग मिश्रण करून गाणें, २४ बेफिकीर गाणें व २५ नाकांतून आवाज काढून गाणें.

मिश्रकोऽनवधानश्च तथाऽन्यसानुनासिकः ।
पंचविंशतिरित्येते गायना निन्दिता मताः ॥ (संगीतरत्नाकर)

वेताळ पंचविशी — एक कथासंग्रह. यांत वेताळानें सांगितलेल्या लोकप्रिय अद्भुत अशा पंचवीस कथा आहेत. म्हणून यास वेताळपंचविशी

म्हणतात. हा ग्रंथ जंभलदत्तकृत असून तो सोळाव्या शतकांत होऊन गेला असें म्हणतात.

२६

सव्वीस दैवी गुण — १ अभय, २ अंतःकरणाची शुद्धता, ३ ज्ञान व कर्म यांविषयीं समान निष्ठा, ४ दातृत्व, ५ दम, ६ यज्ञ, ७ धर्माप्रमाणें आचरण, ८ तप, ९ सरळपणा, १० अहिंसा, ११ सत्य, १२ क्रोध नसणें, १३ (कर्मफल) त्याग, १४ शांति, १५ चहाडी न करणें, १६ सर्व भूतांचे ठायीं दया, १७ हावरेपणा नसणें, १८ मनाचें मार्दव, १९ दुराचरणाची खंत, २० चंचलपणा नसणें (स्थिर बुद्धि), २१ तेजस्विता, २२ क्षमा, २३ मनोदार्ढ्य, २४ अंतर्बाह्य शुद्धता, २५ द्रोह न करणें आणि २६ दुरभिमान नसणें. (भ. गी १६-१ ते ३).

सव्वीस प्राचीन कोशग्रंथ — १ मेदिनी, २ अमरमाला, ३ त्रिकांड, ४ रत्नमालिका, ५ रंतिदेव, ६ भागुरि, ७ व्याडि, ८ शब्दार्णव, ९ द्विरूप, १० कलिंग, ११ रभस, १२ पुरुषोत्तम, १३ दुर्ग, १४ अभिधानमाला, १५ संसारावर्त, १६ शाश्वती, १७ विश्व, १८ बोपालित, १९ वाचस्पति, २० हलायुध, २१ हारावली, २२ साहसांक, २३ विक्रमादित्य, २४ हेमचंद्र, २५ रुद्र आणि २६ अमर. हे सव्वीस प्राचीन संस्कृत कोशग्रंथ होत.

एते कोशाः समाख्याताः संख्या षडिंशति स्मृताः ॥
इति कोश नामानि । (एकाक्षर कोश).

२७

सत्तावीस उपपुराणें — १ सनत्कुमार, २ नरसिंह, ३ बृहन्नारदीय, ४ शिवधर्मोत्तर, ५ दुर्वासस्, ६ कापिल, ७ मानव, ८ उशनस्, ९ वारुण, १० आदित्य, ११ कालिका, १२ सांब, १३ नंदिकेश्वर, १४ सौर, १५ पाराशर, १६ माहेश्वर, १७ वाशिष्ठ, १८ भार्गव, १९ आदि, २० मुद्गल, २१ कल्कि, २२ देवी, २३ महाभागवत,

२४ बृहद्धर्मोत्तर, २५ परानंद, २६ पशुपति आणि २७ हरिवंश. (कल्याण हिं. सं. अंक)

सत्तावीस नक्षत्रें — १ अश्विनी, २ भरणी, ३ कृत्तिका, ४ रोहिणी, ५ मृग, ६ आर्द्रा, ७ पुनर्वसु, ८ पुष्य, ९ आश्लेषा, १० मघा, ११ पूर्वा, १२ उत्तरा, १३ हस्त, १४ चित्रा, १५ स्वाती, १६ विशाखा, १७ अनुराधा, १८ ज्येष्ठा, १९ मूळ, २० पूर्वाषाढा, २१ उत्तराषाढा, २२ श्रावण, २३ धनिष्ठा, २४ शततारका, २५ पूर्वा भाद्रपदा, २६ उत्तरा भाद्रपदा, २७ रेवती (ज्योतिष). हीं सत्तावीस नक्षत्रें देवांचीं मंदिरें होत. पहिलीं चौदा देवनक्षत्रें व शेवटचीं तेरा यमनक्षत्रें होत. अभिजित् हें अठ्ठाविसावें नक्षत्र अलिकडे मानलें जातें. या सत्तावीस नक्षत्रांपैकीं मृग नक्षत्रापासून हस्त नक्षत्रापर्यंतचीं नऊ नक्षत्रें पर्जन्यमानाचीं होत. (तै. ब्रा.)

सत्तावीस योग — १ विष्कंभ, २ प्रीति, ३ आयुष्मान्, ४ सौभाग्य, ३ शोभन, ६ अतिगंड, ७ सुकर्मा, ८ धृति, ९ शूल, १० गंड, ११ वृद्धि, १२ ध्रुव, १३ व्याघात, १४ हर्षण, १५ वज्र, १६ सिद्धि, १७ व्यतीपात, १८ वर्याण, १९ परिघ, २० शिव, २१ सिद्धि, २२ साध्य, २३ शुभ, २४ शुक्ल, २५ ब्रह्मा, २६ ऐंद्र आणि २७ वैधृति. (ज्योतिषसार)

सत्तावीस प्रकार लोककथेचे — १ राजकथा, २ चोरकथा, ३ महामात्रकथा, ४ सेनाकथा, ५ भयकथा, ६ युद्धकथा, ७ अन्नकथा, ८ पानकथा, ९ वस्त्रकथा, १० शयनकथा, ११ मालाकथा, १२ गन्धकथा, १३ ज्ञातिकथा, १४ यानकथा, १५ ग्रामकथा, १६ निगमकथा, १७ नगरकथा, १८ जनपदकथा, १९ स्त्रीकथा, २० पुरुषकथा, २१ शूरकथा, २२ विशिखाकथा (बाजारांतील गप्पा), २३ कुम्भस्थाकथा (पाणवठ्यावरील कथा), २४ पूर्वप्रेतकथा (मृतांच्या गोष्टी), २५ निरर्थककथा, २६ लोकाख्यायिका आणि २७ समुद्राख्यायिका. (दीघनिकाय १-८)

सत्तावीस रसायन-शास्त्रप्रवर्तक — १ आदिनाथ, २ चन्द्रसेन, ३ लंकेश, ४ विशारद, ५ कपाली, ६ मत, ७ मांडव्य, ८ भास्कर, ९ शूरकनक, १० रत्नघोष, ११ शंभु, १२ अर्क, १३ नरवाहन,

१४ इन्द्रद, १५ गोमुख, १६ कम्बलि, १७ व्याडि, १८ नागार्जुन, १९ सुरानंद, २० नागबोधि, २१ यशोधन, २२ खंड, २३ कापालिक, २४ ब्रह्मा, २५ गोविंद, २६ लम्पक आणि २७ हरि. हे सत्तावीस रसशास्त्राचे आद्यप्रवर्तक व रससिद्धि देणारे होत.

'सप्तविंशति संख्याका रससिद्धिप्रदायकाः ॥' (अ. र. र. १)

सत्तावीस (मराठी) **वृत्तें** — १ स्वर्गंगा किंवा फटका, २ बालानंद, ३ साकी किंवा रसवाहिनी, ४ चंद्रकांत किंवा सुलभा, ५ सूर्यकांत किंवा राजसा, ६ माधवकरणी तथा मधुरा, ७ मेनका, ८ केशवकरणी, ९ राजहंस तथा रसतरंगिणी, १० हंसाराणी, ११ शारदा, १२ नृपममता, १३ भूपतिवैभव, १४ अकुर, १५ मुद्रिका, १६ पादाकुलक, १७ वधुवल्ली, १८ देवला, १९ म्हातारा, २० माळीण, २१ पन्ना, २२ पंचकल्याणि, २३ आर्द्रा, २४ घुंगुरवाळा, २५ कृष्णा-कोयना, २६ कुसुमगंधा व २७ कबीर. कवितेच्या प्रत्येक चरणांत किती अक्षरें असावींत याचें मापन असलेलीं हीं सत्तावीस प्रमुख मराठी वृत्तें होत. (म. ज्ञा. को. विभाग ५ वा)

२८

अठ्ठावीस व्यास — १ ब्रह्मदेव, २ मनु, ३ उशना, ४ बृहस्पति, ५ सूर्य, ६ मृत्यु, ७ इन्द्र, ८ वसिष्ठ, ९ सारस्वत, १० त्रिधामा, ११ त्रिवृषा, १२ भरद्वाज, १३ अन्तरिक्ष, १४ वप्री, १५ त्रय्यारुण, १६ धनंजय, १७ कृतञ्जय, १८ ऋणज्य, १९ भारद्वाज, २० गौतम, २१ उत्तम (हर्यात्मा), २२ वेनराजस्रव, २३ तृणबिंदु, २४ भार्गवऋक्ष, २५ शक्ति, २६ पराशर, २७ जातुकर्ण व २८ कृष्णद्वैपायन असे अठ्ठावीस व्यास होऊन गेले.

अष्टाविंशतिरित्येते वेदव्यासः पुरातन। (विष्णु अंश ३ अ. ३)

अठ्ठावीस साधूचीं लक्षणें — १ दयालुत्व, २ अद्रोह, ३ तितिक्षा (सहनशीलता), ४ सत्य, ५ अनवद्य (पवित्र), ६ समबुद्धि, ७ परो-

पकार, ८ अकामता, ९ बाह्येंद्रियनिग्रह, १० कनवाळुपणा, ११ स्वकर्माचरण, १२ अकिंचनता, १३ निरिच्छ, १४ मितभोजन, १५ शांति, १६ स्थिरता, १७ परमेश्वराला शरण जाणें, १८ मननशीलता, १९ सावधानता, २० गांभीर्य, २१ धैर्य, २२ षड्विकारांवर जय, २३ निरभिमानता, २४ प्राणिमात्रांविषयीं सद्भाव, २५ परबोधकता, २६ निष्कपटता, २७ कारुणिकता आणि २८ वेदशास्त्ररहस्याचें ज्ञान.

कवि या पदाचे व्याख्यानें । झालीं अठ्ठावीस लक्षणें ।
उरलीं जे अति गहनें । तें दो श्लोकी कृष्णें आदरिलें सांगो ॥
(ए. भा. ११–१०५०)

२९

एकोणतीस प्रकारच्या वीणा — १ अलावणी, २ ब्रह्मवीणा, ३ किन्नरी, ४ लघुकिन्नरी, ५ विपंची, ६ वल्लकी, ७ ज्येष्ठा, ८ चित्रा, ९ घोषवली, १० जया, ११ हस्तिका, १२ कुनाजिका, १३ कूर्मी, १४ सारंगी, १५ परिवादिनी, १६ त्रिशवी, १७ शतचंद्री, १८ नकुलौष्ठी, १९ दंसवी, २० उडंबरी, २१ पिनाकी, २२ निःशंक, २३ शुष्कल, २४ गदावारण हस्त, २५ रुद्र, २६ स्वरमण्डल, २७ कपिलास, २८ मधुस्यंदी आणि २९ घोण.

३०

तीस ताल — १ केरवा, २ दादरा, ३ तीव्रा, ४ रूपक, ५ पस्तु, ६ धुमाळी, ७ मध्यमावती, ८ गजल, ९ ठेका, १० झपताल, ११ सूलताल, १२ रुद्रताल, १३ भानुमती, १४ चौताल, १५ एकताल, १६ खेमटा, १७ फरोदस्त, १८ अडा चौताल, १९ झूमरा, २० दीपचंद, २१ धमार, २२ सवारी, २३ गजझंपा, २४ तिलवाडा, २५ त्रिताल, २६ पंजाबी, २७ टप्प्याचा ठेका, २८ शिखर, २९ विष्णुताल आणि

३० ब्रह्मताल. असे तीस ताल प्रचारांत आहेत (संगीतशास्त्र). ताल म्हणजे गीत, वाद्य आणि नृत्य यांच्या क्रियेच्या गतींचें कालदर्शक नियमित प्रमाण. (म. श. को.)

तीस तिथी व त्या तिथींच्या देवता — १ प्रतिपदा–ब्रह्मन्, २ द्वितीया–त्वष्ट्र, ३ तृतिया–विष्णु, ४ चतुर्थी–यम, ५ पंचमी–सोम, ६ षष्ठी–कुमार, ७ सप्तमी–मुनि, ८ अष्टमी–वसु, ९ नवमी–शिव, १० दशमी–धर्म, ११ एकादशी–रुद्र, १२ द्वादशी–वायु, १३ त्रयोदशी –काम, १४ चतुर्दशी–अनंत, १५ पौर्णिमा–विश्वेदेव, ३० अमावास्या–पितर. (संस्कारविधि)

३२

बत्तीस अक्षरी मंत्र — 'हरेराम हरेराम रामराम हरेहरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे' (रामगीता १३-८)

बत्तीस अलंकार — १ मणि, २ मंगळसूत्र, ३ वज्रटीक, ४ गळसरी, ५ पुतळ्यांची माळ, ६ ठुशी, ७ चंद्रहार, ८ हुल्लड पांच पदरी, ९ मूद, १० राखडी, ११ केकत, १२ केवडा, १३ कुड्ई, १४ कर्णफूल, १५ वाळ्या, १६ बुगड्या, १७ बाजुबंद, १८ वाकी, १९ कंगण्या, २० गोट, २१ तोडे, २२ बांगड्या, २३ बिलवर, २४ माजपट्टा, २५ शिंदेशाही तोडे, २६ तोरड्या, २७ रणजोडवी, २८ जोडवी, २९ विरोद्या, ३० मांसोळ्या, ३१ नथ व ३२ चमकी. असे स्त्रियांचे पूर्वकाळीं प्रमुख बत्तीस अलंकार होते.

...म्हाईबाईचें रूप नटला सावळा वनमाळी ।
सोळा शिणगार बत्तीस अलंकारलेणीं त्याला सगळीं ॥
(पठ्ठे बापूराव लावण्या व गवळणी)

बत्तीस लक्षणें (मनुष्य शरिराचीं) — पांच ठिकाणें सूक्ष्म म्हणजे बारीक असावीं:—१ त्वचा, २ केस, ३ अंगुली, ४ दांत, ५ बोटाचीं पेरें; पांच ठिकाणें दीर्घ म्हणजे लांब असावीं:—६ भुज, ७ नेत्र, ८ हनुवटी, ९ जांघ व १० नाक; सात ठिकाणें आरक्त असावीं:—

११ हाताचे तळवे, १२ पायाचे तळवे, १३ अधरोष्ठ, १४ नेत्र, १५ तालु, १६ जीभ व १७ नखें; सहा ठिकाणें उन्नत असावीं:— १८ वक्षःस्थळ, १९ कुक्षी, २० केस, २१ खांदे, २२ हात व २३ तोंड; तीन ठिकाणें विस्तीर्ण म्हणजे रुंद असावीं:—२४ वक्षःस्थळ, २५ कटि व २६ ललाट; तीन ठिकाणें ऱ्हस्व म्हणजे आखूड असावीं:—२७ ग्रीवा, २८ जंघा व २९ शिश्न; तीन ठिकाणें गंभीर असावीं:—३० स्वर, ३१ कर्ण व ३२ नाभी.

पंच सूक्ष्मः पंच दीर्घः सप्त रक्तः षडुन्नतः ।
त्री पृथुर्लघुगंभीरो द्वात्रिंशल्लक्षणाः पुमान् ॥ (बौद्ध-धर्मसारसंग्रह)

एकूण हीं मनुष्य शरिराचीं बत्तीस शुभ लक्षणें होत (काशीखंड अ. ४१). या बत्तिसांत सर्वश्रेष्ठ नाक हें आहे.

(तुका म्हणे) काय करावीं तीं, बत्तीस लक्षणें ।
नाक नाहीं तेणें, वाया गेलीं ॥ (तुकाराम)

बत्तीस लक्षणें शककर्त्या शिवाजीचीं — १ निश्चयाचा महामेरू, २ बहुत जनांसी आधारू, ३ अखंड स्थितीचा निर्धारू, ४ श्रीमंत योगी, ५ परोपकारी, ६ नरपति, ७ हयपति, ८ गजपति, ९ गडपति, १० भूपति, ११ आदिशक्ति पृष्ठभागी, १२ यशवंत, १३ कीर्तिवंत, १४ सामर्थ्यवंत, १५ वरदवंत, १६ पुण्यवंत, १७ सुकृति, १८ नीतिवंत, १९ जाणता, २० आचारशील, २१ विचारशील, २२ दानशील, २३ धर्मशील, २४ सर्वज्ञ, २५ सुशील सकळांठायीं, २६ धीर, २७ उदार, २८ सुंदर, २९ शूर, ३० क्रियेशीं तत्पर, ३१ सावधानी व ३२ देव–धर्म–गोब्राह्मण संरक्षण समर्थ. (दासायन)

बत्तीस लक्षणें (सामुद्रिक) — १ छत्र, २ कमल, ३ धनुष्य, ४ रथ, ५ वज्र, ६ कांसव, ७ अंकुश, ८ विहीर, ९ स्वस्तिक, १० तोरण, ११ चामर, १२ सिंह, १३ वृक्ष, १४ चक्र, १५ शंख, १६ हत्ती, १७ समुद्र, १८ कलश, १९ प्रासाद, २० मच्छ, २१ यव, २२ स्तंभ (स्तूप), २३ सूर्य, २४ कमंडलु, २५ पर्वत, २६ चवरी, २७ दर्पण, २८ उक्षा (वृष), २९ पताका, ३० लक्ष्मी, ३१ पुष्पमाला

व ३२ मयूर. हीं बत्तीस लक्षणें पुण्यवान राजपुरुषाच्या ठिकाणीं असतात असें हस्ती संजीविनी ग्रंथांत सांगितलें आहे. (हस्तसामुद्रिक शास्त्र)

बत्तीस विद्या (शिल्प शास्त्र) — १ वृक्षविद्या, २ पशुविद्या, ३ मनुष्यविद्या, ४ संसेचनविद्या, ५ संहरणविद्या, ६ स्तंभनविद्या, ७ दृतिविद्या, ८ भस्मीकरणविद्या, ९ संकटविद्या, १० पार्थक्यविद्या, ११ तरीविद्या, १२ नौविद्या, १३ नौकाविद्या, १४ अश्वविद्या, १५ पथविद्या, १६ घंटापथविद्या, १७ सेतुविद्या, १८ शकुंतविद्या, १९ विमानविद्या, २० वासोविद्या, २१ कुट्टीविद्या, २२ मंदिरविद्या, २३ प्रासादविद्या, २४ दुर्गविद्या, २५ कूटविद्या, २६ आकरविद्या, २७ युद्धविद्या, २८ आपणविद्या, २९ राजवरालयविद्या, ३० नगररचनाविद्या, ३१ वनोपवनविद्या व ३२ देवालयविद्या. शिल्पशास्त्रांत अगणित विद्या आहेत, त्यांपैकीं बत्तीस विद्या व चौसष्ट कला मुख्य आहेत.

विद्या ह्यनंताश्च कलाः संख्यातुं नैव शक्यते ।
विद्या मुख्यास्तु द्वात्रिंशच्चतुःषष्टिः कलाः स्मृताः ॥ (भृगुसंहिता अ. १)

सिंहासन बत्तिशी — एक कथासंग्रह. राजा विक्रमाचें रत्नजडित सिंहासन भोजराजास भूमिगर्भांत एके ठिकाणीं सांपडलें. तें बत्तीस हात लांब व आठ हात उंच व बत्तीस रत्नजडीत पुतळ्या जडविलेलें होतें. त्यांचीं नांवें– १ जया, २ विजया, ३ जयंती, ४ अपराजिता, ५ जयघोषा, ६ लीलावती, ७ मंजुघोषा, ८ जयसेना, ९ मदनसेना, १० मदनमंजिरी, ११ शृंगारकलिका, १२ नरमोहिनी, १३ भोगानिधि, १४ रतिप्रिया, १५ सुमित्रा, १६ प्रेमावती, १७ सुलभा, १८ कुरंगनयना, १९ चंद्रज्योति, २० चंद्रकांति, २१ सौभाग्यमंजिरी, २२ लावण्यवती, २३ करुणावती, २४ हंसगमना, २५ रूपकांता, २६ देवानंदा, २७ देवांगना, २८ चित्रिणी, २९ सुलोचना, ३० प्रेमावती, ३१ गुणप्रिया व ३२ चित्रकला. या बत्तीस पुतळ्यांनीं राजा भोज सिंहासनावर आरोहण करूं लागतांच मनुष्यरूप धारण करून त्यास विक्रमाच्या शौर्य, धैर्य वगैरे गुणांबद्दल सांगितलेल्या बत्तीस गोष्टी दिल्या आहेत. ' त्यांस सिंहासन बत्तिशी म्हणतात. ' (सिंहासन बत्तिशी)

३३

तेहतीस वीर्यें — १ ओज, २ तेज, ३ बल, ४ वाणी, ५ सत्ता, ६ श्री, ७ धर्म, ८ ब्रह्मतेज, ९ क्षात्रतेज, १० राष्ट्र, ११ वणिक् वृत्ति, १२ कांति, १३ यश, १४ तपोबल, १५ संपत्ति, १६ आयु, १७ रूप, १८ व्यक्तिमत्त्व, १९ कीर्ति, २० प्राण, २१ अपान, २२ चक्षु, २३ श्रोत्र, २४ दूध, २५ रस, २६ अन्न, २७ अन्नाद्यं (जठराग्नि प्रदीप्त), २८ ऋत (प्रामाणिकपणा), २९ सत्य, ३० व्यक्तिगत नित्यकर्मे, ३१ सामाजिक कर्तव्यें–विहीर धर्मशाळा वगैरे बांधणें, ३२ प्रजा आणि ३३ पशु. हीं तेहतीस वीर्यें अथवा गुण राष्ट्रीय संपन्नतेस आवश्यक. (अथर्व वेद १२-६७) (भारतीय मानसशास्त्र).

तेहतीस व्यभिचारी भाव — शारीरिक अवस्थांशीं समांतर चौदा – १ मरण, २ व्याधि, ३ ग्लानि, ४ श्रम, ५ आलस्य, ६ निद्रा, ७ स्वप्न, ८ सुप्त, ९ अपस्मार, १० उन्माद, ११ मद, १२ मोह, १३ जडता, १४ चपलता; ज्ञानात्मक मनोवस्थांशीं समांतर तीन–१५ स्मृति, १६ मति, १७ विमर्श; भावनात्मक मनोवस्थांशीं समांतर सोळा–१८ हर्ष, १९ अमर्ष, २० धृति, २१ उग्रता, २२ आवेग, २३ विषाद, २४ निर्वेद, २५ औत्सुक्य, २६ चिंता, २७ शंका, २८ असूया, २९ त्रास, ३० गर्व, ३१ दैन्य, ३२ अवहित्थ व ३३ क्रीडा. असे एकूण तेहतीस व्यभिचारी अथवा संचारी भाव साहित्यशास्त्रांत मानले आहेत. (भरतनाट्य ६. १८ ते २१).

३६

छत्तीस गुणमेलन — १ वर्ण, २ वश्य, ३ नक्षत्र, ४ योनीचे गुण, ५ गृहमैत्री, ६ गुणाचे गुण, ७ राशिकूट, ८ नाडीचे गुण हीं सर्व मिळून छत्तीस होतात. वधुवरांचे छत्तीस गुण जमल्यास विवाहास उत्तम मानतात. (ज्योतिष)

एकनाड षडाष्टक चुकवून । दोहींचा पाहोन एकगण ।
गृहमैत्री छत्तीस लक्षण । कुशल शोधुनि पहाणें ॥

(सिद्धान्तबोध २४-८५)

छत्तीस गुण राज्यशासकांस आवश्यक — १ रागद्वेषांचा त्याग, २ नास्तिक असूं नये, ३ क्रूरता न करतां द्रव्यसंपादन, ४ औद्धत्याचा अस्वीकार, ५ प्रिय भाषण, ६ शौर्य, ७ आत्मश्लाघा नसावी, ८ दानशूरत्व, ९ अपात्रीं द्रव्याचा अपव्यय न करणें, १० प्रगल्भता, ११ निष्ठुर असूं नये, १२ नीच लोकांशीं संगनमत न करणें, १३ बांधवांशीं वैर न करणें, १४ एकनिष्ठ नसेल असा हेर ठेवूं नये, १५ दुसऱ्याला क्लेश न होतील अशा रीतीनें कार्य करावें, १६ असज्जनांना आपला उद्देश कळवूं नये, १७ आपल्या गुणांचा उच्चार करूं नये, १८ सत्पुरुषांकडून कांहीं घेऊं नये, १९ असज्जनांना आश्रय देऊं नये, २० सर्व बाजूंनीं विचार केल्यावांचून दंड करूं नये, २१ कारस्थान गुप्त असावें, २२ लुब्ध मनुष्यांना दान करूं नये, २३ अपकार करणारांवर विश्वास ठेवूं नये, २४ स्त्रियांचें संरक्षण, २५ काम नियमित, २६ परिमित भोजन, २७ सन्माननीयांचा मान ठेवणें, २८ गुरुजनांची सेवा, २९ देवांचें पूजन, ३० संपत्तिप्राप्तीची इच्छा करावी, ३१ संपत्तीचा उपभोग घ्यावा पण मोह नसावा, ३२ दक्ष असावें पण कालज्ञानशून्य असूं नये, ३३ शत्रूंना मुक्त करण्याविषयीं आश्वासन देऊं नये, ३४ शत्रु व त्याचा अपराध हीं जाणल्यावांचून शस्त्रप्रहार करूं नये, ३५ वध केल्यानंतर शोक करूं नये व ३६ अपकार करणारांवर दया दाखवूं नये. (म. भा. शांति अ. ७०).

छत्तीस रागिण्या (संगीत) — जनमनरंजनास योग्य होतो असा स्वरसमुदाय याला राग म्हणतात. असे सुमारें दीडशेंवर राग हल्लीं प्रचारांत आहेत. पण मुख्य पुरुष राग सहा व त्यांच्या प्रत्येकीं सहा भार्या म्हणजे छत्तीस रागिण्या होत. कोणी कोणी पांचच मानतात. राग, रागिण्या व पुत्रराग याबाबतींत ऐकमत्य नाहीं. निरनिराळे ग्रंथकार नांवें व संख्या निरनिराळीं देतात. राग हे भगवान शंकराच्या शरिरापासून व रागिण्या—मस्तकापासून उत्पन्न झाल्या अशी कथा आहे.

राग राागिण्या—

१ **श्रीराग** — १ गौरी, २ कोलाहली, ३ धीरा, ४ द्राविडी, ५ मालकौशिकी व ६ गांधारी.

२ **वसंत** — १ आंदोला, २ कौशिकी, ३ चरमंजिरी, ४ गंडगिरी, ५ देवशास्त्र व ६ रामगिरी.

३ **पंचम** — १ त्रिगुणा, २ स्तंभतीर्था, ३ आदिरी, ४ कुंकुभा, ५ वैराटी व ६ सामवेरी.

४ **भैरव** — १ भैरवी, २ गुर्जरी, ३ भाषा, ४ वेलागुली, ५ कर्णाटकी व ६ रक्तहंसा.

५ **मेघ किंवा मेघमल्हार** — १ बंगाली, २ मधुरा, ३ कामोदा, ४ अक्षिनारिका, ५ देवगिरी व ६ देवाली.

६ **नरनारायण** — १ त्रोटकी, २ मोडकी, ३ नरा, ४ दुंबी, ५ मल्हारी व ६ सिंधु मल्हारी.

तेणें साही राग छत्तीस भार्या । चौसष्टी मूर्च्छना दावूनियां ।
अनेक उपरागांचिया क्रिया । दाविल्या तेव्हां रिसानें ।। (ह. वि. २५-११९)
(स्कंद–नागरखंड अ. २५४)

छत्तीस व्यंजनें — क्, ख्, ग्, घ्, ङ्, च्, छ्, ज्, झ्, ञ्, ट्, ठ्, ड्, ढ्, ण्, त्, थ्, द्, ध्, न्, प्, फ्, ब्, भ्, म्, य्, र्, ल्, व्, श्, ष्, ह्, ळ्, क्ष्, ज्ञ्, हीं–बत्तीस व्यंजनें होत.

३७

सदतीस छंद (छंदःशास्त्र) — १ आर्या, २ गीति, ३ उपगीति, ४ अक्षरपंक्ति, ५ शशिवदना, ६ मदलेखा, ७ अनुष्टुप्, ८ विद्युन्माला, ९ माणवक, १० प्रमाणिका, ११ चंपकमाला, १२ मणिबंध, १३ हंसी, १४ शालिनी, १५ दोधक, १६ इंद्रवज्रा, १७ उपेंद्रवज्रा, १८ उपजाति, १९ रथोद्धता, २० स्वागता, २१ वैश्वदेवी, २२ तोटक, २३ भुजंगप्रयात, २४ द्रुतविलंबित, २५ हरिणीप्लुता, २६ वंशस्थ, २७ इंद्रवंशा, २८ प्रभावती, २९ प्रहर्षणी, ३० वसंततिलका, ३१ मालिनी,

३२ हरिणी, ३३ शिखरिणी, ३४ पृथ्वी, ३५ मंदाक्रांता, ३६ शार्दूल-विक्रीडित व ३७ स्रग्धरा. (पिंगलनाग)

४०

चाळीस प्रकारचा काळा बाजार* — १ अगोदरची रक्कम मागून मांडणें, २ कांहीं काळानें वसूल करावयाचा तो आजच मांडून टाकणें, ३ वसूल होण्यासारखा असून न करणें, ४ वसूल करावयास नको तें करणें, ५ झालेला वसूल न मांडणें, ६ झालेला वसूल न दाखविणें, ७ थोडा असेल तो पुष्कळ दाखविणें, ८ पुष्कळ असेल तो थोडा दाखविणें, ९ एका सदराखालील वसूल भलत्या सदरांत दाखविणें, १० एकाकडून आलेला दुसऱ्याचे नांवावर दाखविणें, ११ देणें तें न देणें, १२ द्यावयास नको तें देणें, १४ नको तेव्हां देणें, १५ थोडें देऊन पुष्कळ दिलें असें दाखविणें, १६ पुष्कळ देऊन थोडें दाखविणें, १७ एक वस्तूऐवजीं दुसरीच देणें, १८ एकाचें दुसऱ्यास देणें, १९ भरणा न करणें, २० भरणा न करतां केला असें दाखविणें, २१ किंमत आली नाहीं असा कच्चा माल नोंदून टाकणें, २२ वसूल झालेली नोंद न करणें, २३ ठोक वसूल होण्यासारखा हप्त्यानें वसूल करणें, २४ हप्त्यानें द्यावयाचें तें एकदम वसूल करणें, २५ हलकी वस्तु देऊन भारी किंमतीची घेणें, २६ भारी किंमत देऊन हलकी वस्तु घेणें, २७ किंमती वाढविणें, २८ किंमती उतरविणें, २९ दिवस वाढविणें, ३० दिवस कमी करणें, ३१ वर्ष व वर्षांतील महिने यांतील मेळ घालवून टाकणें, ३२ महिना व महिन्यांतील दिवस यांतील मेळ नाहींसा करणें, ३३ गैरहजर मनुष्याची मजुरी काढून घेणें, ३४ उत्पन्नाचे सदरांत विरोध दाखविणें, ३५ धर्मादायांत लबाडी, ३६ तयार झालेल्या कामांत लबाडी करणें, ३७ रक्कम अथवा माल यांत लबाडी, ३८ सोन्यारुप्यांत लबाडी, ३९ सवलती देतांना लुच्चेगिरी, ४० वजनमापांत फसविणें. असे चाळीस प्रकारचे काळा बाजार कौटिल्य अर्थशास्त्रांत नमूद आहेत. (कौटिल्य अर्थशास्त्र आधि. २ अ. २९)

* काळा बाजार म्हणजे वाममार्गी अथवा खोटा व्यवहार.

४९

एकूणपन्नास ताना (संगीत शास्त्र) — १ अग्निष्टोम, २ अत्यग्निष्टोम, ३ वाजपेय, ४ षोडशी, ५ पुंडरीक, ६ अश्वमेध, ७ राजसूय, ८ अश्वक्रांत, ९ रथक्रांत, १० विष्णुक्रांत, ११ सूर्यक्रांत, १२ गजक्रांत, १३ बलभिन्न, १४ नागपक्ष, १५ स्विष्टकृत, १६ बहुसौवर्ण, १७ गोसव, १८ महाव्रत, १९ विश्वाजित्, २० ब्रह्मयज्ञ, २१ प्राजापत्य, २२ चातुर्मास्य, २३ संस्था, २४ शस्त्र, २५ उक्थ, २६ चतुर्थक, २७ सौत्रामणि, २८ चित्रा, २९ ईडा, ३० पुरुषमेध, ३१ श्येन, ३२ वज्र, ३३ ईषु, ३४ अंगिरा, ३५ कंक, ३६ सौभाग्यकृत, ३७ कारीरि, ३८ शांतिकृत, ३९ पुष्टिकृत्, ४० वैनतेय, ४१ उच्चाटनी, ४२ वशीकरण, ४३ ज्योतिष्टोम, ४४ दर्श, ४५ नान्दी, ४६ पौर्णमासी, ४७ अश्वप्रतिग्रह, ४८ रात्रि व ४९ सौरभ. (सुरतरंगिणी)

ताना एकोनपंचादाशित्येत स्वरमंडलम् (बृहन्नारदीय पूर्वखंड५०-३१)

५१

एकावन्न सिद्ध क्षेत्रें — १ कुरुक्षेत्र, २ बदरिकाश्रम, ३ नारायण क्षेत्र (बदरिकाश्रम), ४ गया, ५ पुरुषोत्तमक्षेत्र (जगन्नाथपुरी), ६ वाराणशी, ७ वाराहक्षेत्र, ८ पुष्कर, ९ नैमिषारण्य, १० प्रभासक्षेत्र, ११ प्रयाग, १२ शूकरक्षेत्र (सोरों), १३ पुलहाश्रम (मुक्तिनाथ), १४ कुब्जाम्रक्षेत्र (हृषिकेश), १५ द्वारका, १६ मथुरा, १७ केदारक्षेत्र, १८ पंपाक्षेत्र (होसपेठ), १९ बिंदुसर (सिद्धपूर), २० तृणबिंदुवन, २१ दशपुर (मंदसोर), २२ गंगासागरसंगम, २३ तेजोवन, २४ विशाखसूर्य (विशाखापट्टण), २५ उज्जयिनी, २६ दंडक (नाशिक), २७ मानस (मानससरोवर), २८ नंदा (नंदापर्वत), २९ सीताश्रम (बिठूर), ३० कोकामुख, ३१ मंदार (भागलपूर), ३२ महेंद्र (मंजसर), ३३ ऋषभ, ३४ शालग्रामक्षेत्र (दामोदरकुंड), ३५ गोनिष्क्रमण, ३६ सह्याद्रि, ३७ पाण्ड्य, ३८ चित्रकूट, ३९ गंधमादन (रामेश्वर), ४० हरिद्वार, ४१ वृंदावन, ४२ हस्तिनापुर, ४३ लोहाकुल

(लोहार्गल), ४४ देवशाल, ४५ कुमारिक्षेत्र (कुमारस्वामी), ४६ देवदारुवन (आसाम), ४७ लिंगस्फोट, ४८ अयोध्या, ४९ कुंडिन, ५० त्रिकूट व ५१ माहिष्मती (कल्याण तीर्थांक)

५२

बावन्न मातृका — ॐकारापैकीं अ उ म या तीन मात्रा वरील बिंदु ही अर्धमात्रा मिळून साडे तीन मात्रा व त्यापासून पुढें बावन्न मातृका (अक्षरें) ॐकार आणि स्वर व व्यंजनें मिळून ५२ मुळाक्षरें. (१६ स्वर सोळाचे अंकी व ३६ व्यंजनें छत्तीसचे अंकीं पाहा)

५५

पंचावन्न रस — ९ काव्याचे, ८ योगशास्त्र, ९ भक्तिरस, ६ विषयांचे (१ पुष्प, २ गंध, ३ स्त्री, ४ शय्या, ५ वस्त्र व ६ अलंकार), १८ विद्यांचे व ५ मद्याचे अशा एकंदर पंचावन्न रसांची गणना प्राचीनांनीं केली आहे.

काव्यशास्त्रे नवरसाः योगे चाष्टौ रसाः स्मृताः
भक्तियोग नवरसाः ऋतवो विषये स्मृताः ।
अष्टादश प्रकाराहि विद्यायाः परिकीर्तिताः
पञ्चमद्या रसा देवि पञ्च पञ्चाशताः स्मृताः ॥ (सम्प्रदायवृत्तम्)

६०

साठ अधिकरणें (गीतेचीं) — १ ऐतिह्य कथन, २ दैन्य प्रदर्शन, ३ श्रीकृष्णास शरण, ४ आत्मप्रबोधन, ५ स्वधर्मपालन, ६ बुद्धियोग, ७ स्थितप्रज्ञता, ८ कर्मयोग, ९ नित्यकर्म, १० लोकसंग्रह, ११ शासनपालन, १२ शत्रुसंहार, १३ जन्मकर्म, १४ कर्म–अकर्म, १५ प्राज्ञमुखें ज्ञान, १६ सांख्ययोग, १७ सदामुक्तता, १८ योगारूढ होणें, १९ समाधि अभ्यास, २० शाश्वत योग, २१ एकसूत्रता, २२ शरणता, २३ मोह त्यागून ज्ञानविज्ञान साधन, २४ संतत स्मरण, २५ भूत लय–उत्पत्ति, २६ बोधक्षयोदय, २७ ईश्वरी सत्ता, २८ हरिभावना, २९ निष्काम भक्ति, ३० ईशस्मरण, ३१ विभूतिसंक्षेप, ३२ विभूतिविस्तार,

३३ ईश्वरी रूप, ३४ ईश्वरी रूपावलोकन, ३५ क्षमायनस्तोत्र, ३६ रूपविसर्जन, ३७ भक्ततुलना, ३८ सुलभ साधन, ३९ ईश्वर-गुणगान, ४० क्षेत्राक्षेत्रशोधन, ४१ प्रकृतित्याग, ४२ निर्लिप्त आत्मता, ४३ त्रिगुण संसार, ४४ गुणमुक्तता, ४५ वृक्ष (अश्वत्थ) छेत्र, ४६ जीवात्मादर्शन, ४७ जीवनव्याघ्र, ४८ पुरुषोत्तम, ४९ दोन संपदा, ५० असुरवर्णन, ५१ शास्त्रीय संयमानें नरकद्वार टाळणें, ५२ श्रद्धाविभाग, ५३ स्वाभाविक गुण, ५४ आहार यज्ञाचारण, ५५ ॐतत्सदर्पण, ५६ त्यागमीमांसा, ५७ कर्मनिर्णय, ५८ त्रिधावृत्ति, ५९ पूर्ण साधना व ६० अर्जुनबोध. हीं साठ गीतेचीं अधिकरणें अथवा विषय होत.

(गीताई अधिकरण माला.)

साठ संवत्सरें — १ प्रभव, २ विभव, ३ शुक्ल, ४ प्रमोद, ५ प्रजापति, ६ अंगिरा, ७ श्रीमुख, ८ भाव, ९ युवा, १० धाता, ११ ईश्वर, १२ बहुधान्य, १३ प्रमाथि, १४ विक्रम, १५ वृष, १६ चित्रभानु, १७ सुभानु, १८ तारण, १९ पार्थिव, २० व्यय, २१ सर्वजित्, २२ सर्वधारी, २३ विरोधी, २४ विकृति, २५ स्वर, २६ नंदन, २७ विजय, २८ जय, २९ मन्मथ, ३० दुर्मुख, ३१ हेमलंबी, ३२ विलंबी, ३३ विकारी, ३४ शार्वरी, ३५ प्लव, ३६ शुभकृत्, ३७ शोभन, ३८ क्रोधी, ३९ विश्वावसु, ४० पराभव, ४१ प्लवंग, ४२ कीलक, ४३ सौम्य, ४४ साधारण, ४५ विरोधकृत, ४६ परिधावी, ४७ प्रमादी, ४८ आनंद, ४९ राक्षस, ५० नल, ५१ पिंगल, ५२ कालयुक्त, ५३ सिद्धार्थी, ५४ रौद्र, ५५ दुर्मति, ५६ दुंदुभि, ५७ रुधिरोद्गारी, ५८ रक्ताक्षी, ५९ क्रोधन व ६० क्षय.

(ज्योतिष)

६४

चौसष्ट कला — (अ) चौदा विद्या आणि चौसष्ट कला अशी प्राचीन परंपरा आहे. या चौसष्ट कला कोणत्या यासंबंधीं मतैक्य नाहीं. श्रीमद्भागवत शुक्रनीति व वात्सायन कामसूत्रें वगैरे निरनिराळ्या ग्रंथांत निरनिराळ्या याद्या आढळतात. शिवतत्त्वरत्नाकर ग्रंथांत या चौसष्ट

कलांचा नामनिर्देश असा आहे:—१ इतिहास, २ आगम, ३ काव्य, ४ अलंकार, ५ नाटक, ६ गायकत्व ,७ कवित्व, ८ कामशास्त्र, ९ दूरोदर (द्यूत), १० देशभाषालिपि ज्ञान, ११ लिपिकर्म, १२ वाचन, १३ गणक, १४ व्यवहार, १५ स्वरशास्त्र, १६ शाकुन, १७ सामुद्रिक, १८ रत्नशास्त्र, १९ गज–अश्वरथ-कौशल, २० मल्लशास्त्र, २१ सूपशास्त्र, २२ भूरुह-दोहद (बागाइत), २३ गंधवाद, २४ धातुवाद, २५ रससंबंधीं खनि-वाद, २६ बिलवाद, २७ अग्निसंस्तम्भ, २८ जलसंस्तम्भ, २९ वाच-स्तंभन, ३० वायुस्तंभन, ३१ वशीकरण, ३२ आकर्षण, ३३ मोहन-३४ विद्वेषण, ३५ उच्चाटन, ३६ मारण, ३७ कलावंचन, ३८ परकाय, प्रवेश, ३९ पादुकासिद्धि, ४० वाक्‌सिद्धि, ४१ गुटिकासिद्धि, ४२ ऐन्द्र-जालिक, ४३ अंजन, ४४ परदृष्टिवंचन, ४५ स्वरवंचन, ४६ मणि-भूमिकर्म–जमिनीवर रत्नांची मण्यांची रचना करणें, ४७ मंत्र औषधींची सिद्धि, ४८ चोरकर्म, ४९ चित्रक्रिया, ५० लोहक्रिया, ५१ अश्मक्रिया, ५२ मृत्क्रिया, ५३ दारुक्रिया, ५४ वेणुक्रिया, ५५ चर्मक्रिया, ५६ अम्बर-क्रिया, ५७ अदृश्यकरण, ५८ दन्तिकरण, ५९ मृगयाविधि, ६० वाणिज्य, ६१ पाशुपाल्य, ६२ कृषि, ६३ आसवकर्म आणि ६४ लाव-कुक्कुट-मेषादि युद्धकारक कौशल (शिवतत्त्व रत्नाकर द्वितीय तरंग). नखचित्रें ही पासष्टावी कला होय.

(आ) वात्सायन कामसूत्राच्या आधारें या चौसष्ट कलांचें वर्गीकरण असें आहे:-

वाङ्मयात्मक कला दहा — १ वाचन व पठन , २ शब्दकोशविद्या व पद्यरचना, ३ गूढकाव्यज्ञान, ४ समस्यापूर्ति, ५ न पाहिलेल्या वस्तु व अक्षरें ओळखणें, ६ सांकेतिक भाषाज्ञान, ७ अनेक भाषाज्ञान, ८ कूट प्रश्न सोडविणें, ९ तोंडी कूट प्रश्न सोडविणें, १० नकला करणें; **गृह्यकला** (घरगुती धंदे) **तीन** — ११ शिवणकला, १२ धनुष्य-बाण वगैरे करणें, १३ शय्या तयार करणें; **पाकशास्त्रकला तीन** — १४ विविध भोजन-प्रकार, १५ विविध पाकरचना व १६ विविध पेयें; **स्नान वेषभूषा वगैरे नऊ** — १७ चंदनाची उटी, १८ अलंकार घालणें, १९ सुगंधी द्रव्यें तयार करणें, २० फुलांचे दागिने, २१ पुष्पमाला बनविणें, २२ दांत वस्त्रें रंगविणें, २३ केशरचना, ६४ शिरोवेष्टनप्रकार व २५ वस्त्रांतर करणें; **हस्तव्यवसाय–**

कला नऊ — २६ नकाशा काढणें, २७ चित्रकला, २८ विविध दृश्यें दाखविणें, २९ मूर्तिकला, ३० लाकडावरील खोदकाम, ३१ रांगोळ्या, ३२ पुष्पशय्या तयार करणें, ३३ दोऱ्याचीं कृत्रिम फुलें तयार करणें व ३४ फुलांच्या गाड्या तयार करणें; **करमणुकीच्या कला अकरा** — ३५ कारंजें तयार करणें, ३६ जादुगिरी, ३७ तर्ककर्म, ३८ कोंबडे वगैरेंची लढत लावणें, ३९ पोपटांना शिकविणें, ४० विविध रितींनीं एकच गोष्ट करणें, ४१ हातचलाखी, ४२ विविध खेळ, ४३ वशीकरण विद्या, ४४ विविध वेष धारण करणें, ४५ कुचुमारानें शिकविलेली जादू करणें; **शास्त्रीय कला नऊ** — ४६ सोनें वगैरेंत हिरे बसविणें, ४७ गृहशिल्प, ४८ सोनें रुपें वगैरे परीक्षा, ४९ विविध धातूंचें ज्ञान, ५० रत्नें रंगविणें, ५१ खाणी कोठें आहेत तें ओळखणें, ५२ बागबगीचा, ५३ धातूवरील कोरीव काम, ५४ मणी रत्नें वगैरेंना भोंकें पाडणें; **संगीत कला चार** — ५५ गायन, ५६ वादन, ५७ जलतरंग, ५८ शरीर गोंदणें; **शारीरिक व्यायाम कला चार** — ५९ मुलांचे खेळ, ६० विविध व्यायामाचें ज्ञान, ६१ नृत्य आणि ६२ युद्धकलांचें ज्ञान; **नाट्यकला एक**—६३ अभिनय; **शिष्टाचारकला एक** — ६४ विविध शिष्टाचारांचें ज्ञान. (पुरुषार्थ वर्ष १० अंक ६) जैन धर्मग्रंथांत ७२ कला मानिल्या आहेत.

६५

चांगदेव पासष्टी — श्रीज्ञानेश्वरांनीं चांगदेवास केलेला अध्यात्मज्ञानाचा उपदेशग्रंथ. यांत पासष्टच ओव्या असल्यामुळें त्यास चांगदेव पासष्टी म्हणतात.

७२

बहात्तर यक्षप्रश्न § — पांडव वनवासांत द्वैतवनांत असतांना तृषाहरणासाठीं एका सरोवराकडे गेल्या वेळीं तेथील जल प्राशन करणार इतक्यांत अंतरिक्षांतून यक्षवाणी झाली कीं, माझ्या प्रश्नांचें उत्तर देईल

§ हे यक्षप्रश्न भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या संशोधित महाभारताच्या आवृत्तीवरून घेतले आहेत. आरण्यक पर्वांत बरेच पाठभेद अन्य प्रतींत आढळतात. त्यामुळें या यक्षप्रश्नांच्या संख्येबाबतहि मतभेद आहेत.

त्यानेंच हें जल प्राशन करावें असा माझा नियम आहे. परंतु क्रमानें नकुल, सहदेव, अर्जुन व भीम या चौघांनींहि यक्षप्रश्नाचें उत्तर न देतां जल प्राशन केल्यामुळें ते गतप्राण होऊन पडले. शेवटीं युधिष्ठिरानें त्या यक्षाच्या सर्व प्रश्नांचीं समर्पक उत्तरें दिल्यावर ते चौघेहि धर्माचे भ्राते जिवंत झाले. हा भाग महाभारतांत आरण्यक पर्वांत आहे. यक्ष व युधिष्ठिर यांच्यामधील हीं प्रश्नोत्तरमालिका आत्मतत्त्वाचा निर्णय करण्यासाठीं आरंभिली आहे. प्रश्न व उत्तरें खालील प्रमाणें:—

१ सूर्याला कोण उदित करतो ?—ब्रह्मापासून सूर्याचा उदय होतो.
२ त्याचे साहाय्यकर्ते कोण ?—देव हे त्याचे साहाय्यकर्ते.
३ त्याला अस्तास कोण नेतो ?—धर्म.
४ तो कशाच्या आधारानें असतो ?—सत्याच्या आधारानें.
५ पुरुष श्रोत्रिय कशानें होतो ?—वेदाध्ययन केल्यानें.
६ त्याला ब्रह्मप्राप्ति कशानें होते ?—तपानें.
७ तो साहाय्यवान् कशानें होतो ?—धैर्याच्या योगानें.
८ तो बुद्धिमान् कशानें होतो ?—वृद्ध आचार्यांच्या सेवेनें.
९ ब्राह्मणाचें देवत्व कोणतें ?—स्वाध्याय.
१० त्यांचें सदाचरण कोणतें ?—तपश्चर्या.
११ त्यांचा मानवी भाव कोणता ?—मरण.
१२ त्यांचें असदाचरण कोणतें ?—परनिंदा.
१३ क्षात्रियांचें देवत्व कोणतें ?—धनुर्विद्या.
१४ त्यांचा परंपरागत धर्म कोणता ?—यज्ञ करणें.
१५ त्यांचा मानवी भाव कोणता ?—युद्धांत भय व पलायन.
१६ त्यांचें असदाचरण कोणतें ?—शरणगताचें रक्षण न करणें.
१७ यज्ञासंबंधीं साम कोणतें ?—प्राण.
१८ तत्संबंधीं मुख्य यजुर्मंत्र कोणता ?—मन.
१९ यज्ञाला आधारभूत असें एक काय आहे ?—ऋग्वेद.
२० कशाशिवाय यज्ञाचें अस्तित्व असूं शकत नाहीं ?—ऋग्वेदाशिवाय.
२१ सर्व प्रकारें तृप्ति करणारांमध्यें श्रेष्ठ कोण ?—पर्जन्य.
२२ पितरांचें संतर्पण करणारांत उत्तम कोण ?—बीज.

२३ इहलोकीं स्वस्थतेची इच्छा करणारांना साधन ?—गाय.
२४ संततीची इच्छा करणारांना श्रेष्ठ काय ?—पुत्र.
२५ कोणता पुरुष जिवंत असून मृतवत्—देवता, अतिथी, सेवक, पितर आणि आत्मा या पांचांना जो कांहींच अर्पण करीत नाहीं तो.
२६ पृथ्वीपेक्षां श्रेष्ठ काय ?—माता.
२७ आकाशापेक्षां उंच काय ?—पिता.
२८ वायूपेक्षां चंचल काय ?—मन.
२९ मनुष्याला सर्वांत वाढत जाणारी गोष्ट कोणती ?—चिंता.
३० निद्रेंतहि डोळे मिटत नाहींत असा कोण ?—मत्स्य.
३१ उत्पन्न झालें असतां हालचाल नसतें असें काय ?—अंडें.
३२ कोणाला हृदय नाहीं ?—दगडाला.
३३ वेगानें वाढते कोण ?—नदी.
३४ प्रवाशाला मित्र कोण ?—समुदायानें असणें.
३५ सज्जनाला घरीं मित्र कोण ?—भार्या.
३६ रोग्याला मित्र कोण ?—औषध.
३७ आसन्नमरण झालेल्यास मित्र ?—दान.
३८ एकाकी मार्ग क्रमणारा कोण ?—सूर्य.
३९ पुनः पुनः जन्म घेणारा कोण ?—चंद्र.
४० शीताला औषध कोणतें ?—अग्नि.
४१ सर्वांत मोठें उत्पत्तिस्थान कोणतें ?—भूमि.
४२ धर्माच्या पर्यवसानाचें मुख्य स्थान ?—दक्षता.
४३ यशःप्राप्तीचें मुख्य साधन कोणतें ?—दान.
४४ स्वर्गप्राप्तीचें मुख्य साधन काय ?—सत्य.
४५ सुखाचें मुख्य निधान कोणतें ?—शील.
४६ मनुष्याचा आत्मा कोण ?—पुत्र.
४९ त्याचा दैवानें दिलेला मित्र कोणता ?—भार्या.
५० त्याचें जीवन कोणतें ?—पर्जन्य.
५१ त्याला मुख्य आधार काय आहे ?—दान.
५२ द्रव्यप्राप्तीच्या साधनांत उत्तम साधन कोणतें ?—दक्षता.

५३ उत्तम धन कोणतें ?—विद्याधन.
५४ उत्तम लाभ कोणता ?—आरोग्य.
५५ श्रेष्ठ सुख कोणतें ?—समाधान.
५६ इह लोकीं श्रेष्ठ धर्म कोणता ?—आश्रितांचें रक्षण.
५७ अक्षय्य फलद्रूप होणारा धर्म ?—वैदिक धर्म.
५८ कशाचें नियमन केलें आसतां दु:ख करण्याची पाळी येत नाहीं ?—मन:संयमन.
५९ कोणाची संगति केली असतां वाया जात नाहीं—सज्जनांची संगति.
६० कशाच्या त्यागानें मनुष्य प्रिय होतो ?—वृथा मान.
६१ शोक करण्याचा प्रसंग काय टाळल्यानें येत नाहीं—क्रोध.
६२ कोणत्या त्यागानें मनुष्य संपत्तिमान् होतो ?—आशा.
६३ कशाचा त्याग केल्यानें तो सुखी होतो ?—लोभ.
६४ मृत पुरुष कोणता ?—दरिद्री.
६५ राष्ट्र मृत कसें होतें ?—अराजकानें.
६६ मृत श्राद्ध कोणतें ?—अधीत ब्राह्मणाभावीं.
६७ मृत यज्ञ कोणता ?—दक्षिणारहित.
६८ कोठून आलेलें पाणी श्रेष्ठ ?—आकाशापासून.
६९ अन्न कोणतें ?—गोदुग्ध.
७० विष कोणतें ?—याचना.
७१ श्राद्धाला योग्य काल ?—स्वाध्यायतत्पर ब्राह्मणाची अनुकूलता.
७२ सर्व संपात्तिमान् असा पुरुष कोणता ?—ज्याची कीर्ति दिगंत गाजत आहे असा, प्रिय व अप्रिय, सुख व दु:ख तसेंच येऊन गेलेलें व भावी सुख–दु:ख हीं समान लेखणारा पुरुष सर्व संपत्तीनें युक्त होय.
(म. भा. संशोधित आवृत्ति आरण्यकपर्व भाग २अ.२९७)

८४

चौऱ्यायशीं आसनें— [अ] (**योगशास्त्र**) असें म्हणतात कीं,भगवान शंकरांनीं जितकी प्राणि–जाति म्हणजे चौऱ्यायशी लक्षयोनि तितकीं आसनें निश्चित केलीं होतीं, पण क्लिष्टता, अनभ्यास आणि कालातिक्रमण वगैरेंमुळें

तीं सर्व लुप्त होऊन फक्त ८४ शिल्लक राहिलीं. या ८४ आसनांत १ सिद्धासन व २ पद्मासन हीं दोन योगसाधक व बाकीचीं ८२ आसनें रोगनाशक आहेत. (कल्याण योगांक). कांहीं ग्रंथकार १ सिद्धासन, २ पद्मासन, ३ भद्रासन व ४ सिंहासन हीं चार सर्वश्रेष्ठ मानतात. (हठयोग-प्रदीपिका). पद्मासनानें भुक्ति व मुक्ति दोन्ही प्राप्त होतात. म्हणून पद्मासन अधिक मान्य आहे. अलीकडे कोणी कोणी शीर्षासनाला प्राधान्य देतात. [ब] (**कामशास्त्र**) — योगशास्त्राप्रमाणें कामशास्त्रांतहि चौऱ्यायशीं आसनें सांगितलीं आहेत. (कोकशास्त्र.)

योगी चौऱ्यायशी आसनें । तितुकींच कामशास्त्राचीं भिन्नें ।
देखतां अभ्यासमार्गीं मनें । योगी भोगी प्रेरिती ॥
(मुक्तेश्वर म. भा. सभा २-५०)

९६

शहाण्णव कुळें क्षत्रियांचीं (महाराष्ट्र) — १ अहिरराव, २ आंग्रे, ३ आंगणे, ४ इंगळे, ५ कदम–कर्दम, ६ काळे, ७ काकडे, ८ कोकाटे, ९ खंडागळे, १० खडतरे, ११ खैर, १२ गव्हाणे, १३ गुजर, १४ गायकवाड, १५ घाटगे, १६ चव्हाण, १७ चालुक्य, १८ जगताप, १९ जगदाळे, २० जगधने, २१ जाधव, २२ ठाकूर, २३ धमाले, २४ ढमढेरे, २५ ढवळे, २६ ढेकळे, २७ ढोणे, २८ तावडे–तायडे, २९ तोंवर–तुंवर, ३० तेजे, ३१ थोरात, ३२ थोटे, ३३ दरबारे, ३४ दळवी, ३५ दाभाडे, ३६ देवकांते, ३७ धर्मराज, ३८ धायबर, ३९ धुमाळ, ४० नलावडे, ४१ नालिंधरे, ४२ निकम, ४३ निसाळ, ४४ पौरव–पवार–प्रमार, ४५ प्रतिहार–परिहार, ४६ पानसरे, ४७ पांढरे, ४८ पाठारे, ४९ पालवे, ५० पालांडे, ५१ पिंगळे, ५२ पिसाळ, ५३ फडतरे, ५४ फाळके, ५५ फांकडे, ५६ फाटक, ५७ बागवे, ५८ बागराव, ५९ बांडे, ६० बाबर, ६१ भागवत, ६२ भोसले–सिसोदे, ६३ भोवारे, ६४ भोगले, ६५ भोईटे, ६६ मधुरे, ६७ मालपे, ६८ माने, ६९ मालुसरे, ७० महाडिक, ७१ म्हांबर, ७२ मुळीक, ७३ मोरे, ७४ मोहिते, ७५ राठोड, ७६ राष्ट्रकूट,

७७ राणे, ७८ राऊत, ७९ रेणुसे, ८० लाड, ८१ वाघ, ८२ विचारे, ८३ शेलार–शिलाहार, ८४ शंखपाळ, ८५ शिंदे, ८६ शितोळे, ८७ शिर्के, ८८ सालवे, ८९ सावंत, ९० साळुंखे, ९१ सांबारे, ९२ सिसोदे, ९३ सुर्वे–सुर्ये, ९४ हंडे, ९५ हरफळे व ९६ क्षीरसागर.

(क्षत्रियांचा इतिहास भाग २ रा).

१००

शंभर वर्षें (मानवाचें आयुष्य) — शंभरापेक्षां अधिक काल जगणारीं माणसें प्राचीन काळीं होतीं. चालू काळांतहि क्वचित् आढळतात. पण किमान मर्यादा शंभर मानिली आहे. शतायुर्वै पुरुषाः । (श्रुति)

१०७

एकशें सात मर्मस्थानें — ११ मांसमर्म, ४१ शिरामर्म, २७ स्नायुमर्म, ८ अस्थिमर्म आणि २० संधिमर्म. अशीं मानव शरिरांत एकूण एकशें सात मर्मस्थानें आहेत.

सप्तोत्तरं मर्मशतम् । (अष्टांग हृदय शरीरस्थान ७–२)

१०८

एकशें आठ उपनिषदें — ऋग्वेदाच्या २१ शाखा, यजुर्वेदाच्या १०९, सामवेदाच्या १००० आणि अथर्ववेदाच्या ५० अशा एकूण ११८० शाखागणिक असलेल्या उपनिषदांपैकीं प्रमुख उपनिषदें १०८ आहेत. त्यांत दशोपनिषदें (दहा अंकाखालीं पाहा) मुख्य होत.

अष्टोत्तरशतस्यादौ प्रामाण्यं मुख्यमीरितम् ॥ (रा. गी. १८-३)

या १०८ उपनिषदांव्यतिरिक्त अड्यार (मद्रास) वाचनालय संस्थेमार्फत आणखीं ७१ उपनिषदें प्रसिद्ध झालीं आहेत.

संकीर्ण

एकशें बावन्न मूर्ख — समग्र यादी दासबोध दशक २ समास १ पाहा. यांत क्रमांक १ चा अधिकारी म्हणजे " जन्मला जयांचे उदरीं । तयाशीं जो विरोध करी । सखी मानिली अंतुरी । तो एक × × ! "

(दासबोध २–१)

दोनशेंसहा अस्थि (मानव शरिराच्या)—मस्तक ८, मुख १४, कानाच्या अस्थि ६, पाठीच्या कण्याच्या अस्थि २६, उरोस्थि व फासळ्यांच्या अस्थि २५, कंठिकास्थि १, हातांच्या अस्थि ६४ व पायांच्या अस्थि ६२ एकूण दोनशेंसहा अस्थि मानव शरिरांत आहेत. सुश्रुतांत ही अस्थिसंख्या तीनशें मानिली आहे.

नऊशें स्नायु—मानव शरिरांत एकंदर नऊशें स्नायु म्हणजे दोऱ्या-सारखीं बंधनें आहेत. (सुश्रुत शारीर ५–२९)

एकवीस हजार सहाशें दैनिक श्वास—मानवी प्राण्याचे श्वासोच्छ्वास अहोरात्रांतून २१६०० होतात असा संकेत आहे. (कल्याण योगांक)

अठ्याऐंशी सहस्र ऋषि — गृहस्थाश्रमी ऋषी अठ्याऐंशी हजार वारंवार उत्पन्न होऊन प्रलयकालपर्यंत धर्मसंस्थापनार्थ या लोकांत वावरत असतात.

एवमावर्तमानास्ते वर्तन्त्याभूतसंप्लवम् ।
अष्टयशीति सहस्राणि ऋषीणां गृहमेधिनाम् ॥ (मत्स्य)

चौऱ्यांशी लक्ष योनि—जलचर ९ लक्ष, पक्षी १० लक्ष, कीटक सृष्टि ११ लक्ष, वनस्पति २० लक्ष, पशु ३० लक्ष व मानव ४ लक्ष अशी एकंदर चौऱ्यांशी लक्ष योनींची (प्राणिजाति) गणना प्राचीनांनीं केली आहे.

जलजा नवलक्षास्तु दशलक्षास्तु पाक्षिणः ।
रुद्रलक्षास्तु कृम्याद्याः स्थावराणां च विंशतिः ॥
त्रिंशल्लक्षं गवादीनां चतुर्लक्षास्तु मानवः ॥

(योगरत्नाकर भाग १ ला)

साडेतीन कोटि केश — मानव शरिरावर साडेतीन कोटि केश असतात असें परिगणन धर्मशास्त्रांत मानलें आहे.

तिस्रः कोट्योऽर्ध कोटी च यानि लोमानि मानवे ।

(धर्मसिंधु तृतीय परिच्छेद).

सात कोटि महामंत्र — महामंत्र सात कोटि आहेत असें कापिल गीतेंत सांगितलें आहे. सप्तकोटिर्महामन्त्रः । (क. गी. ३-६३).

चाळीस अब्ज तारका — आकाशगंगा हें एक विश्वचक्र आहे. यांत सुमारें ४० अब्ज तारका आहेत असें ज्योतिषशास्त्रांत मानलें आहे.

(केसरी २४ जानेवारी १९५४).

अठरा पद्में वानर — श्रीरामाचे साह्यार्थ अठरा पद्में वानरसेना होती.

(रामायण)

परिशिष्ट १ लें

शब्द–संकेत

["अनंतपारं किल शब्दशास्त्रम्" याप्रमाणें संकेतांचीहि व्याप्ति संख्यात्मक व संख्येव्यातीरिक्तहि अमाप आहे. जिज्ञासू वाचकांस ज्ञान व मनोरंजनाबरोबरच आकर्षकपणा वाटून जिज्ञासा जागृत व्हावी एवढ्या-पुरतेंच कांहीं संकेतांचें मर्यादित संकलन]

श्री — पीठस्थ आचार्यांस उद्देशून संकेतानें वापरतात. उदा० श्रीशंकराचार्य, श्रीमध्वाचार्य इ. श्री शब्द सामान्यतः श्रेष्ठत्व बोधक आहे. सामान्य यतीला श्री १०८ व पीठस्थ आचार्यांस श्री १००८ असें संबोधिलें जातें.

अर्धोदय पर्व — पौष व॥ अमावास्येचा प्रथम भोग रविवार व श्रवण नक्षत्राचा मध्यभाग व व्यातिपाताचा अत्यंभाग हे योग असले म्हणजे अर्धोदय पर्व होय. याचें पुण्य कोटि सूर्यग्रहणासमान आहे. (धर्मसिंधु)

अधिक मास — सूर्यसंक्रातिरहित चांद्रमास. चांद्रवर्षांत सुमारें तीन वर्षांनीं येणारा तेरावा महिना. हा महिना साधारणतः ३२ महिने १६ दिवस आणि ४ घटिका इतक्या कालावधीनंतर येतो. यासच धोंडा महिना, मल मास किंवा पुरुषोत्तम मास अशीं नांवें आहेत.

अमृतसिद्धि योग — रविवारीं हस्त, सोमवारीं श्रवण, किंवा मृग, मंगळवारीं अश्विनी, बुधवारीं अनुराधा, गुरुवारीं पुष्य, शुक्रवारीं रेवती व शनिवारीं रोहिणी याप्रमाणें वार व नक्षत्रयोग हा कोणत्याहि कार्यास शुभ मानलेला आहे. त्यासच अमृतसिद्धि योग म्हणतात.

अश्वत्थामा दुग्ध — पाण्यांत पीठ कालवून केलेला दुधासारखा पातळ पदार्थ. असा द्रोणाचार्यांच्या स्त्रीनें आपल्या मुलाला–अश्वत्थाम्याला-करून दिला होता अशी कथा आहे. असाच लहान मुलांच्या हट्टाच्या समजुतीचा एक प्रकार लक्षणेनें समजावयाचा.

कपिला षष्ठी — भाद्रपद वद्य षष्ठीच्या दिवशीं मंगळवार, रोहिणी नक्षत्र, व्यतिपातयोग, सूर्य नक्षत्र हस्त, इतके योग आल्यास तीस कपिला षष्ठी म्हणतात. हा अपूर्व योग बहुधा साठ वर्षांनीं येतो. ज्या गोष्टी एकत्र

जमणें अशक्य त्या आकस्मिकपणें एकत्र जमल्यास आनंदानें कपिला षष्ठीचा योग म्हणतात.

कन्यागत — कन्या राशीस गुरु येतो तो काल. हा फार शुभ समजतात. हा काल सिंहस्थानंतर येतो. तो सुमारें तेरा महिने असतो. या काळांत भागीरथी नदी कृष्णेस भेटावयास येते अशी समजूत आहे. म्हणून कन्यागतांत कृष्णास्नानास विशेष महत्त्व मानलें आहे.

कोजागिरी — आश्विन शु॥ १५. या दिवशीं रात्री लक्ष्मीप्रीत्यर्थ मध्यरात्रीपर्यंत जागून लक्ष्मी व चंद्र यांची पूजा करून दूध वगैरे पितात. कोजागर्ति म्हणजे कोण जागतो असें लक्ष्मी विचारते व जो जागा असतो त्याला संपत्ति देते अशी समजूत आहे.

घबाड मुहूर्त — सूर्य नक्षत्रापासून चंद्र नक्षत्रापर्यंत मोजून येणाऱ्या संख्येला तीन या संख्येनें गुणून गुणाकारांत चालू तिथी मिळवून आलेल्या संख्येला सातांनीं भागून बाकी तीन उरल्यास त्या दिवशीं हा योग येतो असें समजतात व तो शुभ मानला जातो.

मल्लिनाथी — मल्लिनाथ हा संस्कृत साहित्यांतील एक प्रसिद्ध टीकाकार. यानें रघुवंश, किरात, माघ वगैरे अनेक ग्रंथांवर टीका लिहिल्या असल्यामुळें मल्लिनाथी म्हणजे टीका हा अर्थ रूढ झाला.

लक्ष्मण रेषा — लक्ष्मणानें सीतेस रेषा ओढून दिली होती व त्या रेषेच्या बाहेर न जाण्यास सांगितलें होतें, व तसें न केल्यास धोका होईल असें बजावलें होतें. यावरून विशिष्ट मर्यादेचें उल्लंघन झाल्यास धोका अटळ असा संकेत.

विश्वामित्री सृष्टि — ब्रह्मदेवाशीं स्पर्धा करून विश्वामित्रानें प्रतिसृष्टि निर्माण केली अशी कथा आहे. मनुष्याच्या डोक्यासारखा नारळ, गाईऐवजी म्हैस, घोडयाऐवजीं गाढव हीं त्याचीं उदाहरणें आहेत.

विश्वामित्राचा उन्हाळा — आश्विन शु. १५ ते कार्तिक शु. १५ हा शरद् ऋतूचा मध्यकाल.

हे — बायकोनें नवऱ्याचें नांव घ्यावयाचें नसतें म्हणून पति या अर्थीं हा शब्द संकेतानें वापरला जातो. उदा. ‘ आमचे हे ’. तसेंच ‘ तिकडे ’ अथवा ‘ स्वतां ’ असाहि प्रयोग केलेला आढळतो.

परिशिष्ट २ रें

कविसंकेत

[निसर्गांत नसलेल्या पण प्राचीन कवींनीं कल्पिलेल्या कविकल्पना]

१. चक्रवाक आणि चक्रवाकी यांच्यामध्यें फक्त एक कमळाचें पान असतें, पण तीं एकमेकांस दिसत नाहींत. सारी रात्र दोघांना विरहावस्थेंत कंठावी लागते. सूर्योदयीं त्यांचें मीलन होतें.

२. स्त्रीच्या विविध हावभावांनीं पुढील वृक्ष बहरतात असा कविसंकेत आहे

स्त्रीच्या स्पर्शें **प्रियंगू**प्रति आणि **बकुला** मद्य गंडूषकांनीं।
पादाघातें **अशोका, तिलक–कुरबकां** वीक्षणालिंगनानि ॥
मंदारा नर्मवाक्यें, सुरुचिर हंसनें **चंपका** येई बार।
आम्रा फुंकें; **नमेरू** फुलति कलरवें नर्तनें **कर्णिकार** ॥

३. मृगाचे किडे आषाढांत दिसले कीं, पृथ्वी ऋतुस्नात झाली असें समजतात.

४. ग्रीष्मऋतूच्या (पावसाळ्याच्या) आरंभीं हंस मानस सरोवराकडे जातात.

५. फक्त मेघजल पिऊनच चातक आपली तहान भागावितो ॥

६. अतिशयोक्तींतच कविप्रतिभेचा विलास आहे, असा प्राचीन संकेत आहे.

७. चंद्रकांत मणि चंद्राकिरणांच्या संयोगानें पाझरतो.

८. कामधेनु ही स्वर्गीय धेनु, चिंतामणि हें स्वर्गीय रत्न व कल्पतरु हा स्वर्गीय वृक्ष हे इप्सितांची परिपूर्ति करणारे आहेत असा कविसंकेत आहे.

परिशिष्ट ३ रें

विविधसंकेत

१. उपनिषदें वेदान्तसूत्रें आणि भगवद्गीता. या प्रस्थान त्रयीवर भाष्यें लिहिल्याखेरीज आचार्य पदवी प्राप्त होत नाहीं.

२. तत्त्वज्ञान आणि विनोद यांचें साहचर्य असत नाहीं.

३. धंदेवाईकानें आपल्या व्यवसायबंधूंचें काम विनामूल्य करावें असा संकेत आहे.

४. मालमत्तेचें वाटप करणें झाल्यास वडिलानें समान वाटे करावयाचे, पण धाकट्यानें प्रथम स्वीकारावयाचा व राहिलेला मोठ्यानें घ्यावयाचा.

५. भूगर्भांतील ज्या पदार्थांचें विशिष्ट गुरुत्व जास्त आहे, जे धनवर्धिष्णु अपारदर्शक व एक प्रकाराची चकाकी देतात त्या पदार्थांना धातु म्हणावें असा संकेत आहे. (सराफ-परिचय).

६. भूमिगत धनाचें महासर्प संरक्षण करीत असतात.

७. षट्कर्णी झालेली गोष्ट सहसा गुप्त राहात नाहीं.

परिशिष्ट ४ थें संकीर्ण

वैदिक संकेत

१. वेद हे अपौरुषेय आहेत.

२. गुरूजवळ अध्ययन केल्याविना विद्या प्राप्त होत नाहीं.

सामाजिक संकेत

१. स्त्रीचा तोंडांत कुठलेंहि गुपित राहात नाहीं.

२. समाजामध्यें स्त्रीपुरुषांनीं परस्परांचा सन्मान करणें झाल्यास पुष्पमाला हातांत द्यावी.

३. वर ज्येष्ठ, वधूहि ज्येष्ठ आणि मासहि ज्येष्ठ असा त्रिवेणी संगम, विवाहास वर्ज्य मानला आहे.

४. अग्निशामक दलाचा घंटानाद ऐकला असतां साहाय्यासाठीं सर्वांनीं अविलंबें यावे हा मानव्याचा संकेत.

व्यावहारिक संकेत

१. वरिष्ठ न्यायालयाचा निवाडा, वैद्याचें प्रमाणपत्र व स्थापत्य विशारदांचा अंदाज या तीन गोष्टींत पुनर्विचार नाहीं.

सौजन्य संकेत

१. पंक्तींत भोजनसमयीं सर्वांचें झाल्याविना पंक्तींतून उठूं नये.

२. रस्त्यानें जातांना पुढील माणसाचे कांहीं रस्त्यावर सांडलें तर त्याचें लक्ष वेधणें.

३. मरणोत्तर एखाद्याविषयीं अनुदार उद्गार काढूं नयेत.

पौराणिक संकेत

१. पृथ्वी ही विष्णुपत्नी आहे असा संकेत आहे.

२. शंखध्वनि ऐकला कीं सर्व कामें स्थगित करावीं असा देवलोकींचा संकेत आहे.

वारकरी संकेत

१. आषाढी, कार्तिकी, माघी अथवा चैत्री यांपैकीं एका तरी शुद्ध ११ स गळ्यांत तुळशीची माळ घालून नियमित पंढरीची वारी करणें.

२. वारकरी म्हटला म्हणजे तो कोणत्याहि वयाचा व जातीचा असो एकमेकांनीं एकमेकास बरोबरीच्या नात्यानें नमस्कार करावयाचा असा सांप्रदायिक संकेत आहे.

धार्मिक संकेत

१ पिंडाला काकस्पर्श झाल्याविना सद्गति नाहीं असा संकेत आहे.

अध्यात्मिक संकेत

१. सर्वांभूतीं परमेश्वर आहे.

२. राधा म्हणजे जीवात्मा व श्रीकृष्ण म्हणजे परमात्मा.

संगीत शास्त्रांतील संकेत

१. दीप राग गायिल्यानें दिवे लागतात.

२. हिंदोल राग गायिल्यानें झोंपाळा आपोआप हालत राहतो.

युद्धसंकेत

१. शत्रूचा निरोप घेऊन आलेला दूत अवध्य असतो.

नैर्बंधिक संकेत

१. शंभर अपराधी सुटले तरी हरकत नाहीं, पण एका निरपराध्यास शिक्षा होऊं नये.

२. न्यायासनासमोर आलेला आरोपी आरोप शाबीत होईपर्यंत गुन्हेगार म्हणून गृहीत धरूं नये.

आंतरराष्ट्रीय संकेत

१. ज्या त्या राष्ट्राची वकिलात त्या त्या राष्ट्राची भूमि असें मानण्याचा आंतरराष्ट्रीय संकेत आहे.

जयभारत

उपसंहार

संकेत म्हणजे काय ? : कोणत्याहि भाषेंत कांहीं शब्द फार गूढार्थ-सूचक तसेंच बहुर्थसूचक असतात. अशांपैकींच संकेत हा एक शब्द आहे. याचे खूण, चिन्ह, इशारा वगैरे सर्वसाधारण अर्थ कोशांत दिले आहेत; पण याखेरीज संकेत म्हणजे सूचक सिद्धान्त (महानुभावीय वाङ्मय), अनेकांची मूक संमति किंवा रूढि (Social conventions), गृहीत व सर्वमान्य झालेल्या रूढ कल्पना, सिद्ध किंवा ठरलेल्या गोष्टी, कांहीं विशिष्ट अलिखित नियम असे अनेक अर्थ संभवतात व तसे संभाषणांत आणि वाङ्मयांत उपयोजिलेलेहि आढळतात.

२. प्रत्यक्ष शब्दांत जो अर्थ नाहीं पण जो दूरान्वयानें ध्वनित होतो म्हणजे त्या शब्दानें ध्वन्यर्थानें व लक्षणेनें दर्शित केला जातो तेथें संकेत उत्पन्न होतो. कांहीं शब्द, शब्दसमूह, संख्या आणि वाक्यें इत्यादींनींहि संकेत व्यक्त होतात, त्याचप्रमाणें साध्या अक्षरानेंहि ते व्यक्त केलेले आढळतात. कांहीं संकेत तर नुसत्या अंगविक्षेपानेंहि दाखविले जातात. इतका संकेत हा शब्द व्यापक आहे.

३. संकेताची काटेकोर व्याख्या करणें कठीण आहे, तथापि ती लवचिकांत लवचिक म्हणजे सर्वसाधारण संख्येंत सांगितलेलें ज्ञान अथवा एखादी सर्वमान्य अशी गोष्ट असा व्यापक अर्थ या ग्रंथांत आम्हीं स्वीकारला आहे व तदनुसार एकंदर ग्रंथाची मांडणी केली आहे. उदाहरणार्थ, ' कसें करूं ? काय करूं ? ' हा शब्दप्रयोग अनेक अस्थिर मनोवृत्तीच्या माणसांचे तोंडीं असतो, तो आम्हीं व्यावहारिक दृष्ट्या 'अष्टाक्षरी मंत्र' म्हणून समाजांत रूढ असल्यामुळें या ग्रंथांत समाविष्ट केला आहे. मंत्र याचा प्रत्यक्ष अर्थ निराळा व संकेतानें प्राप्त होणारा अर्थ निराळा.

४. संकेत दोन प्रकारचे असतात. एक श्रद्धाप्रधान व दुसरे कल्पना-प्रधान. श्रद्धाप्रधान संकेत वेद, पुराणें, इतिहास, वगैरे यांवर आधारलेले असतात आणि कल्पनाप्रधान संकेत हे कवींनीं निर्माण केलेले असतात. या दोन्ही प्रकारांचा अंतर्भाव या ग्रंथांत करण्यांत आला आहे.

५. **संकेताची व्याप्ति :** संकेताची व्याप्ति व क्षेत्र फार मोठें आहे. संख्येव्यतिरिक्तहि संकेत असतात, नव्हे अमाप आहेत. ते समाजांत, व्यवहारांत, बोलण्याचालण्यांत, वागण्यांत, तसेंच आचरणांत प्रत्यहीं वापरले जातात. त्या सर्वांचें संकलन हा फार मोठा विस्तार होईल व तें एकट्यादुकट्याच्या आवांक्याबाहेरचें आहे, म्हणून संख्यात्मक असेच संकेत प्रायः यांत दिले आहेत.

६. कांहीं संख्यावाचक शब्द नुसतेच वापरले जातात. त्या संख्येनें विशिष्ट बोध काय होतो हें प्रत्यक्षांत दाखविलें जात नाहीं, पण ते परंपरागत संकेतानें समाजांत पूर्णपणें ज्ञात व सार्वत्रिक असतात. याचें प्रत्यंतर देवीच्या आरतींत आढळतें तें असें:—" चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं । साही विवाद करतां पडले प्रवाहीं ॥ " या पंक्तींत चार आणि सहा म्हणजे चार वेद आणि सहा शास्त्रें, असा निश्चित अर्थ अभिप्रेत आहे व तो प्रस्तुत ग्रंथांत त्या त्या संख्येपुढें वाचकांस आढळून येईल.

७. हाच दृष्टिकोण समोर ठेवून या ग्रंथांत फक्त संख्याविशिष्ट संकेत या मर्यादित अर्थानेंच संकेत शब्दाचा विनियोग करण्यांत आला असून वाचकांनाहि संभ्रम राहूं नये व अभिप्रेत अर्थ सुगमतेनें व्यक्त व्हावा म्हणून उपसंहाराचा हा प्रपंच करावा लागला.

८. ग्रंथलेखनाचें कार्य कितीहि कसोशीनें व कुशलतेनें केलें तरी मानव हा स्खलनशील असल्यामुळें कांहीं उणीवा व दोष राहाणारच, म्हणून आरंभीं म्हटल्याप्रमाणें " न्यून ते पुरतें " याकडे वाचकांचें पुन्हां एकदां लक्ष वेधून हा उपसंहार पुरा करतों.

—संपादक

(167 Ek